Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.

# श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र. ०९/२००८.** **दिनांक १८.१०.२००८**

**स्थळ - शिर्डी कार्यालय** **वेळ- दुपारी २.३० वाजता**

श्रीसाईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीची सभा शिर्डी येथे शनिवार दिनांक १८ ऑक्टोबर, २००८ रोजी दुपारी २.३० वाजता संस्थानचे शिर्डी येथील कार्यालयात आयोजित करणेत आली असलेबाबत इकडील जा.नं.एसएसएस-वशी-०४-१५२५३-२००८, दि.१४.१०.२००८ रोजीचे पत्राने सर्व मा.सदस्यांना कळविणेत आले होते. त्यानुसार सदरहू सभा शनिवार दिनांक १८ सप्टेबर, २००८ रोजी दुपारी २.३० वाजता संस्थानचे शिर्डी येथील कार्यालयात मा. अध्यक्ष श्री.जयंत मुरलीधर ससाणे यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

या सभेस खालील मा. सदस्य उपस्थित होते.

| | | | |
|---|---|---|---|
| ०१ | मा.श्री.जयंत मुरलीधर ससाणे,अध्यक्ष | ०२ | मा.श्री.राधाकृष्ण एकनाथराव विखेपाटील |
| ०३ | मा.श्री.पांडूरंग गमाजी अभंग | ०४ | मा.श्री.सुरेश गोरक्षनाथ वाबळे |
| ०५ | मा.श्रीमती उर्मिला प्रदिप जाधव | ०६ | मा.डॉ.एकनाथ भागचंद गोंदकर |
| ०७ | मा.कॅप्टन सुरेश वासूदेवा | ०८ | डॉ.पी.एल.तिवारी |

मा.श्री.किशोर रा. मोरे
कार्यकारी अधिकारी

सभेच्या सुरुवातीस श्रीसाईबाबांची प्रार्थना करणेत येऊन शासन अधिनियमातील कलम ११ (२) नुसार आवश्यक गणपूर्ती असल्याने सभेचे कामकाज मा.अध्यक्ष, श्री.जयंत मुरलीधर ससाणे यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आले.

सदरहू सभेस काही अपरिहार्य कारणास्तव उपस्थित राहू शकत नसलेबाबत मा.श्री शंकरराव गेणूजी कोल्हे,मा.श्री शैलेश श्रीहरी कूटे, मा.श्री समि खतीब, मा.श्री रिम्पल लोहिया, मा.श्री.रमाकान्त गणेश कर्णिक मा.मा.श्री अशोक भिमाशंकर खांबेकर, मा.श्री कृष्णचंद्र श्यामसुंदर पाण्ड्ये, व मा.सौ.सुमित्रा कैलास कोते यांनी दूरध्वनीवरुन कळविले आहे, त्याची नोंद घेण्यात आली व समितीने त्यांना अनुपस्थित राहणेची अनुमती दिली.

यानंतर विषयपत्रिकेवरील विषयांवर चर्चा सुरु करण्यात आली.

**विषय नं.०१ नियोजित रुग्णालयाचे बांधकामाबाबत.**

**निर्णय क्र.७४८ (अ)** संस्थानने यापुर्वी संपादीत केलेल्या शिर्डी सर्व्हे नं. १२५, १२६ (आरक्षण क्र.३४) मधिल जमिनीवर सुपरस्पेशालिटी हॉस्पीटल व कर्मचारी निवासस्थाने उभारणेकामी बांधकाम आराखडे व इतर अनुषंगिक कामासाठी मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार, आर्किटेक्ट हाफीज कॉन्ट्रॅक्टर, मुंबई यांची आर्किटेक्ट म्हणून नेमणूक करण्यात आलेली आहे. आर्किटेक्ट हाफीज कॉन्ट्रॅक्टर, मुंबई यांना द्यावयाचे आर्किटेक्ट फीबाबत मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक २५ नोव्हेंबर, २००६ चे निर्णय क्रमांक ८९४ अन्वये सुपर स्पेशालिटी रुग्णालयाच्या भव्य प्रकल्पाची व्याप्ती लक्षांत घेता, नामांकित आर्किटेक्ट हाफीज कॉन्ट्रॅक्टर,मुंबई यांना आर्किटेक्टच्या कामापोटी २ टक्के फी अधिक प्रचलित दराने सर्व्हीस टॅक्स व इतर अनुषंगीक बाबी अदा करणेसाठी मान्यता देण्यात आली.

सदर सुपरस्पेशालिटी रुग्णालयाचे नियोजित प्रकल्पासाठी आर्किटेक्ट हाफिज कॉन्ट्रॅक्टर यांनी दि.१६/०२/२००७ चे पत्राव्दारे ढोबळ अंदाजपत्रक व नकाशे सादर केले असून त्यानुसार या प्रकल्पाचे फक्त इमारत बांधकामासाठी अंदाजे रक्कम **रुपये ७३.५० कोटी** मात्र इतका खर्च अपेक्षित आहे. सदर नियोजित प्रकल्पाचा आवाका व अंदाजित खर्चाचे परिमाण पाहतां, सदर मोठया स्वरुपाच्या प्रकल्पासाठी, प्रोजेक्ट मॅनेजमेंट कन्सल्टंट नेमणेकरीता वर्तमानपत्रात जाहिरात देऊन नामांकित प्रोजेक्ट मॅनेजमेंट कन्सल्टन्ट संस्थांकडून विषयांकित सुपरस्पेशालिटी हॉस्पीटल प्रकल्पाचे प्रोजेक्ट मॅनेजमेंट कन्सल्टन्सी सेवेसाठी अर्ज-तथा-प्रस्ताव मागविणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा. कार्यकारी अधिकारी यांनी दि. ३१/०३/२००७ रोजीचे मा. उपसमिती सभेपुढे सादर केला होता. त्यावर सविस्तर चर्चा होऊन, यापुर्वीच संस्थानने काही मोठे प्रकल्प हाती घेतलेले असल्याने त्यासाठी मोठ्या निधीची आवश्यकता भासणार आहे. सबब सदरचा प्रकल्प तूर्त होती न घेता भविष्यात पुरेसा निधी उपलब्ध झाल्यास यथावकाश प्रस्ताव पुनःश्च सादर करण्यात यावा अशी शिफारस करण्यात आली. सदरहू शिफारस दि. २८/०७/२००७ रोजी झालेल्या मा. व्यवस्थापन समिती सभेमध्ये संमत करण्यात आलेल्या निर्णय क्र. ५१४ अन्वये मान्य करण्यात आली आहे.

आता मौजे नांदुर्खी, ता. राहाता गट नं. ३३१ व ४४६ मधिल सुमारे ४२ एकर क्षेत्र असलेली जमीन संस्थानला उपलब्ध होत आहे. ही जागा श्री साईबाबा हॉस्पिटल पासून सुमारे ४.५० कि.मी. अंतरावर आहे. या विस्तिर्ण जमिनीवर नियोजीत रुग्णालयाचे बांधकाम केल्यास सुयोग्य स्वरुपात नियोजन करणे शक्य होणार आहे. यापुर्वी शिर्डी सर्व्हे कं. १२५, १२६ (आरक्षण क्र. ३४) मधिल ज्या भुखंडावर रुग्णालय इमारत बंधकाम करणे प्रस्तावीत होते. त्या भुखंडाचे क्षेत्र ४ हे ३२ आर (१०.८० एकर) इतके आहे. आता वरीलप्रमाणे सुमारे ४२ एकर इतक्या विस्तीर्ण क्षेत्राचा भूखंड उपलब्ध होत असल्याने बांधकामासाठी नवीन भूखंडाशी सुसंगत असे बांधकाम नकाशे नव्याने तयार करावे लागतील. त्यामुळे आता हा प्रकल्प हाती घेण्यासाठी वर नमूद केलेप्रमाणे दि. ३१.०३.२००७ रोजीचे मा. उपसमिती सभेपुढे सादर केलेल्या प्रस्तावानुसार प्रोजेक्ट मॅनेजमेंट कन्सल्टंटची नेमणूक करणे आवश्यक आहे.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



वरीलप्रमाणे मौजे नांदुर्खी येथील जागेवर रुग्णालय बांधकामासाठी प्रथम नियोजीत रुग्णालयाची क्षमता, स्वरुप, रुग्णांसाठी उपलब्ध करावयाच्या विविध प्रकारच्या सेवा इत्यादी अनुषंगिक गरजा प्रथम निश्चित करणे आवश्यक आहे. त्यानुसार नंतर इमारतींचे नकाशे आर्किटेक्ट यांचेमार्फत तयार करावे लागतील. त्याकरीता सर्वप्रथम या प्रकल्पासाठी या क्षेत्रातील नामांकीत व अनुभवी अशा तज्ञ हॉस्पिटल कन्सल्टंटची नेमणूक करणे आवश्यक आहे असे मत मा. वैद्यकीय संचालक, संस्थान रुग्णालये यांनी मा. कार्यकारी अधिकारी यांचेशी झालेल्या समक्ष चर्चेदरम्यान व्यक्त केलेले असलेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रकल्पाची व्याप्ती लक्षात घेता त्याचे कार्यान्वयन सुनियोजित पद्धतीने व सुलभरित्या होणेसाठी सर्वसाधारणपणे खालीलप्रमाणे कृती कार्यक्रम राबविण्यात यावा,असें ठरलें.

(०१) मौजे नांदुर्खी,राहाता येथील उपरोक्त जागा संस्थानचे नावावर करुन त्याचा ताबा घेणे, सरकारी मोजणी करणे, इ.आवश्यक ती पूर्तता करण्यात यावी.

(०२) सदर जमिनीचे हद्दीवर तीन फुट उंचीचे बांधकाम व त्यावर चेनलिंक केसिंग या स्वरुपाचे कम्पाऊंडचे बांधकाम करण्यात यावे. त्यासाठी येणारे योग्य त्या अपेक्षित खर्चास मान्यता देण्यात आली.

(०३) नियोजित रुग्णालयाची क्षमता, स्वरुप, रुग्णांसाठी उपलब्ध करावयाच्या विविध प्रकारच्या सेवा, प्रत्येक विभागासाठी आवश्यक चटई क्षेत्र इ.अनुषंगिक गरजा प्रथम निश्चित करणेसाठी मा.विश्वस्त, मा.कार्यकारी अधिकारी,मा.वैद्यकीय संचालक व इतर संबंधित अधिकाऱ्यांनी सेठी हॉस्पिटल, अपोलो हॉस्पिटल, बिर्ला हॉस्पिटल, मंगेशकर हॉस्पिटल, एशियन हार्ट इन्स्टीट्यूट तसेच श्रीराम हॉस्पिटल,गुरगाव इ. नामांकित रुग्णालयांची पहाणी करुन आवश्यक माहिती संकलीत करावी.

(०४) मा.वैद्यकीय संचालक यांनी या प्रकल्पासाठी नामांकित व तज्ज्ञ अशा हॉस्पिटल प्रोजेक्ट कन्सल्टंटची नेमणूक करणेकामी वर्तमानपत्रातील जाहिरातीद्वारे अर्ज मागवावेत.

(०५) सदर प्रकल्पाकरिता आर्किटेक्ट नेमणूकीसाठी मोठ्या हॉस्पिटल बांधकामातील अनुभवी व नामांकित अशा आर्किटेक्टस्‌बाबत माहिती घेऊन प्रस्ताव सादर करावा.

(कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

**विषय नं.०२** **मौजे निमगाव कोऱ्हाळे येथील गट नं.१९८, १९९, २०० मध्ये साई गार्डन उभारणेबाबत.**

**निर्णय क्र.७४९** " श्रीं " चे दर्शनासाठी येणाऱ्या साईभक्तांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. त्याच प्रमाणात त्यांना सोयी सुविधाही वाढवाव्या लागत आहे. मंदिर परिसरात साईभक्तांसाठी अनेक सोयी सुविधा निर्माण करण्यात आल्या आहेत. मंदिर परिसरातील असणारी गर्दी कमी करण्याचे दृष्टीने अनेक उपाय- योजना करण्यात आल्या आहेत. मंदिर परिसरात फारशा आवश्यक नसणाऱ्या सुविधांपैकी मंदिर परिसरात असणारी कॅन्टीन व लाडू काउंन्टर प्रसादालय परिसरात हलविण्यात आले आहे. "श्रीं" ची दर्शन रांगही मंदिर परिसराचे उत्तर बाजूकडील पिंपळवाडी रोडचे फुटपाथवरुन करण्यात आली आहे.

समाधी मंदिरातून दर्शन घेऊन बाहेर पडणाऱ्या भक्तांची मंदिर परिसरात मोठ्या प्रमाणावर गर्दी असते. गर्दीत दर्शन घेऊ इच्छिणाऱ्या भक्तांची भर पडतच असते यासाठी मंदिर परिसरातील भक्तांची गर्दी पसरविण्यासाठी उपाय- योजना करण्याचे ठरले आहे. शिर्डी येथे येणाऱ्या साईभक्तांसाठी दर्शना व्यतिरिक्त आणखी आकर्षक केंद्र बनविल्यास समाधी मंदिर परिसरातील गर्दी कमी होईल याकरीता मौजे निमगांव कोऱ्हाळे येथील संस्थानचे गट नं. १९८, १९९, २०० मध्ये मा. व्यवस्थापन समितीचे दि. १७.०२.२००७ रोजीचे सभेत साईगार्डन करण्याचे ठरले आहे. त्यामध्ये खालील बाबींचा समावेश असेल.

०१. साईभक्तांना आकर्षित करणे.

०२. साईबाबा संस्थानसाठी मोठ्या स्वरुपाचे कार्यक्रम आयोजित करणेकरीता योग्य अशी जागा निर्माण करणे.

०३. श्री साईबाबांच्या काळातील व जीवणावरील माहिती आकर्षक व देवाणघेवाणीच्या स्वरुपात उपलब्ध करणे.

०४. जे साईभक्त श्रीसाईबाबांचे उद्देशाबाबत अकलन व जागृती करण्यास उत्सुक असतील त्यांना संधी उपलब्ध करुन देणे.

सदर नियोजित प्रकल्प सुमारे १५ ते २० एकर जागेवर उभारण्यात येईल. तेथे जाण्यासाठी मंदिर परिसरापासून शटल बससेवा उपलब्ध असेल. श्री साईबाबा गार्डनमध्ये खालील प्रमाणे सोयी - सुविधा असतील.

**०१. सुशोभित कम्पांउड भिंत बांधणे.**

**०२. लॅण्ड स्केपिंग** :- यामध्ये सॉफ्ट लॅण्डस्केपिंग, वॉटर फ्युचर, बेंचेस, पेव्हेलियन, लायटिंग, सिंगीग, रोड, पार्किंग इ. सह.

**०३. थिम डिस्प्ले** :-

०१. साईबाबा थ्रीडी इमेज ०२. पेपर गोस्ट स्पेशल इफेक्टस

०३. हॉलोग्राफिक डिस्प्ले.

०१. उपहारगृह ०२. स्टॉल्स ०३. रेल्वे, बस, ट्रेन बुकींग

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



०४. पीआरओ सेंटर ०५. हरवले सापडले ०६. प्रशासकिय इमारत
०७. लायब्ररी ०८. रिसर्च व नेटवर्कींग ०९. प्रकाशने विभाग
१०. आर्ट गॅलरी, हॉल्स १२. साईम्युझियम १३. लहान मुलांसाठी म्युझियम
१४. देणगी १५. सार्वजनिक सोयीसुविधा, इमारत अंतर्गत सुशोभिकरण व फर्निचर

याव्यतिरीक्त लॅण्ड स्कॅप सुविधेमध्ये थ्री डी इमेज, वॉकींग ट्रॅक्स, पॅव्हेलियन, लहान मुलांसाठी जागा, ध्यानधारणां करण्यासाठी सुविधा भजनासाठी म्युझिक गार्डन तयार करणे याचा समावेश असेल.

थ्री डी इमेजमध्ये अंतर्गत व बाह्य वॉटर स्कीन करणे. वॉटर फॉटनप्रमाणे पंप सिस्टीम वापरुन यामध्ये इमेज तयार केली जाते. सदर इमेज स्थिर अथवा हलती ठेवता येते. वेगवेगळ्या स्वरुपातील इमेज आपणांस यामध्ये तयार करता येतील.

म्युझियम अंतर्गत भागामध्ये Peppers Ghost Illusion व Holographic Projection तंत्राचा वापर करुन प्रतिमा तयार करणे. आर्किटेक्ट यांनी उपरोक्त बाबींचे रु. ४६.२३ कोटी रकमचे ब्लॉक एस्टीमेट सादर केले होते.

यावर मा. व्यवस्थापन समितीचे दि. १७.०२.२००८ रोजीचे सभेत यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, सदरचे काम निमगांव को-हाळे येथील गट नं. १९८, १९९ व २०० येथील जागेत आर्थिक निधीनूसार खालील प्रमाणे तीन टप्प्यात करण्याचें ठरलें आहे.

०१. प्रथम वर्षे - १९ कोटी
०२. दुसरे वर्षे - १५ कोटी
०३. तिसरे वर्षे - १२ कोटी

त्यानूसार आर्किटेक्ट सोनीया काप्रे, नवि दिल्ली यांना प्रस्तावीत साईगार्डनचे कामाचे नियोजनाचे दृष्टीने करावयाचे टप्पे, टप्यानुसार करावयाच्या कामाचे तपशिलवार आराखडे, अंदाजपत्रके, निवीदा मसुदा तसेच नियोजित गार्डनमध्ये करावयाचे सोयीसुविधा बाबत वेगवेगळे सल्लागारांची नेमनूक करणे इ. बाबींची पुर्तता करणे व याबाबत मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सदर प्रकल्पाचे सादरी करणाबाबत आर्किटेक्ट यांना दि. ०९ ऑक्टोबर, २००८ चे पत्रान्वये कळविणेत आलेले आहे.

उपरोक्त बाबीबाबत आजचे मा. व्यवस्थापन समितीचे सभे समोर आर्किटेक्ट श्रीमती सोनीया काप्रे, नवि दिल्ली यांनी प्रस्तावीत साईगार्डन प्रकल्पाचे सादरीकरण (Presentation ) व तपशीलवार माहिती सादर केली.

तसेच खालील बार्बीकरीता आर्किटेक्ट यांनी योग्य ते सल्लागार न मिळाल्यामुळे संस्थान मार्फत सदर सल्लागार यांची नेमणूक करणे व फी ठरविणे योग्य राहील असे सांगितले.

०१. वॉटर स्क्रिन कम लेझर शो डिझाईन करणे व सूपरव्हिजन करणे.
०२. म्युझियमचे करिता संशोधन, कथालेखन व थिमसाठी स्क्रिप्ट रायटर नेमणे.
०३. म्युझियमचे विशेष प्रकारचे प्रदर्शनासाठी परिमानकारक, डिझाईन व ले आऊट साठी सल्लगार नेमणे.
०४. श्री साईबाबांचे जिवनावर आधारीत Documentry तयार करणेबाबत कार्यवाही करणे.

साईगार्डन साठी उपरोक्त बाबी व्यतिरीक्त करावयाचे सोयी-सुविधा ( बांधकाम,प्लंबिंग व सॅनटरी इलेक्ट्रीकल इ. कामासाठी) साठी रु. ३५.५० कोटी मात्र रकमेचे एस्टीमेट सादर केले होते. यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरविण्यात आले की, आर्किटेक्ट यांनी सूचविलेप्रमाणे उपरोक्त कामी सल्लागार नेमणे व साईगार्डनचे बांधकाम व अनुषंगिक कामासाठी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन निविदा मागविण्यात याव्यात,असे ठरलें. (कार्यवाही- बांधकाम विभाग प्रमुख)

**विषय नं.०३** **मौजे निमगांव को-हाळे येथील गट नं.१८३ मध्ये बहूउद्देशिय हॉल बांधणेबाबत**

**निर्णय क्र.७५०** **(अ)**मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक २४ मे, २००८ रोजीचे सभेत मौजे निमगांव को-हाळे येथील गट नंबर १८३ मध्ये बहूउद्देशिय हॉल बांधणेकामी निर्णय क्रमांक ४२८ खालीलप्रमाणे झालेला आहे :

".. .. थोडक्यात उपरोक्त परिच्छेदात नमुद केल्याप्रमाणे, श्री. जयंत केणी, मुंबई यांनी बहुउद्देशीय हॉल प्रकल्पासाठी आर्किटेक्ट म्हणून नेमणूक करण्यात यावी, असे सुचविलेले आहे. त्यास अनुसरुन, मौजे निमगांव को-हाळे शिवारातील गट नंबर १८३ मध्ये बांधावयाचे बहुउद्देशीय हॉलचे प्रेझेंटेशन देणेसाठी आमंत्रित करणेस आणि सदरहू प्रकल्पाचे सविस्तर बांधकाम आराखडे व अंदाजपत्रक श्री.जयंत केणी, मुंबई यांच्या सिध्दीविनायक असोसिएटस्, कळवा, जिल्हा ठाणे या संस्थेकडून करुन घेणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. "

उपरोक्त निर्णयास अनुसरुन, मे.सिध्दीविनायक असोसिएटस्, कळवा (आर्किटेक्ट जयंत केणी) यांना दिनांक १२ जून, २००८ रोजीचे पत्रान्वये मौजे निमगांव को-हाळे शिवारातील गट नंबर १८३ मध्ये बहूउद्देशीय हॉल उभारणेकामी प्राथमिक बांधकाम आराखडे व अंदाजपत्रक तयार करणेबाबत कळविणेत आलेले होते.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



**(ब)** मे.सिध्दीविनायक असोसिएटस्, कळवा (आर्किटेक्ट जयंत केणी) यांनी दिनांक १० जुलै, २००८ रोजी बहुउद्देशीय हॉलच्या विविध संकल्पना मा. कार्यकारी अधिकारी व वरिष्ठ मुख्य अभियंता यांचे समक्ष सादर केल्या होत्या. सदरहू संकल्पनांमध्ये मा. कार्यकारी अधिकारी व वरिष्ठ मुख्य अभियंता यांनाही काही बदल सुचवून बहुउद्देशीय हॉलचा प्राथमिक बांधकाम आराखडा व अंदाजपत्रक तयार करण्याच्या सूचना आर्किटेक्ट केणी यांना दिल्या होत्या.

त्यानुसार आर्किटेक्ट जयंत केणी यांनी आज रोजी बहुउद्देशीय हॉल बांधकामाविषयी तयार केलेली संकल्पचित्रे मा.अध्यक्षसाो. यांचेसमोर सादर केली होती. आर्किटेक्ट केणी यांनी, त्यांनी सादर केलेल्या विविध संकल्पचित्रांनुसार बहुउद्देशीय हॉल बांधकामासाठी अंदाजित रक्कम रुपये २० (वीस) कोटी मात्र इतका खर्च येईल, असे सांगितले.

यावर मा.अध्यक्षसाो. यांनी असे सांगितले की, आर्किटेक्ट यांनी सादर केलेल्या बहुउद्देशीय हॉलच्या संकल्पना योग्य व स्वीकारार्ह आहेत तथापि त्यांनी सादर केलेल्या संकल्पना अत्यंत उच्च दर्जाच्या आहेत, त्यामुळे सदरहू बांधकाम प्रकल्पास येणारा खर्च भविष्यात वाढू ही शकतो. ही बाब लक्षात घेऊन सर्वसाधारण अद्यायावत सुविधा असलेल्या बहुउद्देशीय हॉल बांधकामासाठी अंदाजित रक्कम रुपये १० कोटी मात्रच्या खर्चाचा बांधकाम आराखडा तयार करावा.

उपरोक्त चर्चेस अनुसरुन, आर्किटेक्ट जयंत केणी यांचेकडून मौजे निमगांव कोऱ्हाळे शिवारातील गट नंबर १८३ मध्ये उभारणी करावयाचे बहुउद्देशीय हॉलचे बांधकाम आराखडे व अंदाजपत्रक तयार करवून घेऊन, ते यथावकाश मा.व्यवस्थापन समितीच्या मंजुरीसाठी सादर करणेत यावेत, असे ठरले.

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**विषय नं.०४ मंदिर परिसर व सध्याचे प्रसादालय परिसरात साईभक्तांसाठी वाढीव सोयी-सुविधा निर्माण करणेबाबत.**

**निर्णय क्र.७५१.** मंदिर परीसरात साईभक्तांसाठी वेळोवेळी आवश्यकतेनुसार सोयी सुविधा निर्माण करण्यात आल्या आहेत. शिर्डी येथे "श्रीं" चे दर्शनासाठी साईभक्तांची दिवसेंदिवस गर्दी वाढत आहे. त्यामुळे सदर सोयी-सुविधांमध्ये आणखी वाढ करणे आवश्यक आहे. सदरहू बाबतीत आजअखेर खालीलप्रमाणे कार्यवाही करणेत आलेली आहे.

१) समाधी मंदिराचे उत्तर बाजुकडील सभाकुंडासमोरील स्टेज व कारंजा काढून टाकणेत आलेला आहे.

२) मदिर परिसरातील कॅन्टीन व लाडू प्रसाद विक्री काउंटर प्रसादालय परिसरात स्थलांतरीत करणेत आलेले आहेत.

३) गुरुस्थान मंदिरासमोरील ध्यानमंदिर (बेसमेंट) इमारतीचा अथवा त्या जागेचा योग्य तो वापर करणेबाबत प्रस्ताव तयार करणेबाबत आर्किटेक्ट यांना कळविण्यात आले आहे.

४) मंदिर व मंदिर परिसरात उत्सवाच्या, सुट्टयांच्या कालावधीमध्ये भक्तांची खूपच गर्दी होते. उन्हाळयात व पावसाळयात साईभक्तांना ऊन, पावसाचा खूपच त्रास सहन करावा लागतो. पादचारी मार्गापैकी, मंदिराकडील बाजूच्या पादचारी मार्गावर कायमस्वरुपी सुशोभित छत उभारण्यात यावे. तसेच पिंपळवाडी रस्त्यास (मनोजकुमार गोस्वामी मार्ग ) दोन्ही बाजूस पादचारी मार्ग तयार करण्यात आलेला आहे. या पादचारी मार्गावर दर्शन रांगेची व्यवस्था करणेत आलेली आहे. त्यावर सुशोभित छत उभारणेबाबत स्वतंत्र प्रस्तावानुसार कार्यवाही सुरु आहे.

५) समाधी मंदिरातून दर्शन घेऊन बाहेर पडणाऱ्या भक्तांची मंदिर परिसरात मोठया प्रमाणावर गर्दी असते. या गर्दीमध्ये दर्शन घेऊ इच्छिणाऱ्या भक्तांच्या गर्दीची भर पडत असते. यासाठी मंदिर परिसरातील भक्तांच्या गर्दीचे विकेंद्रीकरणासाठी करणे आवश्यक आहे.

उपरोक्त अ.नं. ५ बाबत आर्किटेक्ट सोनिया काप्रे, नवि दिल्ली यांनी दि. १६.१०.२००८ रोजीचे ई. मेल व्दारे प्राप्त प्रस्तावामध्ये खालील प्रमाणे बाबी समाविष्ट केलेल्या आहेत :-

१) जुन्या प्रसादालयाच्या जागेवर दर्शन रांगेसाठी इमारत प्रस्तावीत केली आहे. सध्याचे मंदिर परिसरातील अत्यावश्यक व पुरातन इमारती ज्यांना धार्मीक दृष्ट्या महत्व आहे, अशा इमारती तशाच ठेऊन उर्वरीत भागात बगीचा विकसीत करणे.

२) यामुळे मंदिर परिसरास आकर्षक रुप येऊन हिरवळीमुळे परिसरात रमणिय वातावरण होऊन सुरक्षा व्यवस्थेवरुन ताण कमी करण्यास मदत होईल.

३) प्रसादालयाची जागा पिंपळवाडी रस्त्यामुळे मंदिर परिसरापासून वेगळी झाल्याने पिंपळवाडी रस्त्याखालून रुंद भुयारी मार्ग प्रस्तावीत केला आहे.

४) पुर्वीच्या प्रस्तावानुसार साईभक्तांचे गट करुन प्रतिक्षा कक्ष तयार करुन समाधि मंदिरातील अगोदरचा गट बाहेर आल्यानंतर पुढील गटास प्रवेश देणे या क्रमाने व्यवस्था केल्यास व त्याबाबत प्रतिक्षा कक्ष तयार करणे, इलेक्ट्रॉनिक फलकाव्दारे दर्शनाची वेळ सुचीत करणे.

५) दर्शन रांगेच्या पूर्ण लांबीत सर्व माळ्यावर देणगी कक्ष, प्रसाद, उदी, नारळ, कॅन्टीन सुविधा, पुस्तक विक्री, देणगी आलेल्या वस्तू विक्री, चप्पल, मोबाईल, स्टोअर्स इ. सुविधा निर्माण करून आत जाणाऱ्या व दर्शन घेऊन बाहेर येणाऱ्या भक्तांना देवाण घेवाण करता येईल.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



६) प्रसादालयाची जागा नगर- मनमाड रस्त्यापेक्षा ५'.०० " खाली असल्याने नियोजित दर्शनरांगेचे प्रवेशद्वार रस्त्याच्या पातळीवर घेतल्यास तळघरास (बेसमेंट) प्रकाश व वायुविजन चांगल्या प्रकारे करता येईल.
७) दर्शन रांग पिंपळवाडी रस्त्यावर प्रस्तावीत भुयारी मार्गाने मंदिराकडे आणता येईल.
सर्व माळ्यावर (बेसमेंटसह) दर्शन रांग व सार्वजनिक दालनातिल इतर सुवीधा वेगळ्या करता येतील.
८) प्रसादालय परिसरातील जागेचे क्षेत्रफळ २४३४७.०० चौ. मी. आहे, पैकी १६६०० चौ. मी. बांधकाम तळमजला अधिक ३ माळे स्वरुपात करता येईल. तसेच या इमारतीत खालील प्रमाणे व्यवस्था करता येईल.

| | | |
|---|---|---|
| ०१. | बेसमेंट | शॉप्स, प्रसाद काउंटर, कॅन्टीन, दर्शन रांग |
| ०२ | तळमाळा | प्रवेशद्वार, माहिती केंद्र, क्लोकरुम व दर्शन रांग |
| ०३. | पहिला माळा | दर्शन रांगेसाठी सोयी सुविधा |
| ०४. | दुसरा माळा | सुरक्षा, प्रशासन व इ. व्यवस्था. |

वरीलप्रमाणे आर्किटेक्ट माथुर ॲण्ड काप्रे, नवि दिल्ली यांनी मंदिर परिसर व सध्याचे प्रसादालय परिसरात साईभक्तांसाठी वाढीव सोयी सुविधा निर्माण करणेबाबत प्रस्ताव सादर केला आहे.

आर्किटेक्ट यांनी सध्याचे प्रसादालय नविन जागेत स्थलांतरीत झाल्यानंतर साईभक्तांच्या वाढीव सोयी-सुविधा निर्माण करण्यासाठी करावयाचे बदलांबाबत सादरीकरण करुन तपशीलवार माहिती सभेस दिली. साईभक्तांना सोयी सुविधा उपलब्ध व्हाव्या म्हणून सुधारीत दर्शन रांग, प्रतिक्षागृह, चप्पल स्टॅण्ड, मोबाईल लॉकर्स, साईभक्तांचे लगेजसाठी लॉकर्स, बुकस्टॉल, कापडकोठी, लाडू प्रसाद काऊंटर्स,चहा,कॉफी,दुध व स्नॅक्स उपलब्ध होणेसाठी उपहारगृह,उदीवाटप केंद्र,नारळ फोडण्याची व्यवस्था,देणगी काऊंटर्स,बँक काऊंटर्स,अभिषेक व पारायण कक्ष,व्यवस्थापन समिती व प्रशासकीय कामकाजासाठी व्यवस्था,संरक्षण व्यवस्था,माहिती व सुविधा केंद्र,डिस्प्ले बोर्ड सिस्टिम, Audio-Video सीसीटीव्ही व्यवस्था,आवश्यक भांडार,उदी पॅकींग व्यवस्था,उत्सव कार्यक्रम व्यवस्था,पालखी दर्शन व्यवस्था,तसेच इतर सर्व बाबींचा सविस्तर अभ्यास करुन आवश्यक तेथे सल्लागारांचा,आर्किटेक्टस् यांचा सल्ला घेऊन प्रस्ताव व्यवस्थापन समितीपुढे यथावकाश सादर करावा असा प्रस्ताव तयार करणेकामी येणाऱ्या अनुषंगिक सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही- बांधकाम विभाग प्रमुख)

**विषय नं.०५ शैक्षणिक संकुल स्थलांतरीत करणेबाबत.**

**निर्णय क्र.७५२** संस्थान संचलीत शैक्षणीक संकुलामध्ये श्री साईबाबा इंग्लिश मेडीयम स्कूल, कन्या विद्या मंदिर, कनिष्ठ महाविद्यालय व औद्योगिक प्रशिक्षण केंद्र सध्या भक्तनिवास परिसरात सुरु आहे. शाळेमध्ये विद्यार्थांच्या संख्येत झालेली वाढ तसेच नव्याने सुरु केलेले कनिष्ठ महाविद्यालय यामुळे शैक्षणिक संकुलाची जागा अपुरी पडत आहे. त्यामुळे कनिष्ठ महाविद्यालय जिल्हा परिषद शाळेच्या इमारतीत सध्या स्थलांतरीत करण्यात आले आहे. शैक्षणिक संकुलालगत साईबाबा भक्तनिवास इमारत आहे. त्यामुळे तेथे उतारणाऱ्या भक्तांची वर्दळ मोठ्या प्रमाणात असते. तसेच त्या ठिकाणी साई आश्रम प्रकल्पाचे कामही सुरु आहे. साई आश्रम प्रकल्पात सुमारे १५७० खोल्यांचा समावेश आहे. त्यामुळे या परिसरातील गर्दीत मोठ्या प्रमाणात वाढ होईल. सध्या असलेली व संभाव्य गर्दीचा विचार करीता सदर परिसर शैक्षणिक दृष्या गैरसोयीचा होईल. करीता शैक्षणीक संकूल स्थलांतरीत करणे आवश्यक आहे.

सध्या संस्थानकडे आरक्षण क्र. ३४ मधील रुग्णालयाकरीता आरक्षीत असलेली लोढा यांचेकडून खरेदी केलेली जमिन ८.५ एकर इतकी उपलब्ध आहे. प्रस्तावीत रुग्णालयाचे बांधकाम नांदुर्खी येथील जमिनीत करणेबाबत चर्चा झाली आहे. त्यामुळे आरक्षण क्र. ३४ मधील रुग्णालयाऐवजी शैक्षणिक संकूल असा बदल करुन तेथे शैक्षणीक संकुल उभारणीचा प्रकल्प हाती घेता येईल अथवा श्री शेळके यांचेकडून खरेदी केलेले स.नं. १२४/११ व १२४/१२ मधील आरक्षण क्र. ३१ प्राथमिक शाळा व प्ले ग्राउंड ०३ एकर क्षेत्रात आय.टी.आय. व्यतिरिक्त शैक्षणिक संस्थेचे काम करता येईल व आय.टी.आय. करीता पर्यायी जागेचा विचार करता येईल अथवा नविन जागा खरेदी करुन शैक्षणिक संकुलाची तेथे उभारणी करता येईल असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, शैक्षणिक संकुलासाठी जागा उपलब्धतेचा विचार करुन प्रस्ताव तयार करणेत यावा तसेच सध्या असणाऱ्या शैक्षणिक संकुलातील इंग्लिश मिडीयम स्कुल व कन्या विद्या मंदिर आहे त्याच ठिकाणीच ठेवता येतील काय या पर्यायांचा विचार करुन जागेची निश्चिती झालेनंतर प्रस्ताव सादर करावा.
(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**विषय नं.०६ नविन वॉटर ट्रीटमेंट प्लॅन्टबाबत.**

**निर्णय क्र.७५३** सदरहू विषयाबाबत पूढे निर्णय क्र.७५४ मध्ये चर्चा झालेली आहे.

**विषय नं.०७ पाणी पुरवठ्यासाठी धरणातून थेट पाईपलाईन टाकणेबाबत.**

**निर्णय क्र.७५४** श्री साईबाबा संस्थानसाठी शासनाच्या मान्यतेने सन १९९४ पासून धरणाच्या उजव्या कालव्याद्वारे पाणी पुरवठा होत आहे. त्यासाठी ३० दिवसांसाठी १२५८३३३३३ लिटर्स इतका पाणी कोठा मंजुर आहे. सदर पाण्याचा साठा कनकुरी शिवारात १३.२१ हेक्टर क्षेत्रात मातीचा तलाव करुन करण्यात येत आहे. सदरच्या तलावाशेजारी संस्थानने जलशुध्दीकरण केंद्र कार्यान्वीत केलेले असुन, त्या ठिकाणाहुन कनकुरी, पिंपळवाडी, व श्री साईबाबा संस्थान यांना पाईप लाईनद्वारे पाण्याचा पुरवठा करण्यात येत आहे.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



सध्या श्री साईबाबा संस्थानचे प्रसादालय, हॉस्पीटल, कर्मचारी निवासस्थाने, भक्तनिवासस्थाने, पोलीस कॉलनी, कर्मचारी हौसींग, शाळा, विश्रामगृह, पिंपळवाडी व कनकुरी गाव या सर्वांसाठी मिळून दैनंदिन सुमारे ३० लक्ष लिटर्स पाण्याची आवश्यकता आहे.

दैनंदिन सुमारे ५० हजार ते २ लाख ऐवढे साईभक्त साईंचे दर्शनासाठी शिर्डीस येत आहेत. दिवसेंदिवस शिर्डीस श्री साईंचे दर्शनासाठी येणा-या भक्तांचे संख्येत लक्षणीय म्हणजे दरवर्षीसुमारे २५% वाढ होत आहे. त्यामुळे संस्थानने तयार केलेल्या साठवण तलावात साठा केलेले पाणी याआधी ९० दिवसांपर्यंत पुरु शकत होते. परंतू भक्तांची वाढलेली गर्दी व त्यामुळे पाण्याचा होणारा दैनंदिन वापर यामुळे साठा केलेले पाणी ९० दिवसांऐवजी केवळ ४५ दिवस पुरते अशी परिस्थीती निर्माण झालेली आहे. त्यासाठी साठवण तलावाची क्षमता वाढविणे आवश्यक झाले आहे. करीता तलावाचे पश्चिम बाजुस कॅनाल पर्यंत असलेल्या जमिनी संपादन करुन वाढीव पाणी साठयासाठी तलाव वाढविणे आवश्यक आहे.

संस्थानचे प्रसादालयात सद्यस्थितीत दैनंदिन सुमारे २५ ते ३० हजार व सुटयांचे कालावधीत दैनंदिन सुमारे ५० ते ६० हजार भक्त प्रसाद भोजन घेत आहेत. संस्थानकडे भक्तांसाठी असलेली निवासव्यवस्था सध्या १० हजार व्यक्तींपुरतीच मर्यादीत आहे. संस्थानने चेन्नई येथील साईभक्त श्री. के. व्ही. रमणी यांचे सहकार्याने सुमारे १५ हजार भाविकांची निवास व्यवस्था होईल ऐवढे मोठे "श्री साईआश्रम" प्रकल्पाचे काम सुरु केले असुन ते अल्पावधीत पुर्णत्वास येईल. तसेच धर्मशाळा इमारतीचे शेजारी ३२० खोल्यांचे द्वारावती या भक्त निवासाचे काम पुर्णत्वास आले आहे. त्याच बरोबर संस्थानने एकाचवेळी सुमारे साडे पाच हजार साईभक्त भोजन घेवू शकतील असे विस्तीर्ण व प्रशस्त साई प्रसादालय संस्थानने बांधलेले असून अल्पावधीत ते सुध्दा कार्यान्वीत होत आहे. शेती महामंडळाचे खरेदी केलेल्या जागेत १०० खोल्यांची नविन सेवाधाम इमारत व त्यालगत साईप्रसाद हौसींग सोसायटीच्या इमारती बांधलेल्या आहेत. याशिवाय वर्षभरात रेल्वे सुरु झाल्यानंतर भक्तांची गर्दी दुप्पट होण्याची संभावना आहे.

उपरोक्त प्रमाणे नमूद केलेल्या, लवकरच कार्यान्वीत होणा-या प्रॉजेक्टसाठी दैनंदिन सुमारे २० लाख लिटर्स वाढीव पाण्याची आवश्यकता संस्थानला लागणार आहे.

भाविकांच्या मनोरंजासाठी शेगांव अथवा हैद्राबाद येथील गार्डनचे धर्तीवर बगीचा उभारणी करणेचाही संस्थानचा मानस आहे. त्यासाठी, तसेच संस्थानचे संभाव्य व नियोजित वाढीव प्रकल्पांसाठी पाण्याची मोठया प्रमाणात आवश्यकता भासणार आहे. हे सर्व विचारात घेवून संस्थानसाठी वाढीव पाणी पुरवठा योजना तयार करुन ती कार्यान्वीत करण्यासाठी ठोस निर्णय घेणे ही काळाची गरज आहे.

संस्थानच्या साठवण तलावाला पाणी वाहून आणणारे कालवे ब्रिटिशकालीन असुन जुने झालेले आहेत तसेच नदयामध्ये सांडपाणी, रासायनिक द्रव्ये, घाण मिसळल्याने व तेच पाणी कालव्याद्वारे वाहून येत असल्याने या पाण्यावर प्रक्रियेचा खर्च वाढतो. बंद पाईपमधून धरणाचे पाणी आणल्यास ते शुध्द स्वरुपात असेल व पुरवठाही खात्रीचा असेल.

संस्थानचा सध्याचा वॉटर ट्रिटमेंट प्लॅन्ट अपुरा असल्याने व्यवस्थापन मंडळाने हा प्लॅन्ट वाढविण्यास परवानगी दिली आहे. मात्र हा प्लॅन्ट वाढविला तरी त्या प्रमाणात पाणी साठा वाढणे आवश्यक आहे. शिवाय या प्लॅन्टसाठी जवळपास साठेसात कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. थेट धरणातून पाणी आणण्याचा प्रकल्प राबविल्यास त्या खर्चात वॉटर ट्रिटमेंट प्लॅन्टही समाविष्ट असेल. त्यामुळे फक्त प्लॅन्ट उभारण्यापेक्षा दारणा धरणातून पाणी आणण्याची योजना राबविणे संस्थानचे दृष्टीने हितकारक ठरेल असे मत आहे.

मात्र या प्रकल्पाला जेवढा उशिर होईल तेवढी खर्चात वाढ होत जाणार आहे.

या प्रकल्पासाठी भाविकांना आवाहन केल्यास चांगला प्रतिसाद मिळेल असेही मत आहे.

दि. २८/०७/२००७ व दि. ११/०८/२००७ रोजी झालेल्या मा. व्यवस्थापन समिती सभेत संस्थानच्या वाढीव पाणी पुरवठा योजने संदर्भात विचार विनिमय होवून दारणा धरणातून थेट पाईप लाईन टाकून पाणी आणणेसाठी एल.ॲन्ड टी. कंपनीकडून सर्व्हे करुन घेणेबाबत चर्चा झालेली आहे. त्याचबरोबर "एल. ॲन्ड टी कंपनीने दारणा धरणाप्रमाणेच, निळवंडे धरणातून पिण्याचे पाईप लाईन आणणे कामी सर्व्हे करुन अहवाल सादर करावा" असा निर्णय झालेला आहे. त्यानुसार जा.नं.एसएसएस/वशी/पा.पु/ १४००७/२००७ दि.३१/०८/२००७ नुसार एल. ॲन्ड टी. कंपनीस निळवंडे धरणाचा सर्व्हे करुन अहवाल संस्थानला देणे बाबत कळविले. परंतू अद्यापपर्यंत त्यांचेकडून सर्व्हे अहवाल प्राप्त झालेला नाही. मात्र याआधी एल ॲन्ड टी कंपनीचे प्रतिनिधींनी मुळा, निळवंडे व दारणा या धरणांची व परिसराची पहाणी करुन त्यांनी त्यांचे सादर केलेल्या प्राथमिक अहवालामध्ये मुळा व निळवंडे धरणातून पाईप लाईन करुन पाणी घेणे ऐवजी दारणा धरणातून पाईपलाईनद्वारे संस्थानला पाणी पुरवठा करणे अनुकूल असल्याचा अभिप्राय दिलेला आहे. दारणाधरण ते शिर्डी साठवण तलाव यामधील अंतर ९५ किलोमीटर असुन पाईप लाईनसाठी सुमारे ७० ते ७५ कोटी रुपये खर्चाचे इस्टीमेट त्यांनी दिलेले आहे.

तरी उपरोक्तप्रमाणे संस्थानसाठी आवश्यक असलेल्या वाढीव पाणी पुरवठयाची आवश्यकता विचारात घेवून, संस्थानचे लवकरच नव्याने कार्यान्वीत होणारे प्रकल्प, नियोजित प्रकल्प, शिर्डीस येणा-या

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



साईभक्तांचे संख्येत होणारी प्रचंड वाढ या सर्व बाबींचा विचार करुन पुढील काही दिवसांसाठी संस्थानला आवश्यक असणा-या वाढीव पाण्याचे नियोजन करणे आवश्यक असलेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, दारणा धरणातून शिर्डी येथे पाणी आणण्याची योजना शिर्डी नगरपंचायती मार्फत राबविल्यास शासनाकडून ९०% अनुदान मिळेल व संस्थानला फक्त १०% रक्कम भरावी लागेल तरी मा.श्री.शंकरराव गेणूजी कोल्हे, उपाध्यक्ष व मा.आमदार श्री.राधाकृष्ण एकनाथराव विखेपाटील यांचे समवेत चर्चा करुन सविस्तर प्रस्ताव तयार करावा. (कार्यवाही-पाणीपुरवठा विभागप्रमुख)

**विषय नं.०८** **नविन प्रसादालय निवासस्थान इमारती मधील अंतर्गत स्वच्छता व इतर कामे कंत्राटी पद्धतीने घेणेबाबत.**

**निर्णय क्र.७५५** सध्या प्रसादालय हॉलमध्ये १०००ची बैठक व्यवस्था असून द्‌रोज सरासरी २५,००० हजार साईभक्त प्रसाद भोजनाचा लाभ घेतात. प्रसाद भोजन घेणा-या भक्तांचे संख्येचे दृष्टीने सदर हॉल अत्यंत अपुरा पडू लागल्याने नविन भव्य/दिव्य असे श्री साई प्रसादालय बांधण्यात आलेले आहे.

अ) सध्याचे प्रसादालयाचे क्षेत्रफळ सुमारे ४५००० स्क्वे.फुट असून १००० साईभक्तांची बैठक व्यवस्था आहे. सदरील प्रसादालयामध्ये संस्थानचे कायम/ कंत्राटी कर्मचा-याकडून स्वच्छतेचे काम करुन घेतले जाते. त्याकामी खालीलप्रमाणे कर्मचारी काम करतात. व स्वच्छतेसाठी साहित्य वापरणेत येत आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | भोजन हॉल, किचन व आतील परिसरामध्ये झाडू मारणे प्रति शिफ्टला ०६ प्रमाणे ०२ शिफ्टसाठी - | १२ |
| २) | भोजन हॉलमध्ये फावडी मारणेकामी प्रति शिफ्टला ०४ प्रमाणे ०२ शिफ्टसाठी - | ०८ |
| ३) | स्वच्छतेसाठी दरमहा लागणारे अंदाजे साहित्य , झाडू / कुंचे - | ६० नग |
| ४) | स्वच्छतेसाठी दरमहा लाकडी / रबरी फावडे / लोटे - | ६० नग |
| ५) | स्वच्छतेसाठी द्‌रोज लागणारे लिक्वीड सोप केमीकल वगैरे - | १० लि. |
| ६) | पर्यवेक्षकीय कर्मचारी प्रति शिफ्टला ०१ प्रमाणे ०२ शिफ्टसाठी - | ०२ |

उपरोक्तकामी खर्च खालीलप्रमाणे

| **अ.नं.** | **खर्चाचा तपशील** | **दर (रोजंदारी )** | **१ वर्षासाठी खर्च रुपये** |
|---|---|---|---|
| १) | द्‌रोज दोन शिफ्टसाठी कर्मचारी २० | १६७/- x ३६५ = | १२,१९,१००/- |
| २) | द्‌रोज लिक्वीडसोप १० लि. | १० लि. x २२/- = | ८०,३००/- |
| ३) | दरमहा झाडू / कुंचे ६० नग | ६० x २०/- = | १४,४००/- |
| ४) | लाकडी / रबरी फावडे - लोटे ६० नग | ६० x ५५/- x १२ महीने = | ३९,६००/- |
| ५) | पर्यवेक्षकीय कर्मचारी २ | २ x ९०००/- x १२ महीने = | २,१६,०००/- |
| | | | **१५,६९,४००/-** |

वरीलप्रमाणे १२ महीण्यासाठी अंदाजे एकूण रु. १५, ६९,४००/- खर्च होत असून त्यानूसार दरमहा रु. १,३०,७८३/- खर्च होत आहे. तसेच आरोग्य विभाग यांनी प्रसादालयाचे बाहेरील परिसर व टॉयलेट ब्लॉक स्वच्छतेकामी सुमारे ८१,५८०/- खर्च येतो असे नमूद केलेले आहे. त्यानूसार सध्याचे प्रसादालय व परिसरासाठी स्वच्छतेकामी खर्च दरमहा रु. २,१२,३६३/- खर्च येतो.

ब) नविन श्री साई प्रसादालयाचे क्षेत्रफळ १,७१,००० चौरस फूट असून ते सध्याचे प्रसादालयापेक्षा सुमारे ४ ते ५ पट मोठे असून रचना भव्य / दिव्य व आकर्षक अशी आहे. तसेच साईभक्तांसाठी व कर्मचा-यासाठी टॉयलेट ब्लॉक असून प्रसादालय इमारतीचे समोर व बाजूने गार्डन तयार केलेले आहे. त्यानूसार नविन श्री साई प्रसादालयाचे स्वच्छतेकामी आतील व बाहेरील बाजूने खालीलप्रमाणे कर्मचारी व अंदाजे साहित्य लागणार आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | प्रसाद भोजनहॉलमध्ये झाडू मारणे प्रति शिफ्टला १० x २ (शिफ्ट) - | २० |
| २) | प्रसाद भोजनहॉलमध्ये फावडी मारणे प्रति शिफ्टला १० x २ (शिफ्ट) - | २० |
| ३) | चेंबर साफसफाई ३ x २ - | ०६ |
| ४) | उपभांडार , किचन, १ ला माळा VIP साफसफाई हॉलशिवाय इतर परिसर (आतील ) ७ x २ - | १४ |
| ५) | १ ला माळा भोजन हॉल झाडू मारणे ३ x २ - | ०६ |
| ६) | फावडी , रबरी लोटे मारणे ३ x २ - | ०६ |
| ७) | प्रसादलयाचा बाहेरील परिसर व गार्डन , टॉयलेट ब्लॉक साफ सफाई १२ x २ - | २४ |
| | | **९६** |
| ८) | देखरेखकामी मुकादम २ x २ - | ०४ |
| ९) | हाउस किपींग उपअधिक्षक १ x २ - | ०२ |
| १०) | स्वच्छतेकामी दरमहा लागणारे अंदाजे झाडू / कुंचे | २०० नग |
| ११) | स्वच्छतेकामी फावडी मारणे , रबरी लोटे | १०० नग |
| १२) | स्वच्छतेकामी लिक्वीड सोप , डिटर्जेंट केमिकल फिनाईल अंदाजे (द्‌रोज) | २० लिटर |

उपरोक्तकामी अंदाजे खर्च खालीलप्रमाणे.

| **अ.नं.** | **खर्चाचा तपशील** | **दर (रोजंदारी )** | **१ वर्षासाठी खर्च रुपये** |
|---|---|---|---|
| १) | द्‌रोज दोन शिफ्टसाठी कर्मचारी | ९६ x १६७ x ३६५ = | ५८,५१,६८०/- |

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



| | | | |
|---|---|---|---|
| २) | हाउसकिपींग उपअधिक्षक | ०२ x १२,०००/- x १२ (महीने) | ०२,८८,०००/- |
| ३) | देखरेखकामी मुकादम | ०४ x ९,०००/- x १२ (महीने) | ०४,३२,०००/- |
| ४) | स्वच्छतेकामी साहित्य झाडू , कुंचे दरमहा २०० नग | २०० x २०/- x १२ (महीने) | ४८,०००/- |
| ५) | स्वच्छतेकामी फावडी , रबरी लोटे , १०० नग | १०० x ५५/- x १२ (महीने) | ६६,०००/- |
| ६) | लिक्वीड सोप, केमिकल , फिनाईल १० लि. | १०लि.x ४५०/- x ३६५ दिवस | १६,४२,५००/- |
| | | एकुण रुपये | **८३,२८,१८०/-** |

एकूण अंदाजे खर्च रु. ८३,२८,१८०/- नूसार दरमहा रुपये ६,९४,०१५/- एवढा खर्च अपेक्षित आहे. सदर खर्च मनुष्यबळाकरवी हाताने स्वच्छता करुन घेतल्यास येणार आहे. काही प्रमाणात मशिनरी वापरल्यास सुमारे रु. २०,००,०००/- किंमतीच्या मशिनरी घ्याव्या लागतील असे मत आहे.

नविन श्री साई प्रसादालय हे अत्यंत भव्य / दिव्य व आकर्षक तयार केलेले आहे. त्यामुळे तेथील स्वच्छताही त्या वास्तुस शोभेल अशी उच्च दर्जाची , आधुनिक मशिनरीव्दारे करावी असे मत आहे. त्याकामी मा.व्यवस्थापन समिती दिं. ०६/०९/२००८ चे निर्णयानूसार मंत्रालय , साखर संघ , मोठ - मोठे औद्योगिक क्षेत्र , सुपर स्पेशालिटी हॉस्पीटल मध्ये हाउस किपींगचे काम , स्वच्छतेची कामे करणारी नामवंत खाजगी एजन्सी बी.व्ही.जी. इंडिया लि., पुणे यांना समक्ष बोलावून श्री साई प्रसादालय परिसर दाखवून हाउस किपींग , स्वच्छतेच्या कामाचे खर्चाचा अंदाज घेण्यात आलेला आहे.

बी.व्ही.जी इंडिया लि., पुणे यांनी उपरोक्तकामी एकत्रित मासिक खर्च रुपये ११,१२,५२३/- + १२.३६ सर्व्हीस टॅक्स कळविलेला आहे.

स्वच्छतेकामी खर्च रुपये = ११, १२,५२३/-
सर्व्हीस टॅक्स १२.३६ % = १,३७,५०८/-
----------------------------------------------------------
एकूण रुपये = १२,५०,०३१/- x १२ = १,५०,००,३७२/- रुपये
--------------------------------------------------------

आजचे सभेत मे.बी.व्ही.जी. इंडिया लि.पुणे यांना समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्यांनी चर्चेमध्ये रुपये १०,००,०००/- अंतिम दर देऊ केले.

यावर सविस्तर चर्चा होऊन,नवीन प्रसादालय इमारत व व्दारावती इमारतीमधील अंतर्गत स्वच्छता व इतर कामे कंत्राटी पध्दतीने करणेसाठी १० कोटीचे पुढे वार्षिक उलाढाल आहे अशा ठेकेदारांकडून वर्तमानपत्रात जाहिरात देऊन निविदा मागविण्यात याव्यात असे ठरले.

(कार्यवाही-अधिक्षक,प्रसादालय विभाग)

**विषय नं.०९** **आस्थापना खर्च भागविणेसाठी निधीबाबत.**

**निर्णय क्र.७५६** सदरहू विषय पुढे ढकलण्यात आला.

**विषय नं.१०** **द्वारावती इमारती करिता बेड खरेदीकामी आलेल्या निविदा उघडून निर्णय घेणे.**

**निर्णय क्र.७५७** **(अ)** मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक १७ ऑगष्ट, २००८ रोजीचे उपसमितीने केलेल्या शिफारशीस अनुसरुन, दिनांक ०६ सप्टेंबर, २००८ रोजीचे सभेत व्दारावती इमारतीसाठी एम. एस. स्ट्रक्चरचे फर्निचर व इतर फर्निचर / साहित्य खरेदी करणेसाठी आर्किटेक्ट यांचेकडून फर्निचरचे सविस्तर स्पेसिफिकेशन तयार करुन गोदरेज व खिरा या नामांकित कंपन्यांकडून दरपत्रके मागवावित व उर्वरित काऊंटर व तत्सम इतर फर्निचरसाठी स्वतंत्र निविदा मागविण्यात याव्यात, असा निर्णय झालेला आहे.

सदरहू निर्णयांस अनुसरुन, व्दारावती इमारतीसाठी आवश्यक असणाऱ्या सिंगल बेडस् खरेदीसाठी गोदरेज व खिरा या उत्पादक कंपन्यांना इकडील पत्र क्रमांक १४३१४/२००८ व १४३१५/२००८ दिनांक २९ सप्टेंबर, २००८ अन्वये खाली नमूद केलेल्या सविस्तर तपशीलानुसार (Technical Specifications) व विहीत अटी शर्तीनुसार दिनांक ०६ ऑक्टोबर, २००८ अखेर सिलबंद दरपत्रके सादर करणेबाबत कळविणेत आलेले होते.

| Sr. No. | Description | Required Qty. |
|---|---|---|
| 01 | **Supply of CRCA Pipe Framed Single Bed**<br>Having **Size 2005 mm x 925 mm x 570 mm** with as per detailed specifications given in **Annexure 'A'**. | **1264 Nos.** |

**Annexure 'A'**

| Item | Sr.No. | Description | Dia 1 in mm | Dia 2 in mm | Thickness in mm |
|---|---|---|---|---|---|
| **HEAD BOARD** | 01 | Round Pipe | 50.80 | 00.00 | 1.00 |
| | 02 | Oblong Pipe | 75.00 | 25.00 | 1.25 |
| | 03 | Rectangular Pipe | 25.40 | 50.80 | 1.25 |
| **BED REST FRAME** | 01 | Oblong Pipe | 75.00 | 25.00 | 1.25 |
| | 02 | Square Pipe | 16.00 | 16.00 | 1.25 |
| | 03 | Bed Mesh | 1850.00 | 735.00 | 4.00 |

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **TAIL BOARD** | 01 | Round Pipe | 50.80 | 00.00 | 1.00 |
| | 02 | Oblong Pipe | 75.00 | 25.00 | 1.25 |

**(ब)** उपरोक्त परिच्छेदात नमुद केल्याप्रमाणे, व्दारावती इमारतीसाठी सिंगल बेडस् खरेदीकामी संबंधित उत्पादक कंपन्यांकडून खालीलप्रमाणे सिलबंद दरपत्रके प्राप्त झालेली आहेत, त्याचा तपशील :

| **Sr.No.** | **Name of the Company** | **Inward No. / Date** |
|---|---|---|
| 01 | Godrej & Boyce Mfg. Co. Ltd., Pune | 23400/06.10.2008 |
| 02 | Khira Steel Works Pvt. Ltd., Ahmedabad | 23401/06.10.2008 |

उपरोक्त विहीत मुदतीत प्राप्त झालेली सिलबंद दरपत्रके आजचे सभेत उघडण्यात येऊन दरपत्रकसादरकर्त्यांना समक्ष चर्चा /वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ.नं. | दरपत्रक सादरकर्त्याचे नांव | निविदेतील दर | चर्चा/वाटाघाटीअंती देऊ केलेले दर रुपये |
|---|---|---|---|
| 01 | Godrej & Boyce Mfg. Co. Ltd., Pune | Basic Rs.6,500/- + vat12.5% 812.50= 7,312.50 | Basic Rs.6,200/- + vat12.5% 775/- = 6975/- |
| 02 | Khira Steel Works Pvt. Ltd., Ahmedabad | Basic Rs.9,261/- + vat15% 1,369.15= 10,650.15/- | Basic Rs.8,797.95/- + vat15% 1,319.57= 10,116.72/- |

यावर सविस्तर चर्चा होऊन, **Godrej & Boyce Mfg. Co. Ltd., Pune** यांचे निम्नतम दर स्विकारणेत येऊन त्यांचेकडुन आवश्यकतेनुसार दोन टप्प्यात सिंगल बेडस् खरेदीकामी पुरवठा आदेश देण्यात यावा तसेच अनामत सुरक्षा रक्कमेसाठी बँक गॅरंटी घेणेत यावी.नमुना सिंगल बेड ताब्यात मिळाले पासून ८ आठवडयाचे आत कंपनीने साहित्याचा पुरवठा करावा, असे ठरले. (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**यानंतर मा.अध्यक्ष यांचे परवानगीने आयत्या वेळेच्या विषयावर चर्चा सुरु करण्यात आली.**

**आयत्या वेळेचा विषय नं.०१** **दिनांक ०६.०९.२००८ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समितीचे सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे**

**निर्णय क्र.७५८** दिनांक ०६.०९.२००८ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समितीचे सर्वसाधारण सभेचे इतिवृत्ताच्या प्रती सर्व सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेत असताना खालीलप्रमाणे दुरस्ती करण्यात आली.

**(०१) निर्णय क्र.६५४ मधील परिच्छेद-**

यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानमार्फत फक्त श्री साई दैनंदिनी २००९ (सर्वसाधारण) ची छपाई करण्यात यावी, याकामी प्रेसधारकांनी सादर केलेल्या नमुन्यांची पाहणी केली असता मे.ब्ल्यू बर्ड (इं) लि.,पुणे यांचा दर निम्नतम असला तरी त्यांनी सादर केलेला डायरी नमुना अयोग्य असल्याने, तसेच मे.ऑस्कर ऑफसेट प्रा.लि.,मुंबई हे निविदेतील शर्ती अटीनुसार अपात्र ठरल्याने त्यांचे दर विचारात घेण्यात आले नाही. मा.विश्वस्तांनी पसंत केलेल्या स्विकारार्ह दैनंदिनी व दिनदर्शिकाचे खालीलप्रमाणे दर मान्य करण्यात आले.

**या ऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे-**

यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानमार्फत फक्त श्री साई दैनंदिनी २००९ (सर्वसाधारण) ची छपाई करण्यात यावी, याकामी प्रेसधारकांनी सादर केलेल्या नमुन्यांची पाहणी केली असता मे.ब्ल्यू बर्ड (इं) लि.,पुणे यांचा दर निम्नतम असला तरी त्यांनी सादर केलेला दैनंदिनी व दिनदर्शिकेचा नमुना अयोग्य असल्याने, तसेच मे.ऑस्कर ऑफसेट प्रा.लि.,मुंबई हे निविदेतील शर्ती अटीनुसार अपात्र ठरल्याने त्यांचे दर विचारात घेण्यात आले नाही. मा.विश्वस्तांनी पसंत केलेल्या स्विकारार्ह दैनंदिनी व दिनदर्शिकाचे खालीलप्रमाणे दर मान्य करण्यात आले. तसेच दैनंदिनीचे काम विभागुन देण्यात यावे असें ठरले. (कार्यवाही-प्रकाशने प्रमुख)

**(०२) निर्णय क्र.७०८ मधील शेवटचा परिच्छेद-**

यावर सविस्तर चर्चा होऊन, संजीवनी प्रि कॅडेट ट्रेनिंग सेंटर फॉर डिफेन्स सर्व्हीसेस पोलीस अँड इंडियन सिव्हील सर्व्हीसेस अँड मोटर ड्रायव्हिंग स्कुल, कोपरगांव यांना सन २००८-२००९ या वर्षभरासाठीचे ४ बॅचेससाठी शिधा धान्य स्वरुपात देणेस मान्यता देण्यात आली, याकामी शासनाची मान्यता घेण्यात यावी असे ठरले.

**या ऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे-**

यावर सविस्तर चर्चा होऊन, संजीवनी प्रि कॅडेट ट्रेनिंग सेंटर फॉर डिफेन्स सर्व्हीसेस पोलीस अँड इंडियन सिव्हील सर्व्हीसेस अँड मोटर ड्रायव्हिंग स्कुल, कोपरगांव यांना सन २००८-२००९ या वर्षभरासाठीचे ४ बॅचेससाठी शासनाची मान्यता घेऊन शिधा धान्य स्वरुपात मदत देणेस मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-०५)

**आयत्या वेळेचा विषय नं.०२** **दिनांक २०.०९.२००८ रोजी शिर्डी येथे झालेल्या वैद्यकीय उपसमिती सभेचे इतिवृत्त.**

**निर्णय क्र.७५९** दिनांक २०.०९.२००८ रोजी शिर्डी येथे झालेल्या वैद्यकीय उपसमिती सभेचे इतिवृत्ताच्या प्रती सर्व सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन या इतिवृत्तातील खालील निर्णयांना पुष्टी देण्यात आली.

**०१) <u>श्री साईबाबा हॉस्पिटल परिसरामध्ये खाजगी मेडिकल स्टोअर सुरु करणेबाबत प्राप्त झालेल्या निविदा उघडणेबाबत.</u>**

श्री साईबाबा रुग्णालयात रुग्ण व त्यांचे नातेवाईकांचे सोईसाठी औषध दुकान भाडे तत्वावर चालवणेस देणेकामीचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समिती सभा दि.०७.०७.२००८ रोजीचे सभेपुढे मान्यतेसाठी ठेवण्यात

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



आला होता. त्यावर चर्चा होऊन सदर औषध दुकान पाच वर्षा करीता भाडे तत्वावर चालविण्यास देणकामी विहीत पध्दतीने वर्तमान पत्रात जाहीरात देऊन निविदा मागविणे बाबत निर्णय झालेला आहे.

त्यानुसार उपरोक्त औषध दुकान भाडे तत्वावर चालवणेस देणेकामी संस्थानच्या जनसंपर्क कार्यालयामार्फत सार्वमत, सामना व जयबाबा-नगर आवृत्ती या वतर्मान पत्रात जाहिरात देण्यात येऊन दि.०७/०८/२००८ ते दि.२१/०८/२००८ अखेर संस्थानच्या शिर्डी व मुंबई कार्यालयात निविदा विक्रिसाठी ठेवण्यात आल्या होत्या व निविदा स्विकारण्याची अंतीम मुदत दि.२३/०८/२००८ अखेर ठेवण्यात आली होती. मुंबई कार्यालयात १० निविदा विक्रिसाठी ठेवण्यात आल्या होत्या तर शिर्डी कार्यालयात ६५ निविदा विक्रिसाठी ठेवण्यात आल्या होत्या. त्यास अनुसरुन शिर्डी व मुंबई येथील कार्यालयात एकूण २६ निविदा प्राप्त झालेल्या आहेत त्या खालीलप्रमाणे -

| | | | |
|---|---|---|---|
| 01 | Sandeep Narayan Thate, Apollo Hospital, Chennai | 14 | Rajesh Vasantrao Gaikwad, Lasalgaon |
| 02 | Sandeep Narayan Thate , Apollo Hospital, Chennai. | 15 | Sachine Manohar Nawale, Akola. |
| 03 | Arun Popatlal Jani, Shirdi | 16 | Saikrupa Medical, Kopargaon |
| 04 | Ashok Balkrishna Wabale, Shahartakli. | 17 | Sailendra Shivlal Pipada, Ganeshnagar. |
| 05 | Pankaj Zumbarlal Hiran, (Jeevan Medical & Agencies, Shrirampur.) | 18 | Prince Medical, Nashik. |
| 06 | Atul Ashokrao Ahire, Nashik. | 19 | Gajanan Janardhan Wani, Kopargaon. |
| 07 | Lokmanya Hospital Medical stores, Pune. | 20 | Samir Ashok Joshi, Nashik. |
| 08 | Naresh Sampatlal Parakh, Shirdi. | 21 | Pankaj Dheusukhlal Ranka, Kolhar Bk. |
| 09 | Shri Sai Sansthan Employees Credit Co-Op. Society, Shirdi. | 22 | Sandeep Namdeorao Lute, Rahata |
| 10 | Siddheshwar Med. & Gen. Stores, Kopargaon. | 23 | Somnath Karbhari Waghe, Kelwad. |
| 11 | Suhas Chandrakant Khodse, Nashik. | 24 | Tarun Omprakash Bhusari, Kopargaon. |
| 12 | Thate Ashok V., Rahuri. | 25 | Vinod Bhimsen Longani, Kopargaon. |
| 13 | Wellness Forever, Mumbai | 26 | Yogeshwar Sudam Shelke, Shirdi. |

तरी उपरोक्त प्रमाणे औषध दुकान भाडे तत्वावर चालवणेस देणेकामी प्राप्त झालेल्या २६ सिलबंद निविदा आजचे सभेत समक्ष उघडण्यात आल्या. **त्यांचा तुलनात्मक तक्ता तयार करुन, निविदासादरकर्त्यांना व्यवस्थापन समितीचे पुढील सभेपुढे चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात यावे अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

०२ **श्री साईबाबा हॉस्पिटलमधील काही विभाग श्री साईनाथ रुग्णालयात स्थलांतरीत करणे बाबत.**

संदर्भीय विषयाबाबतच्या कार्यवाहीसाठी आजपर्यंत अनेक वेळा विविध प्रकारचे निर्णय घेण्यात आले आणि त्या निर्णयांना विविध कारणांस्तव स्थगितीही देण्यात आली.

**वरीलप्रमाणे वेळोवेळी घेतले गेलेले व स्थगिती मिळालेले निर्णय पुढीलप्रमाणे -**

(१) दोन्ही हॉस्पिटल्सचे विलिनीकरण करावे, यासाठी किमान ६०० बेडची क्षमता असलेल्या रुग्णालयासाठी नवीन इमारत बांधण्यात यावी व अशा नवीन रुग्णालयाचे श्रीसाईनाथ रुग्णालय असे नामांतर करण्यात यावे.

(२) सध्या श्री साईबाबा हॉस्पिटलमधील काही विभाग श्री साईनाथ रुग्णालयात हलविणे.

(३) दोन्ही हॉस्पिटल्समधील विविध तज्ञ डॉक्टर्सच्या वेतनातील तफावत दूर करणे.

(४) श्री साईबाबा हॉस्पिटलमधील डॉक्टरांना कामाच्या प्रमाणात इन्सेन्टिव्हज् मिळतात त्या धर्तीवर श्री साईनाथ रुग्णालयातील डॉक्टरांनाही इन्सेंटिव्हज् देण्यात यावेत. त्यासाठीचे विविध निकष व इन्सेंटीव्हज्ची रक्कम याबाबत पुढील निर्णयार्थ अभ्यासपूर्ण अहवाल सादर करण्यात यावा.

(५) श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये उपचार घेत असतांना बील भरण्यास असमर्थ असणाऱ्या गरीब रुग्णांना श्री साईनाथ रुग्णालयाकडे हलविण्यात यावे.

वरील विविध विषयांवर ठोस निर्णय घेता यावेत यासाठी पुनर्प्रस्ताव सादर करणेबाबत मा.कार्यकारी अधिकारी महोदय यांनी आदेश दिलेले आहेत.

श्रीसाईबाबा हॉस्पिटलमधून काही विभाग श्री साईनाथ रुग्णालयात स्थलांतरित करण्यासाठी देण्यात आलेल्या आदेशाच्या कार्यवाहीसाठी पुढील निकष लावले आहेत.

श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयात काही विभाग समांतर काम करीत आहेत. यापैकी काही विभाग हे श्री साईबाबा हॉस्पिटलमधील सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलकरिता पुरक नाहीत.

श्री साईबाबा हॉस्पिटलमधील काही विभागांना मिळालेला प्रतिसाद हा निराशाजनक असून विविध प्रकारचे कर्मचाऱ्यांवरील वेतन खर्च हा समर्थनीय नाही.

श्री साईनाथ रुग्णालयात रुग्णांची संख्या (बाहय रुग्ण तथा अंतरुग्ण) जास्त असूनही तेथे काही विशेषज्ञ उपलब्ध नसतात. याऊलट श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये सदर विशेषज्ञ उपलब्ध असूनही त्यांना रुग्णांच्या अभावी पुरेसे काम नसते.

वरील निकषांच्या आधारावर पुढील विभागांचे स्थलांतर करणेबाबत खालील प्रमाणे कार्यवाही असावी.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



**अ) दंतरोग विभाग :-**

**श्री साईबाबा हॉस्पिटलमधील या विभागाची सद्यस्थिती : -**

**साधनसामुग्री :-** श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये सध्या अत्याधुनिक तंत्रज्ञानाने परिपूर्ण असलेल्या दोन Dental Chairs पैकी एक श्री साईनाथ रुग्णलयात स्थलांतरित केली आहे.

ii) **मनुष्यबळ :-** मॅक्सिलोफेसियल सर्जन - १
डेंटल आर.एम.ओ. - ३
डेंटल टेक्निशियन - १
**एकुण संख्या - ५**

iii) **रुग्ण तपासणीचा गोषवारा : - (सन २००७-२००८ या आर्थिक वर्षाकरिता )**

**एकूण रुग्ण तपासणी व इलाज -२७५५**

सरासरी प्रति दिन प्रति डॉक्टर २ पेक्षा कमी रुग्ण (१.९ patients per day per dentist)

**श्री साईनाथ रुग्णालयातील सद्यस्थिती पुढीलप्रमाणे :-**

**साधनसामुग्री :- अ)** जुनाट व संपूर्णपणे निरुपयोगी झालेली एकमेव Dental Chair आहे.
श्रीसाईबाबा हॉस्पिटलमधील एक अत्याधुनिक डेंटल चेअर तेथे ठेवण्यात आली आहे.
**ब)** डेंटल एक्स-रे मशिन

ii) **मनुष्यबळ :-** डेंटल आर.एम.ओ. - १

iii) **रुग्ण तपासणीचा गोषवारा** :- अद्यापपर्यंत तेथे डेंटल चेअर उपलब्ध नसल्याने तेथे दंत शस्त्रक्रिया करणे शक्य झाले नाही परंतु आता एक डेंटल चेअर तेथे स्थलांतरित करण्यात आली असल्याने यापुढे तेथील कामकाजात सुसूत्रता येऊ शकते**.**

**मनुष्यबळाची विभागणी पुढीलप्रमाणे करता येऊ शकते.**

एक महिलाडेंटल आर.एम.ओ.श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये काम करेल व उर्वरित एक पुरुष व एक महिला डेंटल आर एम.ओ. श्री साईनाथ रुग्णालयामध्ये काम करतील.यामुळे प्रत्येक रुग्णालयात एक -एक महिला दंतवैद्य कार्यरत राहणार असल्यामुळे कामकाजात सुसूत्रता येईल.

**ब) त्वचारोग विभाग : -**

श्रीसाईबाबा हॉस्पिटलमधील या विभागाची सद्यस्थिती : -

**अ) श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये** सुपर स्पेशालिटी सेवांना सदर विभाग पुरक नाही.

**ब) कामाचा गोषवारा- दररोज सरासरी फक्त १३ रुग्ण**

श्री साईनाथ रुग्णालयातील या विभागाची सद्यस्थिती : -

श्री साईनाथ रुग्णालयात सध्या त्वचारोग विभाग नियमित कार्यरत नाही. मात्र तेथे त्वचा रोगाने त्रस्त असलेल्या रुग्णांची संख्या मोठी आहे. तज्ञ नसलेले डॉक्टर्स सध्या अशा रुग्णांवर उपचार करीत असल्यामुळे रुग्णांमध्ये असमाधानाची भावना निर्माण होत आहे.

निष्कर्ष :- वरील अ व ब चे अनुषंगाने सदर विभाग श्री साईनाथ रुग्णालयात हलविण्यात यावा.

सदर विभाग श्री साईनाथ रुग्णालयात हलविणेबाबतची कार्यवाही : -

श्रीसाईबाबा हॉस्पिटलमधील त्वचारोग तज्ञ डॉ. कांबळे यांची आस्थापना विभागामार्फत श्री साईनाथ रुग्णालयात बदली करणे येथपर्यंतच कार्यवाही मर्यादित आहे व ती सत्वर होऊ शकते.

**क) स्त्रीरोग चिकित्सा विभाग : -**

श्री साईबाबा हॉस्पिटलमधील या विभागाची सद्यस्थिती : -

**मनुष्यबळ :-** पूर्ण वेळ स्त्रीरोग तज्ञ - २

रुग्ण तपासणीचा गोषवारा **: -** (सन २००७-२००८ या आर्थिक वर्षाकरिता )

एकूण बाहयरुग्ण १९८२ (म्हणजेच दररोज सरासरी प्रति दिन प्रति डॉक्टर २.७ रुग्ण)

एकूण शस्त्रक्रिया **:-** ३३५ (म्हणजेच दररोज सरासरी प्रति दिन प्रति डॉक्टर ०.५ रुग्ण)

श्रीसाईबाबा हॉस्पिटलमध्ये सदर विभाग सुपर स्पेशालिटी सेवांना पुरक नाही.

श्रीसाईनाथ रुग्णालयातील या विभागाची सद्यस्थिती **: -**

श्रीसाईनाथ रुग्णालयात अनेक उच्चशिक्षित पदवीधारक स्त्रीरोग तज्ञ नियुक्त होऊन अल्पावधीतच काम सोडून गेले आहेत. त्यामुळे पदविकाधारक डॉक्टर्सच या विभागात काम करीत असतात.

कामाचा गोषवारा :- या विभागात रोज अनेक शस्त्रक्रिया होत असून स्त्रियांची बाळंतपणेही पार पाडली जातात.

निष्कर्ष :- सदर विभाग श्री साईनाथ रुग्णालयात हलविण्यात यावा.

श्रीसाईनाथ रुग्णालयात स्त्रीरोग चिकित्सा हा विभाग पूर्वीपासूनच कार्यरत असल्याने श्रीसाईबाबा हॉस्पिटलमधील स्त्रीरोग तज्ञांची तेथे बदली करणे येथपर्यंतच कार्यवाही मर्यादित आहे व ती आस्थापना विभागामार्फत सत्वर होऊ शकते.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



**(ड) फिजिओथिरॅपी :-**

श्रीसाईबाबा हॉस्पिटलमध्ये कार्डीऑलॉजी, कार्डीओथोरॅसिक सर्जरी, न्यूरो सर्जरी, आर्थोपेडीक सर्जरी इ. विभागांना फिजिओथिरॅपीस्टच्या सेवांची आवश्यकता असते. सध्या फिजिओथिरॅपिस्ट एकच असल्याने (श्री नवसुपे) त्यांच्या डयुटीच्या वेळेची विभागणी श्रीसाईनाथ रुग्णालय व श्री साईबाबा हॉस्पिटलसाठी योग्य त्या प्रकारे करणे आवश्यक आहे. तसे करणे सहज शक्यही आहे.

श्रीयुत नवसुपे हे सकाळी ८.३० ते दु.१२.३० पर्यंत श्री साईनाथ रुग्णालयात व दु.०१.३० ते सायं.०५.३० पर्यंत श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये काम करतील.

श्रीसाईबाबा हॉस्पिटलमध्ये या विभागाला मिळालेला प्रतिसाद हा अपेक्षाभंग करणारा ठरला असून सदर विभाग श्री साईनाथ रुग्णालयात हलविल्यास तेथील रुग्णांना फार मोठा लाभ होऊ शकतो.

**या विभागासाठी पुढीलप्रमाणे गरज आहे.**

०१) तळमजल्यावरील जागेचे ठिकाण, योग्य ते क्षेत्रफळ, खेळती हवा व योग्य ती प्रकाशयोजना, विद्युत पुरवठा इत्यादीसह.

Hydrotherapy या पध्दतीचे उपचार सुरु करणे झाल्यास पाणी पुरवठा व सांडपाणी निचरा इत्यादीची आवश्यकता भासेल.

०२) रुग्णांसाठी प्रतिक्षालय - योग्य आसन व्यवस्थेसह

सदर नियोजनाची कार्यवाही झाल्याबरोबर हा विभाग तात्काळ तिकडे स्थलांतरित करण्यात येऊ शकतो.

सदर विभाग श्रीसाईनाथ रुग्णालयात हलविण्याकामी रुग्णालयांसमोरील धर्मशाळेचा आश्वासन देण्यात आले होते. परंतु कालातरांने श्री साईबाबा हॉस्पिटलसाठी सदर जागा मिळणार नाही, अशी वरिष्ठांकडूनच समज देण्यात आली.

**(इ) नाक, कान, घसा विभाग :-**

डॉ.शंतनु टंडन (ई.एन.टी.सर्जन) यांना माहे जुलै २००७ मध्ये सेवामुक्त केल्यापासून श्री साईबाबा हॉस्पिटलमधील सदर विभाग बंद करणेत आलेला आहे. परंतु Trauma Care Unit विभाग सुरु झाल्यानंतर एका नाक, कान, घसा तज्ञाची इमर्जन्सी उपचारांसाठी जरुर भासू शकते.

श्रीसाईनाथ रुग्णालयातील नाक, कान, घसा तज्ञ डॉ.कुलकर्णी सायं ०६.०० ते सकाळी ०९.०० पर्यंत शिर्डीमध्ये उपलब्ध नसतात. श्री साईबाबा रुग्णालयात डॉ.गेठे, कान-नाक-घसा तज्ञ, हे नियुक्त झाले असून ते प्रत्यक्षात श्री साईनाथ रुग्णालयामध्ये काम करत आहेत. परंतु श्री साईबाबा हॉस्पिटलमधील इमर्जन्सी कॉल्स् अटेंड करणे त्यांच्यावर बंधनकारक असावे.

**(ई) मेडीकल स्टोअर विभाग** :-

१) जनसंपर्क कार्यालयाने एका मोठया हॉलमध्ये आपले ऑफीस थाटले असल्याने या हॉलमधील उर्वरित बरीचशी मोकळी जागा इतर कोणत्याही कामासाठी उपयुक्त नाही.

२) मेडीकल स्टोअरमध्ये मटेरियल मॅनेजर व स्टोअर मॅनेजर यांनी Inventory फार मोठया प्रमाणावर ठेवल्यामुळे मुख्य मेडीकल स्टोअर कक्ष, कॉन्फरन्स हॉल येथे खचाखच सामान भरुन वाटेतील पॅसेजेसमध्येही उरलेल्या सामानाचे ढीग रचलेले आहेत. याबाबत मा. कार्यकारी अधिकारी महोदय यांनीही त्यांचे समक्ष राऊंडमध्ये नाराजी व्यक्त केली होती. मात्र अद्यापिही (६ महिन्यांच्या कालावधीनंतर) उपरोक्त परिस्थितीत कोणतीही सुधारणा झाल्याचे दिसून येत नाही.

३) वरील बाबींमुळे श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये विविध सभांचे तसेच चर्चासत्रांचे आयोजन व नियोजन, ग्रंथालय, डॉक्टरांसाठी रिक्रिएशन हॉल इ. महत्वाच्या कामांसाठी कोठेही जागा शिल्लक राहिलेली नाही. (विश्वस्तांसहित) मान्यवरांच्या सभांसाठीही प्रशासकीय कार्यालय अथवा मा.वैद्यकीय संचालक यांचे कार्यालयासारख्या संकुचित जागांचा उपयोग करणे अनिवार्य ठरत आहे व तेथे काही प्रमाणात लाजिरवाणेपणाची भावना निर्माण होते.

मेडीकल स्टोअरमधील ९०% माल श्रीसाईनाथ रुग्णालयाकरिता वापरला जात असतो. मा.अध्यक्ष महोदय यांनी मा.वैद्यकीय संचालक यांचेशी दिनांक १४.०७.२००८ रोजीच्या मा.व्यवस्थापन समितीचे सभेनंतर श्रीसाईबाबा हॉस्पिटलमध्ये मा.वैद्यकीय संचालक यांचे कक्षात त्यांचेशी केलेल्या चर्चेत २०० रुम येथील धर्मशाळा नं.२ मधील काही जागा श्री साईबाबा हॉस्पिटलकरिता देणेचे आश्वासन दिले होते. सदर जागेची पाहणी सुध्दा वरिष्ठ अधिकाऱ्यांमार्फत केली गेली.

त्यावर अनुकूल अंतिम निर्णय झाला असता तर मेडीकल स्टोअरचे काही विभाग सदर जागेमध्ये हलविणे अत्यंत सोईस्कर झाले असते. तसेच हॉस्पिटलच्या इतर प्रलंबित कामांना गती देणे शक्य झाले असते.

परंतु कालातरांने श्री साईबाबा हॉस्पिटलसाठी सदर जागा मिळणार नाही, अशी वरिष्ठांकडूनच समज देण्यात आली.

वरील कारणांमुळे सध्या फक्त दंतरोग चिकित्सा, त्वचारोग व स्त्रीरोग हे विभाग श्री साईनाथ रुग्णालयात स्थलांतरित करणे तत्वत: शक्य आहे.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



तात्पर्य :-

श्रीसाईबाबा हॉस्पिटलमध्ये जागेची अतिशय कमतरता भासत असूनही फिजिओथिरॅपी, मेडीकल स्टोअर (साईनाथ रुग्णालयाचा औषध साठा) हे विभाग स्थलांतरित करण्याची कार्यवाही जागा उपलब्ध करुन देण्याचे नाकारले गेल्यास अशक्य आहे.

२) जागा उपलब्ध करुन देण्याचा निर्णय घेतला गेल्यास श्री साईबाबा हॉस्पिटलमधील उपलब्ध / अतिरिक्त जागेचे पुनर्नियोजन करणे शक्य होईल.

३) श्रीसाईनाथ रुग्णालयातील उपलब्धी बघता सध्या फक्त दंतरोग चिकित्सा, त्वचारोग व स्त्रीरोग हे विभाग श्रीसाईनाथ रुग्णालयात स्थलांतरित करणे तत्वतः शक्य आहे.

**यावर सविस्तर चर्चा होऊन,**

**अ) दंतरोग विभाग-** श्रीसाईबाबा हॉस्पिटलकडे असलेल्या दंतरोग विभागात सध्या असलेल्या वैद्यकीय अधिकाऱ्यांपैकी एक मॅक्सिलोफेसियल सर्जन व एक लेडी डेन्टीस्ट ठेवण्यात येऊन, उर्वरित दंतरोग तज्ञ व इतर कर्मचारी श्रीसाईनाथ रुग्णालयाकडे स्थलांतरीत करण्यात यावे. जे अधिकारी/कर्मचारी स्थलांतरीत होणार नाहीत त्यांना नियमानुसार सेवामुक्त करण्यात यावे. तसेच श्रीसाईनाथ रूग्णालयातील दंतरोग विभागासाठी आवश्यक असणाऱ्या दोन नवीन डेंटल चेअर्स खरेदी करण्यात याव्यात.

**ब) त्वचा रोग विभाग -**श्री साईनाथ रुग्णालयाकडे स्थलांतरीत करणे.

**क) स्त्रीरोग चिकित्सा विभाग-** श्री साईनाथ रुग्णालयाकडे स्थलांतरीत करणे.

**ड) कान,नाक घसा विभाग-**श्री साईनाथ रुग्णालयाकडे पाठवावा आवश्यकतेनुसार साईबाबा हॉस्पिटलमध्ये बोलविण्यात यावे.

**इ) मेडिकल स्टोअर-**श्रीसाईनाथ रुग्णालयास लागणारी सर्व औषधे उदा.आयुर्वेदीक, होमीओपॅथीक व नियमित लागणारी सर्जिकल्स औषधे इ.व त्यासाठी आवश्यक स्टाफ साईनाथ रुग्णालयाकडे स्थलांतर करावे. फक्त श्री साईबाबा हॉस्पिटलसाठी लागणारी औषधे व स्टाफ श्री साईबाबा हॉस्पिटलकडे ठेवावा.

**ई) फिजिओथेरपी पूर्ण विभाग-** सदर विभाग श्रीसाईनाथ रुग्णालयात जागेचे नियोजन करुन स्थलांतरीत करण्यात यावा. Physiotherapist च्या duties वैद्यकीय संचालक यांनी सुनिश्चित कराव्यात.

**उ) नेत्रचिकित्सा विभाग-** श्रीसाईनाथ रुग्णालयात नेत्र शल्य चिकित्सा विभागासाठी आवश्यक त्या सर्व सुविधा उपलब्ध झाल्यानंतर स्थलातरीत करण्यात यावा. तदनंतर **श्रीसाईबाबा रुग्णालयात जागा उपलब्ध झाल्यानंतर सर्व बाबींचा अभ्यास करुन नविन कॅथलॅबसाठी यथावकाश प्रस्ताव सादर करण्यात यावा.**

**तसेच, श्री साईबाबा हॉस्पिटलकडील दंतरोग विभागाकडील दोन डेंटल चेअर्ससाठी दोन दंतरोग तज्ञ ठेवणेत यावे व श्री साईनाथ हॉस्पिटलकडील दोन डेंटल चेअर्ससाठी एक दंतरोग तज्ञ श्री साईनाथ हॉस्पिटलकडे पाठविणेत यावा, असे ठरले.**

**उपरोक्तप्रमाणे उपसमितीच्या शिफारशी मान्य करण्यात आल्या.**

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**०३ <u>श्रीसाईबाबा रुग्णालयातील डॉक्टरांना इन्सेंटीव्हज देणे बाबत.</u>**

अ) दिनांक १५.०९.२००८ रोजी मा.वैद्यकीय संचालक यांचे कक्षात मा.वैद्यकीय संचालक यांचे अध्यक्षतेखाली सदर विषयावर चर्चा झाली. या चर्चेत खालील वैद्यकीय अधिकारी उपस्थित होतेः -

वैद्यकीय संचालक डॉ.बोबडे

उप वैद्यकीय संचालक डॉ.म्हस्के

वैद्यकीय प्रशासक डॉ.पटवर्धन

वैद्यकीय अधिक्षिका डॉ.पेंडसे

सदर विषयाचे complex स्वरुप विचारात घेऊन विविध पैलूंचा सखोल विचार करण्यात आला. श्रीसाईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालय यांची आर्थिक मुलभूत भिन्नता लक्षात घेता काही पर्यायांपैकी एक निवडणे भाग पडणार असल्याचे सर्वानुमते ठरले.

श्री साईनाथ रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी हे श्री साईबाबा संस्थानचेच कर्मचारी असून सुपर स्पेशालिटी सर्व्हीसेस वगळता जनरल स्पेशालिटीमध्ये श्री साईबाबा हॉस्पिटलच्या वैद्यकीय अधिकाऱ्यांप्रमाणेच रुग्णसेवा प्रदान करीत असतात. त्यामुळे त्यांनाही इन्सेन्टिव्हज् देणे योग्य होईल, यावर सर्वांचे एकमत झाले.

पर्याय नं.१) : -

श्रीसाईबाबा हॉस्पिटलमध्ये सध्या प्रचलित असलेल्या पध्दतीनुसारच वैद्यकीय तज्ञांना इन्सेन्टिव्हज् देण्यात यावेत.

श्रीसाईनाथ रुग्णालयामध्ये फिक्स्ड इन्सेन्टिव्हज् देण्यात यावेत. या इन्सेन्टिव्हजसाठी लावले गेलेले निकष व नियमावली पुढीलप्रमाणे:-

इन्सेन्टिव्हज हे फिक्स्ड स्वरुपाचे,विभागवार व कामाचे स्वरुप लक्षात घेऊन ठरविले आहेत.
(operative / non operative, work load, critical care इ.चा विचार करता )

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



रजेच्या कालखंडातील इन्सेन्टिव्हजची रक्कम प्रतिदिन या प्रमाणात कपात केली जावी.यात आठवडा सुटी सोडून इतर सार्वजनिक सुटया व विविध प्रकारच्या सर्व रजा यांचा समावेश असेल.

एकाच विभागात दोन अथवा त्यापेक्षा अधिक कन्सल्टंट आल्यास इन्सेन्टिव्हजची रक्कम त्यांच्यातील सेवाज्येष्ठतेच्या प्रमाणात विभागली जाईल.

प्रत्येक डॉक्टरचे Job Appraisal हे मा. वैद्यकीय संचालक हे वेळोवेळी करतील व प्रत्येकाच्या Incentives Continuation व इन्सेन्टिव्हज्‌ची रक्कम कामाच्या दर्जानुरुप कमी-जास्त करण्याच्या निर्णयाचे पूर्ण अधिकार मा. वैद्यकीय संचालक यांचेकडे राहतील.

सध्या श्री साईनाथ रुग्णालयातील विविध तज्ञांना देण्यात येणाऱ्या इन्सेन्टिव्हज्‌ची रक्कम

श्री साईबाबा हॉस्पिटलमधील जनरल स्पेशालिटीच्या तज्ञांना गेल्या दोन वर्षात दिल्या गेलेल्या सरासरी रकमेप्रमाणे असावी, ती पुढीलप्रमाणे :-

अ) General Medicine, General Surgery,Orthopaedics, Intensivist, Anesthesia
या विभागांतील प्रति तज्ञांस रुपये ३०,०००/- दरमहा

ब) Gynaecology, ENT, Ophthalmology,
या विभागांतील प्रति तज्ञांस रुपये २५, ०००/- दरमहा

क) Paediatrics, Dermatology, Pathology, Radiology
या विभागांतील प्रति तज्ञांस रुपये २०,०००/- दरमहा

ड) पदविकाधारक डॉक्टर वरील कोणत्याही विभागात वैद्यकीय तज्ञ म्हणून काम करीत असल्यास त्यांना उपरोक्त सारणीच्या ५०% इन्सेन्टिव्हज् दरमहा देण्यात यावेत.

इ) नवनियुक्त व पुर्वानुभवाची कमतरता असलेल्या वैद्यकीय तज्ञाला काही कालावधीपर्यंत (Probation Period) इन्सेन्टिव्हज् देण्यात येऊ नयेत. अशा तज्ञाच्या ज्ञानाची व कौशल्याची खातरजमा (Job Appraisal) झाल्यावरच इन्सेन्टिव्हज् देण्याचा निर्णय मा.वैद्यकीय संचालक यांचेकरवी घेतला जावा.

ई) सध्या कार्यरत असलेल्या व इन्सेन्टिव्हज् घेणाऱ्या वैद्यकीय तज्ञांचे Periodic Job Appraisal केले जाईल व त्यांचे भविष्यातील इन्सेन्टिव्हज् देण्याचा निर्णय मा. वैद्यकीय संचालक यांचेकरवी घेतला जावा.

फ) संस्थान तर्फे इन्सेन्टिव्हज् घेणाऱ्या कोणत्याही वैद्यकीय तज्ञास कोणत्याही प्रकारचा खाजगी व्यवसाय करता येणार नाही. इन्सेन्टिव्हज् घेऊन खाजगी व्यवसाय करतांना आढळल्यास अशा तज्ञावर शिस्त भंगाची योग्य ती कडक कारवाई केली जावी.

पर्याय नं. २) : -

श्रीसाईबाबा हॉस्पिटलमध्ये सुपर स्पेशालिस्ट वैद्यकीय तज्ञांना सध्या प्रचलित असलेल्या पध्दतीनुसारच वैद्यकीय तज्ञांना इन्सेन्टिव्हज् देण्यात यावेत. या सुपर स्पेशालिटी सर्व्हीसेस पुढीलप्रमाणे :-

| | | | |
|---|---|---|---|
| 01 | Neuro Surgery | 02 | Neurology |
| 03 | Cardiothoracic Surgery | 04 | Cardiology |
| 05 | Nephrology | 06 | Urology |
| 07 | Radio Diagnosis (C T , M R I) | | |

श्रीसाईबाबा हॉस्पिटलमधील जनरल स्पेशालिस्ट वैद्यकीय तज्ञांना पर्याय नं. १ मधील श्री साईनाथ रुग्णालयासाठी केलेल्या नियमावलीप्रमाणे फिक्स्‌ड इन्सेन्टिव्हज् देण्यात यावेत.

परंतु यात श्री साईबाबा हॉस्पिटलमधील वैद्यकीय तज्ञांच्या कामाचा दर्जा खालावला जाण्याची शक्यता नाकारता येत नाही.कारण काम केले अथवा न केले तरी वेतन अथवा इन्सेन्टिव्हज् फिक्स्ड स्वरुपाचे असल्यामुळे रुग्णांच्या बाबतीत डॉक्टरांची आस्था व काळजीपूर्वकपणा कमी होऊन काम टाळण्याची वृत्ती वाढू शकते. श्री साईबाबा हॉस्पिटलमधील रुग्ण हे Paying Patients असल्यामुळे चांगल्या दर्जाच्या व तत्पर सेवेची त्यांची रास्त अपेक्षा असते. त्यामुळे श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये फिक्स्ड इन्सेन्टिव्हज् न देणे हितावह राहील असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

१) कॅथलॅब टेक्निशियन्स यांना मासिक रुपये १०,०००/- व

२) पर्फ्युजनिस्ट यांना मासिक रुपये ५०००/- फिक्स्‌ड इन्सेन्टिव्हज् देण्यात यावेत.

यावर सविस्तर चर्चा होऊन, मा.विश्‍वस्त श्री.राधाकृष्ण एकनाथराव विखेपाटील, मा.डॉ.एकनाथ भागचंद गोंदकर, डॉ.पी.एल. तिवारी, वैद्यकीय संचालक डॉ.बोबडे, उपवैद्यकीय संचालक डॉ.म्हस्के यांची समिती नेमण्यात येऊन, यांनी श्रीसाईबाबा हॉस्पिटल व श्रीसाईनाथ रुग्णालयातील वैद्यकीय अधिकाऱ्यांना फिक्स्ड इन्सेन्टिव्हज् देणेबाबत निर्णय घेण्यात यावा,अशी शिफारस केली, ती मान्य करण्यात आली.

ब) श्री साईबाबा हॉस्पिटल दिनांक १५ मे २००६ रोजी सुरु झाले आहे. सुरुवातीला रुग्णांची संख्या कमी असल्याने डॉक्टरांना किमान मासिक मोबदला मिळण्यासाठी मासिक फिक्स वेतन /मानधन अधिक जास्त दराने इन्सेंटीव्ह देण्याच्या दृष्टीने इन्सेंटीव्हजबाबत मा.व्यवस्थापन समितीचे सभेमध्ये वेळोवेळी धोरणात्मक निर्णय संमत झाले आहे. व त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आली आहे.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



हॉस्पिटलमध्ये सध्या रुग्णांची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढली असून डॉक्टरांना मिळणाऱ्या इन्सेंटीव्हमध्ये सुध्दा चांगल्या प्रमाणात वाढ झालेली आहे. सध्या डॉक्टरांना मिळणाऱ्या मासिक वेतन /मानधन अधिक इन्सेंटीव्ह अशा एकूण देय रकमेचे अवलोकन केले असता सध्या देण्यात येणाऱ्या इन्सेंटीव्हमध्ये बदल करणे आवश्यक असल्याबाबत आजचे सभेत चर्चा झाली. मा.विश्वस्त डॉ.पी.एल.तिवारी यांनी सध्या देण्यात येत असलेल्या **इन्सेंटीव्हमध्ये डॉक्टरांचा व हॉस्पिटलचा शेअर पुढीलप्रमाणे विभागणी करणेबाबतचा प्रस्ताव मांडला तो मान्य करण्यात यावा अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. सदर आदेशाची कार्यवाही दिनांक ०१.११.२००८ पासून करण्यात यावी.**

| अ.नं. | इन्सेंटीव्ह रकमेच्या | डॉक्टरांचा शेअर | हॉस्पिटलचा शेअर |
|---|---|---|---|
| ०१. | सुरुवातीच्या रुपये १ लाख इन्सेंटीव्ह रकमेपर्यन्त | ७० टक्के | ३० टक्के |
| ०२. | रुपये ०१ लाखाचे यपुढे रुपये २ लाखापर्यन्त | ८० टक्के | २० टक्के |
| ०३. | रुपये २ लाखाचे पुढे | ९० टक्के | १० टक्के |

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**०४ अ) कार्डियॉक ॲम्ब्यूलन्स जरुरीनुसार पीएमटी लोणी येथे पाठविणे बाबत**
**ब) पीएमटी लोणी तर्फे श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये कर्करोग चिकित्सा विभाग सुरु करणे बाबत**

**अ) कार्डियॉक ॲम्ब्यूलन्स जरुरीनुसार पीएमटी लोणी येथे पाठविणे बाबत : -**

मा.अध्यक्ष महोदय यांनी पी.एम.टी. लोणी, येथील डॉक्टरांच्या मागणीनुसार श्रीसाईबाबा हॉस्पिटलची कार्डिॲक ॲम्बुलन्स उपलब्ध करुन देणेविषयी येथील प्रशासनाला आदेश दिलेले आहेत. येथून डॉक्टर, नर्स व वार्डबॉय या कर्मचाऱ्यांचा संचही उपलब्ध करुन ॲम्बुलन्सबरोबर पाठविला जावा असा तेथील डॉक्टरांचा हट्टाग्रह असतो. वास्तविक पी.एम.टी,लोणी येथे मेडीकल कॉलेज असल्याने तेथे डॉक्टर्स नर्सेस इ.ची कमतरता असण्याचे काहीच कारण नाही. याऊलट श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये आर.एम.ओ. व नर्सेसची कमतरता असल्यामुळे तेथून मागणी आल्यास फक्त ड्रायव्हरसह ॲम्बुलन्स पाठविणेत येऊ शकते. कार्डिॲक ॲम्बुलन्समध्ये व्हेंटिलेटर, मल्टीपॅरा मॉनिटर, डिफिब्रिलेटर इत्यादी अत्यंत महत्वाची व महागडी उपकरणे आहेत. सदर उपकरणांची निष्काळजीपणे हाताळणी झाल्यास ती खराब होऊन बंद पडू शकतात व त्यांच्या दुरुस्तीकरिता मोठा खर्च होऊ शकतो. तसेच या उपकरणांशिवाय सदरची ॲम्बुलन्स ही गंभीर रुग्णांसाठी अयोग्य ठरते. ही ॲम्बुलन्स पी.एम.टी.लोणी येथून वापरानंतर परत आल्यावर बायो - मेडीकल इंजिनियर यांनी यातील उपरोक्त सर्व उपकरणांची संपूर्ण तपासणी करुन अहवाल देणेबाबत आदेश देण्यात आलेले आहेत. बायो-मेडीकल इंजिनियर यांच्या अहवालानुसार या उपकरणांच्या दुरुस्तीची गरज भासल्यास याकामी येणारा सर्व खर्च पी.एम.टी. ने करावा,असे मत आहे.

**ब) पीएमटी लोणी तर्फे श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये कर्करोग चिकित्सा विभाग सुरु करणे बाबत**

श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये कर्करोग चिकित्सा सुरु करणेबाबत : -

पी.एम.टी.येथील कर्करोग तज्ञ श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये कर्करोग चिकित्सा सुरु करणेबाबत उत्सुक असून तशा आशयाचा प्रस्ताव अनेक वेळा आला आहे. या कामी सहकार्य देणेस्तव श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये एक ओ.पी.डी. उपलब्ध करुन देता येईल. येथे सदर कर्करोग तज्ञांव्दारे रुग्णांचे स्क्रिनिंग करुन कर्करोगाने ग्रस्त असलेल्या रुग्णांचे उपचार पी.एम.टी.,लोणी, मध्ये केले जावेत. याचे कारण पुढीलप्रमाणे :-

कर्करोगावरील किमोथिरॅपी अथवा इतर महागडे उपचार श्री साईबाबा हॉस्पिटल येथे केले गेल्यास नियमाप्रमाणे दारिद्रय रेषेखालील रुग्णांस चॅरिटी देणे क्रमप्राप्त होऊन कोटयावधी रुपयांचा आर्थिक बोजा संस्थानवर पडणे अटळ होईल. त्यामुळे सदर उपचार हे पी.एम.टी. लोणी, येथेच केले जावेत. याकामी कर्करोगाच्या रुग्णांवर होणाऱ्या खर्चाची जबाबदारी श्री साईबाबा संस्थानवर असू नये, या अटीवरच कर्करोग चिकित्सा सुरु करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, खालीलप्रमाणे शिफारसी उपसमितीने केल्या त्या मान्य करण्यात आल्या.

**अ)** शिर्डी व शिर्डी परिसरात ज्या ज्या रुग्णांना/रुग्णालयांना कार्डीयाक ॲम्ब्यूलन्सची आवश्यकता असेल त्यांना चार्जेस आकारुन ॲम्ब्यूलन्स उपलब्ध करुन देण्यात यावी. तसेच आवश्यकता भासल्यास नविन कार्डीयाक ॲम्ब्यूलन्स खरेदी करावी, या ॲम्ब्यूलन्सवर आवश्यकतेनुसार वैद्यकीय अधिकाऱ्यांची व कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यात यावी.**कार्डीयाक ॲम्ब्यूलन्ससाठी सुधारित दर निश्चित करणेबाबत प्रस्ताव व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करण्यात यावा.**

**ब)** श्रीसाईबाबा हॉस्पिटलमध्ये कर्करोग चिकित्सा सुरु करण्यात येऊ नये. या आजाराचे रुग्णांचे माहितीसाठी **दोन्ही रुग्णालयाचे स्वागत कक्षाजवळ "कर्करोग आजारावर चिकित्सा व उपचार प्रवरा ग्रामिण रुग्णालय,लोणी येथे केले जातात" असा बोर्ड लावण्यात यावा.**

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक/वाहन विभाग प्रमुख)

**०५ अ) डॉ.संजय शुक्ला, फिजिशियन यांनी गंभीर रुग्णांबाबत वारंवार दाखविलेला निष्काळजीपणा व बेपर्वाई वृत्तीबाबत.**

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



डॉ.संजय शुक्ला यांची श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये फिजिशियन या पदावर नेमणूक झाल्याने ते दि.२४/०७/२००७ रोजी सदर पदावर हजर झाले. तेव्हापासून त्यांचेकडे स्वतंत्र युनिट असून आठवडयातून मंगळवार, गुरुवार व शनिवार या तीन दिवशी ओपीडीसह इमर्जन्सी डयुटी असून सोमवार, बुधवार व शुक्रवार या तीन दिवशी हॉस्पिटलमधील त्यांचे युनिटमध्ये दाखल झालेल्या रुग्णांचा राऊंड घेण्याव्यतिरिक्त काहीही काम नसते.

उपरोक्तप्रमाणे इमर्जन्सी डयुटीच्या दिवशी डॉ.शुक्ला यांनी त्यांचे योग्य गंभीर रुग्णांना तपासण्यासाठी हॉस्पिटलमध्ये येणे व योग्य ती कार्यवाही करणे आवश्यक होते. परंतु RMOs व इतर स्टाफ यांनी वारंवार बोलावून सुध्दा रात्रीच्या वेळी डॉ.शुक्ला येत नसत.

डॉ.शुक्ला यांच्या अनुपस्थितीत संपूर्ण ज्ञानाच्या व सुयोग्य अनुभवाच्या कमतरतेमुळे तसेच योग्य त्या मार्गदर्शनाच्या अभावाने RMOs वर मानसिक ताण पडतो तसेच रुग्णांच्या प्रकृतीला गंभीर धोके पोहचतात.

प्रसंगी होणा-या मृत्युंमुळे रुग्णांचे नातेवाईक, इतर संबंधित यांच्यात क्षोभ निर्माण होऊन प्रशासनाला वारंवार गंभीर अडचणीत यावे लागते. याबरोबरच हॉस्पिटलच्या नांवलौकिकांस बाधा येऊन त्याचे अनिष्ट परिणाम होत आहेत.

लोकांमधील रुग्णसेवेबद्दल समाधान, डॉ.शुक्ला यांचेकडून होणारा निष्काळजीपणा व बेजबाबदारपणा याबद्दल जनमाणसांत चीड व असंतोष होत असून भविष्यात त्याचा मोठा उद्रेक होण्याची दाट शक्यता आहे, असे मत आहे.

दि.२८.०८.२००८ रोजी खालीलप्रमाणे गंभीर रुग्ण श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये उपचारार्थ दाखल झाले. परंतु डॉ.शुक्ला यांनी पुढीलप्रमाणे अमानुष निष्काळजीपणा व बेपर्वाई दाखविली आहे.

श्रीमती शांताबाई गायकवाड, वय ६५, ही महिला दु.१.४० वा. GICU मध्ये गंभीर अवस्थेत डॉ.शुक्ला यांच्या युनिटमध्ये दाखल करण्यात आली. डॉ.संजय पठारे, डॉ.सुभाष शामकुंवर व डॉ.वरुण खडांगळे, आरएमओ यांनी वारंवार दूरध्वनी करुन सुध्दा डॉ.शुक्ला दु.०४.०० वा. पर्यंत हॉस्पिटलमध्ये फिरकले नाहीत. त्यानंतर सदर रुग्णास दुपारी ०४.०० वा. त्यांनी तपासले असता तिची हृदय क्रिया बंद पडलेली आढळली. संध्याकाळी ०६.०० वा. सदर रुग्णास आरएमओ व्दारे मृत घोषित करण्यात आले.

श्री राजेश यशवंत कोकाटे, वय ३८ हा रुग्ण दु.१.४५ वा. ICU मध्ये तीव्र हृदय विकाराचा झटका आल्याने भरती करण्यात आला. या रुग्णालाही डॉ.शुक्ला यांनी दु.०४.०० वा. म्हणजेच सुमारे सव्वा दोन तासाच्या विलंबानंतर तपासले. सदर रुग्णाचा मध्यरात्री ००.५१ वा. मृत्यू झाला. याही रुग्णाचा मृत्यू आरएमओ व्दारे घोषित करण्यात आला.

श्रीमती गौतमीबाई झोटींग, वय ७५ वर्षे, ही महिला गंभीर आजाराने संध्याकाळी ०५.४५ वा. ICU मध्ये भरती करण्यात आली. सदर रुग्णाला डॉ.शुक्ला यांनी तपासले सुध्दा नाही. या रुग्णाचा मृत्यू संध्याकाळी ०६.४५ वा. झाला. याही रुग्णाचा मृत्यू आरएमओ व्दारे घोषित करण्यात आला.

वरील रुग्णांपैकी श्रीमती शांताबाई गायकवाड हिच्या नातेवाईकांनी डॉ.शुक्ला यांचे निष्काळजी पणाबद्दल संतापजनक प्रतिक्रिया व तीव्र असंतोष व्यक्त केला. सुदैवाने याचवेळी अत्यंत आदरणीय व मान्यवर व्यक्ती रुग्णालयात योगायोगाने उपस्थित होत्या व त्यांच्या हस्तक्षेपामुळे सदर प्रकरणाला अनिष्ट वळण लागले नाही.

डॉ.शुक्ला यांच्या इन्सेन्टीव्हज् बद्दलच्या अपेक्षा व त्यांची या संदर्भातील मतप्रणाली पुढीलप्रमाणेः-

डॉ.शुक्ला यांनी मध्यंतरी इन्सेन्टीव्हज मिळत नाहीत या कारणास्तव संस्थान कर्मचा-यांना तपासण्यास नकार दिला होता. मा.उप वैद्यकीय संचालक यांनी योग्य ती समज दिल्यावरही डॉ.शुक्ला यांची संस्थान कर्मचा-यांना दिली जाणारी वैद्यकीय सेवा संशयास्पद असल्याची अनेक कर्मचा-यांमध्ये भावना आहे.

ब) इन्सेन्टीव्हज वाढवून मिळाल्याशिवाय रुग्ण सेवा न सुधारल्याबाबत डॉ.शुक्ला यांनी जाहिरपणे केलेले मत प्रदर्शन

डॉ.शुक्ला यांना दि.२९.०८.२००८ रोजी दुपारी ०५.३० वा. वैद्यकीय संचालक यांचे कक्षात समक्ष बोलावून उपरोक्त घटनांबाबत विचारणा केली असता डॉ.शुक्ला यांनी दिलेले उत्तर पुढीलप्रमाणे :-

'फिजिशियन्सना सध्या मिळणारे इन्सेन्टीव्हज हे अल्प व असमाधानकारक असल्याकारणाने श्रीसाईबाबा संस्थानने माझेकडून (फिजिशियन या नात्याने) तत्पर व सुयोग्य रुग्ण सेवा अपेक्षित धरु नये. जोपर्यंत इन्सेन्टीव्हज्ची रक्कम वाढविण्यात येणार नाही. तोपर्यंत सदरची बेजबाबदार व निष्काळजीपणाची माझी वर्तणूक माझ्या मते समर्थनीयच आहे. प्रशासनाला रुग्णांची फारच काळजी असल्यास प्रशासनाने प्रथम माझे इन्सेन्टीव्हज् वाढविणेबाबतची कार्यवाही सत्वर करावी '

उपरोक्त तीन रुग्णांच्या मृत्यूंबाबत दाखविलेल्या दिरंगाईचे कारण डॉ.शुक्ला यांच्या मते इन्सेन्टीव्हजची कमतरता हेच आहे. जोपर्यंत इन्सेन्टीव्हजमध्ये मोठी सुधारणा होत नाही, तोपर्यंत डॉ.शुक्ला यांचेकडून कामकाजात सुधारणा होण्याची शक्यता श्री साईबाबा संस्थानने अपेक्षित धरली जाऊ नये, असे त्यांनी स्पष्ट केले आहे.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



दिनांक २९.०८.२००८ रोजी डॉ.शुक्ला यांना समज देऊनही त्यांचे दिनांक ३१.०८.२००८ रोजीचे त्यांचे इमर्जन्सी डयुटी वेळेत (दिनांक ३१.०८.२००८ रोजी सकाळी ०८.०० ते दिनांक ०१.०९.२००८ रोजी सकाळी ०८.०० वाजेपर्यंत) खालील दोन गंभीर रुग्णांना भरती झाल्यापासून सुमारे ६ ते ८ तास तपासले नाही. या रुग्णांचा तपशील पुढीलप्रमाणे :-

श्रीमती सुनिता सोनवणे, वय ३५ वर्षे, ही रुग्ण दिनांक ०१.०९.२००८ रोजी पहाटे ३.०० वाजता मेंदूमध्ये रक्ताच्या गुठळया झाल्याने (Stroke) शरिराच्या उजव्या बाजूचा पक्षाघात होऊन फिट्सचे झटके येत असल्याचे अवस्थेत G I C U विभागात उपचारार्थ भरती करण्यात आली. तिचा रक्तदाबही १५० - १२० मि मि इतका उच्च होता. अशा गंभीर अवस्थेत ज्या रुग्णाला सुमारे ६ तासांच्या विलंबाने म्हणजेच सकाळी ०९.०० वाजता तपासले. तोपर्यंत रुग्णाची परिस्थिती ढासळत गेली होती.

श्री लक्ष्मण गणपत लहारे हा रुग्ण दिनांक ०१.०९.२००८ रोजी पहाटे ०१.०० वाजता हार्ट ॲटॅक आल्याने I C C U विभागात भरती करण्यात आले या रुग्णालाही डॉ.शुक्ला यांनी सुमारे ८ तासांच्या विलंबाने म्हणजेच सकाळी ०९.०० वाजता तपासले.

वरील दोन्हीही रुग्णांबाबत Golden Hour या परिकल्पनेची पायमल्ली डॉ.शुक्ला यांचेकडून करण्यात आलेली आहे. उपरोक्त दोन्हीही रुग्णांना त्याचे दुष्परिणाम भोगावे लागत आहेत.

तसेच याचा अर्थ डॉ.शुक्ला यांना समज देऊनसुध्दा त्यांचे वर्तनात सुधारणा होण्याची शक्यता त्यांना मोठया प्रमाणात इन्सेंटिव्हज् वाढवून दिल्याखेरीज असंभवनीय वाटते.

डॉ.शुक्ला यांच्या गैरशिस्त वर्तनाचे गांभीर्य विचारात घेऊन या गैरशिस्त वर्तनाची रितसर खातेनिहाय चौकशी पूर्ण होऊन निर्णय होईपर्यंत संस्थान हॉस्पिटल सेवेतून दि.०३.०९.२००८ पासून जा.क्र.एसएसएस/वशी - ७ ए /२४८७/ २००८ दि. ०२.०९.२००८ अन्वये सेवानिलंबित करण्यात आले आहे.

डॉ.शुक्ला यांनी दिलेल्या बेमुर्वतखोर व संतापजनक विधानांमुळे तसेच त्यांच्या बेजबाबदार, अनैतिक व निष्काळजी वर्तणुकीमुळे ते पुढीलप्रमाणे कार्यवाहीस पात्र आहेत, असे मत आहे.

डॉ.शुक्ला यांचा रुग्ण सेवेबाबतचा निष्काळजीपणा, गंभीर रुग्णांच्या बाबतही दाखविलेली अनास्था व बेजबाबदार वर्तणूक यासह मोठया इन्सेन्टीव्हजबद्दलची त्यांची तीक्ष्ण व लोभी मतप्रणाली लक्षात घेता श्री साईबाबा संस्थानच्या गरीब, गरजू रुग्णांनाही संपूर्ण उपचार देण्याच्या तत्वज्ञानाशी डॉ.शुक्ला यांची वर्तणूक व विचारसरणी विसंगत व अमान्य आहे. तसेच समज देऊनसुध्दा त्यांचे वर्तनात सुधारणा होणे असंभवनीय आहे. या कारणांमुळे डॉ.शुक्ला यांचेवर उचित कारवाई करणे अत्यावश्यक असलेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, डॉ.शुक्ला यांची खातेचौकशी लवकरात लवकर पुर्ण करुन वरीलप्रमाणे दोषी आढळल्यास त्यांना सेवामुक्त करण्यात यावे अथवा राजीनामा दिल्यास तो स्विकारण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली आहे.**

(कार्यवाही-कामगार अधिकारी/वैद्यकीय संचालक)

**०६ <u>श्रीसाईबाबा हॉस्पिटलमधील डॉक्टरांना निवासासाठी फॅमिली क्वार्टर्स मिळणे बाबत</u>**

श्रीसाईबाबा हॉस्पिटलमध्ये ४० आर.एम.ओ. व ०६ सी.एम.ओ. अशा एकूण ४६ ज्युनिअर डॉक्टर्सची (आर.एम.ओ., सी.एम.ओ.) पदे शासनमान्य असून सध्या ३९ इतक्या ज्यु.डॉक्टर्स (आर.एम.ओ., सी.एम.ओ.) कार्यरत आहेत. यापैकी बऱ्याच डॉक्टरांचे विवाह झाले असून काहींचे कुटूंब विस्तृत आहे. ज्युनिअर्स डॉक्टर्सपैकी फक्त तीन जणांना वरील प्रकारची निवासस्थाने प्राप्त झालेली आहे. इतर डॉक्टरांची राहण्याची सोय करणेकामी ज्युनिअर्स डॉक्टर्ससाठी योग्य अशी (हॉल, बेडरुम, किचन, वरंडा, सेल्फ कन्टेन्ड) २० निवासस्थाने उपलब्ध करण्याची जरुर आहे.

तसेच सिनिअर डॉक्टर्सपैकी (कन्सल्टंटपैकी) बऱ्याच जणांना अद्याप त्यांचे योग्य निवासस्थाने (हॉल, बेडरुम, किचन, वरंडा, सेल्फ कन्टेन्ड) उपलब्ध झालेली नाहीत. तरी अशा किमान ३० सिनीअर डॉक्टर्स निवासस्थानांची जरुरी आहे. निवासस्थानांच्या अभावी बरेच कन्सल्टंट श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये रुजू होणेस तयार होत नाहीत. कन्सल्टंट, आर.एम.ओ. व सी.एम.ओ. डॉक्टर्सला निवासस्थान उपलब्ध झाल्यास तत्पर रुग्णसेवा देता येईल.

तसेच मा.विश्वस्त डॉ.पी.एल.तिवारी यांनी दूरध्वनीमार्फत डॉक्टर्ससाठी ५० निवासस्थाने संस्थानमार्फत नविन कन्स्ट्रक्शन करुन देणेबाबत प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना देण्यात आलेल्या असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, बांधकाम विभागाने वैद्यकीय अधिकाऱ्यांसाठी निवासस्थाने बांधणेकामी जागा निश्चित करुन सविस्तर प्लॅन व एस्टिमेट तयार करावे अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक/बांधकाम विभागप्रमुख)

**०७ <u>श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये रुग्णांच्या बिलात देण्यात येणाऱ्या सवलतीची नियमावली बनविणे बाबत.</u>**

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये आसपासच्या परिसरातीलच नव्हेतर राज्यभरातून व परराज्यांमधूनही रुग्ण दाखल होण्याचे प्रमाण खूप मोठया प्रमाणात वाढलेले असून, जीवनदायी योजनेमुळे त्यात अधिकच भर पडली आहे, त्याच प्रमाणात सवलत मागण्यांचे प्रमाणही वाढतच चालले आहे, सवलत देणेविषयी आवश्यक ती कागदपत्रे व खालील मुद्यांवर सविस्तर चर्चा होऊन नियमावली तयार करण्यात यावी ही विनंती.

(१) दि बॉम्बे पब्लिक ट्रस्ट अॅक्ट, १९५०, कलम ४१ एए, ४१ एए (बी), ४१ एए (१) (सी), ४१ एए (४) (सी), व मा.उच्च न्यायालय, मुंबई यांचेकडील रिट पिटीशन नं.३१३२/२००४ मध्ये दि.१७.०८.२००६ चे आदेशान्वये लागू केलेल्या गरीब, गरजू व आर्थिक दृष्टया दुर्बल घटकांतील रुग्णांसाठीची योजना. मा.व्यवस्थापन समितीचे दि.२५.११.२००६ चे सभेतील विषय क्र.३९, निर्णय क्र.९१२ अन्वये सदर योजनेच्या अंमलबजावणीस मान्यता प्राप्त आहे.

दि बी.पी.टी. अॅक्ट, १९५०, कलम ४४ एए व मा.उच्च न्यायालयाच्या योजनेनुसार :-

(अ) पब्लिक चॅरिटेबल ट्रस्टने हॉस्पिटलच्या वापरण्यात येणाऱ्या एकूण खाटांच्या १०% खाटा गरीब रुग्णांसाठी राखीव ठेऊन बिल आकारणी करु नये.

(शासन निर्णय, दि. ६.१२.२००५, नुसार गरीब व्यक्ती म्हणजे ज्यांचे म्हणजे ज्यांचे वार्षिक उत्पन्न रु.२५,०००/- च्या मर्यादेत आहे अशी व्यक्ती).

(ब) पब्लिक चॅरिटेबल ट्रस्टने हॅास्पिटलच्या वापरण्यात येणाऱ्या एकूण खाटांच्या १०% खाटा दुर्बल घटकांतील (Weaker Section) राखीव ठेऊन सवलतीच्या दरामध्ये बिल आकारणी करण्यात यावी. (शासन निर्णय, दि. ६.१२.२००५, नुसार दुर्बल घटकातील व्यक्ती म्हणजे ज्यांचे वार्षिक उत्पन्न रु.५०,०००/- च्या मर्यादेत आहे अशी व्यक्ती).

१. दुर्बल घटकातील रुग्णांच्या वैद्यकीय तपासण्या व उपचार चॅरिटेबल हॅास्पिटलच्या प्रत्येक विभागात सवलतीच्या दरात करण्यात यावे, ज्या सेवा बील आकारणी करुन करण्यात येतात, त्या सेवांचे अतिदुर्बल रुग्णांचे बील हे हॉस्पिटलच्या कमीतकमी दरश्रेणी प्रमाणे आकारण्यात यावे, औषधे व इतर साधनांचे बील हॅास्पिटलच्या खरेदीच्या दराइतकेच आकारण्यात यावे, तरीही दुर्बल घटकांतील रुग्णांनी औषधे व इतर साधनांचे किमान ५०% बील अदा करावे, जर डॉक्टर्स त्यांची फी आकारणार नसतील तर ती दुर्बल घटकातील रुग्णांच्या अंतिम बीलामध्ये दर्शविण्यात येऊ नये, अशा प्रकारे बील तयार करुन ते इंडिजंन्ट पेशंन्ट फंड (आय.पी.एफ.) खात्याच्या खर्चामध्ये दर्शविण्यात यावे.

२. चॅरिटेबल हॉस्पिटलने दर महिन्याला सर्व रुग्णांच्या (अतिदुर्बल व दुर्बल घटक सोडून) एकूण बील रक्कमेच्या २ % रक्कम आय.पी.एफ. खात्यामध्ये जमा करावेत, आय.पी.एफ. खात्यामध्ये जमा असलेली जास्तीत जास्त रक्कम अतिदुर्बल व दुर्बल घटकांतील रुग्णांच्या वैद्यकीय उपचारावर खर्च करण्यात यावी, जर सतत सहा महिने आय.पी.एफ. खात्यामध्ये रक्कम कमी किंवा जास्त असल्यास ती पुढील महिन्यात संतुलित करण्यात यावी, जर आय.पी.एफ. खात्याची शिल्लक रक्कम कमी असेल व अतिदुर्बल, दुर्बल घटकांतील रुग्णांच्या उपचाराचा खर्च जास्त असेल तर, तर चॅरिटेबल हॉस्पिटलने सदर बाब नियंत्रण कमिटी (मॉनिटरींग कमिटी) यांचे निदर्शनास आणून द्यावे, की जे सदर हॉस्पिटलला योग्य ते निर्देश करतील.

३. चॅरिटेबल हॉस्पिटलने आय.पी.एफ.खात्यामध्ये जमा झालेल्या रक्कमेची माहिती मा. धर्मादाय आयुक्त यांना सादर करावी आर्थिकदृष्टया अतिदुर्बल व दुबल घटकांतील रुग्णांवर केलेले उपचार व त्यांच्या संबंधी वैद्यकीय समाज सेवकांनी संकलित केलेली माहिती, प्रत्येक रुग्णांवर झालेला खर्च यासह बॉम्बे पब्लिक ट्रस्ट नियम १९५१, नियम २५ ए, नुसार माहिती सादर करण्यात यावी.

४. चॅरिटेबल हॉस्पिटलच्या विश्वस्तांनी त्यांचे नातेवाईक, ट्रस्टचे कर्मचारी व त्यांचेवर अवलंबून असलेले कुटूंबिय यांना अतिदुर्बल व दुर्बल घटकांच्या रुग्ण श्रेणीमध्ये चॅरिटेबल हॉस्पिटलमध्ये वैद्यकीय उपचार करुन घेऊ नयेत.

५. चॅरिटेबल हॉस्पिटलमध्ये कोणत्याही ठिकाणाहून किंवा शासकीय रुग्णालय किंवा नगरपालिका रुग्णांलय इत्यादी मार्फत आलेल्या आर्थिकदृष्टया अतिदुर्बल व दुर्बल घटकांतील रुग्णांना खाली दर्शविलेल्या नियमानुसार दाखल करुन घेण्यात यावे.

६. उपरोक्त कलम ५ मध्ये दर्शविल्याप्रमाणे चॅरिटेबल हॉस्पिटलमध्ये वापरण्यात येणाऱ्या सरासरी खाटांच्या १०% पर्यंत खाटा अतिदुर्बल रुग्ण वैद्यकीय तपासण्या व उपचारांसाठी दाखल करुन घेण्यात यावेत, त्याचप्रमाणे आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांतील रुग्णांना चॅरिटेबल हॉस्पिटलमध्ये वापरण्यात येणाऱ्या सरासरी खाटांच्या १०% पर्यंत रुग्ण वैद्यकीय तपासण्या व उपचारांसाठी दाखल करुन घेंण्यात यावे, चॅरिटेबल हॉस्पिटलने रुग्णांची आर्थिक परिस्थिती वैद्यकीय समाज सेंवकांमार्फत खालीलपैकी कोणत्याही एका दाखल्यानुसार तपासून घ्यावी :-

१. रेशनकार्ड/दारिद्रय रेषेखालील कार्ड.
२. तहसिलदारांचा मागील आर्थिक वर्षाचा उत्पन्नाचा दाखला.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



३. फोटो ओळखपत्र (शासनमान्य १३ कागदपत्रांपैकी कोणतेही एक उदा.आर.टी.ओ. लायसेन्स, मतदान ओळखपत्र, पासपोर्ट, पॅन कार्ड इ.)

परंतु सध्या अशा प्रकारच्या रुग्णांची संख्या मोठया प्रमाणावर वाढत असून बहुतेक रुग्ण दाखल होतांनाच रेशन कार्ड, तहसीलदारांचा दाखला अशी कागदपत्रे सादर करतात, याबाबत मा. उच्च न्यायालयाच्या योजनेनुसार (गरीब, गरजू (Indigent) १०% व दुर्बल घटकांतील (Weaker Section) १०%) असे २० % रुग्णांपेक्षा अधिक रुग्णांस सवलत देण्यात यावी किंवा कसे? याबाबत योग्य तो निर्णय होणे गरजेचे आहे.

(२) मा. व्यवस्थापन समितीचे दि.१९.८.२००६ चे सभेतील विषय क्र.२६, निर्णय क्र.४०१ अन्वये श्री साईनाथ रुग्णालयामध्ये दारिद्रय रेषेखालील कार्डधारकांनी बिलांमध्ये सवलतीची मागणी केल्यास पुर्ण रकमेपर्यंत माफी देणेत येते, इतर पेशंटला त्यांचेशी आर्थिक क्षमतेबाबत चर्चा करुन सवलत देण्यात येते, याबाबत रु.१०००/- पर्यंत सवलत देणेचे अधिकार वैद्यकीय अधिक्षिका, रु.१०००/- ते रु.५०००/- पर्यंत प्रशासकीय अधिकारी, रुग्णालये, व रु.५०००/- च्या पुढील सवलतींचे अधिकार मा.कार्यकारी अधिकारी यांना दिलेले आहेत.

उपरोक्त नियम श्री साईनाथ रुग्णालयातील नाममात्र दर आकारणी विचारात घेऊन करण्यात आलेला आहे, परंतु तोच नियम श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये लागू आहे, वास्तविकत: श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये सुपर स्पेशालिटी वैद्यकीय सेवा सुविधा उदा. सि.टी. स्कॅन, एम.आर.आय., आय.सी.यु, हृदय शस्त्रक्रिया इ. पुरविण्यात येत असल्याने सहाजिकच दर आकारणी (रु.५,०००/- ते रु.१,५०,०००/- पर्यंत किंवा त्याहुन जास्त) त्या प्रमाणात जास्त असते.

यास्तव सवलतींचे अधिकार पुढीलप्रमाणे वाढविण्यात यावेत किंवा कसे? वैद्यकीय अधिक्षिका यांना रु.५,०००/- पर्यंत, उप-वैद्यकीय संचालक यांना, रु.१५,०००/- पर्यंत, वैद्यकीय संचालक यांना रु.२५,०००/- पर्यंत, प्रशासकीय अधिकारी यांना रु.५०,०००/- पर्यंत, मा.कार्यकारी अधिकारी यांना रु.१,००,०००/- पर्यंत, व त्यापुढील रकमेच्या सवलतींचे अधिकार मा. व्यवस्थापन उप-समिती यांना देण्यात यावेत किंवा कसे याबाबत निर्णय होणे गरजेचे आहे.

(३) मा. व्यवस्थापन समितीचे दि.१५.५.२००६ चे सभेतील विषय क्र.०२, निर्णय क्र.३०८, अन्वये, प्रत्येक ब्रँचमध्ये २०% चॅरीटी देणेबाबत मान्यता प्राप्त आहे.

सध्या मा. अध्यक्ष, उपाध्यक्ष, किंवा मा. विश्वस्त यांचे शिफारस पत्रानुसार रुग्णांस सरासरी २०% इतकी सवलत देण्यात येते. परंतु काही प्रसंगी पदाधिकाऱ्यांकडून नुसते शिफारस पत्र देण्यात येते किंवा टेलीफोन वरुन सुचना देण्यात येतात, परंतु कोणतीही कागदपत्रे नसतांना प्रसंगानुरुप बिलांमध्ये कमी अधिक प्रमाणात किंवा पुर्ण सवलत द्यावी लागत आहे, याबाबत नियम होणे गरजेचे आहे.

४) दिवसा अथवा रात्री-अपरात्री अनेक रुग्ण गंभीर वा अति-गंभीर अवस्थेत उदा. हृदय विकाराचा झटका, विषबाधा/ विषप्राशन, गळफास, गॅसगळती, भाजणे, पाण्यात बुडणे, भिंत किंवा झाड पडणे, वीज पडणे, भूकंप-वादळ, वन्यप्राणी हल्ला, श्वानदंश, सर्पदंश इ. वा बरेचदा रस्त्यावरील वाहन अपघातात आसपासच्या परिसरातील जखमी झालेले रुग्ण एकाच वेळी मोठया संख्येने दाखल होतात, अशावेळी त्यांना डिपॉझिट भरणेची सक्ती करणे मानवतेच्या व कायद्याच्यादृष्टीने योग्य नसल्याने त्यांचेवर विविध प्रकारच्या महागडया तपासण्या उदा. सी.टी.स्कॅन, एम्.आर.आय. वगैरेंसह उपचार, प्रसंगी तातडीच्या शस्त्रक्रियाही कराव्या लागतात, अशा रुग्णांच्या नातेवाईकांकडून मागाहून रक्कम भरण्याचे लेखी हमीपत्र घेतले तरीही विविध क्षेत्रातील मान्यवरांचे फोन व शिफारसपत्राद्वारे मोफत उपचार करण्याच्या सुचना व विनंती केली जाते, मात्र अशा रुग्णांकडून डिपॉझिट भरुन घेणे अथवा बील वसुली करणे अवघड होऊन बसते, याबाबत नियम होणे गरजेचे आहे.

श्रीसाईभक्त:- देशाच्या कानाकोप-यातून तसेच परदेशातूनही मोठया प्रमाणात साईभक्त साई दर्शनासाठी येत असतात, क्वचित प्रसंगी त्यांना संस्थानचे भक्त निवास, भोजनगृह, दर्शनरांग, मंदिर परिसर, प्रवासा दरम्यान अपघात होत असतात किंवा हार्ट अॅटॅक, अॅपेन्डीक्स, अर्धांगवायु, ब्रेन हॅमरेज इ. अकस्मात उद्‌भवलेल्या आजारामुळे भक्ताची प्रकृती गंभीर बनते, कधीकधी प्रवासा दरम्यान वाटमारी होते, चोरटयांकडून बेदम मारहाण होते, शिर्डीच्या आसपास ४०/५० कि.मी. परीसरातील अशा घटनांमध्ये सापडलले साईभक्तांना श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात येते, काही भक्त बिलापोटी काही प्रमाणात अनामत रक्कम भरतात, तर काही भक्त अनामत रक्कम भरु शकत नाही.

अशा रुग्णांचे डिपॉझिट भरुन घेणे, तपासण्या, उपचार इ. बाबतचे सर्व अधिकार वैद्यकीय अधिक्षिका, उप-वैद्यकीय संचालक /वैद्यकीय संचालक यांना देण्यात यावेत किंवा कसे? किंवा अशा रुग्णांस औषधे इंजेक्शन्स् स्वत: बाहेरुन घेण्यास सांगून फक्त हॉस्पिटल चार्जेस माफ करण्यात यावेत किंवा कसे?

तसेच अशा रुग्णांसाठी बिलींग विभागात एक दानपेटी ठेऊन, रुग्ण किंवा नातेवाईक स्वखुशीने दान पेटीत जी रक्कम दान करणार असेल त्या रकमेची रजिष्टरमध्ये नोंद करुन त्याची पावती संबंधितांना देण्यात यावी किंवा कसे? याबाबत नियम होणे गरजेचे आहे.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



(५) मृत्यू पावलेल्या बहुतेक रुग्णांच्या बिलांमध्ये मोठया प्रमाणावर सवलत देणे भाग पडते, बील न भरल्याच्या कारणास्तव अदयापपर्यंत कोणतेही शव अडवून ठेवण्यात आलेले नाही, याबाबत नियम होणे गरजेचे आहे.

अशा उपचारा दरम्यान मृत्यु पावलेल्या मयत रुग्णां बाबतचे सर्व अधिकार वैद्यकीय अधिक्षिका उप-वैद्यकीय संचालक /वैद्यकीय संचालक यांना देण्यात यावेत किंवा कसे?

तसेच बिलींग विभागात एक दानपेटी ठेऊन, नातेवाईक स्वखुशीने दान पेटीत जी रक्कम दान करणार असेल त्या रकमेची रजिष्टरमध्ये नोंद करुन त्याची पावती संबंधितांना देण्यात यावी किंवा कसे? याबाबत नियम होणे गरजेचे आहे.

(६) आजी-माजी आमदार, खासदार, मंत्री, शासन अधिकृत पत्रकार, स्थानिक प्रतिष्ठीत नागरिक तसेच विश्वस्त मंडळाचे आजी-माजी पदाधिकारी, इतर मान्यवर व्यक्ती, स्वातंत्र्य सैनिक, जेष्ठ नागरीक, विविध आश्रमांतील साधू/तपस्वी, आश्रमशाळेतील विद्यार्थी, अपंग, शासकीय अधिकारी इ. वा त्यांचे कुटूंबीयांवर करण्यात आलेल्या वैद्यकीय तपासण्या/उपचारांचे बिलांची मागणी करणे संबंधितांचे पद, समाजातील दर्जा, शिष्टाचार (प्रोटोकॉल) यामुळे प्रशासनास अडचणीचे ठरते. याबाबत नियम होणे गरजेचे आहे.

अशा रुग्णांस बिलींग विभागामार्फत बिल भरणे बाबतचे मागणी पत्र/नोटीस पाठवून वसुली संबंधिची कार्यवाही करण्यात यावी किंवा त्यांचे बिलात संपुर्ण माफी देण्यात यावी किंवा कसे? याबाबत नियम होणे गरजेचे आहे.

(७) आकस्मित तातडीच्या प्रसंगी, कार्यालयीन वेळेनंतर, सुट्टीच्या दिवशी किंवा उप-वैद्यकीय संचालक, वैद्यकीय संचालक, प्रशासकीय अधिकारी यापैकी कुणीही हजर नसल्यास, अशा तातडीच्या व गंभीर प्रसंगी हॉस्पिटलचे मॅनेजर या पदावरील उपस्थित अधिकारी यांनी वरिष्ठांशी दुरध्वनी/मोबाईलवरुन संपर्क साधून रुग्ण विना डिपॉझिट दाखल करुन घेणे, मृतदेह नातेवाईक/पोलीस (पोलीस केस दाखल असल्यास) यांचे ताब्यात देणे, मोफत केस पेपर देणे, सर्प दंशावरील इंजेक्शन्स् (५०% किमंत आकारुन किंवा मोफत) देणे इ. सारखे निर्णय घेण्यास परवानगी असावी, की जेणे करुन रुग्णांचे नातेवाईक, जमावाचा उद्रेक होणार नाही किंवा वर्तमानपत्रे/वृत्तवाहिन्यां सारख्या प्रसिध्दी माध्यमांद्वारे हॉस्पिटलविषयी क्षुल्लक कारणांवरुन वृत्ते प्रसिध्द होणार नाहीत, यास्तव सदर बाबीस मान्यता असावी.

(८) श्री साईबाबा संस्थान कर्मचारी व त्यांचे कुटूंबिय :- दि.०१.०४.१९९९ रोजीच्या श्री साईबाबा संस्थान सेवा (वैद्यकीय देखभाल) नियम १९९९, नियमावली नुसार श्री साईबाबा संस्थान कर्मचारी व त्यांचे कुटूबियांनाश्रीसाईनाथ रुग्णालयात मोफत औषधोपचार करण्यात येतात, या शिवाय जे उपचार संस्थानचे रुग्णालयात होत नाहीत, अशा उपचारांसाठी संस्थान कर्मचाऱ्यांना अगर त्यांचे नातेवाईकांना बाहेरच्या रुग्णालयात पाठविणेत येते व या कामी आलेल्या खर्चाची प्रतिपूर्ती संस्थान कडून करण्यात येते.

श्री साईबाबा हॉस्पिटलच्या सर्व विभागांची ओ.पी.डी. क्षमतेपेक्षा जास्त प्रमाणात होत असून त्यामध्ये ५०% पेक्षा जास्त ओ.पी.डी. रुग्ण हे संस्थान कर्मचारी किंवा त्यांचे अवलंबित असतात, यास्तव किरकोळ आजारांसाठी उदा. सर्दी पडसे, खोकला, ताप, डोकेदुखी इ. साठी यापुर्वीच्या नियमाप्रमाणे कर्मचाऱ्यांनी श्रीसाईनाथ हॉस्पिटलमध्ये उपचार घ्यावेत किंवा श्री साईबाबा हॉस्पिटलच्या कॅन्सल्टी विभागातून संदर्भित केल्यास सुपर कन्सल्टंटचे उपचार घ्यावेत.

श्री साईबाबा हॉस्पीटल कार्यान्वीत झाल्यापासुन बहुतेक सर्व प्रकारच्या सुपरस्पेशालिटी वैद्यकिय सेवा-सुविधा उदा. सी.टी. स्कॅन, एम.आर,आय, अॅन्जिओग्राफी इ. तपासण्या, आय.सी.यु. जी.आय.सी.यु. मधील उपचार, कृत्रिम सांधे बसविणे, मेंदू व हृदय शस्त्रक्रिया इ. करण्यात येतात, संस्थानचे कर्मचारी व त्यांचे अवलंबीत कुटुंबीय यांचेवर मोठया शस्त्रक्रिया करतेवेळी संस्थान कर्मचारी व त्यांचे कुटूबियांचे आग्रहास्तव इम्पोर्टेड उपकरणे उदा. स्टेन्ट, बलून, पेसमेकर, व्हॉल, डिव्हाईस, कृत्रिम गुडघे, खुबे इ. वापरण्यात आल्यास त्यासाठी येणाऱ्या वाढीव खर्चाच्या/ फरकाच्या रकमेचा भरणा संबंधित कर्मचाऱ्याकडून करुन घेण्यात यावा किंवा कसे? याबाबत योग्य तो नियम होणे गरजेचे आहे.

बहुतेक सर्वच कर्मचारी स्पेशल रुम व डिलक्स् रुमची मागणी करतात यास्तव खालील प्रमाणे नियम करण्यात यावा.

| अ.नं. | श्रेणी | वार्ड |
|---|---|---|
| १ | वर्ग -I | डिलक्स् रुम |
| २ | वर्ग - II | स्पेशल रुम |
| ३ | वर्ग - III | **ट्विन शेअरींग** |
| ४ | वर्ग -IV | जनरल किंवा सेमी प्रायव्हेट वार्ड |

जर एखादा कर्मचारी त्यांच्या श्रेणी व्यतिरीक्त स्पेशल किंवा डिलक्स् रुमचे चार्जेसचा रोख भरणा करण्यास राजी असल्यास अशा कर्मचाऱ्यास वा त्याचे अवलंबित कुटूंबिय रुग्णास स्पेशल किंवा डिलक्स् रुम देण्यात यावे.

प्रत्येक संस्थान कर्मचा-यास वैदयकीय सेवा मिळणेकामी त्यांचे अवलंबित कुटूंबियांसह ग्रुप फोटो असलेले ओळखपत्र सक्तीचे करावे, कारण त्यामुळे नुसते नाव सांगून कोणासही गैर फायदा घेता येणार

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



नाही, एकदा फोटो ओळखपत्र चालू केल्यानंतर कोणत्याही सबबीखाली उदा. ओळखपत्र सापडत नाही, हरवले आहे, विसरले आहे, नंतर देतो इ. सबबीखाली मोफत केस पेपर व पुढील वैदयकीय सेवा देण्यात येऊ नयेत, परंतु प्रसंगानुरुप व रुग्णाच्या आजाराच्या गंभीरतेनुसार अशा सेवा देणे भाग पडल्यास त्याचे रितसर बिल हे संबंधित कर्मचाऱ्याकडून भरुन घेण्यात यावे व संबंधित कर्मचाऱ्याने आवश्यक कागदपत्राची पुर्तता करण्यात आल्यास वैदयकीय खर्चाचा परतावा देता येऊ शकेल.

अशा प्रकारचे कुटूंब ओळखपत्र महाराष्ट्र शासनाची राज्य कामगार योजना (ई.एस.आय.एस.) लागू असलेल्या राज्यभरातील सर्व आस्थापनांमधील कामगारांना लागू करण्यात आलेले आहे)

संस्थान कर्मचारी किंवा त्यांचे अवलंबित कुटूंबीय रुग्णालयात ॲडमिट नसतांनाही, त्यांना मुंबई, पूणे येथील वरिष्ठ रुग्णालयात तपासण्या/उपचारार्थ घेऊन जाणेसाठी मोफत ॲम्बुलन्सची मागणी करतात, तरी रुग्ण ॲडमिट नसतांना ॲम्बुलन्स् देणे झाल्यास संबंधित कर्मचा-याकडून भाडे वसूल करण्यात यावे, परंतु इतर ॲडमिट पेशंटची मागणी नसल्यास व अँम्बुलन्स उपलब्ध असल्यास या बाबतचे सर्व अधिकार वैद्यकीय अधिक्षिका, उप-वैद्यकीय संचालक /वैद्यकीय संचालक यांना देण्यात यावेत किंवा कसे? या विषयी योग्य तो नियम होणे गरजेचे आहे.

तसेच संस्थानचे सेवानिवृत्त कर्मचारी व त्यांचे वरील अवलंबीत पती/पत्नी यांचेवर (शासनाच्या सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या धर्तीवर) वयोमानापरत्वे वारंवार औषधोपचार व वैद्यकीय उपचाराची आवश्यकता असते, अशा कर्मचाऱ्यांनी संस्थानच्या सेवेत आयुष्यातील बराच मोठा कालावधी व्यतीत केलेला असतो, त्यांना मोफत वैदयकिय सेवा सुविधा पुरविणे बाबत योग्य तो नियम होणे आवश्यक आहे,

(९) सध्या ॲम्ब्युलन्सचे दर इतर ॲम्बुलन्सच्या तुलनेत अत्यंत कमी असुन त्यामधे वाढ करण्यात यावी किंवा कसे ?

| ॲम्बुलन्सचा प्रकार | सध्याचे दर | प्रस्तावित दर |
|---|---|---|
| टाटा सुमो व टाटा ४०७ (डिझेल) | रू.३/- प्रति कि.मी | रू.५/- प्रति कि.मी. |
| मारुती ओमनी (पेट्रोल) | रू.४/- प्रति कि.मी. | रू.६/- प्रति कि.मी. |
| टेम्पो ट्रॅव्हलर-कार्डीयाक (डिझेल) | रू.५/- प्रति कि.मी. | रू.८/- प्रति कि.मी. |

श्रीसाईभक्तांस आकस्मिक तातडीच्या प्रसंगी मंदीर/भक्तनिवास परिसरातून ॲम्ब्युलन्स सेवा पुरवावी लागते, आसपासच्या परिसरात अपघात झाल्यास तातडीने ॲम्ब्युलन्स् सेवा पुरवावी लागते, हॉस्पिटलमधे उपचारार्थ ॲडमिट असलेल्या गरीब रुग्णांस किंवा रुग्ण मयत झाल्यास ॲम्ब्युलन्स् सेवा पुरवावी लागते, अशा वेळी नातेवाईकांकडे मानवतेच्या दृष्टीकोनातून रक्कम भरुन घेणे शक्य होत नाही यास्तव वैद्यकीय अधिक्षिका, उपवैद्यकीय संचालक, वैद्यकीय संचालक, प्रशासकीय अधिकारी यांना मोफत ॲम्ब्युलन्स् पुरविणेबाबत अधिकार देण्यात यावेत किंवा कसे? याबाबत योग्य तो नियम होणे गरजेचे आहे.

(१०) जीवनदायी योजना :-महाराष्ट्र शासन, जीवनदायी योजना, सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्रं.जिआयो-२६०७/प्र.क्र.-१७/अरोग्य-३, मंत्रालय, मुंबई, दि.१९.४.२००७, मधील अं.नं.२ नुसार, मंजुर रक्कमेपेक्षा जादा खर्च संबंधित हॉस्पिटलने सोसावा असा नियम आहे.

यास्तव जीवनदायी योजनेच्या रुग्णांकडून फरकाची रक्कम भरुन घेणे नियम बाहय आहे, परंतु कुणी स्वखुशीने फरकाच्या रक्कमेपोटी काही किंवा पुर्ण रक्कम भरणार असल्यास तशी भरुन घेता येऊ शकेल व उर्वरीत रक्कमेच्या सवलतीस मंजुरी असावी.

तथापि, रूग्णांच्या व नातेवाईकांच्या मागणीनुसार किंवा आवश्यकतेनुसार इम्पोर्टेड उपकरणे उदा. स्टेन्ट, बलून, पेसमेकर, व्हॉल, डिव्हाईस इ. वापरण्यात आल्यास, त्यासाठी येणाऱ्या वाढीव खर्चाची रक्कम रुग्णाकडून भरून घेता येवू शकेल, कारण जीवनदायी योजनेच्या मार्गदर्शक तत्वानुसार शासनाकडून कमीत कमी खर्चाच्या उपकरणांसाठीच अनुदान मंजुर करण्यात येते.

(११) श्रीसाईबाबा संस्थानकडून राज्यभरातील तसेच परराज्यातील मिळून जवळपास १०० शासन मान्य व संस्थानच्या यादीमध्ये समाविष्ट असलेल्या रुग्णालयांस दरमहा जवळजवळ १ कोटी रुपये इतके वैदयकीय अनुदान पाठविले जाते, वास्तविकत: महाराष्ट्र शासनाच्या जीवनदायी योजने अंतर्गत हृदय, मेंदू, किडनी व कॅन्सर हया आजारांवरील उपचार व शस्त्राक्रियासाठी प्रत्येक रुग्णास रु.१,५०,०००/- पर्यंत आर्थिक सहाय्य मिळते.

सध्या श्रीसाईबाबा हॉस्पिटमधील रुग्णांच्या बिलांमध्ये दरमहा साधारण रु.२० ते २५ लाख सवलत दिली जाते, त्या विषयी फार मोठा गहजब, गाजावाजा व चर्चा होत असते, परंतु बाहेरील जवळपास १०० हॉस्पिटल्स्ना दरमहा १ कोटी रुपये अनुदान पाठविले जातें, त्यापैकी जीवनदायी योजने अंतर्गत मान्यता असलेल्या राज्य भरातील सुमारे ४० रुग्णालयांस वैदयकीय अनुदान पाठविणे बंद केल्यास त्या प्रमाणात साईनाथ व साईबाबा हॉस्पिटलमध्ये देण्यात येणारी सवलत भरुन निघेल किंवा दोन्ही रुग्णालयांच्या आधुनिकीकरणासाठी वापरता येऊ शकेल. (जीवनदायी मान्यता प्राप्त रुग्णालयांची माहिती आरोग्य संचालनालय, सार्वजनिकआरोग्य विभाग, आरोग्य भवन, सेन्ट जॉर्ज हॉस्पिटल कम्पाऊंन्ड, ५/६ वा मजला, मुंबई, येथे मिळू शकेल).

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



यास्तव राज्यभरातील ज्या रुग्णालयांना शासनाच्या जीवनदायी योजनेअंतर्गत हृदय, मेंदू, किडनी, कॅन्सर या पैकी ज्या ज्या आजारांस शासन मान्यता असेल त्या त्या आजारांसाठी संबंधित रुग्णालयांस वैदयकीय अनुदान पाठविणे बंद करण्यात यावे किंवा कसे? याबाबत सविस्तर चर्चा होऊन योग्य तो नियम होणे गरजेचे आहे.

(१२) रिफंडः- दि.२८.०७.२००७ रोजी झालेल्या व्यवस्थापन समिती सभेतील मंजुर विषय नं.४४ निर्णय क्रं.६३९ नुसार यावर सविस्तर चर्चा होऊन नियमानूसार बाहेरुन आलेली आर्थिक मदत संबधित रुग्णांच्या शस्त्रक्रियेसाठीच वापरणे बंधनकारक आहे, अन्यथा उशीरा मदत प्राप्त झाल्यास मदत देणाऱ्या सस्थेला ती रक्कम परत करणे संस्थानवर बंधनकारक आहे, परंतु यामध्ये गरीब-गरजू रुग्णांवर मानवतेच्या दृष्टीकोनातुन अन्याय होऊ शकतो, तथापी लेखा परीक्षणाच्या दृष्टीने बाहेरुन आलेली मदत संस्थानकडे जमा करुन घ्यावी आणि रूग्णाने पुर्वी संस्थानकडे भरलेल्या रक्कमेतून सवलत वजा जाता डॉक्टरांनी दिलेल्या अपेक्षित रक्कमेच्या दाखल्यापेक्षा अतिरिक्त होणारी रक्कम रुग्णांना परत करण्यात यावी असे ठरले.

परंतू रुग्णांने भरलेल्या रकमे व्यतिरीक्त व संस्थानने दिलेली सवलत वजा न करता बिल रकमेपेक्षा जास्त आलेली संपुर्ण रक्कम परत मागणाऱ्यांचे प्रमाण वाढत असलेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

**यावर सविस्तर चर्चा होऊन,सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**०८ <u>श्रीसाईबाबा हॉस्पिटलमध्ये नवीन कॅथलॅब सुरु करणेबाबत</u>**

मा.विश्वस्त डॉ.पी.एल.तिवारी यांचा दि.०३.०९.२००८ रोजी दूरध्वनीव्दारे आलेला आदेश तसेच मा.कार्यकारी अधिकारी यांनी वैद्यकीय संचालक यांना दिलेल्या सूचना पुढीलप्रमाणे : -

(१) श्री साईबाबा हॉस्पिटलमधील कार्डीओलॉजी विभागाचे कामाचे वाढते स्वरुप पाहता नवीन कॅथलॅब सुरु करणे आवश्यक आहे.

(२) सदर कॅथलॅब ही नवीन बिल्डींगमधील नेत्र विभाग श्री साईनाथ रुग्णालयात स्थलांतरीत करुन तेथे प्रस्थापित करण्यात यावी.

(३) याकामी नवीन कॅथलॅब मशिन, कार्डीयॅक रिकव्हरी युनिटसाठी लागणारी विविध उपकरणे इत्यादींची खरेदी करण्याचा प्रस्तावही सादर करण्यात यावा.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, नेत्रशल्य चिकित्सा विभागासाठी आवश्यक त्या सुविधा उपलब्ध झाल्यानंतर साईनाथ रुग्णालयाकडे स्थलांतरीत करण्यात यावा. तदनंतर श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये जागा उपलब्ध झाल्यानंतर त्यावेळच्या परिस्थीतीचा सर्व बाबींचा अभ्यास करुन नवीन कॅथलॅब साठी यथावकाश प्रस्ताव सादर करण्यात यावा अशी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**०९ <u>श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये बेसिक हेल्थ चेकअप पॅकेजेस सुरु करणे बाबत</u>**

**बेसिक हेल्थ चेकअप पॅकेजेस डिलीव्हरी या प्रकल्पनेतील प्रमुख कारणीमिमांसा पुढीलप्रमाणे :-**

०१) वयाच्या चाळीशी नंतर म्हणजेच जीवनाच्या प्रौढावस्थेत उच्च रक्त दाब, हृदय विकार, मधुमेह, ऑस्टिओपोरोसीस, दात खराब होणे (उदा. दात किडणे,) डोळयांचे विकार (उदा. मोतीबिंदू) व प्रसंगी कर्करोग अशा विविध विकारांना सुरुवात होऊ शकते.

०२) वरीलपैकी बरेच विकार हे मोठ्या प्रमाणावर बळावल्यावरच त्यांची लक्षणे दिसू लागतात. त्यानंतर सदर विकारांवर नियंत्रण प्राप्त करणे हे अवघड व दुरापास्त होऊ शकते.

०३) लक्षणे दिसू लागण्यापुर्वी योग्य ते निदान होऊन योग्य ते इलाज सुरु केल्यास सदर विकारांवर नियंत्रण ठेवता येते. विविध अत्याधुनिक उपकरणांच्या सहाय्याने असे रोग निदान सहज शक्य होते.

०४) वरील बहुतेक विकारांवर औषधोपचार व आहार - विहार उपाय योजना उपलब्ध आहेत.

०५) पूर्वीच्या समजुतीप्रमाणे हे विकार शहरी जीवन राहणीमानापर्यंत मर्यादित राहिले नसून खेडोपाडी सुध्दा फार मोठया प्रमाणावर आढळून येत आहेत.

०६) अनुवंशिकता, जीवन राहणीमान (उदा. बैठे ), व्यसनाधीनता, नोकरी व्यवसायाचे स्वरुप, (ताण तणाव, बदलत्या शिफ्ट डयुटीज् इ.) अयोग्य आहार विहार, वाढती आयुर्मर्यादा इ. कारणांमुळे वरील विकारांना बळी पडण्याच्या प्रमाणाचा आलेख सतत उंचावताना दिसत आहे.

०७) अशिक्षितता, आरोग्या विषयीचे अज्ञान, आर्थिक कमजोरी इ. कारणांमुळेही आरोग्याकडे दुर्लक्ष होऊन उपलब्ध असलेल्या अत्याधुनिक व सहजी परवडणाऱ्या वैद्यकीय सेवांचा लाभ घेण्याची वृत्ती समाजाच्या दुर्बल घटकामध्ये अभावाने आढळते.

०८) श्रीसाईनाथ रुग्णालयाचे नेत्रशल्य चिकित्सा विभागासाठी आवश्यक त्या सुविधा उपलब्ध झाल्यानंतर स्थलांतरीत करण्यात यावा. तद्नंतर श्रीसाईबाबा रुग्णालयात जागा उपलब्ध झाल्यानंतर त्यावेळच्या परिस्थितीच्या सर्व बाबींचा अभ्यास करुन नविन कॅथलॅब साठी यथावकाश प्रस्ताव सादर करण्यात यावा.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



वरील सर्व बाबी लक्षात घेता प्रौढावस्थेतीतील विविध विकारांबद्दल समाजाच्या सर्व स्तरांमध्ये जन जागृती होऊन आरोग्यांविषयी लोकांची आस्था निर्माण होणे व उपलब्ध अत्याधुनिक वैद्यकीय तंत्रज्ञानाचा लाभ सर्वसामान्य व्यक्तीपर्यंत पोहचणे आवश्यक असल्याचे स्पष्ट आहे.

श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये विविध रोग विकारांच्या निदानासाठी अत्याधुनिक, स्वयंचलीत व अचूक आकडेवारी देणारी यंत्र सामुग्री उपलब्ध आहे. अशी यंत्र सामुग्री शहरांतील नामांकित रुग्णालयांमध्ये सुध्दा एकत्रितपणे क्वचितच आढळते. तसेच या हॉस्पिटलमध्ये सदर यंत्रसामुग्रीसाठी उपयोगात आणण्यासाठी लागणारे कुशल तंत्रज्ञ व विशेषज्ञ डॉक्टर्स कार्यरत आहेत.

श्री साईबाबा हॉस्पिटलमधील सर्व पायाभूत अंतर्रचना व समाजातील वाढत्या व्याधी - विकारांचे लवकरात लवकर निदान होऊन त्यांचेवर नियंत्रण ठेवण्याची गरज, यात सुयोग्य सांगड घालणे सहज शक्य आहे. ही बाब मा. अध्यक्ष महोदय, यांनी लक्षात घेऊन श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये बेसीक हेल्थ चेकअप पॅकेजेसङ अल्प दरात उपलब्ध व्हावे या दृष्टीने मा. वैद्यकीय संचालक यांना कार्यवाही करणेबाबत सुचवले.

उपरोक्त कार्यपुर्तीकामी बेसिक हेल्थ चेकअप पॅकेजेस (स्त्रिया व पुरुष यांना काही प्रमाणात) वेगवेगळे सादर केले आहेत.

सध्या हॉस्पिटलमध्ये आकारल्या जाणाऱ्या दराने बेसिक हेल्थ चेकअप- पुरुषांकरिता रु. ८०५/- व स्त्रियांकरिता रु. ८५५/- असे दर होतात, यावर मा. वैद्यकीय संचालक, यांनी उपरोक्त दोन्ही बेसिक हेल्थ चेकअप पॅकेजचे दर रु. ६००/- असावेत, असे सुचविले आहे.

| Basic Health Check up : Male | | | Basic Health Check up : Female | |
|---|---|---|---|---|
| 1 | Haemogram | 30 | Haemogram | 30 |
| 2 | E.S.R. | 10 | E.S.R. | 10 |
| 3 | B.S.L–F& PP/Random | 50 | B.S.L. – F & PP/Random | 50 |
| 4 | BUN, S.Creatinine | 75 | BUN, S.Creatinine | 75 |
| 5 | Blood Group | 30 | Blood Group | 30 |
| 6 | Lipid Profile | 300 | Lipid Profile | 300 |
| 7 | Urine routine | 25 | Urine routine | 25 |
| 8 | Chest X- ray PA | 100 | Chest X- ray PA | 100 |
| 9 | ECG | 50 | ECG | 50 |
| 10 | Blood Urea | 35 | PAP Smear (Above 45 yrs. age) | 50 |
| 11 | Eye Check up | 50 | Blood Urea | 35 |
| 12 | Dental Check up | 50 | Eye Check up | 50 |
| 13 | Blood Pressure | 0 | Dental Check up | 50 |
| | **Total** | **805** | Blood Pressure | 0 |
| | | | **Total** | **855** |

तरी उपरोक्तप्रमाणे बेसिक हेल्थ चेकअप पॅकेजेस सुरु करणेस व याकामी रु. ६००/- (अक्षरी रुपये सहाशे) मात्र दर आकारणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, बेसिक हेल्थ चेकअप पॅकेजेस सुरु करणेस व याकामी रु.७००/- मात्र दर आकारण्यात यावा. तसेच याकामी आवश्यक ते साहित्य/उपकरणे खरेदी करणेत यावेत,अशी शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

१० **श्रीसाईबाबा हॉस्पिटलमध्ये टेलि रेडिओलॉजी रिपोर्ट चार्जेस ठरविणेबाबत.**

श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये रेडीओलॉजी विभागामध्ये करण्यात आलेल्या एम.आर.आय व सि.टी.स्कॅन तपासणीचा रेडीओलॉजिस्ट रिपोर्ट करतात. एम.आर.आय. व सि.टी.स्कॅन तपासणीचे दर व त्यावर ५% मोबदला देणेबाबत मा.व्यवस्थापन समितीचे सभेमध्ये ठराव संमत झाला आहे. यामध्ये साधारणतः सि.टी.स्कॅन साठी प्रति तपासणी रू. ७०/- ते १२५/- व एम.आर.आय.साठी रू. १२५/- ते १५०/- पर्यंत मोबदला देण्यात येते आहे. हॉस्पिटलमध्ये टेली रेडीओलॉजी रिपोर्टींग पध्दती सुरु करण्यात येत आहे. यामध्ये सध्या हॉस्पिटलचे रेडीओलॉजीस्ट देत असलेला तपासणीचा रिपोर्ट बाहेरील समकक्ष अथवा नामांकित तज्ञ रेडीओलॉजिस्ट संगणकप्रणाली व्दारे (टेली रेडीओलॉजी) रिपोर्ट पाठवितात. या रिपोर्ट नुसार रुग्णांवर पुढील उपचार केले जातात. अशा प्रकारे रिपोर्ट करण्यासाठी खालील नामांकित रेडीओलॉजिस्ट यांनी आपली प्रति रिपोर्ट रू.२००/- ते ४००/- मागणी केली आहे. प्रत्यक्ष चर्चेत धर्मादाय हॉस्पिटलसाठी हा दर प्रति रिपोर्ट रू.२००/- ची समंती दिली आहे.

०१) डॉ. स्वाती आढाव, मुंबई
०२) डॉ. दिपक पाटकर, मुंबई
०३) डॉ. अतुल देशमुख, लातूर.

सध्या हॉस्पिटलच्या रेडिओलॉजिस्ट डॉ. योगिनी शहा या मॅटर्नीटी लिव्हवर जाणार आहेत. नविन रेडिओलॉजिस्टला सि.टी.स्कॅन व एम.आर.आय. मध्ये जास्त अनुभव नसल्याने टेली रेडिओलॉजी रिर्पोटींग पध्दती अवलंब करणे गरजेचे आहे.

**तरी उपरोक्त तज्ञ रेडिओलॉजीस्ट यांना आवश्यकतेनुसार टेली रेडिओलॉजी रिपोर्टींग करण्यास व प्रति केस दर रू.२००/- देण्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी**

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



**यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

११ **जैव वैद्यकीय घनकचरा व्यवस्थापन व हाताळणीबाबत**

महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाने श्रीसाईनाथ व श्री साईबाबा हॉस्पिटलला स्वतंत्रपणे दि.१/०४/२००७ ते दि.३१/०३/२००८ या एक वर्षांचे कालावधीकरिता जैव वैदयकीय घनकचरा व्यवस्थापन व हाताळणीकरिता ऑथरायझेशन दिलेले आहे. सदरच्या ऑथरायझेशन पत्रात दिलेल्या नियम व अटीतील अट क्र.०६ नुसार

"दोन्ही हॉस्पिटलमध्ये निघणारा जैव वैदयकीय घनकचरा पुढील कार्यवाहीकरीता सार्वजनिकरीत्या जैव वैदयकीय घनकचरा विल्हेवाट लावणा-या व महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाने मान्यता दिलेल्या संस्थेस म्हणजे मे.बायोक्लीन सिस्टीम्स, अहमदनगर यांना देणे व सदरची माहीती महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळास देणे बंधनकारक आहे."

महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाकडे पुढील कालावधीत ऑथरायझेशन नुतनीकरण करणेकरीता दोन्ही हॉस्पिटलसाठी दि.३१/०३/२००८ पुर्वी स्वतंत्रपणे अर्ज करण्यात आले आहेत. परंतु दोन्ही हॉस्पिटलकरीता स्वतंत्रपणे सांडपाणी प्रक्रीया संयंत्र अद्याप पावेतो उभारण्यात आले नसल्यामुळे महाराष्ट्र राज्य प्रदुषण नियंत्रण मंडळाने ऑथोरायझेशन नुतनीकरण प्रमाणपत्र दिलेले नाही. रुग्णालय विभागाकडुन त्याबाबतीत पाठपुरावा सुरु आहे.

श्रीसाईनाथ व श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये निघणारा जैव वैदयकीय घनकचरा महाराष्ट्र प्रदुषण मंडळाचे आदेशानुसार पुढील विल्हेवाट लावणेकामी मे.बायोक्लीन सिस्टीम्स, अहमदनगर यांना दि. ०१/०९/२००७ ते दि. ३१/०८/२००८ या कालावधीकरीता देणेबाबत मा. व्य. समितीच्या दि. २२/०९/२००७ चे सभेतील निर्णय क्र. ७२९ अन्वये कार्यादेश देण्यात आला होता. सदर कार्यादेशानुसार मे.बायोक्लीन सिस्टीम्स, अहमदनगर यांना सदर कामाकरीता प्रतीमाह रु. ३२,०००/- इतकी रक्कम अदा करण्यात आली आहे.

वरील कार्यादेशाचा कालावधी दि. ३१/०८/२००८ रोजी संपत असल्यामुळे मे.बायोक्लीन सिस्टीम्स, अहमदनगर यांनी पुढील कालावधीत जैव वैद्यकिय घनकचरा पुढील कार्यवाहीकरीता घेउन जाणेकरीता प्रतिमहीना रु. ३४,०००/- चे कोटेशन त्यांचे पत्र क्र.AMD/551 दि. १३/०८/२००८ अन्वये पाठविले आहे. सदरचे दर हे इंधन, इलेक्ट्रीसिटी, ट्रान्सपोर्टेशन, कन्झ्युमेबल, वेतन इ. च्या दरांमध्ये वाढ झाल्यामुळे मागील वर्षीच्या दरांमध्ये एकुण रु. २,०००/- ने वाढ करण्यात आली असल्याचे कंपनीने कळविले आहे.

तरी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाचे नियमानुसार मे.बायोक्लीन सिस्टीम्स, अहमदनगर यांना पुढील एक वर्षाचे कालावधीकरीता श्री साईनाथ व श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये निघणारा जैव वैदयकीय घनकचरा पुढील कार्यवाहीकरीता घेउन जाणेसाठी कार्यादेश देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता,त्यास मान्यता देण्यात यावी,अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

१२ **रुग्णालयाकडील पूर्व लेखापरिक्षक श्री व्ही.व्ही कोठारी, चार्टर्ड अकौंटंट यांचे मानधन वाढीबाबत**

श्रीसाईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयाच्या कामकाजाचा व्याप दिवसेंदिवस वाढत असुन आर्थिक व्यवहारांतही मोठया प्रमाणात वाढ झालेली आहे. वाढत्या व्यवहारावर अचुक नियंत्रण रहावे यासाठी लेखाविभागातुन आदा करण्यात येणारे प्रत्येक देयक आदा होण्यापुर्वी, सर्व नियमाचे पालन झाल्याबाबत स्वतंत्र पुर्व लेखापरीक्षकाकडुन तपासणी होणे गरजेचे आहे. त्याअनुषंगाने आर्थिक वर्ष २००८-०९ साठी श्री व्ही.व्ही कोठारी, चार्टर्ड अकौन्टंट यांची नियुक्ती केलेली आहे.

आर्थिक वर्ष २००७-२००८ साठी मे. व्ही.व्ही. कोठारी चार्टर्ड अकौन्टंट श्रीरामपुर या लेखापरिक्षक संस्थेची वार्षिक रु.१,५०,०००/- एकत्रित मानधनावर नियुक्ती करण्यात आली होती.

तसेच मा. व्यवस्थापन समितीचे दि.१६/०३/२००८ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.२३६ अन्वये त्यांची सन २००८-२००९ साठी त्यांचे पुर्वीच्या मानधन व अटी शर्तीवर नेमणुक करण्यात यावी असे ठरले.

श्रीसाईबाबा हॉस्पिटल व श्रीसाईनाथ रुग्णालयाच्या कामकाजाचा व्याप दिवसेंदिवस वाढत व्याप लक्षात घेता, त्यांनी त्यांचे दि.२४/०५/२००८ चे पत्रान्वये त्यांचे मानधनामध्ये रु.२,५०,०००/- ते २,६५,०००/- पर्यंत वाढ करावी अशी विनंती केलेली असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री.व्ही.व्ही. कोठारी चार्टर्ड अकौन्टंट श्रीरामपुर, हे श्रीसाईबाबा व श्रीसाईनाथ रुग्णालयाचे प्री ऑडीट व इंटर्नल ऑडीट हे दोन्ही कामे करीत असल्याने त्यांना वाढीव मानधन देणेबाबतचा सविस्तर प्रस्ताव व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर करावा,अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक/मुख्य लेखाधिकारी)

**१३. श्री साईनाथ रुग्णालयासाठी लॉकर खरेदीबाबत**

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



श्रीसाईनाथ रुग्णालयातील अधिसेविका कार्यालयाने त्यांचे डि. पी. क्रमांक ७७५५ दि.२५/०७/२००८ अन्वये १५ नग २४ कॅबीनेट असलेल्या लॉकरची मागणी केलेली आहे.

सदरचे लॉकर हे वार्ड मधील ड्यूटीवर असणारे परिचारीका / परिचारक यांचे कपडे व त्यांचे महत्वाचे वस्तू ठेवणेकामी आवश्यक असतात.

सदर लॉकर खरेदीकामी प्रती नग अंदाजे रु.९,०००/- या प्रमाणे १५ नग खरेदीकामी अंदाजे रु.१,३५,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे.

तरी वरीलप्रमाणे २४ कॅबीनेट असलेले १५ नग लॉकर कोटेशन मागवून खरेदीस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.१,३५,०००/- चे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

**यावर सविस्तर चर्चा होऊन,श्रीसाईनाथ रुग्णालयासाठी आवश्यक असणारे १५ नग लॉकर्स गोदरेज या नामांकित कंपनीकडून कोटेशन मागवून खरेदी करणेस व याकामी येणारे योग्य त्या खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**१४. <u>श्रीसाईबाबा हॉस्पिटलकडील बायोकेमिस्ट,ई.सी.जी.टेक्निशियन,परिचारीका (बी.एस्ससी), एम. आर. आय. टेक्निशियन यांचे वेतनश्रेणीबाबत</u>**

श्रीसाईबाबा हॉस्पीटल नव्याने कार्यान्वीत करण्यासाठी आवश्यक असलेल्या कर्मचाऱ्यांचा आकृतीबंध मा. विश्वस्त डॉ. पी.एल. तिवारी यांनी तयार करुन मा.व्यवस्थापन समितीच्या मान्यतेने शासनाच्या मंजूरीसाठी पाठविलेला होता.दरम्यानचे काळात आकृतीबंधास शासनाचे मान्यतेस अधिन राहून वैद्यकिय अधिकारी / इतर अधिकारी व कर्मचारी यांचे नियुक्तीसाठी वर्तमान पत्रात जाहीरात देऊन, मुलाखतीद्वारे निवड करुन फिक्स पे/मानधनावर विविध वैद्यकीय अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या नियुक्त्या करण्यात आलेल्या होत्या.

सदर आकृतीबंधास शासन निर्णय क्र.सासंवि-२००५/३१७/(१०३)-का.सोळा मंत्रालय मुंबई -३२ दि.१३/०६/२००७ नुसार मान्यता मिळालेली आहे.आकृतीबंधास मान्यतेच्या अधिन राहून श्री साईबाबा हॉस्पीटलमधील तात्पुरत्या नेमणूका दिलेल्या व ज्यांचा परिवीक्षाधीन कालावधी दि.०१/०८/२००७ रोजी संपलेल्या व तदनंतर संपत असलेल्या अशा कर्मचाऱ्यांना मा.व्यवस्थापन समितीच्या सभेतील मान्यतेने शासन आकृतीबंधानुसार वेतनश्रेणी देण्याबाबत आदेश पारीत केलेले आहेत.

**०१)** यापूर्वी प्रशासन शाखा जा.नं.एसएसएस/वशी-०१/११००६/२००५ दि.०३/१०/२००५ अन्वये शासनास सादर केलेल्या आकृतीबंधात बायोकेमिष्ट पद-०१ वेतनश्रेणी रु. ६५००-२००-१०५०० इ.सी.जी तंत्रज्ञ पदे-०३ वेतनश्रेणी रु. ५०००-१५०-८००० अशी दर्शविण्यात आलेली आहेत. त्यानुसार जाहिरात देऊन मुलाखतीव्दारे निवड करुन कु.नंदा चौधरी यांची बायोकेमिस्ट तसेच श्री वाघ,तांबे व ढोकचौळे यांची ई.सी.जी. टेक्निशियन म्हणून ०६/०६/२००६ रोजी एकत्रित वेतनावर नेमणूक करण्यात आलेली असून त्यांचे नेमणूकीस ०१ वर्ष होऊन गेलेले असल्याने त्यांनाही वेतनश्रेणी देणे आवश्यक आहे. तथापी मा. डॉ. तिवारी यांनी सादर केलेल्या सुधारित आकृतीबधांत सदर पदांचा चुकून समावेश झालेला नसल्याने शासनाचे मान्य आकृतीबंधात सदर पदांचा समावेश नाही.

**०२)** तसेच स्टाफ नर्स कु.शितल साबळे (बी.एस्सी नर्सिंग) यांना मा.व्यवस्थापन समितीचे दि.१७/०२/२००७ रोजीचे सभेतील ठरावानुसार एकत्रित मानधन रु.१२०००/- इतके देण्यात येत आहे. तथापि मान्य आकृतीबंधात परिचारीका पदाची शैक्षणिक पात्रता B.Sc / G.N.M. दर्शवून वेतनश्रेणी ४५००-१२५-७००० अशी दर्शविलेली आहे. शासनाकडे B.Sc Nursing हया शैक्षणिक पात्रतेच्या पदास वेतनश्रेणी रु.६५००-२००-१०५०० इतकी देण्यात येत आहे. सदरच्या वेतनश्रेणीनुसार त्यांना वेतन द्यावे लागेल, याबाबत शासनाकडे पत्रव्यवहार केलेला आहे.

**०३)** आकृतीबंधात भांडार व माल (मटेरिअल्स स्टोअर मॅनेजर) हे सिनीअर मॅनेजर हे पद एकत्रीत दाखविलेले आहे. आकृतीबंधात सदर पदाची वेतनश्रेणी ही ६५००-२००-१०५०० दर्शविलेली आहे. सदरच्या वेतनश्रेणीनुसार मासिक वेतन एकूण रु.१३७४८/-इतके देय होते.परंतु व्यवस्थापन सभा दि.०४/०३/२००६ मधील मान्यतेनुसार स्टोअर मॅनेजर पदावर नेमणूक केलेले श्री दिलीप शर्मा यांना मासिक रु.१५०००/- इतके एकत्रीत मानधन देण्यात आलेले आहे. त्यांना वेतनश्रेणीवर घेताना ६५००/- या मुळ वेतनात ०३ वेतनवाढी देऊन त्यांचे वेतन निश्चित करावे लागेल.साईबाबा हॉस्पीटलमध्ये स्टोअर्स मॅनेजर या पदावर श्री शर्मा हे कार्यरत असून मटेरिअल मॅनेजर या पदावर नेमणूक दिलेले श्री चांदगुडे हे हजर न झाल्याने फार्मासिस्ट श्री एम.के. थोरात यांना मटेरियल मॅनेजर पदाचा अतिरिक्त कार्यभार देऊन सदर पदाचे काम पहाण्यास सांगणेत आलेले आहे.

**०४)** तसेच मान्य आकृतीबंधात कॅथ लॅब टेक्निशियन या पदासाठी रु.५०००-१५०-८००० हि वेतनश्रेणी दर्शविण्यात आलेली आहे या वेतनश्रेणीनुसार मासिक रु.१०५७५/- इतके वेतन देय होते.परंतु सदर श्री कुलभैय्या यांना नेमणूक देताना त्यांचे अनुभवाचा विचार करुन व्यवस्थापन सभा दि.०४/०३/२००६ मधिल मान्यतेनुसार रु.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



१५०००/- इतके एकत्रीत मानधन देण्यात आलेले आहे.त्यांना देय वेतनश्रेणीनुसार एकूण वेतनापेक्षा रु.४४२५/- जादा देण्यात आलेले आहे त्यामुळे त्यांचे वेतन ठरविताना १३ वेतनवाढी द्याव्या लागतील.

**०५)** तसेच श्री साईबाबा हॉस्पीटलमध्ये MRI मशिन बसविण्याचा निर्णय नंतर घेण्यात आल्याने शासनास सादर केलेल्या आकृतीबंधात MRI टेक्निशियन पदाचा समावेश नाही तथापि MRI टेक्निशियन म्हणून ०२ कर्मचाऱ्यांची नियुक्ती केलेली असून त्यास ५०००-१५०-८००० वेतनश्रेणी देय आहे.

तरी बायोकेमिस्ट, ई.सी.जी. टेक्निशियन,एम.आर.आय.टेक्निशियन,परिचारीका (बी.एस्सी,) या पदांचा वेतनश्रेणीसह आकृतीबंधात समावेश,भांडार व माल व्यवस्थापक (स्टोअर मॅनेजर व मटेरियल्स मॅनेजर) हि दोन पदे स्वतंत्र करणे इत्यादी कामी मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घेवून **सदर विषय मान्यतेसाठी मा.विधी व न्याय विभागाकडे पाठविणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी, तसेच शासनाचे मान्यतेच्या आधीन राहून सदर टेक्नीशिअन्सना इतर टेक्नीशियन्सप्रमाणे वेतन देण्यात यावे,अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही-अधिक्षक आस्थापना/वैद्यकीय संचालक)

**१५ <u>श्रीसाईनाथ हॉस्पिटलकडील विविध पदावरील कर्मचाऱ्यांना वेतनश्रेणी देणेबाबत</u>**

श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,अधिनियम २००४ नुसार अधिनियम २००४ नुसार दि.२३/०८/२००४ पासून श्री साईबाबा संस्थानचा कारभार महाराष्ट्र शासनाच्या अधिपत्याखाली सुरु आहे. अधिनियम-२००४ कलम नं.१३ (०४) नुसार "ज्या अधिकाऱ्याला किंवा कर्मचाऱ्याला दरमहा दोन हजार रुपयाहून अधिक वेतन देण्यात येत असेल किंवा द्यावयाचे असेल अशा कोणत्याही अधिकाऱ्याची कर्मचाऱ्याची नेमणूक समितीकडून असे पद शासनाने मान्य केलेल्या कर्मचारी आकृतीबंधानुसार मंजूर करण्यात येईपर्यंत केली जाणार नाही" अशी तरतूद आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे दि. २७/१२/२००४ चे सभेतील निर्णय क्र. १९२ अन्वये श्रीसाईनाथ हॉस्पीटलच्या जुन्या जागेत नवीन बांधकाम करुन त्यामध्ये श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था,शिरडी चे मार्फत नव्याने श्री साईबाबा हॉस्पीटल (सुपरस्पेशालीटी ) सुरु करणेबाबत निर्णय झाला. त्यासाठी आवश्यक असलेल्या वैद्यकीय अधिकारी / कर्मचारी पॅरामेडीकल कर्मचारी यांचा एकूण ७३७ पदांचा आकृतीबंध मा. विधी व न्याय विभागाकडे मान्यतेसाठी पाठविण्यात आला होता. श्री साईबाबा हॉस्पीटल चालू करावयाचे असल्याने आकृतीबंधास शासनाचे मान्यतेच्या अधिन राहून वर्तमानपत्रात जाहीरात प्रसिध्द करुन अर्ज बोलावून तसेच वेळोवेळी मा.व्यवस्थापन समितीसमोर उमेदवारांच्या मुलाखती घेवून श्री साईबाबा हॉस्पीटलकडे वैद्यकीय अधिकारी/पॅरामेडीकल अधिकारी यांना एकत्रीत वेतनावर नेमणूका देण्यात आलेल्या आहेत. सदर आकृतीबंध मान्यतेसाठी पाठविल्यानंतर त्यास शासन निर्णय क्र.सा.सं.वि./२००५/३१७/ (१०३), का/सोळा मंत्रालय मुंबई दि.१३ जून २००७ अन्वये मान्यता मिळालेली असून,सदर मान्यतेनुसार श्रीसाईबाबा हॉस्पीटलकडे नेमणूका केलेल्या वैद्यकीय अधिकारी व इतर पॅरामेडीकल कर्मचाऱ्यांना मा.व्यवस्थापन समितीचे दि.११/०८/२००७ रोजीचे निर्णयानुसार दि.०१/०८/२००७ पासून पदनिहाय वेतनश्रेणी मंजूर करण्यात येऊन नेमणूका देण्यात आलेल्या आहेत. तसेच मान्यतेमधील काही त्रुटींबाबत शासनाकडे पत्रव्यवहार करणेत आलेला असून त्याचा पाठपुरावा करणेत येत आहे.

विद्यमान व्यवस्थापन समितीने कारभार हाती घेतल्यानंतर सन-२००६ मध्ये श्री साईनाथ हॉस्पीटल सह संस्थानच्या सर्व विभागांसाठी आवश्यक ३०२८ पदांचा सुधारित आकृतीबंध (श्री साईबाबा हॉस्पीटल सोडून) तयार करणेत येऊन मा.व्यवस्थापन समिती सभा दि.२०/०५/२००७ मधील मान्यतेनंतर जा.नं.एसएसएस/वशी-०१/ ९८०७/२००७ दि.२९/०६/२००७ अन्वये मा. प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग मंत्रालय मुंबई यांचेकडे मान्यतेसाठी सादर करणेत आला असून त्यास अद्याप मान्यता येणे आहे.

श्रीसाईबाबा हॉस्पीटलकडे वैद्यकिय अधिकारी व पॅरामेडीकल स्टाफच्या जाहीरातीद्वारे नेमणूका करतांना त्याच मुलाखतीद्वारे श्री साईनाथ हॉस्पीटलकडे खालीलप्रमाणे नेमणूक केलेल्या कर्मचा-यांना आकृतीबंधाचे मान्यतेअभावी वेतनश्रेणी देऊ शकत नसल्याने वेतनश्रेणीनुसार वेतन देणे अडचणीचे झाले आहे. सदर कर्मचा-यांकडून त्याबाबत वारंवार मागणी होत आहे.

श्रीसाईबाबा हॉस्पीटलकडे नेमणूका केलेल्या कर्मचा-यांच्या जाने-०८ मध्ये दिलेल्या वेतनश्रेणी आदेशाचे अंमलबजावणीस जा.नं.एसएसएस/वशी-०१/२९२/२००८ दि.२८/०१/२००८ अन्वये तूर्त स्थगिती देणेत आलेली आहे. तेही कर्मचारी वेतनश्रेणीप्रमाणे वेतन देणेबाबत वारंवार विचारणा करतात.

**तरी आकृतीबंधास शासनाचे मान्यतेस अधीन राहून श्रीसाईनाथ हॉस्पीटलकडील संबंधीत कर्मचाऱ्यांस वेतनश्रेणीच्या एकूण वेतनाच्या जवळपास खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे एकत्रित वेतन देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता,त्यास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

| अ.नं. | पदनांत | संख्या | दिलेले एकत्रीत वेतन / मानधन | देय वेतनश्रेणी | वेतनश्रेणीनुसार एकूण वेतन | प्रस्तावित एकत्रित वेतन |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | वैद्यकीय अधिकारी (आर.एम.ओ.)सि.एम.ओ.) | १२+०१=१३ | १७,०००/- | ८,०००-१३,५०० | १६९२०/- + (एनपीए ) | १६०००/- +ऐवजी एकत्रित रु.१८०००/- (एनपीए ) |
| २. | लॅब टेक्निशियन | ०६ | ८,०००/- | ५०००-८००० | १०५७५/- | १००००/- |

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ३. | ई.सी.जी.टेक्निशियन | ०३ | ८,०००/- | ५०००-८००० | १०५७५/- | १००००/- |
| ४ | फार्मासिस्ट | ०८ | ७,०००/- | ४५००-७००० | ९५१८/- | ९०००/- |
| ५ | ज्यु.एक्स-रे टेक्निशियन | ०२ | ६,५००/- | ४०००-६००० | ८४६०/- | ८०००/- |
| ६. | लॅब असिस्टंट | ०४ | ४,०००/- | २५५०-३२०० | ५३९३/- | ५०००/- |
| ७. | थिएटर असिस्टंट | ०५ | ४,०००/- | २५५०-३२०० | ५३९३/- | ५०००/- |

(कार्यवाही-अधिक्षक आस्थापना/वैद्यकीय संचालक)

१६ **प्रयोगशाळा तंत्रज्ञ पदनाम व वेतनश्रेणीबाबत.**

श्री साईबाबा हॉस्पीटलसाठी आकृतिबंध तयार करुन शासनाचे मान्यतेसाठी दि.१६/०८/०५ रोजी पाठविला होता. आकृतिबंधात नमुद केलेल्या पदनामानुसार हॉस्पीटलमधील वैद्यकीय अधिकारी तसेच पॅरामेडीकल कर्मचारी भरणेकामी दि.०५/०९/२००५ दि.२०/०३/२००६ रोजी व इतर दिनी वर्तमानपत्रात जाहीरात प्रसिध्द करुन पात्र उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात आलेले होते. मुलाखतीव्दारे पात्र उमदेवारांच्या आकृतिबंधास मान्यतेच्या अधिन राहून विविध पदावर नेमणुका करण्यात आलेल्या आहेत.

तथापी शासन निर्णय सा.स.वि.२००५/ ३१७/ (१०३) का.सोळा, मंत्रालय,मुंबई -३० दिनांक १३/०५/२००७ अन्वये मंजूर झालेल्या आकृतिबंधात वरिष्ठ प्रयोगशाळा तंत्रज्ञ, २ पदे, वेतनश्रेणी रुपये-५,०००-१५०-८,००० व सहाय्यक प्रयोगशाळा तंत्रज्ञ ४ पदे, वेतनश्रेणी रु.- ४,०००-१००-६,००० दर्शविलेली आहे, व रक्तपेढी तंत्रज्ञ ६ पदे वेतनश्रेणी रुपये-५,०००-१५०-८,००० (शैक्षणिक पात्रता बी.एस्सी व रक्तपेढी प्रशिक्षण ) अशी दर्शविण्यात आलेली आहे.

श्री साईनाथ रुग्णालयाकडील आकृतिबंधात प्रयोगशाळा तंत्रज्ञ १० पदे व रक्तपेढी तंत्रज्ञ ०८ पदे असून त्यासाठी शैक्षणिक पात्रता बी.एस्सी.,डी.एम.एल.टी./एफ.डी.अे. अशी असून वेतनश्रेणी रुपये-५,०००-१५०-८,००० अशी दर्शविली आहे.

श्री साईबाबा हॉस्पीटलसाठी आकृतिबंधास शासनाची मान्यता येण्याच्या अगोदर प्रयोगशाळा तंत्रज्ञ या पदनामाने श्री साईबाबा हॉस्पीटलकडे ६ व श्री साईनाथ रुग्णालयाकडे ६ कर्मचारी यांच्या नेमणुक केलेल्या असून त्यांच्या शैक्षणिक पात्रता सारख्या म्हणजे बी.एस्सी.,डी.एम.एल.टी. अशा आहेत.

कार्यालयीन कामकाजाच्या सोईच्या दृष्टिने श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकडे एकच पदनाम असावे व सारखीच वेतनश्रेणी असावी, म्हणून श्री साईबाबा हॉस्पीटलकडील वरिष्ठ व कनिष्ठ प्रयोगशाळा तंत्रज्ञ ही दोन पदनामे न ठेवता त्याऐवजी फक्त "प्रयोगशाळा तंत्रज्ञ" हे पदनाम ठेवता येईल असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

**यावर सविस्तर चर्चा होऊन श्री साईबाबा हॉस्पीटलकडील वरिष्ठ व कनिष्ठ प्रयोगशाळा तंत्रज्ञ ही दोन पदनामे न ठेवता त्याऐवजी सर्वांसाठी "ज्युनिअर प्रयोगशाळा तंत्रज्ञ " हे पदनाम ठेवण्यात यावे अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

१७ **श्रीसाईबाबा हॉस्पिटलकडे कार्यरत असलेले स्पेशालिस्ट व्हिजीटींग वैद्यकीय अधिकारी यांचे मुदतवाढी बाबत**

श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था,शिरडी मार्फत श्री साईबाबा हॉस्पीटल सुरु करण्यात आलेले असून सदर हॉस्पीटल व्यवस्थीत रित्या चालू झालेले आहे. सदर हॉस्पीटलमध्ये शासनाचे मान्यतेच्या अधिन राहून वेगवेगळे स्पेशालीस्ट वैद्यकिय अधिकारी नेमण्यात आलेले आहेत. तसेच पॅरामेडीकल स्टॉफ ही नेमण्यात आलेला आहे.

त्याच प्रमाणे मा. व्यवस्थापन समितीच्या मान्यतेने श्री साईबाबा हॉस्पीटलसाठी मानधनावर प्रथम एक वर्षाचे कालावधीसाठी व्हीजीटींग वैद्यकिय अधिकारी म्हणून नेमणूका करण्यात आलेल्या आहेत. त्यांच्या एक वर्षाचे कालावधी पूर्ण झालेले असून त्यांना पुढील मुदतवाढी देण्यात आलेल्या नाही. वैद्यकिय संचालक यांनी संबंधीत वैद्यकिय अधिकारी यांच्या मुदतवाढी करणेबाबत अभिप्राय दिलेले आहेत.

| अ.नं. | वैद्यकिय अधिकारी नांव | पदनाम | मुदतवाढ तारीख |
|---|---|---|---|
| ०१. | डॉ. राहुल आर. पाटील | Visiting Hon.Interventional Cardiologist | ३१/०३/२००९ |
| ०२. | डॉ. मनोज बी चोपडा | Honorary Consultant in Cardiology | ३१/०३/२००९ |
| ०३. | डॉ.अनिरुध्द धर्माधिकारी | Honorary Consultant in Cardiologisy | ३१/०३/२००९ |
| ०४. | डॉ. राहुल आर कैचे | Visiting Consultant in Cardiothoracic & Vascular Surgeon | ३१/०३/२००९ |
| ०५. | डॉ. विनोद एम विजन | Honorary Consultant in Cardiologist | ३१/०३/२००९ |
| ०६. | डॉ. अभय वालीया | Honorary Consultant in Cardic Surgeon | ३१/०३/२००९ |
| ०७. | डॉ. विजय रामाराव | Honorary Consultant in Orthopedic surgery. | ३१/०३/२००९ |
| ०८. | डॉ. दिलीप बी. शिरसाठ | Honorary Consultant in Orthopedic surgeon . | ३१/०३/२००९ |
| ०९. | डॉ. विनायक नेरलीकर | Visiting Consultant in Orthopedic | ३१/०३/२००९ |
| १०. | डॉ. जयंत एच. वाघ | Visiting Hon.Laprascopic Surgeon | ३१/०३/२००९ |
| ११. | डॉ. अरुण व्हि. मारवाले | Visiting Hon.Psychiatrist | ३१/०३/२००९ |
| १२. | डॉ. जयेश प्र. वाघुलदे | Visiting Consultant Nephrologist | ३१/०३/२००९ |

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



| | | | |
|---|---|---|---|
| १३. | डॉ.संभाजी शिवाजीराव डांगे | Visiting General Surgeon | ३१/०३/२००९ |
| १४. | डॉ. प्राची वसंत पवार | Visiting Consultant Ophthalmologist | ३१/०३/२००९ |
| १५. | डॉ. राजेंद्रकुमार आर पटणी | Visiting Consultant in Urologist | ३१/०३/२००९ |
| १६. | डॉ. आनंद गजानन दिवाण | Visiting Hon. Neuro Physician | ३१/०३/२००९ |
| १७. | डॉ. ओमप्रकाश मुंदडा | Visiting Urologist | ३१/०३/२००९ |
| १८. | डॉ. अभिजित आगाशे | Visiting Consultant in Orthopedic | ३१/०३/२००९ |

उपरोक्त वैद्यकिय अधिकारी हे नेमणूकीपासून श्री साईबाबा हॉस्पीटलकडे सेवा देत आहेत. वैद्यकिय संचालक यांचे अभिप्रायानुसार उपरोक्त ०१ ते १८ स्पेशालीस्ट व्हिजीटींग वैद्यकिय अधिकारी यांच्या त्यांचे नांवापुढे दर्शविल्याप्रमाणे मुदतवाढ देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, डॉ.डांगे यांचेबाबत दिनांक ०६.०९.२००८ चे व्यवस्थापन समितीचे सभेत निर्णय झालेला असल्याने त्यांचेव्यतिरक्त उर्वरित व्हिजीटींग वैद्यकीय अधिकारी यांना प्रस्तावित केल्याप्रमाणे मुदतवाढ देण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**१८ <u>एकत्रित मानधन व फिक्स-पे वरील वैद्यकीय अधिकारी यांचे वेतनाबाबत.</u>**

श्रीसाईबाबा संस्थान मार्फत प्रथम श्री साईनाथ हॉस्पीटल चालविले जात होते. आता सर्व सोयी -सुविधांनी युक्त असे नव्याने श्री साईबाबा हॉस्पीटल सुरु करण्यात आलेले आहे. श्रीसाईबाबा हॉस्पीटलकडील सिनियर कन्सलटंट/ सर्जन यांना मासिक एकत्रित वेतन/मानधन रु.३०,०००/- व तसेच इन्सेंन्टीव्ह दिला जातो तसेच क्लिनीकल असिस्टंट/ ज्यु. कन्सलटंट यांना एकत्रित मानधन/वेतन रु.२५०००/- दिले जाते. तथापी त्याच पात्रतेच्या श्री साईनाथ हॉस्पीटल मध्ये रिक्त पदावर वैद्यकिय अधिका-यांना नेमणूका दिल्या जातात. त्यात बरेचसे वैद्यकिय अधिकारी, एम.डी.,एम.एस, डि.एन.बी. अशी पात्रताधारक असतात. त्यांना मासिक रु.२१०००/- फिक्स पे अथवा मानधन दिले जाते.

त्यामुळे श्रीसाईनाथ हॉस्पीटलकडे नेमणूका देण्यात आलेले वैद्यकिय अधिकारी हे त्यांना दिल्या जाणा-या मानधन / वेतनामुळे नाराज असतात. व ते हॉस्पीटल मध्ये जास्त काळ सेवा देण्यास उत्सुक नसतात. इतरत्र जास्त वेतन मिळाल्यास साईनाथ हॉस्पीटलची सेवा सोडून देतात. त्यामुळे रुग्णांची सेवा खंडीत होते. तसेच रिक्त झालेल्या पदावर नेमणूकीबाबतची कार्यवाही वेळोवेळी करावी लागते.

श्रीसाईनाथ हॉस्पीटल कडे खालील प्रमाणे वैद्यकिय अधिकारी यांच्या नेमणूका करण्यात आलेल्या असून त्यांना त्यांचे नावासमोर दर्शविल्याप्रमाणे फिक्स मानधन/वेतन दिले जाते.

| अ.नं. | वैद्यकिय अधिका-यांचे नांव | पदनाम | शेक्षणिक पात्रता | मासिक एकत्रित मानधन/वेतन |
|---|---|---|---|---|
| ०१. | डॉ. राजेश बावस्कर | स्त्रीरोग व प्रसूती तज्ञ | एम.डी. (गायनीक) | रु. २१०००/- |
| ०२. | डॉ. प्रशांत पठारे, | आर्थोपेडीक सर्जन | एम.एस. (आर्थो ) | रु. २१०००/- |
| ०३. | डॉ. दिपाली गांधाळे, | स्त्रीरोग व प्रसूती तज्ञ | एम.डी. (गायनीक) | रु. २१०००/- |

श्रीसाईबाबा हॉस्पीटलकडे वैद्यकिय अधिकारी यांना नेमणूका देण्यात आलेल्या असून त्यांना खालील त्यांचे नावासमोर दर्शविल्याप्रमाणे एकत्रित वेतन/मानधन दिले जाते व तसेच खालीलप्रमाणे इन्सेंन्टीव्ह दिला जातो.

| अ.नं. | वैद्यकिय अधिका-यांचे नांव | | शेक्षणिक पात्रता | एकत्रित मानधन/वेतन |
|---|---|---|---|---|
| ०१. | डॉ. कुलदिप वाघ, | स्त्रीरोग व प्रसूती तज्ञ | एम.डी. (गायनीक) | रु.३००००/- + इन्सेंन्टीव्ह |
| ०२. | डॉ. संजय खुराणा , | आर्थोपेडीक सर्जन | एम.एस. (आर्थो ) | रु. ३००००/-+ इन्सेंन्टीव्ह |
| ०३. | डॉ. किरण गोरे, | क्लिनीकल असिस्टंट | एम.एस.. सर्जन | रु.२५०००/- + इन्सेंन्टीव्ह |

श्रीसाईबाबा व साईनाथ हॉस्पीटलकडील सारख्याच शैक्षणिक पात्रता असलेल्या सर्व वैद्यकिय अधिकारी यांना सारखे वेतन दिल्यास साईनाथ हॉस्पीटलकडील वैद्यकिय अधिकारी हॉस्पीटलला जास्त काळ सेवा देतील, व वेळोवेळी डॉक्टर सेवा सोडून जाणार नाही व नेहमी पदे भरणेबाबतची कार्यवाही प्रशासनाला करावी लागणार नाही. तसेच वरीलप्रमाणे पगार देऊन ही सदर वैद्यकिय अधिकारी सेवा सोडून जात असतील तर त्यांचेकडून दोन महिन्यांचे एकुण वेतनाइतकी रक्कम नोटीस पे म्हणून वसुल करणेत यावी, व तसा करारनामा त्यांचेकडून करुन घेता येईल. असे वैद्यकिय अधिक्षिका यांनी सुचविले आहे.

श्रीसाईबाबा हॉस्पीटल कडील वैद्यकिय अधिका-यांना इंन्सेन्टीव्ह दिला जातो. साईबाबा हॉस्पीटलकडील वैद्यकिय अधिका-यांना इंन्सेन्टीव्हची रक्कम ब-यापैकी मिळते. श्री साईनाथ हॉस्पीटलकडील चार्जेस अत्यल्प आहेत. त्याचेकडील ओपीडी व आयपीडी पेशंटचे प्रमाणही जास्त आहे. परंन्तु तेथील वैद्यकिय अधिका-यांना इन्सेंन्टीव्ह दिला जात नाही. त्यांचीही त्याबाबत मागणी आहे. त्यांचे कामाचे स्वरुप विचारात घेऊन त्यांना फिक्स इंन्सेन्टीव्ह देणेबाबत विचार करता येईल.

**वैद्यकिय अधिक्षिका यांचे अभिप्रायानुसार दोन्ही हॉस्पीटलकडे सारखीच पात्रता असणा-या नेमणूका करण्यात आलेले व भविष्यात नेमणूका करण्यात येणारे वैद्यकिय अधिकारी यांना सारखेच वेतन/मानधन देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी,अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही-अधिक्षक आस्थापना/वैद्यकीय संचालक)

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



१९ **डॉ.नानासाहेब सारंगधर म्हस्के,वैद्यकीय उपसंचालक यांचे मुदतवाढीबाबत.**

डॉ.नानासाहेब सारंगधर म्हस्के, यांची जा.नं.एसएसएस/वशी-०१/१२२२३/२००७ दि.०४/०८/२००८ अन्वये संस्थानचे श्री साईबाबा हॉस्पीटलकडे वैद्यकिय उपसंचालक,या पदावर प्रतिमहा रु. ३००००/- या एकत्रित वेतनावर एक वर्षासाठी नेमणूक करण्यात आलेली असून ते नेमणूकीच्या पदावर दि. ०६/०८/२००७ रोजी हजर झालेले असून ते सदर पदाची कामे पहात आहेत.

डॉ.म्हस्के, वैद्यकिय उपसंचालक यांचा एक वर्षाचा नेमणूकीचा कालावधी दि.०५/०८/२००८ अखेर संम्पुष्ठात आलेला आहे. डॉ. म्हस्के यांची जन्मतारीख दि.०३/०६/१९४३ अशी असून त्यांचे वय आज मितीस एकूण ६५ वर्षे ०२ महिने इतके आहे.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, डॉ.नानासाहेब सारंगधर म्हस्के,वैद्यकीय उपसंचालक यांना प्रतीमाह रुपये ४५,०००/- इतके एकत्रित मानधनावर पूर्वीचेचे अटी-शर्तीवर एक वर्षाचे कालावधीसाठी मुदतवाढ देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य आहे.**

(कार्यवाही-अधिक्षक आस्थापना/वैद्यकीय संचालक)

२० **हॉस्पिटलकडील वैद्यकीय अधिकारी (इ.एन.टी.सर्जन व क्लिनीकल असिस्टंट) यांचे नेमणूकीबाबत.**

श्रीसाईबाबा संस्थानचे हॉस्पीटलकडे वैद्यकिय अधिकारी या पदावर नोकरी मिळणे बाबत डॉ. योगेश बी.गेठे, संगमनेर व डॉ. हर्षल के.पाटील हडपसर पुणे यांनी अर्ज केले होते. संबंधीत वैद्यकिय अधिकारी यांच्या वैद्यकिय संचालक श्री साईबाबा हॉस्पीटल, शिरडी यांनी समक्ष मुलाखती घेतलेल्या असून त्यांना संस्थानचे हॉस्पीटलकडे रिक्त पदांवर नेमणूका देणेबाबत अभिप्राय दिलेले आहेत.

मा.विश्वस्त डॉ. गोंदकर, डॉ.पी.एल.तिवारी यांनी कामावर घेण्यास शिफारस केलेली आहे. त्यानुसार त्यांच्या खाली तपशीलवार वैद्यकिय अधिकारी यांच्या हॉस्पीटलकडे रिक्त जागी तात्पुरत्या नेमणूका करण्यात आलेल्या आहेत.

| अ.नं. | वैद्यकीय अधिकारी नांव | शैक्षणिक पात्रता | नेमणूक आदेश नंबर व हॉस्पीटलचे नांव | दिलेले पदनांम व एकत्रीत मानधन /वेतन |
|---|---|---|---|---|
| ०१. | डॉ. योगेश बाळकृष्ण गेठे , गणेशनगर संगमनेर अहमदनगर. | एम.बी.बी.एस. एम.एस. (इ.एन.टी ) | जा.नं.एसएसएस/वशी-०१/११५३० /२००८ दि. ०५/०८/२००८ श्री साईबाबा हॉस्पीटल, (ई.एन.टी -सर्जन ) | ई.एन.टी. सर्जन एकत्रित वेतन प्रतिमहा रु.३००००/- |
| ०२. | डॉ. हर्षल कृष्णराव पाटील हडपसर पुणे | एम.बी.बी.एस. डि.एन.बी. | जा.नं.एसएसएस/वशी-०१/१२३८०/२००८ दि. २०/०८/२००८ श्री साईबाबा हॉस्पीटल, (ई.एन.टी -सर्जन ) प्रत्यक्ष काम श्री साईनाथ हॉस्पीटल | क्लिनीकल असिस्टंट (जनरल सर्जरी ) प्रतिमहा रु. २५०००/- |

**उपरोक्त वैद्यकिय अधिकारी ( ई.एन.टी. सर्जन व क्लिनीकल असिस्टंट ) यांच्या करण्यात आलेल्या नेमणूकीस कार्योत्तर मान्यता देण्यात यावी,अशी शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- अधिक्षक, आस्थापना)

२१ **ज्युनिअर पॅथालॉजिस्ट यांना इन्सेंटीव्ह देणे बाबत**

श्रीसाईबाबा हॉस्पिटलमध्ये पॅथॉलाजी विभागातील ज्यु. पॅथॉलाजीस्ट डॉ. पऱ्हे यांनी शेअर मिळणेबाबत मागणी केलेली आहे. पॅथॉलाजी विभागातील तपासण्यांवर ५% मोबदला सिनीअर पॅथॉलाजीस्ट यांना देणेबाबत निर्णय क्र. ७३९ संमत झाला आहे. त्याप्रमाणे सध्या कार्यवाही होत आहे.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये पॅथॉलाजी विभागातील पॅथॉलाजिस्ट यांना देण्यात येत असलेल्या शेअरबाबत मा.विश्वस्त डॉ.एकनाथ भागचंद गोंदकर यांनी पहाणी करुन अहवाल व्यवस्थापन समितीस सादर करावा अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

२२ **दिनांक १८.०९.२००८ रोजी मा.उपाध्यक्ष यांचे श्री साईनाथ रुग्णालयात दिलेल्या भेटीचा वृत्तांत**

मा.उपाध्यक्ष महोदय यांनी श्री साईनाथ रुग्णालयास दि.१८.०९.२००८ रोजी भेट दिली असता, त्यांच्या पहाणीत ज्या त्रुटी दाखविल्या व त्या त्रुटीबाबत मार्गदर्शन केले ते खालीलप्रमाणे आहे त्याची नोंद घेण्यात आली.

०१) श्री साईनाथ रुग्णालयात सध्या रुग्णांची संख्या विचारात घेता रुग्णालयासाठी असलेली जागा ही अत्यंत अपुरी पडते, कारण या रुग्णालयात रुग्णांना व त्यांचे नातेवईकांना बसण्यासाठी जागा नाही.

०२) सदर रुग्णालयात रुग्णांची सेवा करण्यासाठी असणारा डॉक्टर्स, नर्सेस व अनुषंगिक स्टॉफ हा अपूर्ण आहे. रुग्णांची गैरसोय होते व रुग्णास वेळेवर उपचार होऊ शकत नाहीत.

०३) श्री साईनाथ रुग्णालयात फिजीशियन म्हणून डॉ.बी.बी.साबळे हे एकच असलेने ते दररोज १०० ते ११० रुग्ण तपासत असतात, त्यांच्या सोबत डॉ.पोरवाल हे काम पहातात व दररोज साधारण १०० रुग्ण तपासतात ही बाब बरोबर नाही, कारण डॉ. पोरवल हे एम.बी.बी.एस. आहेत. सदर रुग्णालयात फक्त एकच एम.डी. आहेत, त्यासाठी आणखी एका एम.डी. डॉक्टरची आवश्यकता आहे.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



०४) ई.एन.टी. (कान, नाक, घसा) विभागाकडे काम पहाणारे डॉ.कुलकर्णी हे एकच तज्ञ असलेने, त्यांच्यावर देखील कामाचा ताण पडतो, ते सन १९९० पासून एकटेच सदर विभागाचे कार्यरत आहेत. ते साधारण दररोज २५ ते ३० ऑपरेशन करुन ओ.पी.डी. पहात असतात. त्यांच्या हाताखाली असलेला पॅरामेडीकल स्टॉफ देखील कमी आहे.

०५) श्री साईनाथ रुग्णालयातील डॉक्टरांना त्यांच्या कामाप्रमाणे मोबदला (Incentives) मिळत नसलेने त्यांच्यात काम करताना असंतोष जाणवतो.

०६) मा.उपाध्यक्ष महोदयांनी OPD केसपेपर्स विभागाची पहाणी केली असता, केस पेपर देणे दुपारी १२ वाजेपर्यंत बंद झालेले असते, तसेच केसपेपर घेणेसाठी जवळपास १०० ते १२५ रुग्ण किंवा नातेवाईक रांगेत थांबलेले असतात. केसपेपर रुग्णांना लवकर मिळावा यासाठी खालीलप्रमाणे उपाय योजना व्हावी.

केस पेपर विभागाकडे असलेले टोकन पेपर चुकीचे छापलेले आहेत व कागद देखील चुकीचा वापरलेला आहे. केस पेपरसाठी कार्ड टाईप पेपर छापले पाहिजेत, तसेच केस पेपर विभागाकडील गर्दी टाळणेसाठी, बाहेर शेड उभे करावे, कारण OPD केस पेपरची संख्या दररोज जवळपास ७०० ते ८०० आहे. करीता तात्काळ बदल होणे आवश्यक आहे.

मा.उपाध्यक्ष महोदयांनी काही रुग्णांची प्रत्यक्ष विचारपूस केली असता, रुग्णांनी सांगितले की श्री साईनाथ रुग्णालयाकडे अडचण आहे, परंतू रुग्ण येथे लवकर बरा होतो व बरा होऊन लवकर बाहेर पडतो. याऊलट श्री साईबाबा रुग्णालयात तेथिल डॉक्टर पैसे मागतात, तेथे खर्च फार येतो करीता मी श्री साईनाथ रुग्णालयात उपचार घेणेसाठी आलो असे चौकशी करीत असलेल्या रुग्णाने सांगितले, तसेच श्री साईबाबा रुग्णालयाकडे औषधे नाहीत, ती आत्ताच आलीत असे काही रुग्णांनी भेटीत सांगितले.

नंतर मा.उपाध्यक्ष महोदय यांनी आयुर्वेद विभागास देखील भेट दिली. या विभागाच्या पहाणीत असे आढळून आले की, गरजवंत व गरजू रुग्ण ५० ते ६० लाईनमध्ये बसलेले दिसले. तसेच दर गुरुवारी साधारण १२५ रुग्ण असतात. या विभागात पंचकर्मासाठी जागा नाही, तसेच या विभागाकडे सहा महिन्यांपासून औषधे नाहीत. औषधे मेडिकल विभाग मागवत नाही व आली तर सब स्टोअर देत नाही, असे मा.महोदयांचे निदर्शनास आले.

आयुर्वेद विभागात दि.३१.०३.२००८ रोजी स्टॉकला जी औषधे आहेत ती आज पाहिली. तसेच नविन ऑर्डरसाठी दि.०१.०४.२००८ ला Indent दिले तेही पहाण्यास मिळाले. परंतु दि.३१.०३.२००८ रोजी जो स्टॉक आहे ती औषधे का मिळत नाही यांची चौकशी प्रशासकीय अधिकारी यांनी करावी व रिपोर्ट सादर करावा, असे सांगितले.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रशासकीय अधिकारी, रुग्णालय यांनी तपासणी करुन आयुर्वेद विभागात औषधे कां उपलब्ध झाली नाहीत याबाबत अहवाल द्यावा. तसेच मागणीनुसार औषधे उपलब्ध करुन देणेबाबत आवश्यक ती कार्यवाही करणेत यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक/वैद्यकीय अधिक्षीका)

**२३ सर्वोत्कृष्ट पदवी, जास्तीतजास्त कामाचा अनुभव व श्री साईबाबा सुपर स्पेशालिटी रुग्णालयात निवड होऊन दिलेबाबत व कमी पगाराबाबत डॉ.भाऊसाहेब बी साबळे, वैद्यकीय अधिकारी यांचे अर्जाबाबत.**

डॉ.भाऊसाहेब बी.साबळे वैद्यकीय अधिकारी (मेडीसिन) यांनी दि.०७/०९/२००८ रोजी अर्ज करुन त्यात, "मी साईबाबा संस्थानमध्ये १९९२ ते आजपर्यंत १६ वर्षे सेवेत असून आजपर्यंत रुग्णांची सेवा केलेली आहे. संस्थानचे श्री साईबाबा हॉस्पीटल करीता कन्सलटंट फिजीशियन या पदासाठी मुलाखत दिलेली होती. निवड समितीने माझी निवड केलेली होती. मला अपॉईंटमेंट लेटर मिळालेले नाही. माझे जागेवर संस्थानने इतर ०६ ते ०७ वैद्यकीय अधिकाऱ्यांची नेमणूक केली होती ते सर्व ०६ महिने ते ०२ वर्षे अनुभव असलेले डॉक्टर होते. बरेच M.D. (Medicine) नव्हतेही. तरी संस्थानने त्यांना रु.३५,०००/- पगार व रु.५०,०००/- ते १,२५,०००/- इन्सेंन्टिव दिला आहे. मला एम.डी.नंतर वीस वर्षांचा अनुभव आहे. तसेच Indian critical Care Society व Society of Cardiology वगैरे संस्थांचाही Life Member आहे. कृपया मला कन्सल्टंट फिजिशियन ॲन्ड सिनियर इंटेन्सीव्हिस्ट म्हणून व मुलाखतीचे तारखेपासून इंन्सेंन्टिव देण्यात यावा अशी विनंती केलेली आहे.

डॉ.बी.बी.साबळे यांची संस्थानकडे नेमणूक झालेपासूनची माहिती खालीलप्रमाणे

| | |
|---|---|
| नांव | :- डॉ.भाऊसाहेब भागवतराव साबळे |
| शैक्षणिक पात्रता | :- एम.डी.मेडीसिन - एप्रिल १९८७ |
| पदनांम | :- वैद्यकीय अधिकारी (मेडीसिन) |
| कामावर हजर तारीख | :- ०७/०२/१९९२ (एकूण १६ वर्षे ) |

संस्थानचे श्री साईबाबा हॉस्पीटल सुरु होण्याच्या वेळी श्री साईबाबा हॉस्पीटलकडे तज्ञ वैद्यकीय अधिकारी भरणेकामी वर्तमानपत्रात जाहीरात प्रसिध्द करण्यात आलेली होती. त्यावेळी जाहीराती नुसार आलेल्या कंन्सलटंट (जनरल मेडीसिन) या पदाचे मुलाखतीसाठी दि.२९/०१/२००५ रोजी डॉ.साबळे सह एकूण सहा उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलविण्यात आले होते त्यावेळी त्यांच्या मुलाखती घेण्यात आल्या व डॉ.साबळे यांची जनरल मेडीसीन या पदासाठी निवड करण्यात आली.त्याचवेळी डॉ.साबळे हे संस्थानचे रुग्णालयात काम करत असल्यामुळे त्यांना फेरनियुक्ती देण्याचा प्रश्नच येत नाही.असा निर्णय झाल्याने त्यांना नेमणूकपत्र देण्यात आले नाही.त्यावेळी डॉ.बंडोपाध्याय यांची संस्थानकडे इंन्टेन्सीव्हीस्ट या पदावर नेमणूक करण्यात आली. त्यांनी राजीनामा दिल्यानंतर वरिष्ठांचे सुचनेनुसार श्री साईबाबा हॉस्पीटलकडे फिजीशियन नसल्याने व रुग्णांचे हाल होत आहेत. पर्यायी व्यवस्था होईपर्यंत जा.नं.एसएसएस/वशी-०१/२७७६/२००६ दि.११/१०/२००६ अन्वये डॉ.साबळे यांनी पुढील आदेश होईपर्यंत श्री साईबाबा हॉस्पीटलकडे दैनंदिन कामे करावे व आवश्यकतेनुसार श्री साईनाथ रुग्णालयाकडे ऑन कॉल जावून

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



उपचार करावे असे आदेशीत करण्यात आले होते. त्यानंतर जा.नं.एसएसएस/वशी-०१/३०४२/२००६ दि.१८/११/२००६ अन्वये डॉ.साबळे यांनी पुर्ववत श्री साईनाथ हॉस्पीटलकडे पुर्णवेळ वैद्यकीय अधिकारी म्हणून काम पहावे असे आदेशीत करण्यात आले.

आता दि.१०/०८/२००८ रोजी श्री साईबाबा हॉस्पीटकडे वैद्यकीय अधिकारी (फिजीशियन) या पदावर नेमणूका करणेकामी जाहीरात देऊन मुलाखती घेण्यात आल्या त्यावेळी डॉ.साबळे यांनी सिनियर इन्टेन्सीव्हीस्ट, फिजीशियन व कार्डीओलॉजीस्ट इत्यादी पदासाठी अर्ज केले होते. त्यांना सिनियर इन्टेन्सीव्हीस्ट व फिजीशियन या पदासाठी मुलाखत पत्र देण्यात आले होते. ते कार्डीओलॉजीस्ट या पदासाठी पात्र नसल्याने त्यांना सदर पदासाठी मुलाखत पत्र देण्यात आले नव्हते. डॉ.साबळे यांची फिजीशियन व सिनियर इंन्टेन्सीव्हीस्ट या पदासाठी एकाचवेळी मा.विश्वस्त डॉ.प्यारेलाल तिवारी सो., डॉ.गोंदकर सो., मा.श्री खांबेकर सो. व मा.श्री सुरेशराव वाबळे सो.यांचेसमोर मुलाखत घेण्यात आली त्यावेळी त्यांची नेमणूकीसाठी निवड करण्यात आलेली नाही.

**तरी डॉ.साबळे यांचेबाबत मा.अध्यक्ष महोदय यांचे अभिप्राय व मा.आ.श्री राधाकृष्ण विखे पा.सो.यांचे शिफारस पत्र व दि.१०/०८/२००८ रोजी झालेली मुलाखत यास अनुसरुन मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केलेल्या प्रस्तावाची नोंद घेण्यात आली.** (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

**२४. <u>मटेरिअल मॅनेजर या पदाचे पदनाम व वेतनश्रेणी मिळणेबाबत श्री मच्छिंद्र के.थोरात यांचे अर्जाबाबत</u>**

सदरहू विषयावरील चर्चा तहकुब ठेवण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

**यानंतर आयत्या वेळेच्या विषयावर चर्चा सुरु करण्यात आली.**

**२५. श्रीपुण्यतिथी उत्सव २००८ मध्ये होणाऱ्या निमंत्रित कलाकारांची नांवे मा.विश्वस्त श्री सुरेश गोरक्षनाथ वाबळे व मा.डॉ.एकनाथ भागचंद गोंदकर यांनी निश्चित केली त्या मान्यता देण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

| अ.नं. | दिनांक | कलाकारचे नांव | कार्यक्रमाचा तपशिल | मानधन |
|---|---|---|---|---|
| ०१ | ०८.१०.२००८ ते १०.१०.२००८ | ह.भ.प मंदार गंगाधर व्यास बुवा,डोंबीवली | किर्तनकार | रुपये ७,५०१/- |
| ०२ | ०८.१०.२००८ | श्री अभय माणके, इंदोर | गीत रामायण कार्यक्रम | रुपये ११,०००/- प्रवासभाड्यासह |
| ०३ | ०९.१०.२००८ | श्री विलास बुवा पाटील,मुंबई | भाव विलासिया भक्तीगीत कार्यक्रम | रुपये २८,०००/- प्रवासभाड्यासह |
| ०४ | १०.१०.२००८ | श्री शुभ्रम बहलजी,कानपुर | साईभजन कार्यक्रम | रुपये १८,०००/- |

(कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-०५)

**२६. <u>दसरा ( पुण्यतिथी ) उत्सव २००८ करीता मंडप व्यवस्था करणेकामी आलेले कोटेशन उघडून त्यावर निर्णय होणेबाबत..</u>**

श्री साईबाबा संस्थान मार्फत सालाबाद प्रमाणे याही वर्षी शनिवार दि. ०८ ऑक्टोबर, २००८ ते दि. १० ऑक्टोबर, २००८ अखेर तिन दिवस "श्रीं " चा साईबाबा पुण्यतिथी उत्सव संस्थान मार्फत साजरा करण्यात येणार आहे. उत्सवाचे कालावधीमध्ये साईभक्तांची मोठया प्रमाणावर गर्दी होण्याची शक्यता असल्यामुळे मंदिर परिसर, नविन भक्तनिवासस्थान परिसर, धर्मशाळा परिसर, प्रसादालय परिसर व साईनगर परिसर या सर्व ठिकाणी तात्पुरत्या स्वरुपाची अतिरिक्त निवास व्यवस्था व्हावी म्हणुन उपरोक्त उत्सवाच्या कालावधीत खालील प्रमाणे मंडप उभारणी करणे व इत्यादी अनुशंगिक व्यवस्था करणेकामी येणारे रु. २०.४० लक्ष मात्रचे खर्चास व त्याकामी अशा प्रकारचे काम करणारे मंडप ठेकेदार यांचेकडून कोटेशन मागविणेस मा. व्यवस्थापन समितीचे दि. १७.०८.२००८ रोजीचे सभेत मान्यता देणेत आलेली आहे.

त्यानूसार खालील प्रमाणे मंडप व्यवस्था करणे कामी कोटेशन मागविणेत आलेले आहे.

०१.मंदिर परिसरातील मंडप (पत्र्याचे छत असलेले मंडप ) :- ६८,३३०.०० चौ. फुट मंडप

०२. साईनगर, भक्तनिवासस्थान (५०० रुम) व इतर परिसरातील मंडप (छताकरीता प्लास्टीक ताडपत्री):- १,३०,६७४.०० चौ. फुट मंडप व इ. अनुषंगिक व्यवस्था.

उपरोक्त प्रमाणे मंडप व्यवस्था करणे कामी खालील मंडप ठेकेदार यांना इकडील जा. नं. १३२४५/२००८ दि. १०.०९.२००८ चे पत्रान्वये कोरे कोटेशन फॉर्म दि. १०.०९.२००८ ते दि. १५.०९.२००८ या कालावधित घेऊन जाणे बाबत व सिलबंद कोटेशन / दरपत्रक दि. १७.०९.२००८ रोजी ४.०० वाजेपर्यंत सादर करणे बाबत खालील मंडप ठेकेदार यांना कळविणेत आले होते.

| **अ.नं** | **ठेकेदाराचे नांव** |
|---|---|
| ०१ | सावता मंडप ॲण्ड टेन्ट डेकोरेटर्स, राहाता |
| ०२ | झुराळे टेन्ट मंडप डेकोरेटर्स, निमगांव खैरी |
| ०३ | कैलास मंडप ॲण्ड लाईट डेकोरेटर्स, अहमदनगर |
| ०४ | रोशनी मंडप ॲण्ड लाईट डेकोरेशन, संक्रापूर |
| ०५ | शर्मा मंडप ॲण्ड लाईट डेकोरेटर्स, वैजापूर |
| ०६ | बाबला टेन्ट हाऊस, श्रीरामपूर |
| ०७ | बालाजी मंडप डेकोरेटर्स, मनमाड |
| ०८ | शुभम टेन्ट हाऊस, निमगांव खैरी |

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



| | |
|---|---|
| ०९ | बी. एस. कातुरे, पुणे |
| १० | गणेश मंडप डेकोरेटर्स, कोपरगांव |
| ११ | जाधव मंडप ॲण्ड लाईट डेकोरेटर्स, कोपरगांव |

उपरोक्त पैकी अ. नं. ०१ ते ०८ चे ठेकेदारांनी विहीत मुदतित कोरे कोटेशन फॉर्म घेऊन सिलबंद कोटेशन सादर केले आहे

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेले कोटेशन्स आजचे सभेत उघडण्यात येऊन कोटेशन्ससादरकर्त्यांना समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ.नं | ठेकेदाराचे नांव | मंदिर परिसरातील मंडप (पत्र्याचे छत असलेले मंडप) एकूण ६८,३३० चौ.फूट कोटेशन मधील दर रु.प्रति दिवस प्र.चौ.फुट | | साईनगर,भक्तनिवासस्थान व इतर परिसरातील मंडप (छताकरीता प्लॉस्टीक ताडपत्री) एकूण १,३०,६७४ चौ.फूट कोटेशन मधील दर रु.प्र.दिवस प्र.चौ.फूट | |
|---|---|---|---|---|---|
| | | कोटेशन्स मधील दर रु. | चर्चा/वाटाघाटीअंती देऊ केलेले दर रु | कोटेशन्समधील दर रु. | चर्चा/वाटाघाटीअंती देऊ केलेले दर रु |
| ०१ | सावता मंडप ॲण्ड टेन्ट डेकोरेटर्स, राहाता | ४.३५ | ३.७५ | ३.२५ | **१.४५** |
| ०२ | झुराळे टेन्ट मंडप डेकोरेटर्स, निमगांव खैरी | ४.४० | -- | ३.०० | २.५० |
| ०३ | कैलास मंडप ॲण्ड लाईट डेकोरेटर्स, अहमदनगर | ४.५० | **३.५०** | ३.५० | २.७५ |
| ०४ | रोशनी मंडप ॲण्ड लाईट डेकोरेशन, संक्रापूर | ४.२५ | ३.७५ | ३.५० | २.५५ |
| ०५ | शर्मा मंडप ॲण्ड लाईट डेकोरेटर्स, वैजापूर | ८.०० | अनुपस्थित | -- | -- |
| ०६ | बाबला टेन्ट हाऊस, श्रीरामपूर | ६.०० | ५.०० | २.५० | १.५० |
| ०७ | बालाजी मंडप डेकोरेटर्स, मनमाड | -- | -- | ३.०० | २.७५ |
| ०८ | शुभम टेन्ट हाऊस, निमगांव खैरी | ३.०० | काम करु शकत नाही | १.५० | १.५० |

यावर सविस्तर चर्चा होऊन, खालीलप्रमाणे निम्नतम दर मान्य करण्यात यावे अशी या उपसमितीची शिफारस आहे.

अ) मंदिर परिसरातील मंडप (पत्र्याचे छत असलेले मंडप)एकूण ६८,३३० चौ.फूट कोटेशन मधील दर रु.प्रति दिवस प्र.चौ.फुट- रुपये ३.५० कैलास मंडप ॲण्ड लाईट डेकोरेटर्स, अहमदनगर

ब) साईनगर, भक्तनिवासस्थान व इतर परिसरातील मंडप (छताकरीता प्लॉस्टीक ताडपत्री)एकूण १,३०,६७४ चौ.फूट कोटेशन मधील दर रु.प्र.दिवस प्र.चौ.फूट-रु.१.४५ सावता मंडप ॲण्ड टेन्ट डेकोरेटर्स, राहाता.

**त्याचप्रमाणे साईभक्तांची गर्दी वाढल्यास जादा मंडप उभारणी करणेस अथवा जादा कालावधी करीता मंडप मंजूर दराने वाढविण्यास व त्याकामी येणारे खर्चास तसेच श्रीपुण्यतिथी उत्सव काळात भक्तांची गर्दी होण्याची शक्यता असल्याने भक्तांचे निवासासाठी आवश्यक तेवढ्या गाद्या, चादरी पुरवठादारांकडून दरपत्रके घेऊन भाडोत्री घेण्यास व त्यासाठी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यता आली.** (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**२७. <u>असोसिएट कन्सलटंट पद व त्या पदाचे मानधन/वेतन मिळणेबाबत डॉ.किरण आर गोरे यांचे अर्जाबाबत.</u>**

अ) डॉ. किरण आर. गोरे, यांची जा.नं.एसएसएस/वशी-०१/१२८२०/२००६ दि. १८/०९/२००६ अन्वये श्रीसाईबाबा हॉस्पीटलकडे क्लिनीकल असिस्टंट (जनरल सर्जरी) या पदावर एक वर्ष कालावधीसाठी दरमहा रु. २५,०००/- या एकत्रित वेतनावर नेमणूक करण्यात आलेली असून ते दि. १८/०९/२००६ रोजी कामावर हजर झालेले आहेत.

डॉ.गोरे यांनी दि.१८/०५/२००७ रोजी अर्ज करुन त्यात "I undersigned Dr.Kiran R.Gore MS. (General Surgeon) working as General Surgeon (Clinical Assistant) since last 8 months. Respected Sir I am working independently since last 6 months managing all routine, emergency surgeries and laparoscopic surgeries. I am working independently now alone managing our General Surgery department. S0 please upgrade my post to Associate Consultant. " अशी विनंती केली असून सदर अर्जावर वैद्यकिय संचालक श्री साईबाबा हॉस्पीटल यांनी " Dr. Reddy had resigned so Dr. Gore is presently woring as Clinical Assistant . In staffing pattren there is a post of full time General surgeon which he can be appointed Hence recommended as assoc. Consultant (General Surgeon) full in Saibaba Hospital and submitted to Hon.ble E.O. for nesesary change in appointment order. असे अभिप्राय दिले आहेत.

ब) डॉ.रितेशकुमार शर्मा यांची जा.नं.एसएसएस/वशी-०१/११७९६/२००६ दि. ०१/०९/२००६ अन्वये श्रीसाईबाबा हॉस्पीटलकडे क्लिनीकल असिस्टंट (स्त्रीरोग व प्रसूती ) या पदावर एक वर्ष कालावधीसाठी

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



दरमहा रु. २५,०००/- या एकत्रित वेतनावर नेमणूक करण्यात आलेली असून ते दि. १८/०९/२००६ रोजी कामावर हजर झालेले आहेत.

डॉ. शर्मा यांनी दि.११/०६/२००७ रोजी अर्ज करुन त्यात "I undersigned Dr.Shrma Riteshkumar has done my M.D. Gynecology from Mumbai and have got 1.5 years experience . I am working as Clinical Assistant in Saibaba Hospital since last 1 year. Kindly request you to consider me for the post of assocate concultant Gynecology department." अशी विनंती केली असून सदर अर्जावर वैद्यकिय संचालक श्री साईबाबा हॉस्पीटल यांनी " (1) There is only one (Dr.Kurde) Doctor M.D.(Gynec) in Sainath Hospital.Sainath both R.M.O.Drs.are D.G.O.(2) In Saibaba Hospital there are three full time Dr.Wagh, Sharma, Boldhane & Dr.Bendre part time visiting only there is no female Gynecologist. (3) The no of petient in Sainath Hospital are quite high as compared to Saibaba Hospital.Hence the services are more needed in Sainath Hospital than Saibaba Hospital.All there doctors should be posted in Sainath hospital. Hence instead of appointing any more doctor in Sainath, all most all doctors of Saibaba Hospital should work in sainath hospital as full time consltant."असे अभिप्राय दिले आहेत.

आता,महाराष्ट्र शासन विधी व न्याय विभाग निर्णय क्र.सासंवि-२००५/३१७/(१०३) का-सोळा मंत्रालय मुंबई दि.१३/०६/२००७ अन्वये साईबाबा हॉस्पीटलच्या आकृतीबंधास मान्यता मिळाली आहे. त्यात पदांचा आकृतीबंध पुढील अटी-वर मंजूर करण्यास येत आहे.असे नमूद केले आहे.

०१) कोणत्याही पदांचे पदनाम,वेतनश्रेणी व पदसंख्येत शासनाच्या मान्यतेशिवाय बदल करण्यात येवू नये.

०२) सदर पदांवर नियुक्ती करतांना पदोन्नतीच्या संधी उपलब्ध होणार नाहीत हे उमेदवारांच्या निदर्शनास आणण्यात यावे.तथापी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांच्या व्यवस्थापन समितीस योग्य वाटल्यास शासन मान्यतेने सदर कर्मचाऱ्यास त्यांची अर्हता व योग्यता तापसून वरिष्ठ पदावर नव्याने नियुक्ती देता येईल.

०३) हॉस्पीटलच्या पदांकरीता श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांच्या व्यवस्थापन समितीचे शासनाच्या मान्यतेने तयार केलेले सर्व नियम लागू राहतील.जोपर्यंत असे नियम अंतिम होत नाहीत तोपर्यंत व्यवस्थापन समितीचा याबाबतचा निर्णय शासन मान्यतेच्या अधीन अंतिम राहील.

०४) हॉस्पीटलकरीता उपरोक्त प्रमाणे आकृतीबंध मंजूर करण्यात आला असला तरी सदर आकृतीबंधातील पदांवर उमेदवारांची नियमित नियुक्ती करण्यापुर्वी सदर पद भरतीस शासनाची मान्यता घेण्यात यावी व तद्‌नंतर पदभरतीची कार्यवाही सुरु करण्यात यावी.

०५) आकृतीबंधात नमूद केलेल्या कर्मचाऱ्यांना हा आकृतीबंध जाहीर झाल्यानंतर शासनाकडील समतुल्य पदांप्रमाणे वेतनश्रेणी अनुज्ञेय असणार नाही.

०६) आकृतीबंधात नव्याने निर्माण केलेल्या व नामनिर्देशनाने (थेट भरतीने ) भरण्यात येणाऱ्या वेतनश्रेणीच्या पदांवरील कर्मचारी एक वर्षाकरीता परिवीक्षाधीन राहील व त्या कालावधीत त्यास सदर पदाच्या वेतनश्रेणीच्या कमीतकमी टप्पावरील वेतन अनुज्ञेय राहील.सदर कर्मचाऱ्यांचे कामाचे मुल्यमापन केल्यानंतर त्या कर्मचाऱ्यास श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांच्या व्यवस्थापन समितीने सेवेत पात्र ठरवल्यास परिविक्षाधीन कालावधी समाप्तीनंतर संबंधीत वेतनश्रेणी लागू होईल.यापुढे अ.नं.७,८,९ विविध मजकुराच्या अटी दर्शविलेल्या आहेत.

सदर आकृतीबंधात मंजूर केलेल्या पदनांमामध्ये असोसिएट कन्सल्टंट या पदनामांचा उल्लेख नाही. तथापि, इतर वैद्यकीय अधिकारी यांचे प्रमाणे डॉ.गोरे व डॉ.शर्मा यांना क्लिनिकल असि.ऐवजी असो. कन्सलटंट हे पदनांम व त्यांचे वेतन देणेस मान्यता देणेबाबतचे प्रस्तावास आस्थापना उपसमितीचे दिनांक ११.०८.२००७ चे सभेत मान्यता देण्यात आलेली होती. परंतू त्यावरील काही कारणास्तव थांबविण्यात आलेली कार्यवाही करण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

**२८. मा.विश्वस्तांचे सुचनेबाबत.**

मा.विश्वस्तांनी खालीलप्रमाणे सुचना मांडल्या.

(०१) सध्या श्री साईनाथ रुग्णालय धर्मशाळा क्र.०२ चे पूर्ण् इमारती व धर्मशाळा क्र.०१ इमारतीचे काही भागात चालविण्यात येत आहे. धर्मशाळा क्र.०१ इमारतीचा उर्वरित भाग भक्तांच्या वापरासाठी आहे. श्री साईनाथ रुग्णालयास जागा कमी पडत असल्याने धर्मशाळा क्र.०१ ही संपूर्ण इमारत श्री साईनाथ रुग्णालयाचे वापरासाठी उपलब्ध करुन देण्यात यावी. तसेच रुग्णालयातील केसपेपर व बिलींगची व्यवस्था धर्मशाळा ऑफीस इमारतीमध्ये हलविण्यात यावी. धर्मशाळा व ऑफिस इमारतीमध्ये रुग्णालयाचे वापराकरीता आवश्यक ती दुरुस्ती करण्यात यावी त्यापैकी सिव्हील वर्कचे काम सध्या संस्थानकडे काम करीत असलेल्या ठेकेदारांकडून त्यांचे मंजूर निविदा दराने अथवा कोटेशन्स मागवून करुन घेण्यात यावे. तसेच ॲल्यूमिनियम पार्टीशन्स व शेडचे कामासाठी तसेच O.T चे सिव्हील कामाव्यतिरिक्त विशेष

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



स्वरुपाचे काम असे काम करणाऱ्या ठेकेदारांकडून कोटेशन्स मागवून काम करुन घेण्यात यावे असे ठरले. व त्यासाठी येणारे योग्य त्या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक/बांधकाम विभाग प्रमुख)

(०२) सध्या बांधण्यात येत असलेल्या व्दारावती इमारतीतील काही खोल्या वैद्यकीय अधिकाऱ्यांचे निवासस्थानासाठी तात्पूरत्या देण्यात याव्यात अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक/बांधकाम विभाग प्रमुख/अधिक्षक आस्थापना)

संस्थानला देणगी मिळालेल्या नांदुर्खी शिवारातील ४२ एकर जमिनीवर सुपस्पेशालिटी हॉस्पिटल व वैद्यकीय अधिकारी निवासस्थाने बांधण्यात यावेत.याकामी आर्किटेक्टची नेमणूक करण्यात यावीअशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक/बांधकाम विभाग प्रमुख)

(०४) संस्थानने खरेदी केलेल्या लोढा यांचे जमीनीत शैक्षणिक संकुल उभारण्यात यावे व सध्याचे शैक्षणिक संकुलाचे जागेवर प्रशासकीय कार्यालय हलविण्यात यावेत अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक/बांधकाम विभाग प्रमुख)

(०५) संस्थान रुग्णालयासाठी चांगल्या वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या सेवा मिळावी याकरीता वैद्यकीय अधिकाऱ्यांना चांगल्या हॉटेलच्या रुम्स भाड्याने घेऊन देण्यात याव्यात अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक/बांधकाम विभाग प्रमुख/अधिक्षक आस्थापना)

(०६) सिस्टर इनचार्ज पदावर नर्सेसना पदोन्नती देणेकामी सध्या सेवेत असलेल्या नर्सेसची नावे गोपनीय अहवालासह प्रस्ताव व्यवस्थापन समितीचे सभेत सादर करण्यात यावा अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक/अधिक्षक आस्थापना)

(०७) मेडिकल स्टोअर श्रीसाईनाथ रुग्णालयात हलवितांना श्रीसाईबाबा हॉस्पिटलमधील सुपरस्पेशालिटी रुग्णालयासाठी आवश्यक असणारी औषधे श्रीसाईबाबा हॉस्पिटलचे स्टोअरमध्ये ठेवण्यात यावीत अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक/वैद्यकीय अधिक्षीका)

(०८) वैद्यकीय संचालक यांनी त्यांचे अधिकारात स्थानिक मेडिकल स्टोअर्समधून तातडीची खरेदी करण्यात यावी. तसेच औषधे कमी पडल्यास वार्षिक मंजूर दराने वेळोवेळी औषधे खरेदी करण्यात यावीत अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

(०९) श्रीसाईनाथ रुग्णालयात खरेदी करण्यात यावयाचे आयुर्वेदिक औषधे डॉ.आव्हाड यांचे सल्ल्याने खरेदी करण्यात यावेत अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक/वैद्यकीय अधिक्षीका)

(१०) श्रीसाईबाबा हॉस्पिटलमधील काही विभाग श्रीसाईनाथ रुग्णालयात स्थलांतरीत केल्यानंतर रिकाम्या होणाऱ्या जागेबाबत मा.उपाध्यक्ष यांचे सुचनेनुसार प्रस्ताव वैद्यकीय संचालक यांनी सादर करावा अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

(११) वैद्यकीय संचालक यांनी श्री साईबाबा व श्रीसाईनाथ या दोन्ही रुग्णालयात राऊंड घेऊन तेथील अडीअडचणीचे वेळोवेळी निवारण करावे अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक/वैद्यकीय अधिक्षीका)

(१२) रुग्णालयातील रुग्णांना वेळेवर औषधे वेळेवर उपलब्ध व्हावे याकरीता दरवर्षी माहे सप्टेबर पासून औषधे खरेदी प्रक्रिया सुरु करावी व जानेवारी पासून औषध पुरवठा सुरु होईल याबाबत दक्षता घ्यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक/वैद्यकीय अधिक्षीका)

(१३) श्रीसाईबाबा रुग्णालयातील एक वर्ष पूर्ण झालेल्या आर.एम.ओ यांना संस्थान सेवेत कायम केल्याचे नेमणूक आदेश देण्यात यावेत अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक/वैद्यकीय अधिक्षीका/अधिक्षक आस्थापना)

(१५) फक्त सुपरस्पेशालिटीच्या केसेस श्रीसाईबाबा हॉस्पिटमध्ये भरती करण्यात याव्यात.

Superspecialities:- Neurology,Cardiology,Cariothoracic surgery, Urology, Nephrology, Traumatology, Adevanced Orthopaedics (e.g.Joint Replacemencts) या व्यतिरिक्त अंतिगंभीर रुग्ण, अपघातात जखमी झालेले रुग्ण (Life/Limb threatening conditiohns) यांना उपचारार्थ श्रीसाईबाबा हॉस्पिटलमध्ये भरती करण्यात याव्यात अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक/वैद्यकीय अधिक्षीका)

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०३ दिनांक ०३.०८.२००८ रोजी शिर्डी येथे शैक्षणिक संकुलातील रिक्त पदांसाठी घेण्यात आलेल्या मुलाखतीचे इतिवृत्त**

**निर्णय क्र.७६०** श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालय, श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर तसेच श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कूल यांचेकरिता शिक्षण सेवक तसेच श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयाकरिता प्रयोगशाळा सहाय्यक पदाचे नेमणूकीकामी मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेने दि.०२/०६/२००८ रोजीचे व निदेशक कॉम्प्युटर ऑपरेटर ॲण्ड प्रोग्रामिंग असिस्टंट (Copa) व क्राप्टसमन फूड प्रॉडक्शन (व्हेज) निदेशक इत्यादी पदासाठीची दि.१६/०१/२००८ रोजीचे वर्तमान पत्रात जाहीरात प्रसिध्द करण्यात आलेली होती. त्यानुसार आलेल्या अर्जांचा तुलनात्मक तक्ता तयार करण्यात येवून जाहीरातीमध्ये दिलेल्या शैक्षणिक अर्हतेच्या व आरक्षीत प्रवर्गाच्या पात्र उमेदवारांना मुलाखत पत्र देण्यात आलेले होते.

सदर पदासाठी दि.०३/०८/२००८ रोजी उपस्थीत उमेदवारांच्या मा.व्यवस्थापन समितीचे सदस्य, तसेच उपरोक्त विषयातील तज्ञ (एक्सपर्ट) यांचेसमोर खालील उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात आलेल्या आहेत. त्यावेळी खालील मान्यवर उपस्थित होते.

०१.मा.श्री.जयंत मुरलीधर ससाणे,अध्यक्ष
०२.मा.श्री.शंकरराव गेणुजी कोल्हे,उपाध्यक्ष
०३.मा.श्री.राधाकृष्ण एकनाथराव विखेपाटील
०४.मा.श्री.पांडूरंग गमाजी अभंग
०५.मा.श्री.सुरेश गोरक्षनाथ वाबळे
०६.मा.श्रीमती उर्मिला प्रदिप जाधव
०७.मा.डॉ.एकनाथ भागचंद गोंदकर
०८.मा.श्री अशोक भिमाशंकर खांबेकर
०९.मा.सौ.सुमित्रा कैलास कोते
१०.प्रा.ए.जी.कांबळे, (एक्सपर्ट,इंग्रजी)
११.मा.श्री.डी.आर.कर्डिले, अ.नगर (एक्सपर्ट,शा.शिक्षण)
१२.मा.श्री.बी.एन.शेळके, अ.नगर (एक्सपर्ट,भूगोल)
१३.मा.श्री.सी.एस.भिंगारदिवे,अ.नगर (एक्सपर्ट,वाणिज्य व अर्थशास्त्र)
१४.मा.श्री.आर.जी.काळे, अ.नगर (एक्सपर्ट,भौतिकशास्त्र)
१५.डॉ.पी.डी.निलावरअ.नगर (एक्सपर्ट,जीवशास्त्र)
१६.मा.श्री.परमार, (एक्सपर्ट,माहिती तंत्रज्ञान)
१७.मा.श्री.विजापुरेअ.नगर (एक्सपर्ट,रसायन शास्त्र)
१८.मा.श्री.डी.डी.आहिराव, अ.नगर (कोपा)
१९.मा.श्री.गुलशनकुमार, शिर्डी, (क्राप्टसमन फुड प्रॉडक्शन) व्हेज.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



| अ.क्र. | पदाचे नांव | जाहीरातीत नमूद केलेली पदे | जाहीरातीनुसार आलेले अर्ज + सेवायोजन कार्यालयाकडील यादी नुसार संख्या | देण्यात आलेले कॉल | मुलाखतीस हजर उमेदवारांची संख्या |
|---|---|---|---|---|---|
| **कनिष्ठ महाविद्यालय शिक्षणसेवक** | | | | | |
| ०१. | भौतिकशास्त्र | (०२) ०१ पूर्णवेळ ०१ CHB | २६+४३ = ६९ | २० | १४ |
| ०२. | जीवशास्त्र | (०२) ०१ पूर्णवेळ ०१ CHB | ३९ | २० | १४ |
| ०३. | रसायनशास्त्र | (०३) ०२ पूर्णवेळ ०१ CHB | ४३+०१ = ४४ | १७ | १२ |
| ०४. | माहिती तंत्रज्ञान | (०२) ०१ पूर्णवेळ ०१ CHB | १८+०३ = २१ | १७ | ११ |
| ०५. | पर्यावरण | (०१) पूर्णवेळ | १६ | ०८ | १४ |
| ०६. | अर्थशास्त्र | (०२) ०१ पूर्णवेळ ०१ अर्धवेळ | ४९+०७ = ५६ | २० | ०७ |
| ०७. | भूगोल | (०१) CHB | ४७+१८ = ६५ | १० | ०८ |
| ०८. | वाणिज्य | (०१) पूर्णवेळ | १६+४ = २० | ०९ | ०६ |
| ०९. | शारीरिक शिक्षण | (०१) पूर्णवेळ | ४१+०४ = ४५ | ०९ | ०६ |
| १०. | इंग्रजी | (०१) अर्धवेळ | ४०+०४ = ४४ | १० | ०७ |
| आरक्षण - अजा-३, अज-२, भज-२, निज (व्हीजे)-१, इमाव-३, खुला-५ | | | | | |
| **कनिष्ठ महाविद्यालय प्रयोगशाळा सहाय्यक** | | | | | |
| ०१. | भौतिकशास्त्र | (०१) पूर्णवेळ | २३+०५ = २८ | १० | ०९ |
| ०२. | रसायनशास्त्र | (०१) पूर्णवेळ | ५५+३३ = ८८ | १० | ०५ |
| ०३. | जीवशास्त्र | (०१) पूर्णवेळ | २१+१३ = ३४ | १० | ०७ |
| ०४. | माहिती तंत्रज्ञान | (०१) पूर्णवेळ | ३२ | १० | ०९ |
| आरक्षण - शासन नियमानुसार अजा-१, अज-१, खुला-२ | | | | | |
| **कन्या विद्या मंदिर शिक्षणसेवक** | | | | | |
| ०१. | गणित (माध्यमिक) | (०१) पूर्णवेळ | ३२+०४ =३६ | ११ | ०९ |
| ०२. | माहिती तंत्रज्ञान (प्राथमिक) | (०१) पूर्णवेळ | २० | १० | ०९ |
| आरक्षण - शासन नियमानुसार अजा-१, अज-१ | | | | | |
| **इंग्लिश मिडियम स्कूल शिक्षणसेवक** | | | | | |
| ०१. | माहिती तंत्रज्ञान (माध्यमिक) | (०१) पूर्णवेळ | ९ | ११ | ०८ |
| ०२. | माहिती तंत्रज्ञान (प्राथमिक) | (०१) पूर्णवेळ | १४ (अ.नं.१ व २ साठी सेवायोजन कार्यालया कडील ८० उमेदवारांची एकत्रित यादी ) | ११ | ०७ |
| **श्री साईबाबा औद्योगिक प्रशिक्षण संस्था** (अ.ज.१+१) | | | | | |
| ०१. | कॉम्प्युटर ऑपरेटर ॲण्ड प्रोग्रामिंग असिस्टंट (Copa) | (०१) पूर्णवेळ | २१+३४ = ५५ | १० | ० |
| ०२. | क्राफ्टसमन फूड प्रॉडक्शन (व्हेज) | (०१) पूर्णवेळ | १+२१ = २१ | ०९ | ०२ |

सदर पदांच्या मुलाखती घेऊन जाहीरातीत नमूद केलेल्या पदाची शैक्षणिक पात्रता व उपलब्ध प्रवर्गातील खालील उमेदवारांना नेमणूक पत्र देण्यात आलेले आहेत.

आरक्षीत असलेल्या प्रवर्गातील उमेदवार उपलब्ध न झाल्याने आवश्यकता व कामाची निकड लक्षात घेवून सदरहू जागेवर आरक्षण नियमानुसार इतर उमेदवारांना तात्पुरत्या नेमणुकीचे आदेश देण्यात आलेले आहेत व नेमणूक आदेशात सदर पद हे आरक्षणातील असल्याचा उल्लेख केलेला आहे.

नेमणूक आदेश देण्यात आलेल्या शिक्षण सेवकांचा तपशील खालीलप्रमाणे -

**अ) श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालय, शिर्डी**

**आरक्षण- अजा-०३, अज -०२, भज -०२, विज-०१, इमाव-३, खुला-०५**

| अ.नं. | उमेदवाराचे नाव व पदनाम | विषय | जात /प्रवर्ग | शेरा |
|---|---|---|---|---|

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



| | | | | |
|---|---|---|---|---|
| ०१ | श्रीमती निघुते अनिता गोविंद शिक्षण सेवक (पूर्णवेळ) | भौतिकशास्त्र | हिंदु मराठा खुला | जा.नं.एसएसएस/वशी-०१/१२९९८/ २००८ दि.०४/०९/२००८ |
| ०२ | श्रीमती शिंदे शितल सुभाषराव शिक्षण सेवक (CHB) | भौतिकशास्त्र | हिंदु माळी इमाव | जा.नं.एसएसएस/वशी-०१/१२९९९/ २००८ दि. ०४/०९/२००८ |
| ०३ | श्री.अनाप भाऊसाहेब एकनाथ शिक्षण सेवक (पूर्णवेळ) | जीवशास्त्र | हिंदु माळी इमाव | जा.नं.एसएसएस/वशी-०१/१३०००/ २००८ दि. ०४/०९/२००८ |
| ०४. | श्रीमती संगिता रंगनाथ बनसोडे शिक्षण सेवक (CHB) | जीवशास्त्र | हिंदु महार अजा | जा.नं.एसएसएस/वशी-०१/१३००१/ २००८ दि. ०४/०९/२००८ |
| ०५. | श्री.दत्तात्रय सोपानराव शेळके शिक्षण सेवक (पूर्णवेळ) | रसायनशास्त्र | हिंदु मराठा खुला | जा.नं.एसएसएस/वशी-०१/१३००२/ २००८ दि. ०४/०९/२००८ |
| ०६. | श्री.दंडवते सुभाष निवृत्ती शिक्षण सेवक (पूर्णवेळ) | रसायनशास्त्र | हिंदु कुणबी इमाव | जा.नं.एसएसएस/वशी-०१/१३००३/ २००८ दि. ०४/०९/२००८ |
| ०७. | श्री.अरुण लक्ष्मण शिंदे शिक्षण सेवक (CHB) | रसायनशास्त्र | हिंदु माळी इमाव | जा.नं.एसएसएस/वशी-०१/१३००४/ २००८ दि. ०४/०९/२००८ |
| ०८. | श्री.संतोष मच्छिंद्र चौधरी शिक्षण सेवक (पूर्णवेळ) | माहिती तंत्रज्ञान | हिंदु मराठा खुला | जा.नं.एसएसएस/वशी-०१/१३००५/ २००८ दि. ०४/०९/२००८ |
| ०९. | श्री.सुनिल दत्तात्रय वरघुडे शिक्षण सेवक (CHB) | माहिती तंत्रज्ञान | हिंदु मराठा खुला | जा.नं.एसएसएस/वशी-०१/१३००६/ २००८ दि. ०४/०९/२००८ |
| १०. | श्री.मच्छिंद्र हरीभाऊ दरेकर शिक्षण सेवक (पूर्णवेळ) | अर्थशास्त्र | हिंदु मराठा खुला | जा.नं.एसएसएस/वशी-०१/१३००७/ २००८ दि. ०४/०९/२००८ |
| ११. | श्री.दत्तु अशोक लांडे शिक्षण सेवक (अर्थवेळ) | अर्थशास्त्र | हिंदु धनगर भज | जा.नं.एसएसएस/वशी-०१/१३००८/ २००८ दि. ०४/०९/२००८ |
| १२. | श्रीमती श्रध्दा बापुसाहेब शिंदे शिक्षण सेवक (CHB) | भूगोल | हिंदु तिरमल भज- ब. | जा.नं.एसएसएस/वशी-०१/१३००९/ २००८ दि. ०४/०९/२००८ |
| १३. | श्री.संगमनेरे दिलीप विठ्ठलराव शिक्षण सेवक (पुर्णवेळ ) | वाणिज्य | हिंदु मराठा खुला | जा.नं.एसएसएस/वशी- ०१/३६७८/२००८ दि.१७/०९/२००८ |

**ब) श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालय, शिर्डी**

**आरक्षण- अजा-०१, अज -०१ खुला-०२**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १४. | श्री. विलास अशोकराव आंबेकर प्रयोगशाळा सहाय्यक | भौतिकशास्त्र | हिंदु-मराठा खुला | जा.नं.एसएसएस/वशी-०१/१३०१३/ २००८ दि. ०४/०९/२००८ |
| १५. | श्री. मिनीनाथ भाऊसाहेब कोते प्रयोगशाळा सहाय्यक | रसायनशास्त्र | हिंदु-मराठा खुला | जा.नं.एसएसएस/वशी-०१/१३०३६/ २००८ दि. ०४/०९/२००८ |
| १६. | सौ. वैशाली प्रशांत देवरे प्रयोगशाळा सहाय्यक | जीवशास्त्र | हिंदु-धनगर भज | जा.नं.एसएसएस/वशी-०१/१३०१५/ २००८ दि. ०४/०९/२००८ (अज उमेदवार उपलब्ध नसल्याने शैक्षणिक वर्षासाठी नेमणूक) |
| १७. | श्री. प्रशांत सबाजीराव बनसोडे प्रयोगशाळा सहाय्यक | माहिती तंत्रज्ञान | हिंदु -तेली इमाव | जा.नं.एसएसएस/वशी-०१/१३०१४/ २००८ दि. ०४/०९/२००८ (अजा उमेदवार उपलब्ध नसल्याने शैक्षणिक वर्षासाठी नेमणूक) |

**क) श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर, शिर्डी**

**आरक्षण- अ.जा.-०१, अ.ज. -०१**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १८. | श्रीमती स्वाती रामदास माने शिक्षणसेवक ( माध्यमिक ) | गणित | हिंदु-चांभार अजा | जा.नं.एसएसएस/वशी-०१/१३०१०/ २००८ दि. ०४/०९/२००८ |
| १९. | श्री.ताराचंद मुकिंदा चिधे शिक्षणसेवक ( प्रथामिक ) | माहिती तंत्रज्ञान | हिंदु-धनगर भ.ज. | जा.नं.एसएसएस/वशी-०१/१३०११/ २००८ दि. ०४/०९/२००८ (अज उमेदवार उपलब्ध नसल्याने शैक्षणिक वर्षासाठी नेमणूक) |

**क) श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कूल, शिर्डी**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २०. | श्री. कैलास निवृत्ती जेजूरकर शिक्षण सेवक ( माध्यमिक ) | माहिती तंत्रज्ञान | हिंदु-माळी इमाव | जा.नं.एसएसएस/वशी-०१/१३०१८/२००८ दि. ०४/०९/२००८ |
| २१. | श्री.विजय बाजीराव पठारे शिक्षणसेवक ( प्रथामिक ) | माहिती तंत्रज्ञान | हिन्दु-माळी इमाव | जा.नं.एसएसएस/वशी-०१/१३०१२/२००८ दि. ०४/०९/२००८ |

**क) श्री साईबाबा औद्योगिक प्रशिक्षण संस्था, शिर्डी** आरक्षण - अज -०१

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ०१. | श्री.सोनवणे प्रशांत प्रभाकर | निदेशक क्राफ्टस्‌मन फुड प्रॉडक्शन (व्हेज) | हिंदु-कुणबी इमाव | जा.नं.एसएसएस/वशी-०१/१३५२८/२००८ दि.१५/०९/२००८ (अज उमेदवार उपलब्ध नसल्याने शैक्षणिक वर्षासाठी नेमणूक) |

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



उपरोक्तप्रमाणे उमेदवारांच्या केलेल्या नेमणूकीस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता. त्यास मान्यता देण्यात आली. तसेच, नेमणूक आदेश देऊनही जे उमेदवार हजर झालेले नाहीत, त्यांचे जागेवर त्वरित नेमणूका द्याव्यात असे ठरले. (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०४** **दिनांक १०.०८.२००८ रोजी शिर्डी येथे साईबाबा व साईनाथ रुग्णालयातील रिक्त पदांसाठी घेण्यात आलेल्या मुलाखतीचे इतिवृत्त.**

**निर्णय क्र.७६१** श्री साईबाबा हॉस्पीटलकरीता आवश्यक असलेल्या वैद्यकीय अधिकारी / पॅरामेडीकल स्टाफ पदांसाठी मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेने विविध वर्तमानपत्रात दि.२५/०६/२००८ रोजी जाहिरात प्रसिध्द करण्यात आलेली होती जाहीरातीस अनुसरुन आलेल्या अर्जांची छाननी करुन पात्र उमेदवारांना मुलाखत पत्र देण्यात आलेले होते त्यास अनुसरुन दि.१०/०८/२००८ रोजी मा.व्यवस्थापन समितीचे सदस्य तसेच विविध पदांवरील तज्ञ (एक्सपर्ट) यांचे समोर उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात आलेल्या आहेत. त्यावेळी खालील मान्यवर मुलाखतीसाठी उपस्थित होते.

१) मा.श्री.सुरेश गोरक्षनाथ वाबळे, विश्वस्त
२) मा.डॉ.एकनाथ भागचंद गोंदकर, विश्वस्त
३) मा.श्री.अशोक भिमाशंकर खांबेकर, विश्वस्त
४) मा.डॉ.पी.एल.तिवारी, विश्वस्त
५) डॉ.शर्मा, डीन पीएमटी, लोणी (एक्सपर्ट)
६) डॉ.सी.एस.बोबडे, वैद्यकीय संचालक
७) डॉ.एन.एस.म्हस्के, वै.उपसंचालक
८) डॉ.आशा पेंडसे, वैद्यकीय अधिक्षिका

वरील मान्यवरांच्या उपस्थितीत खालील पदासाठी मुलाखती घेण्यात आलेल्या आहेत.

| अ. क्र. | पदाचे नांव | जाहीरातीत नमूद केलेली पदे | आलेले अर्ज | देण्यात आलेले मुलाखत पत्र | मुलाखतीस हजरअसलेल्या उमेदवारांची संख्या |
|---|---|---|---|---|---|
| ०१. | सिनी.रेडिओलॉजिस्ट | ०१ | ०१ | ०१ | ०१ |
| ०२. | सिनी.इंन्टेसिव्हीस्ट | ०२ | ०१ | ०१ | ०१ |
| ०३ | ज्यु.ॲनेस्थियालॉजिस्ट | ०४ | ०७ | ०६ | ०२ |
| ०४ | कार्डीयाक सर्जन | ०१ | ०३ | ०३ | ०३ |
| ०५ | ऑब / गायनॉकालॉजिस्ट | ०१ | ०८ | ०३ | ०३ |
| ०६ | जनरल सर्जन | ०२ | ०६ | ०६ | ०२ |
| ०७ | बी.टी.ओ. | ०२ | ०२ | ०२ | ०१ |
| ०८ | आर.एम.ओ. | ०२ | ०४ | ०४ | ०४ |
| ०९. | सिनीयर बायो मेडीकल इंजिनियर | ०१ | ०३ | ०४ | ०२ |
| १०. | ज्यु बायो.मेडीकल इंजि. | ०२ | २३ | १२ | ०९ |
| ११. | डायलेसिस टेक्निशियन | ०२ | १० | ०३ | ०३ |
| १२. | ज्यु.टेक्नि.स्ट्रेस / इको | ०१ | ०३ | ०३ | ०३ |
| १३. | डेंटल टेक्निशियन | ०१ | १३ | ०३ | ०२ |

सदर पदासाठी घेण्यात आलेल्या मुलाखतीमधून खालील पात्र वैद्यकीय अधिकारी व सि.बायो मेडीकल इंजि., ज्यु.बायो मेडीकल इंजि., डायलेसिस टेक्निशियन, ज्यु.टेक्नि.स्ट्रेस/इको, डेंटल टेक्निशियन यांना नेमणूक पत्र देण्यात आलेले आहेत त्यांचा तपशील खालीलप्रमाणे

| अ.क्र. | पदाचे नांव | नेमणूक पत्र देण्यात आलेले वैद्यकीय अधिकारी | नेमणूक आदेश क्र. |
|---|---|---|---|
| ०१. | सिनी.रेडिओलॉजिस्ट | डॉ.योगीनी हेतल शहा. | जा.नं.एसएसएस/वशी-०१/१२४२०/२००८<br>दि. २१/०८/२००८ |
| ०२. | सिनी.इंन्टेन्सिव्हीस्ट | पात्र उमेदवार नाही | --- |
| ०३. | ज्यु.ॲनेस्थियालॉजिस्ट | डॉ.किशोर आप्पासाहेब खरड | जा.नं.एसएसएस/वशी-०१/ १२४१८ /२००८<br>दि.२१/०८/२००८ |
| ०४. | कार्डीयाक सर्जन | डॉ. आशिष आर.अग्रवाल | जा.नं.एसएसएस/वशी-०१/१२४१९ /२००८<br>दि. २१/०८/२००८ |
| ०५. | ऑब / गायनॉकालॉजिस्ट | डॉ.दिपाली दत्तात्रय गांधले | नेमणूक देणे आहे. |
| ०६. | जनरल सर्जन | पात्र उमेदवार नाही | --- |
| ०७. | बी.टी.ओ. | डॉ. सुर्यकांत रामनाथ पाटील | जा.नं.एसएसएस/वशी-०१/१२४२१/२००८<br>दि. २१/०८/२००८ |
| ०८. | आर.एम.ओ. | ०१) डॉ.नितीन अरुण नाईक<br>०२) डॉ.अजयकुमार बाबुराव धोंगडे<br>०३) डॉ. क्षितीज आत्माराम जाधव<br>०४) डॉ.शितल आशिष अग्रवाल. | जा.नं.एसएसएस/वशी-०१/१२४८७/०८<br>जा.नं.एसएसएस/वशी-०१/१२४९४/०८<br>जा.नं.एसएसएस/वशी-०१/१२४९३/०८<br>जा.नं.एसएसएस/वशी-०१/१२४९५/०८<br>दि. २२/०८/२००८ |
| ०९. | सिनीयर बायो मेडीकल | ०१) श्री राजेश रमनलाल वाकडे | जा.नं.एसएसएस/वशी-०१/१४५५९/०८ |

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



| | | | |
|---|---|---|---|
| | इंजिनियर | | दि.०२/१०/२००८ |
| १०. | ज्यु बायो.मेडीकल इंजि. | ०१) कु.मोनिका रंगनाथ शिंदे<br>०२) श्री.तुषार प्रकाश कुटे | जा.नं.एसएसएस/वशी-०१/१३०२८/०८<br>जा.नं.एसएसएस/वशी-०१/१३०२६/०८<br>दि.०४/०९/२००८ |
| ११. | डायलेसिस टेक्निशियन | ०१) श्री.मनतोडे जॉन राफेल | जा.नं.एसएसएस/वशी-०१/१३०२७/०८<br>दि.०४/०९/२००८<br>दि.२२/०९/२००८ रोजी कामावर हजर परंतु दि.२३/१०/२००८ पासून विनापरवाना गैरहजर दुरध्वनीद्वारे संपर्क केला असता राहण्याची व्यवस्था न झाल्याने कामावर येऊ शकत नाही. |
| १२. | ज्यु.टेक्नि.स्ट्रेस / इको | ०१) श्री नितीन भगवानराव काटे | जा.नं.एसएसएस/वशी-०१/१३०२४/०८<br>दि.०४/०९/२००८<br>दि.०३/१०/२००८ रोजी कामावर हजर परंतु दि.०४/१०/२००८ पासून विनापरवाना गैरहजर दुरध्वनीद्वारे संपर्क केला असता पगार कमी व राहण्याची व्यवस्था न झाल्याने कामावर येऊ शकत नाही असे कळविले आहे. |
| १३. | डेंटल टेक्निशियन | ०१) श्री परमेश रविंद्र चव्हाण | जा.नं.एसएसएस/वशी-०१/१३०२५/०८<br>दि.०४/०९/२००८ |

उपरोक्तप्रमाणे केलेल्या नेमणूकीस मान्यता देण्यात आली. तसेच अ.नं.११ डायलेसिस टेक्निशियन व १२ ज्यु.टेक्नि.ट्रेस / इको या पदावरील उमेदवार वरील कारणास्तव विनापरवाना कामावर गैरहजर असल्याने त्यांचे नेमणूक आदेश रद्द करुन प्रतिक्षा यादीतील पात्र उमेदवारांना नेमणूक पत्र देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०५ दिनांक १७.०८.२००८ रोजी शिर्डी येथे साईबाबा व साईनाथ रुग्णालयातील रिक्त पदांसाठी घेण्यात आलेल्या मुलाखतीचे इतिवृत्त.**

**निर्णय क्र.७६२** श्रीसाईबाबा व श्री साईनाथ हॉस्पीटलकरीता आवश्यक असलेल्या स्टाफ नर्स ७५ पदांसाठी मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेने विविध वर्तमानपत्रात दि.२५/०६/२००८ रोजी जाहिरात प्रसिध्द करण्यात आलेली होती. जाहीरातीस अनुसरुन आलेल्या अर्जांची छाननी करुन पात्र उमेदवारांना मुलाखतपत्र देण्यात आलेले होते. त्यास अनुसरुन दि.१७/०८/२००८ रोजी मा.व्यवस्थापन समितीचे सदस्य तसेच संबंधीत क्षेत्रातील मा.तज्ञ (एक्सपर्ट) यांचे समोर हजर उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात आलेल्या आहेत. त्यावेळी खालील मान्यवर उपस्थित होते.

१) मा.श्री.पांडुरंग अभंग, विश्वस्त
२) मा.श्री.सुरेश वाबळे, विश्वस्त
३) मा.डॉ.एकनाथ गोंदकर, विश्वस्त
४) मा.श्री.अशोक खांबेकर, विश्वस्त
५) मा.सौ.सुमित्रा कोते, विश्वस्त
६) डॉ.सी.एस.बोबडे, वैद्यकीय संचालक
७) डॉ.एन.एस.म्हस्के, वै.उपसंचालक
८) डॉ.आशा पेंडसे, वैद्यकीय अधिक्षीका
९) सौ.एल.जी.रणसिंग (एक्सपर्ट) प्र.मेट्रन, सिव्हील हॉस्पीटल, अ.नगर

स्टाफ नर्स पदासाठी आलेले अर्ज, दिलेले मुलाखत पत्र व मुलाखतीस उपस्थित उमेदवार संख्या खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | पदाचे नांव | आलेले अर्ज | देण्यात आलेले मुलाखत पत्र संख्या | मुलाखतीस हजर असलेल्या उमेद्वारांची संख्या |
|---|---|---|---|---|
| ०१ | स्टाफ नर्स | १८८ | १५२ | १२५ |

७५ नर्सेस भरणेकामी १०० बिंदु नामावलीनुसार खालील प्रमाणे जात प्रवर्ग निहाय पदसंख्या येते.

| अ.जा. | अ.ज. | नि.ज. (व्ही.जे.) | भ.ज. | विमाप्र | इमाव | एकूण अनुशेष | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| -४ | १२ | ०५ | १३ | ०४ | १८ | ५२-०४ = ४८ | २७ | ७५ |

मुलाखतीत पात्र ठरलेल्या खालील उमेदवारांना एक वर्षाचे परीविक्षाधिन कालावधीसाठी नेमणूक आदेश देण्यात आलेले आहेत.

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | गाव / जिल्हा | जात / प्रवर्ग | नेमणूक प्रवर्ग |
|---|---|---|---|---|
| ०१. | श्री हर्षे ज्ञानेश्वर दादाभाऊ | श्रीरामपूर, जि.अ.नगर | हिंदु-मराठा (खुला) | खुला |
| ०२. | श्रीमती निलीमा पेत्रस जाधव | सावेडी, जि.अ.नगर | हिंदु-ख्रिश्चन (खुला) | खुला |
| ०३. | श्रीमती लिना रघुनाथ गमे | शिर्डी, जि.अ.नगर | हिंदु-मराठा (खुला) | खुला |
| ०४. | श्री.प्रमोद शिवाजी वाणी | शिर्डी, जि.अ.नगर | हिंदु-मराठा (खुला) | खुला |
| ०५. | श्रीमती बागेश्री रमाकांत लोहोकरे | राहाता, जि.अ.नगर | हिंदु-ब्राम्हण (खुला) | खुला |
| ०६. | श्रीमती निलीमा श्रीरंग वाघ | सोनई, जि.अ.नगर | हिंदु-मराठा (खुला) | खुला |
| ०७. | श्रीमती प्रज्ञा बापुसाहेब कोते | शिर्डी, जि.अ.नगर | हिंदु-मराठा (खुला) | खुला |

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



| | | | | |
|---|---|---|---|---|
| ०८. | कु.दिपाली विजय देशमुख | सुगाव, अकोले | हिंदु-मराठा (खुला) | खुला |
| ०९. | श्री.प्रदीप युवराज सोनवणे | शिर्डी, जि.अ.नगर | हिंदु-मराठा (खुला) | खुला |
| १०. | श्रीमती सविता चांगदेव वर्पे | एमआयडीसी, अ.नगर | हिंदु-मराठा (खुला) | खुला |
| ११. | श्रीमती शितल संपत नेहे | राहुरी फॅक्टरी, अ.नगर | हिंदु-मराठा (खुला) | खुला |
| १२. | श्रीमती मंदाकिनी मधुकर अनार्थे | राहुरी, जि.अ.नगर | हिंदु-मराठा (खुला) | खुला |
| १३. | कु.अमरजा अनिल गोसावी | शिर्डी, जि.अ.नगर | हिंदु-ब्राह्मण (खुला) | खुला |
| १४. | कु.जगताप उषा किसन | एमआयडीसी, सिन्नर | हिंदु-मराठा (खुला) | खुला |
| १५. | कु.तिपाली सोनाली सोमनाथ | सिडको, औरंगाबाद | हिंदु-मराठा (खुला) | खुला |
| १६. | सौ. वक्ते मोनिका चांगदेव | कोपरगाव, जि.अ.नगर | हिंदु-मराठा (खुला) | खुला |
| १७. | श्री.भोंगळ मनोज निवृत्ती | राहुरी फॅक्टरी, जि.अ.नगर | हिंदु-मराठा (खुला) | खुला |
| १८. | श्री.शेलार जगन्नाथ रामनाथ | राहुरी, जि.अ.नगर | हिंदु-मराठा (खुला) | खुला |
| १९. | कु.पेटकर कल्याणी देवीदास | लोणी खुर्द, जि.अ.नगर | हिंदु-मराठा (खुला) | खुला |
| २०. | सौ.शेळके ज्योती चंद्रभान | मु.पो.सावळीविहिर बु, ता.राहाता, जि.अ.नगर | हिंदु-मराठा (खुला) | खुला |
| २१. | श्री.पुरे रामभाऊ नारायण | सावळविहीर, जि.अ.नगर | हिंदु-चांभार (अ.जा.) | खुला |
| २२. | कु.येवले ज्योती पावलस | हरीगाव, श्रीरामपूर, जि.अ.नगर | हिंदु-महार (अ.जा.) | खुला |
| २३. | कु.तांबे मिना बाबासाहेब | तांभेरे, राहुरी, जि.अ.नगर | हिंदु-महार (अ.जा.) | खुला |
| २४. | सौ. लिहीणार अनिता काशिनाथ | हरीगाव, श्रीरामपूर, जि.अ.नगर | हिंदु-महार (अ.जा.) | खुला |
| २५. | सौ.बागुल वर्षा कारभारी | राहाता, जि.अ.नगर | हिंदु-महार (अ.जा.) | खुला |
| २६. | सौ.साळवे सुयोगा इश्वरदास | टिळकनगर, जि.अ.नगर | हिंदु-महार (अ.जा.) | खुला |
| २७. | सौ.जाधव मंगल कचरु | शिर्डी, जि.अ.नगर | हिंदु-महार (अ.जा.) | खुला |
| २८. | श्री.रविकुमार दिलीपराव रावस | साईराजनगर, जि.अ.नगर | हिंदु-लाड (इमाव) | इमाव |
| २९. | श्रीमती हिराबाई बारकू पवार | एरंदवणे, कर्वे रोड, जि.पुणे | हिंदु-कुणबी (इमाव) | इमाव |
| ३०. | श्रीमती निता अनिल खैरनार | जेल रोड, नाशिक | हिंदु-सुतार (इमाव) | इमाव |
| ३१. | श्रीमती ज्ञानेश्वरी मोहन शेवाळे | राहुरी, जि.अ.नगर | हिंदु -कोष्टी (इमाव) | इमाव |
| ३२. | श्रीमती जयश्री एडवर्ड आढाव | राहुरी बु, जि.अ.नगर | हिंदु-ख्रिश्चन (इमाव) | इमाव |
| ३३. | श्रीमती वडेर उज्वला मलकप्पा | कुपवड, जि.सांगली | हिंदु-धनगर (भ.ज.) | भ.ज. |
| ३४. | श्रीमती सामीना शिरज शिकलगार | देवडी, जि.सातारा | मुस्लीम (भ.ज.-१) | भ.ज. |
| ३५. | श्रीमती संगिता शशिकांत कुमावत | श्रीरामपूर, जि.अ.नगर | हिंदु-वंजारी (भ.ज.) | भ.ज. |
| ३६. | श्री.मनोज बबन साबळे | शिर्डी, जि.अ.नगर | हिंदु-धनगर (भ.ज.) | भ.ज. |
| ३७. | श्रीमती राधा लक्ष्मण पवार | कर्वे रोड, पुणे | हिंदु-कोकणी (अ.ज.) | अ.ज. |

बिंदु नामावलीनुसार प्रवर्गातील पुरेसे उमेदवार उपलब्ध न झाल्याने मुलाखतीत पात्र ठरलेल्या खालील उमेदवारांना ११ महिने कालावधीसाठी तात्पुरते नेमणूक आदेश देण्यात आलेले आहेत.

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | गाव / जिल्हा | जात / प्रवर्ग |
|---|---|---|---|
| ०१. | श्री.सुर्यवंशी आशिष शरद | आदर्श नगर, मनमाड | हिंदु-ख्रिश्चन (खुला) |
| ०२. | कु.कावळे आशा दत्तात्रय | एमआयडीसी, सिन्नर | हिंदु-मराठा (खुला) |
| ०३. | सौ.कुंभार सुनिता शिवशंकर | शिर्डी, जि.अ.नगर | हिंदु-लिंगायत (खुला) |
| ०४. | कु.खान रुबीना युसुफखान | नाशिक रोड, नाशिक | हिंदु-मुस्लीम (खुला) |
| ०५. | कु.शिंदे मनिषा सुकदेव शिंदे | आडगाव, जि.नाशिक | हिंदु-मराठा (खुला) |
| ०६. | श्रीमती बिराजदार आलका भिमराव | नागापूर, जि.अ.नगर | हिंदु-मराठा (खुला) |
| ०७. | सौ.जामकर सविता मुरलीधर | सायखेडा, जि.नाशिक | हिंदु-मराठा (खुला) |
| ०८. | सौ.निकम शितल नानाजी | सिडको, नाशिक | हिंदु-मराठा (खुला) |
| ०९. | श्री.कुलकर्णी विशाल निलकंठ | हिंगणगाव, जि.अ.नगर | हिंदु-ब्राह्मण (खुला) |
| १०. | सौ.पवळ सुलभा प्रकाश | नालेगाव, जि.अ.नगर | हिंदु-मराठा (खुला) |
| ११. | श्री.काळे चांगदेव पंढरीनाथ | रवांदे, कोपरगाव | हिंदु-मराठा (खुला) |
| १२. | सौ.बनसोडे सारिका फकीरा | साकुरी, राहाता | हिंदु-महार (अ.जा.) |
| १३. | सौ.हिवाळे मिनाक्षी पुंजाजी | शिर्डी, जि.अ.नगर | हिंदु-बौध्द (अ.जा.) |
| १४. | कु.भोसले स्वाती पेटेर | भुलाबाई देसाई रोड, मुंबई-२६ | हिंदु-महार (अ.जा.) |
| १५. | सौ.सिंगारे मनिषा बन्सी | कोरेगाव पार्क रोड, पुणे | हिंदु-महार (अ.जा.) |
| १६. | सौ.बोधक कविता वसंत | कोपरगाव, जि.अ.नगर | हिंदु-महार (अ.जा.) |
| १७. | कु.शिंदे कांचन विनायक | एमआयडीसी, अ.नगर | हिंदु-महार (अ.जा.) |
| १८. | सौ.सिंगाडे सारिका शामराव | श्रीरामपूर, जि.अ.नगर | हिंदु-महार (अ.जा.) |
| १९. | सौ.महागडे वैशाली भगवान | एमआयडीसी, अ.नगर | हिंदु-महार (अ.जा.) |
| २०. | कु.आवारे मनिषा स्टेपन | नांदुर खंडाळा, अ.नगर | हिंदु-महार (अ.जा.) |
| २१. | कु.शिरसाठ प्रिया शामराव | श्रीरामपूर, जि.अ.नगर | हिंदु-महार (अ.जा.) |
| २२. | कु.कोळगे प्रतिमा रामचंद्र | राहाता, जि.अ.नगर | हिंदु-महार (अ.जा.) |

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



| | | | |
|---|---|---|---|
| २३. | कु.सदाफुले आशुमती संपत | सालाबतपूर, अ.नगर | हिंदु-ढोर (अ.जा.) |
| २४. | कु.गोर्डे प्रणिता प्रकाश | श्रीरामपूर, जि.अ.नगर | हिंदु-महार (अ.जा.) |
| २५. | कु.मनतोडे रिता मानवेळ | सोनगाव, जि.अ.नगर | हिंदु-महार (अ.जा.) |
| २६. | कु.विघे सुनिता मनोहर | कोपरगाव, जि.अ.नगर | हिंदु-महार (अ.जा.) |
| २७. | सौ.उजागरे सुजाता शिवाजी | शिर्डी, ता.राहाता | हिंदु-महार (अ.जा.) |

उपरोक्त नेमणूक आदेश देण्यात आलेल्या उमेदवारांची जात प्रवर्गानुसार विगतवारी खालीलप्रमाणे आहे.

| **नेमणूक** | **अ.जा.** | **अ.ज.** | **नि.ज. (व्ही.जे.)** | **भ.ज.** | **विमाप्र** | **इमाव** | **खुला** | **एकूण** |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पूर्णवेळ | | ०१ | | ४ | | ०५ | २७ | ३७ |
| ११ महिने | १६ | | | | | | ११ | २७ |

**अ** - उपरोक्त ०१ वर्षाचे परिविक्षाधीन कालावधीसाठी ३७ व ११ महिने कालावधीसाठी २७ असे एकूण ६४ नेमणूक पत्र देण्यात आलेले आहे. त्यास मान्यता असावी.

**ब** - उपरोक्तप्रमाणे दिलेल्या नेमणूक पत्रापैकी ४७ उमेदवार कामावर हजर झाले असून ०४ उमेदवारांनी कामावर उशीरा हजर होणार असलेने मान्यता मिळणेकामी अर्ज केलेला आहे. त्यांचा तपशील खालीलप्रमाणे

| अ.नं. | नेमणूक आदेश दिलेल्या उमेदवाराचे नाव | नेमणूक तारीख | हजर होण्यासाठी मुदतवाढ दिलेली तारीख |
|---|---|---|---|
| ०१ | कु.शिकलकर सामीना एस. | जा.नं.एसएसएस/वशी-१३८११/२००८ दि.२९/०८/०८ | १०/१०/२००८ अखेपर्यंत तथापी आजपावेतो कामावर हजर नाही |
| ०२ | कु.स्वाती पिटर भोसले | जा.नं.एसएसएस/वशी-१३८३१/२००८ दि.१९/०९/०८ | ०६/११/२००८ अखेपर्यंत |
| ०३ | सौ.सिंगारे मनिषा बन्सी | जा.नं.एसएसएस/वशी-१३८३१/२००८ दि.१९/०९/०८ | ०१/११/२००८ अखेरपर्यंत |
| ०४ | श्रीमती कावळे आशा दत्तात्रय | जा.नं.एसएसएस/वशी-१३८३१/२००८ दि.१९/०९/०८ | २३/१०/२००८ अखेरपर्यंत |

उपरोक्त अ.नं. १ ते ४ यांना हजर होण्यास मुदतवाढ देण्यात आलेली असून त्यातील नं.०१ च्या कु.शिकलकर यांची मुदत दि.१०/१०/२००८ रोजी संपलेली आहे. त्या आजपावेतो कामावर हजर झालेल्या नाहीत.

हजर झालेल्या उमेदवारांपैकी दोन नर्सेस ह्या विनापरवानगी कामावर गैरहजर आहेत त्यांची नावे पुढीलप्रमाणे-

| अ.क्र. | पदाचे नांव | कामावर हजर होवून विनापरवाना गैरहजर उमेदवारांचे नांव | शेरा |
|---|---|---|---|
| ०१. | स्टाफ नर्स | ०१. कु.देशमुख दिपाली विजय | दि.०४/०९/२००८ रोजी कामावर हजर परंतु दि.०७/०९/२००८ पासून विनापरवानगी गैरहजर |
| ०२. | स्टाफ नर्स | ०२. कु.शेवाळे ज्ञानेश्वरी मोहन | दि.०६/०९/२००८ रोजी कामावर हजर परंतु दि.०७/०९/२००८ पासून विनापरवानगी गैरहजर |

एकूण ६४ स्टाफनर्स उमेदवारांपैकी ४७ उमेदवारच कामावर हजर झालेले आहेत. मुदतवाढ दिलेल्या उमेदवारापैकी कु.शिकलकर यांची मुदत संपलेली आहे. म्हणजेच ४७+३= ५० उमेदवारच कामावर हजर होतील असे दिसते. नेमणूक आदेशात १५ दिवसाचे आत कामावर हजर व्हावे असे नमूद कलेले आहे. तथापी खालील उमेदवार कामावर हजर झालेले नाहीत.

| **अ.क्र.** | **उमेदवाराचे नाव** | **गाव / जिल्हा** | **जात / प्रवर्ग** |
|---|---|---|---|
| ०१. | श्रीमती निलीमा श्रीरंग वाघ | सोनई, जि.अ.नगर | हिंदु-मराठा (खुला) |
| ०२. | श्री.रविकुमार दिलीपराव रावस | साईराजनगर, जि.अ.नगर | हिंदु-लाड (इमाव) |
| ०३. | श्रीमती हिराबाई बारकू पवार | एरंदवणे, कर्वे रोड, जि.पुणे | हिंदु-कुणबी (इमाव) |
| ०४. | श्रीमती सामीना शिरज शिकलगार | देवडी, जि.सातारा | मुस्लीम (भ.ज.-१) |
| ०५. | श्रीमती राधा लक्ष्मण पवार | कर्वे रोड, पुणे | हिंदु-कोकणी (अ.ज.) |
| ०६. | श्रीमती जयश्री एडवर्ड आढाव | राहुरी बु, जि.अ.नगर | हिंदु-ख्रिश्चन (इमाव) |
| ०७. | सौ.हिवाळे मिनाक्षी पुंजाजी | शिर्डी, जि.अ.नगर | हिंदु-बौध्द (अ.जा.) |
| ०८. | सौ.बोधक कविता वसंत | कोपरगाव, जि.अ.नगर | हिंदु-महार (अ.जा.) |
| ०९. | सौ.सिंगाडे सारिका शामराव | श्रीरामपूर, जि.अ.नगर | हिंदु-महार (अ.जा.) |
| १०. | कु.शिंदे मनिषा सुकदेव शिंदे | आडगाव, जि.नाशिक | हिंदु-मराठा (खुला) |
| ११. | सौ.जामकर सविता मुरलीधर | सायखेडा, जि.नाशिक | हिंदु-मराठा (खुला) |
| १२. | कु.शिरसाठ प्रिया शामराव | श्रीरामपूर, जि.अ.नगर | हिंदु-महार (अ.जा.) |
| १३. | सौ.निकम शितल नानाजी | सिडको, नाशिक | हिंदु-मराठा (खुला) |
| १४. | कु.गोर्डे प्रणिता प्रकाश | श्रीरामपूर, जि.अ.नगर | हिंदु-महार (अ.जा.) |

उपरोक्त यादीमधील १४ उमेदवार हजर होणार नसल्याने त्यांचे नेमणूक आदेश रद्द करुन मुलाखत घेण्यात आलेल्या प्रतिक्षा यादीतील उर्वरीत उमेदवारांना संस्थान नियमानुसार नेमणूक आदेश देता येईल असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



यावर सविस्तर चर्चा होऊन, वरीलप्रमाणे १४ तसेच उर्वरित रिक्त जागांवर मुलाखती घेतलेल्या पात्र उमेदवारांना नेमणूक देण्यात यावी, असे ठरले. (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०६ ०१.(अ) जमा खर्च तक्ता ऑगष्ट,२००८.**

**(ब) माहे ऑगष्ट,२००८ मध्ये मा.कार्यकारी अधिकारी यांनी रुपये २५,०००/-चे मर्यादेत केलेल्या खर्चाच्या तक्त्याची नोंद घेणे.**

**(क) गुंतवणूक तक्त्याची नोंद घेणे.**

**(ड) माहे ऑगष्ट, सप्टेंबर,२००८ या महिन्यात दक्षिणा पेटीत जमा झालेल्या देणगीची नोंद घेणे.**

**(इ) माहे सप्टेंबर, २००८ मध्ये श्री साईबाबांना अर्पण झालेली वस्त्रे व इतर वस्तूंच्या अहवालाची नोंद घेऊन मान्यता देणे.**

**निर्णय क्र.७६३** (A)माहे ऑगष्ट,-२००८ मधील जमा रु २३,१३,४७,०८८.७८, आणि खर्च रुपये १०,५१,५६,७९२.४१ चा तक्ता, मा.कार्यकारी अधिकारी यांचे अधिकारात मंजूर रक्कम रुपये २५ हजार पर्यंतच्या सर्वसाधारण खर्चाचा तपशील माहे ऑगष्ट,२००८ रुपये २,४८,०३८.०० चा तक्ता, दिनांक १०.१०.२००८ अखेर संस्थानची गुंतवणूक रुपये ३,०३,४८,६६,०२२.०० चा तक्ता, माहे ऑगष्ट,सप्टेंबर,२००८ या महिन्यात दक्षिणा पेटीत जमा झालेल्या सोने चांदी, कापड व इतर वस्तूसह आलेल्या एकूण अनुक्रमे रुपये ६,९३,६२,६८१.०० व रुपये ५,०१,५५,८४२.००देणगीचा तक्ता, माहे सप्टेंबर, २००८ मध्ये श्रीसाईबाबांना अर्पण झालेली वस्त्रे व इतर वस्तुचा रुपये १,३७,०८६.०० चा अहवाल, ज्यांच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली.

**०२. श्रीसाईनाथ रुग्णालय माहे ऑगष्ट, सप्टेंबर,२००८ मध्ये देण्यात आलेल्या वैद्यकीय बीलातील सवलतीची नोंद घेऊन मान्यता देणे.**

**निर्णय क्र. ७६३** (B) श्रीसाईबाबा रुग्णालयामध्ये माहे ऑगस्ट,सप्टेबर, २००८ मध्ये अनुक्रमे रुपये ६७,५२,७१७.०० व रुपये ६४,२५,३२२.०० सवलतीच्या तक्त्याच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन, मान्यता देण्यात आली.

**०३. साईनाथ रुग्णालयात माहे ऑगष्ट,सप्टेंबर,२००८ या महिन्यात देण्यात आलेल्या वैद्यकीय अनुदानाची नोंद घेणे.**

**निर्णय क्र. ७६३** (C)साईनाथ रुग्णालयात माहे ऑगस्ट,सप्टेबर,२००८ मध्ये साईनाथ रुग्णालयातील रुग्णांना अंतररुग्ण अनुक्रमे रुपये ८६,६३४.०० व रुपये १,५९,५५५.०० बाह्य रुग्ण रुपये ५९,३६९.०० व रुपये ६७,४८५.०० थॅलसेमिया व हिमोफेलिया रुपये ६७,०५०.०० व रुपये ४९,४००.०० वैद्यकीय बीलांमध्ये देण्यात आलेल्या सवलतीची माहिती दर्शविणाऱ्या तक्त्याच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली

**०४. माहे ऑगष्ट, सप्टेंबर,२००८ मध्ये लावलेल्या ठेकेदारी कर्मचारी संख्येची नोंद घेऊन मान्यता देणे.**

**निर्णय क्र. ७६३** (E) माहे ऑगस्ट,सप्टेबर,२००८ मध्ये संस्थानमधील कामांसाठी कंत्राटदारांमार्फत वेळोवेळी रोजंदारीवर लावलेल्या अनुक्रमे ३७२७७ व ३७२२६ कर्मचाऱ्यांच्या/कामगारांच्या संख्येची माहिती दर्शविणारे तक्ते, ज्यांच्या प्रती सर्व मा.सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली

**०५. बांधकाम प्रगती तक्त्याची नोंद घेऊन मान्यता देणे.**

**निर्णय क्र. ७६३** (F) बांधकाम प्रगती अहवाल दर्शविणारा तक्ता "अ" व "ब" त्याच्या प्रती सर्व मा.सदस्यांना पूरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात आली . (कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

**०६.पाणी तपासणी अहवालाची नोंद घेऊन मान्यता देणे.**

**निर्णय क्र. ७६३** (G) माहे सप्टेबर,२००८ मध्ये संस्थान पाणीपुरवठा योजने अंतर्गत पुरविण्यात येणाऱ्या संस्थानचे परिसरातील पिण्याच्या पाण्याचे नमूने (सॅम्पल्स) मे.एनव्हायरो लॅब, नाशिक यांचेकडे तपासणीसाठी पाठविण्यात आले होते. त्यांचेकडून आलेले तपासणी अहवाल, ज्यांच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात आली.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०७ नवीन लेबर व सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर नेमणूकीबाबत प्राप्त झालेल्या निविदा उघडणे बाबत**

**निर्णय क्र.७६४** संस्थानला कंत्राटी पध्दतीने अकुशल, कुशल कामगार पुरविणेसाठी मे.बी.व्ही.जी.इंडिया लि.,पुणे व मे.बॉम्बे इंटेलिजन्स सिक्यूरिटी (इंडिया) लि.,नाशिक यांची लेबर कॉन्ट्रॅक्टर म्हणून तसेच सुरक्षा कर्मचारी पुरविणेसाठी मे.सुपर प्रोटेक्शन सिक्युरिटी सर्व्हिसेस प्रा.लि.,मुंबई यांची सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर म्हणून दि.०१-११-२००७ पासून नेमणूक करणेत आलेली आहे. संस्थानचे श्री साईबाबा हॉस्पीटल सुरक्षेकामी मे.स्पार्क ऑल सिक्युरिटी ॲन्ड अलाईड सर्व्हिसेस प्रा.लि.पुणे यांची सुरक्षा कर्मचारी पुरविणेकामी दि.१७-०८-२००७ पासून सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर म्हणून व मे ईगल आय एन्टरप्राईज, वापी (गुजरात) यांची साई मंदिर परिसर व महाद्वार सुरक्षेकामी सेवानिवृत्त/माजी सैनिकांमधून कंत्राटी पध्दतीने सुरक्षा कर्मचारी पुरविणेकामी

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



दि.११-८-२००७ पासून सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर म्हणून नेमणूक करणेत आलेली आहे. सदर लेबर व सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर्स यांचे ठेकेदारीची/कराराची मुदत दि.३१-१०-२००८ अखेर संपत आहे.

संस्थानला अकुशल, कुशल कामगार व अनुभवी सुरक्षा कर्मचारी, माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी पुढील एक वर्ष कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने पुरविणेसाठी नविन ठेकेदारांची /कॉन्ट्रॅक्टर्सची नेमणूक करणेसाठी वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्दीस देवून, मान्यता प्राप्त ठेकेदारांकडून "सिलबंद निविदा" मागविणेत आल्या होत्या. "सिलबंद निविदा" विक्रीची मुदत दि.१९-०९-२००८ पासून ते दि.३०-०९-२००८ पर्यंत अशी होती. तसेच "सिलबंद निविदा" स्विकारणेची अंतिम मुदत दि.०१-१०-२००८ रोजी सांयकाळी ५.०० वाजेपर्यंत अशी होती.

संस्थानला अकुशल, कुशल कामगार व सुरक्षा कर्मचारी, माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी कंत्राटी पध्दतीने पुरविणेसाठी मान्यता प्राप्त कंत्राटदारांकडून/ठेकेदारांकडून खालीलप्रमाणे संस्थानचे शिरडी कार्यालयास ३८ व मुंबई कार्यालयास ०७ अशा एकूण-४५ सिलबंद निविदा प्राप्त झालेल्या आहे.

| अ.नं. | निविदा धारकाचे नाव व पत्ता |
|---|---|
| ०१ | **श्री.महेंद्र मोहनीराज गंधे,**<br>"मनिषा" सुयोग गृहनिर्माण मंडळ, प्रोफेसर कॉलनी जवळ, सावेडी रोड, अहमदनगर. |
| ०२ | **मे.ईगल आय एन्टरप्राईज,**<br>पहिला माळा, नचिकेत प्लाझा,मोरारजी सर्कल, जी.आय.डी.सी.वापी-३९६१९५ (गुजरात). |
| ०३ | **प्रखर सिक्युरिटी ॲन्ड अलाईड सर्व्हिसेस,**<br>१, एम.जी.रोड, अब्बास चेंबर्स, ४ था माळा, अरोरा टॉवरजवळ, पुणे-४११ ००१. |
| ०४ | **श्री.भाऊसाहेब भागवत साठे,**<br>मु.पो.बेल पिंपळगांव, ता.नेवासा,जि.अहमदनगर. |
| ०५ | **बरोडा सिक्युरिटी एजन्सी,**<br>आर.वि.देसाई रोड, खंडेराव मंदिर,बरोडा-३९०० ०१.(गुजरात). |
| ०५ | **संतोष केअरवेल सर्व्हिसेस प्रा.लि.,**<br>९-अे/१, स्वामी लिला शाह को-ऑपरेटीव्ह हौसिंग सोसायटी, गार्डन लेन, श्रेयस सिनेमा मागे, घाटकोपर (पश्चिम),मुंबई-४००० ८६. |
| ०६ | **ईगल हंटर सोलुशन्स लिमिटेड,**मुंबई. |
| ०८ | **मे.बॉम्बे इंटेलिजन्स सिक्युरिटी (इंडिया) लिमिटेड,**<br>२ व ३ सिल्व्हर व्हॅली को-ऑपरेटीव्ह हौसिंग सोसायटी, नेहरु नगर समोर, नाशिक-पुणे रोड,नाशिक-४२२ १०१. |
| ०९ | **तिरुमला सर्व्हिसेस,** ०७, भोसले आर्केड, वैभव थियटरजवळ, हडपसर,पुणे-४११ ०२८. |
| १० | **मे.स्पार्क ऑल सिक्युरिटी ॲन्ड अलाईड सर्व्हिसेस प्रा.लि.**<br>३०८,स्टर्लिंग सेंटर, तिसरा माळा, अरोरा टॉवरसमोर,एम.जी.रोड, पुणे-४११ ००१. |
| ११ | **ट्रेन्ड मॅनेजमेंट कन्सल्टंन्सी ॲन्ड सर्व्हिसेस,**<br>०७, भोसले अर्केड, वैभव थियटरजवळ, हडपसर,पुणे-४११ ०२८. |
| १२ | **औरंगाबाद मल्टी सर्व्हिसेस,**<br>१०१/१०२, अक्षयदिप प्लाझा, ९ टाऊन सेंटर,सिडको बस स्टँड, औरंगाबाद. |
| १३ | **नॅशनल एक्स सर्व्हिसमेन सिक्युरिटी गार्ड,**<br>शॉप नंबर: बी-२, सायली अपार्टमेंट, कोहिनूर मंगल कार्यालयाजवळ, गुलमोहोर रोड, अहमदनगर. |
| १४ | **मेट्रो लेबर कॉन्ट्रॅक्टर्स ॲन्ड अलाईड सर्व्हिसेस,**<br>५, रिशाबाई अपार्टमेंट, साईनाथ नगर स्टॉपजवळ,इंदिरा नगर, नाशिक-४२२ ००९. |
| १५ | **ब्लॅक कॅट इंटेलिजन्स प्रायव्हेट लिमिटेड,**<br>३३, पहिला माळा, न्यु. बी.जे.मार्केट,जळगांव-४२५ ००१. |
| १६ | **धैर्य सिक्युरिटी ॲन्ड लेबर सर्व्हिसेस,**<br>मु.पो.नारायणगांव, (साकार नगरी),ता.जुन्नर, जि.पुणे. |
| १७ | **गार्डीयन फॅसिलिटीज मॅनेजमेंट (नागपूर) प्रा.लि.,**<br>१८` .के.मार्केट, धनकवडी, पुणे-सातारा रोड,पुणे-४११ ०४३. |
| १८ | **महात्मा फुले मल्टी सर्व्हिसेस,**<br>५८/१, "जय-विजय" बिल्डींग, कृषी सारथी नगर,बसमत रोड, परभणी. |
| १९ | **पायोनिअर सिक्युरिटी ॲन्ड लेबर सप्लायर्स,**<br>किर्ती नगर, नवी सांगवी,पुणे-४११ ०२७. |
| २० | **श्री.आर.आर.काजळे, लेबर कॉन्ट्रॅक्टर**<br>श्रमप्राप्ती निवास, सातपूर-अंबड लिंक रोड,नाशिक. |
| २१ | **प्रताप डिटेक्टीव्ह ॲन्ड सिक्युरिटी सर्व्हिसेस प्रा.लि.,**<br>पी.डी.एस.हाऊस, सी-४, सहयोग परिसर,ई-८, त्रीलंगा, भोपाळ-४६२ ०३९ (मध्यप्रदेश). |
| २२ | **ईगल सिक्युरिटी ॲन्ड परसोनेल सर्व्हिस,**<br>तळमाळा, मनिका अपार्टमेंट, महाकाली केव्हज रोड, अंधेरी (पुर्व), मुंबई-४०० ०९३. |
| २३ | **आदित्य मल्टी सर्व्हिसेस,**<br>४४३, लालबी मन्झील, ऑफ जे.एम.रोड,हॉटेल शैलेजा लेन, शिवाजी नगर,पुणे-४११ ००५. |

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



| | |
|---|---|
| २४ | **मे.रिलायंन्स एन्टरप्रायजेस,**<br>१०, एन.पी.एस.लाईन, कॉरपोरेशन बँकेसमोर,ईस्ट स्ट्रीट, कॅम्प,पुणे-४११ ००१. |
| २५ | **मे.यश सिक्युरिटी ॲन्ड लेबर सर्व्हिसेस,**<br>लक्ष्मीनारायण निवास, प्लॉट नंबर-२६, तीसगांव रोड,बजाज नगर, सिडको, वाळुज, औरंगाबाद-४३१ १३६. |
| २६ | **श्रीकृपा सर्व्हिसेस,**<br>प्रेस्टीझ प्लाझा-२, ऑफिस नंबर-२०१,फोरमायका (इंडिया) लि.समोर, मुंबई-पुणे रोड,आकुर्डी, पुणे-४११ ०११. |
| २७ | **मे.बी.व्ही.जी.इंडिया लिमिटेड,**<br>बी.व्ही.जी.हाऊस, प्रिमिअर प्लाझा, पुणे-मुंबई रोड,चिंचवड, पुणे-४११ ०१९. |
| २८ | **यश इंडस्ट्रीयल सर्व्हिसेस,**पुणे-४११ ०२३. |
| २९ | **ज्वाला सिक्युरिटी फोर्स,**<br>स्वास्तीक स्कुलसमोर, नवनक्षा, ब्रीज नंबर-१०,कामटी रोड, नागपूर-१७ |
| ३० | **एस्कॉर्ट सर्व्हिसेस,**<br>१०१, राजधानी कॉम्प्लेक्स, श्री शंकर महाराज मठाजवळ, पुणे-सातारा रोड, पुणे-४११ ०४३. |
| ३१ | **युनाईटेड सर्व्हिसेस,**<br>१०१, राजधानी कॉम्प्लेक्स, श्री शंकर महाराज मठाजवळ, पुणे-सातारा रोड, पुणे-४११ ०४३. |
| ३२ | **बीसेफ,**<br>अशोकनगर, सर्वे नंबर-४३, बिल्डींग-सी,शॉप नंबर-१६, चंदननगर, नगररोड,पुणे-४११ ०१४. |
| ३३ | **युनिक डेल्टा फोर्स सिक्युरिटी प्रा.लि.,**<br>२ रा माळा, नाना चेंबर्स, कासारवाडी,पुणे-४११ ०३४ |
| ३४ | **मेजर इंडस्ट्रियल सिक्युरिटी असोशियशन,**<br>गोंधवणी, वार्ड नंबर-०१, श्रीरामपूर, ता.श्रीरामपूर,जि.अहमदनगर |
| ३५ | **श्री शिवसाई सर्व्हिसेस,**<br>मु.पो.शिरडी, ता.राहाता, जि.अहमदनगर |
| ३६ | **साई सिक्युरिटी सर्व्हिसेस,**<br>सहकार भवन, जाखडी लेन, सिन्नर,जि.नाशिक. |
| ३७ | **साई सिक्युरिटी सर्व्हिसेस,**<br>सहकार भवन, जाखडी लेन, सिन्नर,जि.नाशिक. |
| ३८ | **तोगे एन्टरप्राईजेस,**<br>रांजनगांव रोड, वाळूज, एम.आय.डी.सी.,औरंगाबाद. |
| ३९ | **मे.टॉप्स सिक्युरिटी लिमिटेड,**<br>०५, रॉयल प्लॅन्स, गोल्फ ॲन्ड कन्ट्री क्लब,आरे मिल्क कॉलनी, गोरेगांव (पुर्व),मुंबई-४०० ६५. |
| ४० | **सुपर फॅसिलीटी मॅनेजमेंट एक्सपर्ट्स,**<br>६, ॲन्जीलिना को-ऑपरेटीव्ह हौसिंग सोसायटी, बाजीप्रभु देशपांडे मार्ग (जूनी पोलीस लेन), विलेपार्ले (पश्चिम), मुंबई-४०० ०५६. |
| ४१ | **मे सुपर प्रोटेक्शन सिक्युरिटी सर्व्हिसेस प्रा.लि.,**<br>६,ॲन्जीलिना को-ऑपरेटीव्ह हौसिंग सोसायटी, बाजीप्रभु देशपांडे मार्ग (जूनी पोलीस लेन), विलेपार्ले (पश्चिम), मुंबई-४०० ०५६. |
| ४२ | **फ्लॅश सिक्युरिटी ॲन्ड इंटेलिजन्स सर्व्हिसेस,**<br>९६/१७१८, समता नगर, कांदिवली (पुर्व),मुंबई-४०० १०१. |
| ४३ | **ड्रेगॉन सर्व्हिसेस,**<br>शॉप नंबर-१६, शिवशक्ती सोसायटी, इंदिरा नगर,<br>जे.पी.रोड, मधुवन कॉलनीसमोर, अंधेरी (पश्चिम),मुंबई-४०० ०५३. |
| ४४ | **सेन्ट्रल इन्व्हेस्टीगेशन ॲन्ड सिक्युरिटी सर्व्हिसेस लि.**<br>६११,क्रिस्टल पॅराडाईज शॉपिंग मॉल, ऑफ लिंकरोड, विरादेसाई रोड, अंधेरी (पश्चिम),<br>मुंबई-४०० ०५३. |
| ४५ | **कुशांग सिक्युरिटी ॲन्ड प्रोटेक्शन सर्व्हिसेस,**<br>७६०, अंबिकावाडी, सल्तपनरोड, वडाळा (पुर्व),मुंबई-४०० ०३७. |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेल्या निविदा आजचे सभेत समक्ष उघडण्यात आल्या. निविदासादरकर्त्यांनी देऊ केलेल्या दरांचा तुलनात्मक तक्ता तयार करुन, तो व्यवस्थापन समितीचे पुढील सभेत निर्णयार्थ सादर करावा असे ठरले. (कार्यवाही-कामगार अधिकारी )

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०८** **सन २००७-०८ या आर्थिक वर्षाच्या लेखापरिक्षण अहवालाची नोंद घेऊन, अहवाल शासनास सादर करणेस मान्यता देणेबाबत.**

**निर्णय क्र.७६५** मे.शरद एस.गायकवाड ॲण्ड कंपनी,चार्टर्ड अकौटंटस्,मुंबई यांचेकडून दिनांक २९ सप्टेंबर,२००८ रोजी प्राप्त झालेला सन २००७-०८ या आर्थिक वर्षाचा वैधानिक लेखपरिक्षण अहवाल (Statutory Audit Report) व लेखापरिक्षीत लेखे (Audited Accounts) तसेच प्रशासकीय अहवालाच्या प्रती सर्व मा.सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या. त्याची नोंद घेण्यात आली. अधिनियम- २००४ मधील

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



तरतूदीनुसार सदर अहवाल राज्य शासनाकडे तसेच मा.धर्मादाय आयुक्त,महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडे सादर करण्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-मुख्य लेखाधिकारी )

**आयत्या वेळेचा विषय नं.०९** **श्रीसाईबाबा भक्तनिवासस्थान इमारतीमधील डी विंग मधील व्ही.आय.पी.रुम नं.०२,०३,०४, ०५, ०६, ०७, ०८ मध्ये मॅटींग बसविणेबाबत.**

**निर्णय क्र.७६६** अधिक्षक, नविन भक्तनिवासस्थान यांनी कळविले आहे की, दि. २६/०६/२००८ रोजी मा. विश्‍वस्त श्री. डॉ. गोंदकर सोा., व मा.कार्यकारी अधिकारी यांनी नविन भक्तनिवास येथील रुमची पहाणी केली. त्यावेळेस त्यांनी व्ही.आय.पी. रुम मधिल मॅटीन बदलून नविन मॅटीन बसविणेबाबत सूचना केल्या आहेत. तरी इमारतीचे डी. विंग मधील व्ही.आय.पी. रुम, २,३,४,५,६,७,८ मधील मॅटींन बदलून नविन मॅटींन बसविणेबाबत विनंती केली आहे.

याबाबत सदर ठिकाणी १.५ एम एम जाडीचे पी.व्ही.सी. मॅटीन बसविता येईल. याकामी एकूण २,६१७.६२ चौ.फुट मॅटीनची आवश्यकता असून मॅटीन बसविणेकामी अंदाजे रुपये ९३,४४९.०० मात्र खर्च अपेक्षित असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन,श्रीसाईबाबा भक्तनिवासस्थान इमारतीमधील डी विंग मधील व्ही.आय. पी.रुम नं.०२,०३,०४,०५,०६,०७,०८ मध्ये मॅटीन बसविण्याऐवजी चांगल्या प्रकारच्या PORCELIENO/ VETRIFIED टाईल्स कोटेशन मागवून बसविण्यात याव्यात, याकामी येणारे योग्य त्या खर्चास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा विषय नं.१०** **लक्ष्मीनगर वसाहत आरक्षण क्र.२३ मध्ये स्थलांतरीत करणेकामी विकसन यंत्रणा शिर्डी नगरपंचायत, शिर्डी ऐवजी श्रीसाईबाबा संस्थान विश्‍वस्तव्यवस्था करणेबाबत.**

**निर्णय क्र.७६७** **(A)**मा. मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांना इकडील पत्र क्रमांक एसएसएस/बांधकाम/ १४७३२/२००५, दिनांक १७ डिसेंबर, २००५ रोजीचे पत्राने खालीलप्रमाणे विनंती करणेत आली होती :

.. शिर्डी नगरपंचायत हद्दीत लक्ष्मीनगर वसाहत असून सदर वसाहती खालील जागा ही महाराष्ट्र शासनाचे मालकीची आहे. सदर ठिकाणी ग्रामपंचायतीच्या काळात १०१ नागरीकांना अधिकृत घरकुलासाठी जागा वाटप करुन त्यावरील पक्की घरे बांधून देण्यांत आली आहेत. तसेच त्यावर २०३ नागरीकांनी अतिक्रमण केले आहे. लक्ष्मीनगर येथील रहिवाशी यांना सदर जागेतून स्थलांतरीत करुन आरक्षण क्रमांक २३ मध्ये पक्के घरकुलाचे संस्थानमार्फत बांधकाम करुन देता येतील. याकरीता लक्ष्मीनगर वसाहतीचे एकूण क्षेत्र स्मशान भूमीचे क्षेत्र वगळतां १.३६ आर संस्थानला देण्याचे दृष्टीने तसेच आरक्षण क्रमांक २३ मध्ये लक्ष्मीनगर येथील विस्थापितांचे पुनर्वसन करणेसाठी श्री साईबाबा संस्थान विश्‍वस्तव्यवस्था,शिर्डी विकसन यंत्रणा म्हणून नेमणुक करणे व विकास आराखडयात तसा बदल करणेबाबत कार्यवाही होणेस विनंती आहे.

**(B)** त्यानंतर शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांचे दिनांक २३ फेब्रुवारी, २००६ रोजीचे सभेत शिर्डी शहरातील लक्ष्मीनगर वसाहत पुनर्वसन करणेबाबत खालील प्रमाणे निर्णय झालेला आहे :

.. शिर्डी नगरपंचायतीने लक्ष्मीनगर वसाहतीचे पुर्ण सर्वेक्षण श्री. व्ही.बी.इनामके, रा. रुई यांचेकडून करुन घेतलेले आहे. त्यांचे सर्व्हेक्षणानुसार एकूण २९१ नागरीकांची घरे आहेत. त्यापैकी १०१ नागरिकांची घरे अधिकृत आहेत व उर्वरित १९० नागरीकांची घरे अतिक्रमणातील आहेत. तथापि सदर घरांना बरीच वर्षे झालेली आहे. त्यामुळे सदर घरांचेही पुर्नवसन करणे आवश्यक आहे. (यानंतर बांधकाम क्षेत्राचा तपशील दिलेला आहे.) चर्चे अंती असे ठरले आहे की, श्री साईबाबा संस्थान, शिर्डी यांचेकडून आराखडा व पत्र प्राप्त झाल्यानंतर आरक्षण क्रमांक २३ ची विकसन यंत्रणा श्री साईबाबा संस्थान, शिर्डी करण्याबाबत नगर रचना अधिनियमानुसार कार्यवाही करणेत यावी.

**(C)** मा. व्यवस्थापन समितीच्या दिनांक ०४ मार्च, २००६ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक १०८ खालीलप्रमाणे झालेला आहे :

.. मा.जिल्हाधिकारी यांनी सांगितले की,स.न. २/२,२/३ व ३/४ या जमीनी संस्थानला मोफत मिळाव्यात म्हणून शासन व जिल्हाधिकारी यांचेकडे प्रस्ताव पाठवावा. तसेच आरक्षण क्र.२३ मधील जमीन खरेदी देण्याची तयारी दर्शविली आहे. त्याप्रमाणे जमीन घेण्यात यावी. आरक्षण क्रमांक २३ ची विकसन यंत्रणा श्री साईबाबा संस्थान विश्‍वस्त व्यवस्था,शिर्डी असे करणेबाबत शिरडी नगरपंचायतीने पाठपुरावा करावा त्यानुसार आजचे सभेत चर्चा होऊन, आरक्षण क्रमांक २३ मध्ये लक्ष्मीनगर मधील नागरीकांचे पुनर्वसन करणेसाठी शासन व जिल्हाधिकाऱ्याकडे प्रस्ताव सादर करण्यात यावा. उपरोक्त जागा शिर्डी गावठणापासून जवळच्या अंतरावर आहे. त्यामूळे सध्याची मोक्याची संस्थानला लगत असलेली जागा साईभक्तांकरीता सोयी-सुविधा निर्माण करण्यासाठी मिळेल. सदरची जागा संस्थानला अत्यंत आवश्यक आहे.करीता वरीलप्रमाणे जमीन मालकांशी वाटाघाटीत ठरल्याप्रमाणे प्रती आर रुपये १,२५,०००.०० प्रमाणे जमीन खरेदी करणेस, याकामी आवश्यक स्टॅम्प फी, नोंदणी फी व इत्यादी त्या अनुषंगाने येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com   For evaluation only.



तसेच आरक्षण क्र.२३ मधील आवश्यक क्षेत्र  इतर मूळ जमीन मालक देण्यास उत्सुक नाहीत. करीता सदर जमीन मिळणेसाठी भू-संपादनासाठी व स.नं. २/२,२,३ व ३/४ या जमीनी संस्थानला मोफत मिळाव्या याकरीता मा.जिल्हाधिकारी यांचेकडे प्रस्ताव सादर करण्यात यावा, असे ठरले.

सदर निर्णयाप्रमाणे, मा. जिल्हाधिकारी, अहमदनगर यांना खालील सर्व्हे नंबरची जागा संस्थानकडे द्यावी म्हणून दिनांक ३१ मार्च, २००६ रोजीचे पत्रान्वये विनंती करणेत आली :

| अ.नं. | सर्व्हे नंबर | क्षेत्र |
|---|---|---|
| ०१ | ३ / ४ | ०१ हेक्टर ४८ आर |
| ०२ | २ / ३ | ०० हेक्टर १५ आर |
| ०३ | २ / २ | ०० हेक्टर २५ आर |

**(D)** मा. व्यवस्थापन समितीच्या दिनांक ०१ एप्रिल, २००६ रोजी सभेत निर्णय क्रमांक १९१ अन्वये आरक्षण क्रमांक २३ मध्ये करावयाच्या बांधकामाबाबत खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे :

.. वरीलप्रमाणे लक्ष्मीनगर येथील रहिवाशांचे पुर्नवसन करणेसाठी करावयाच्या बांधकामाकरीता अंदाजे रु. ४,८५,२६,८००/- मात्र खर्च अपेक्षित आहे. तसेच रस्ते, ड्रेनेज, स्ट्रीट लाईट इत्यादीसाठी अतिरिक्त खर्च येईल असे आर्किटेक्ट निकम पा.असो.श्रीरामपूर यांनी कळविले असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, एकूण १ हेक्टर ८९ आर क्षेत्रापैकी सुमारे ४७.१० आर क्षेत्र जमीन तसेच रस्ता व आरक्षण क्र.२५ मधील क्रिडांगणाची आरक्षीत जमीन  जमिनमालक सहमतीने देत आहेत ती जमीन खरेदी करणेत यावी. इतर उर्वरीत क्षेत्र भूसंपादनाचे माध्यमातून मिळणेसाठी शासनाकडे प्रस्ताव सादर करण्यात यावा, असे ठरले.

**(E)** मा.मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांना मा. व्यवस्थापन समितीच्या दिनांक १८ डिसेंबर, २००५ रोजीच्या निर्णय क्रमांक ७८४ व दिनांक ०४ मार्च, २००६ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक १०८(४) ची छायांकित प्रत दिनांक ०६ एप्रिल, २००६ रोजीचे पत्रान्वये पाठविण्यांत आली व सदरहू विषयाबाबत केलेल्या कार्यवाहीचा वृत्तांत पाठविणेबाबत विनंती करणेत आली. त्यानंतर दिनांक २० एप्रिल, २००६ व दिनांक ३० एप्रिल, २००६ रोजी स्मरणपत्रे ही देण्यांत आली.

**(F)** मा. मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांना दिनांक १७ मे, २००६ रोजीचे पत्रान्वये आरक्षण क्रमांक २३ बाबत भूसंपादन मंडळ म्हणून श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी करणेबाबत कळविण्यांत आले. तसेच आरक्षण क्रमांक २३ मधील जे खातेदार स्वत:हून संस्थानला जमीन विकत द्यावयास तयार असतील त्यांची जमीन विकत घेणेबाबत ना हरकत दाखला देणेची विनंती करण्यांत आली.

त्यावर मा.मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांनी त्यांचे कडील दिनांक २१ मे, २००६ रोजीच्या पत्रान्वये बांधकामाबाबत तसेच इतर बाबींबाबत अटींची पूर्तता करण्यास सांगितले.  त्यानंतर त्यांनी दिनांक ०२ जून, २००६ रोजी काही अटी घालून पत्र दिले. त्यामध्ये च अट क्रमांक ०१ : सदरचे आरक्षण क्रमांक २३ खालील जमिनीचा वापर हा लक्ष्मीनगर वसाहत पुर्नवसनाकरीता करावयाचा आहे  ही आहे.

मा.मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांचे उपरोक्त पत्राबाबत मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक १९ ऑगष्ट, २००६ रोजीचे सभेत निर्णय क्रमांक ५४३ खालीलप्रमाणे झालेला आहे :

..आता, खालील बाबींवर निर्णय होणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

०१. आरक्षण क्रमांक २३ मधील बांधण्यात येणाऱ्या वसाहतीतील रस्ते व खुली जागा नगरपंचायतीच्या नावावर करणे तसेच सदर रस्ते भुयारी गटार कॉंक्रीटीकरण व विद्युत व्यवस्थेसह तयार करणे.

०२. लक्ष्मीनगर वसाहतीअंतर्गत विकास योजनेतील १८ मीटर रुंद रस्त्याचे क्षेत्र नगरपंचायतीकडे विनामुल्य वर्ग करणे.

०३. आरक्षण क्रमांक २५ क्रिडांगण व १८ मीटर रुंद रस्ता, १२ मीटर रुंद रस्त्याचे क्षेत्र भविष्यात नगर पंचायतीस आवश्यकता भासल्यास भूसंपादन अथवा शासकीय दरानुसार नगरपंचायतीकडे देणे. आरक्षण क्रमांक २३, २५ व १८ मीटर व १२ मीटर रुंदीच्या रस्त्याचा विकास करणेसाठी नगरपंचायतीची रितसर परवानगी घेणे.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

मा. मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांना सदरहू निर्णयाची प्रत दिनांक ०४ ऑक्टोबर, २००६ रोजीचे पत्राव्दारे पाठविणेत आलेली आहे.

**(G)** दरम्यानचे कालावधीत, संस्थानमार्फत मा. विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडेस दिनांक ०६ जून, २००६ रोजीचे पत्रान्वये लक्ष्मीनगर वसाहत स्थलांतरीत करणेबाबत व ही जागा संस्थान कडे हस्तांतरीत करणेबाबत तसेच मुळ लक्ष्मीनगर वसाहतीतील रहिवाशांचे पुनर्वसन योजनेच्या प्रस्तावास मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव सादर करणेत आला.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



मा. व्यवस्थापन समितीच्या उपरोक्त विविध निर्णयांन्वये व मा.मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांचे ना हरकत दाखल्यास अनुसरुन संस्थानने आतापर्यन्त आरक्षण क्रमांक २३ व २५ मधील विविध खातेदारांची एकंदर ०१ हेक्टर ८१ आर जमीन रक्कम रुपये २,१५,६२,०००/- मात्रस खरेदी केलेली आहे.

संस्थानने वरील जमीन खरेदी करतांना लक्ष्मीनगर वसाहतीची जागा संस्थानला मिळणार आहे व तसेच आरक्षण क्रमांक २३ मध्ये लक्ष्मीनगर मधील रहिवाशांचे पुनर्वसन करावयाचे आहे याच उद्देशाने घेतलेली आहे. यासाठी नगरपंचायतीने ज्या ज्या अटी घातल्या होत्या त्या पुर्ण करणेबाबत संस्थानमार्फत नियोजन सुरु आहे.

**(H)** मा.मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांनी दिनांक २१ ऑगष्ट, २००८ रोजी संस्थानला पत्र पाठविले असून, त्यासोबत शिर्डी नगरपंचायतीचे दिनांक ३० जुलै, २००८ रोजी झालेल्या विशेष सर्वसाधारण सभेतील विषय क्रमांक ०१ चा ठराव क्रमांक ६८ जोडून पाठविला आहे.

**(०१)** दिनांक २१ ऑगष्ट, २००८ रोजीचे पत्राचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येत आहे की,

.. नगरपंचायतीच्या दिनांक २४ सप्टेंबर, २००७ च्या सभेत निर्णय क्रमांक ९२ खालीलप्रमाणे झालेला आहे :

चर्चे अंती असे ठरले की, लक्ष्मीनगरचे सर्व रहिवाशांनी मा.अध्यक्षा यांचेकडे दिनांक २४ सप्टेंबर, २००७ रोजी लक्ष्मीनगर स्थलांतर रद्द करणेबाबतचे निवेदन प्रत्यक्ष दिलेले आहे. सदर निवेदन व प्राप्त झालेल्या हरकती सुचना पंचायतीने स्वीकारल्या असून सदर हरकतीचा विचार करता सदर विषय स्थगित ठेवण्यात यावा. श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांनी लक्ष्मीनगर येथील प्रकल्प त्यांचे इतर ठिकाणचे जागेत करावा. लक्ष्मीनगर येथील रहिवाशांचे प्राप्त निवेदन व हरकती सुचना विचार करुन सदर हरकती स्वीकारण्यात आल्या असून सदर नागरीक हे शिर्डी येथील बऱ्याच वर्षापासुनचे रहिवाशी असल्याने शिर्डी नगरपंचायतीचे सर्व सदस्य लक्ष्मीनगर येथील रहिवाशांबरोबरच आहे. सदर विषय स्थगित करण्यांत आलेला आहे.

तसेच नगरपंचायतीच्या दिनांक ३० जुलै, २००८ रोजीच्या ठराव क्रमांक ६८ चे अवलोकन केले असता असे निदर्शनास येत आहे की,

.. चर्चे अंती असे ठरले की, नगरपंचायतीने आरक्षण क्रमांक २३ मध्ये लक्ष्मीनगर वसाहतीचे स्थलांतर करुन पुर्नवसन करणेसाठी फेरबदलाची कार्यवाही केलेली होती. तथापी सदर फेरबदलाबाबत एकूण २७३ हरकती / सूचना प्राप्त झालेल्या आहेत. प्राप्त हरकती / सुचना सुनावणी घेऊन त्याबाबत सर्वसाधारण ठराव क्रमांक ९२ दिनांक २४ सप्टेंबर, २००७ अन्वये फेरबदलाचे कार्यवाहीस स्थगिती देण्यात आलेली आहे. त्यामुळे पुढील फेरबदलाचा प्रस्ताव शासनाकडे सादर केलेला नाही.

मा.अध्यक्ष, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांनी आरक्षण क्रमांक २३ चा फेरबदल करुन विकसन यंत्रणा श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी करणेबाबत चर्चा केलेली आहे. सदर आरक्षण हे श्री साईबाबा संस्थान स्वतः विकसीत करीत अशी चर्चा झालेली आहे. सदर करावयाचा फेरबदल हा संपुर्ण शिर्डी शहरातील होणाऱ्या बेघरांसाठी घरे या कारणासाठी करणेत यावा व त्यासाठी विकसन यंत्रणा श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचेकडून आवश्यक कागदपत्रे घेणेत यावे तसेच सदर फेरबदलाबाबत मा. सहाय्यक संचालक, नगररचना विभाग, अहमदनगर यांचा तांत्रीक दृष्टया अभिप्राय घेणेत यावा. वरीलप्रमाणे कार्यवाही करुन महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदलाची कार्यवाही करणेस व त्यासाठी होणाऱ्या खर्चास या ठरावान्वये बहुमताने मंजुरी देणेत येत आहे.

सदर ठरावामध्ये सदर करावयाचा फेरबदल हा संपुर्ण शिर्डी शहरात होणाऱ्या बेघरांसाठी घरे या कारणाकरीता करणेत यावा व त्यासाठी विकसन यंत्रणा श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी करणेसाठी संस्थानकडून आवश्यक कागदपत्रे घेण्यात यावीत, असे नमूद केलेले आहे. आरक्षण क्रमांक २३ ची विकसन संस्था संस्थान होण्याचा एकमेव हेतू फक्त लक्ष्मीनगरमधील रहिवशांचे पुनर्वसन करणे व लक्ष्मीनगरची जागा संस्थानला मिळणे एवढाच होता व आहे. परंतु नगरपंचायतीचे दिनांक २१ ऑगष्ट, २००८ रोजीचे पत्राचे अवलोकन केले असता, लक्ष्मीनगरमधील जागा संस्थानला देण्याचा प्रस्ताव स्थगित ठेवण्यात आला आहे.

अशा परिस्थितीत आरक्षण क्रमांक २३ बाबत विकसन संस्था श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी होणे उचित राहणार नाही. तसेच शिर्डी शहरातील सर्व बेघरांना घरे देण्यासाठी या जागेचा वापर करण्यात यावा असे नमूद केलेले आहे. म्हणजेच नगरपंचायतीचा असा उद्देश दिसून येतो की, भविष्यात शिर्डी शहरात जे बेघर होतील अशा व्यक्तींना संस्थानने आरक्षण क्रमांक २३ मध्ये घरे बांधून द्यावीत.

या सर्व बाबींचा विचार करुन, आरक्षण क्रमांक २३ बाबत शिर्डी नगरपंचायत, शिर्डी ने सुचविलेला लक्ष्मीनगर पुर्नवसन ऐवजी संपूर्ण शिर्डीतील बेघरांसाठी घरे हा फेरबदल स्वीकारण्यांत यावा व त्यासाठी विकसन संस्था म्हणून श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी असा फेरबदल करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. प्रथम टप्प्यात लक्ष्मीनगर वसाहतीतील रहिवाशांचे स्थलांतरासाठी कार्यवाही करणेत यावी.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.११** **महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांचे माध्यमातून गर्दीचे व वाहतूकीचे नियोजन करणेकरिता सल्लागार संस्था नेमणेकामी संस्थानमार्फत निधी उपलब्ध करुन देणेबाबत.**

**निर्णय क्र.७६८** **(अ) विषयाची पूर्वपीठीका :**

मा.व्यवस्थापन समितीचे विविध निर्णयान्वये, शिर्डी गांवातील व परिसरातील एकुण २५ रस्ते प्राधान्य क्रमाने तीन टप्प्यात विकसित करण्याचे काम महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, मुंबई / पुणे यांचेकडून करुन घेण्यात यावे, असे ठरलेले आहे. याकामी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, मुंबई / पुणे यांचेशी शिर्डी एकात्मिक रस्ते विकास योजनेच्या प्रकल्पासंदर्भात दिनांक १५ ऑक्टोबर, २००६ रोजी शिर्डी येथे मरारविम यांचे मा.उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, शिर्डी नगरपंचायत, शिर्डीचे मुख्याधिकारी व श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे मा.कार्यकारी अधिकारी यांचे स्वाक्षरीनिशी समझोता करारनामा करण्यात आलेला आहे. या करारनाम्यातील अटी-शर्तीनुसार शिर्डी एकात्मिक रस्ते विकास योजना प्रकल्पासाठी येणाऱ्या सर्व खर्चासाठी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे मार्फत निधी उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.

मा. व्यवस्थापन समितीच्या विविध निर्णयांस अनुसरुन, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम,२००४ मधील सुधारित कलम २१ (२) (२) मधील तरतुदीस अनुसरुन शिर्डी एकात्मिक रस्ते विकास योजना प्रकल्प राबविणेकामी मान्यता मिळणेसाठी मा. विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडेस प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे. सदरहू प्रस्ताव मान्यतेस्तव अंतिम टप्प्यात आहे.

शिर्डी शहर एकात्मिक रस्ते विकास योजनेस शासनाची मान्यता मिळणेसाठी वेळोवेळी शासनस्तरावर अनेकवेळा बैठका आयोजित करण्यात आलेल्या होत्या. दिनांक १६ मे, २००७ रोजी मा. ना. श्री. अनिल देशमुख, सार्वजनिक बांधकाम मंत्री (सार्वजनिक उपक्रम), यांचे अध्यक्षतेखाली मरारविम, संस्थान व नगरपंचायत यांचे पदाधिकाऱ्यांची / अधिकाऱ्यांची बैठक मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. मा. मुख्य अभियंता श्री. सुभाष नागे यांनी या बैठकीत शिर्डी शहर एकात्मिक रस्ते विकास योजनेबरोबरच शिर्डी विकास आराखडयातील आरक्षित हरित पट्टयांचा विकास, पार्किंगच्या जागेचा विकास, पार्किंगच्या जागेपासून मंदिरापर्यन्त ये-जा करण्यासाठी पर्यायी व्यवस्था व सुविधा निर्माण करणे इत्यादी कामे लवकरात लवकर हाती घेणे गरजेचे असल्याचे निदर्शनास आणून दिले. यावर मा.आ.श्री. जयंतराव ससाणे, अध्यक्ष यांनी, शिर्डी विकास आराखडयातील हरितपट्टा व पार्किंग जागा विकसित करण्याबाबत सदरहू जागा खाजगी असून त्याचे भूसंपादनासाठी मोठा खर्च अपेक्षित आहे. सदर जागेच्या विकासाची कामे जर मरारविम करणार असेल तर त्यासाठी निधी देणेबाबत संस्थान विचार करेल, असे सांगितले होते.

तद्नंतर दिनांक १६ डिसेंबर, २००७ रोजी मा. ना. श्री. अनिल देशमुख, सार्वजनिक बांधकाम मंत्री, (सार्वजनिक उपक्रम) यांचे अध्यक्षतेखाली शिर्डी येथे शिर्डी शहर एकात्मिक रस्ते विकास योजनेबाबत करणेत येणाऱ्या कार्यवाहीचा आढावा घेणेसाठी बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत ही शिर्डी येथील वाहतुक व गर्दीचे नियोजन करणेबाबत प्रकल्प सल्लागार नेमणेबाबत चर्चा करण्यात आलेली होती.

या कार्यवाही व्यतिरिक्त, मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचेकडेस शिर्डी शहर एकात्मिक रस्ते विकास योजनेबाबत दिनांक ०९ ऑक्टोबर, २००७ व दिनांक ०२ जुलै, २००८ रोजी बैठकींचे आयोजन करण्यात आलेले होते. याबैठकींमध्ये मरारविम, मुंबई यांचेमार्फत मुख्य अभियंता श्री. सुभाष नागे यांनी शिर्डी येथील वाहतुकीचे व गर्दीचे नियोजन करण्यासाठी करावयाचे विकसित कामांचे संगणकीय सादरीकरण केले होते. यावर मा.मुख्यमंत्री यांनी ही याबाबत अभ्यासपूर्ण प्रस्ताव सादर करावा, अशा सूचना दिलेल्या आहेत.

**(ब)** उपरोक्त परिच्छेदात विवेचन केल्यानुसार, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मुंबई / पुणे यांनी दिनांक ११ ऑक्टोबर, २००७ व नंतरच्या विविध पत्रान्वये, शिर्डी येथील वाहतुकीचे व गर्दीचे नियोजन करणे, इतर मनोरंजनात्मक सुविधा उपलब्ध करुन देणे आदि बाबींबाबत सविस्तर सर्व्हेक्षण करुन, या विकास कामांबाबत आर्थिक बाबीसह सर्वंकष प्रकल्प अहवाल तयार करणेसाठी सल्लागार संस्था नेमणेसाठी संस्थान मार्फत रक्कम रुपये ०१ कोटी मात्र निधी उपलब्ध करुन देणेबाबत विनंती केलेली आहे.

थोडक्यात, मरारविम यांनी त्यांचे माध्यमातून शिर्डी शहरातील वाहतुकीचे व गर्दीचे नियोजन करणेसाठी करावयाचे उपाययोजनेचा प्रकल्प अहवाल तयार करणेसाठी सल्लागार संस्था नेमणेस व तयार

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



होणारे प्रकल्प अहवालानुसार पूर्व-निविदा कामासाठी रक्कम रुपये ०१ कोटी मात्र निधी उपलब्ध करुन देणेबाबतचा प्रस्ताव संस्थानकडे सादर केलेला आहे.

**(क)** संस्थानकडे सध्या ज्या मोकळया जमिनी उपलब्ध आहेत व ज्या मोकळया जमिनी भूसंपादन अथवा खरेदीव्दारे नजीकच्या भविष्यात उपलब्ध होणार आहेत. त्यांचा सुनियोजित स्वरुपात विकास होणे आवश्यक आहे. असा विकास करतांना फक्त एकाच प्रकल्पाचा विचार करण्याऐवजी साईभक्त, संस्थान व स्थानिक प्राधिकरण यांच्या गरजांचा एकत्रित विचार करुन सर्वांगिण असा बृहत् विकास आराखडा (Integrated Master Plan) तयार करणे गरजेचे आहे. ही आवश्यकता विचारात घेऊन CRISIL या संस्थेकडून प्राप्त झालेला Preparation of Concept Plan for Development of Surplus Land, Revenue Improvement Strategy and Preparation of Concept Plan to promote Shirdi as Spiritual Tourist Centre अशा विषयाचा प्रस्ताव दिनांक २४ मे, २००८ रोजी झालेल्या मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे सादर करणेत आला होता. त्यावर सदरहु सभेत सविस्तर चर्चा होऊन निर्णय क्रमांक ४४४ अन्वये शिर्डीस येणाऱ्या भक्तांना (पर्यटनाच्या) अधिकाधिक सोयी कशा देता येतील, याबाबत अधिक माहिती घेऊन, सविस्तर प्रस्ताव व्यवस्थापन समितीचे सभेपुढे यथावकाश निर्णयार्थ सादर करावा, असे ठरले आहे.

**(ड)** दिनांक २४ मे, २००८ रोजी झालेल्या मा. व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय क्रमांक ४३० अन्वये शिर्डी व शिर्डी परिसरातील क्षेत्राचा विकास आराखडा तयार करणेसाठी मान्यता देणेत आली आहे. तसेच मा. ना. श्री. विलासराव देशमुख, मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी त्यांचे दालनात दिनांक ०२ जुलै, २००८ रोजी झालेल्या बैठकीत, शिर्डी पासून साधारणतः ०५ किलोमीटर परिसरातील गावांचा समावेश असलेला विकास आराखडा तयार करावा, असे सुचित केले आहे. त्यानुसार शिर्डीसह परिसरातील एकूण १२ गावांचे क्षेत्रासाठी प्राधिकरणाची स्थापना करणेकामी शासनाकडे सादर करणेकामी प्रस्ताव तयार करणेत येत आहे.

**(इ)** वरीलप्रमाणे शिर्डी येथील गर्दी व वाहतुकीचे नियोजन करणे व त्यासाठी बगिचा, वाहनतळ इत्यादी पायाभूत सुविधा उभारणेचा प्रकल्प बांधा-वापरा-हस्तांतरीत करा (BOT) तत्वावर उभारणेकामी त्याची आर्थिक व्यवहार्यता तपासणेसाठी अभ्यास व सर्व्हेक्षण करणे, प्रकल्प अहवाल तयार करणे, याकरीता सल्लागाराची नेमणूक करणे व त्यानंतर निविदांबाबतची कार्यवाही करणे याकामांसाठी अनुक्रमे रुपये २०.०० लक्ष व रुपये ८०.०० लक्ष असा एकूण रुपये १.०० कोटी मात्र खर्च अपेक्षित आहे. ही रक्कम संस्थानतर्फे डिमांड ड्राफ्टव्दारे आदा करावी, अशी विनंती रस्ते विकास महामंडळाने केली आहे. तसेच सदरहू प्रकल्प बांधा-वापरा-हस्तांतर करा या तत्वावर करणे व्यवहार्य नसलेस त्याचा संपूर्ण खर्च श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेतर्फे करणेची तयारी असलेबाबत हमी देणेत यावी, असे रस्ते विकास महामंडळ यांनी कळविले आहे.

वरीलप्रमाणे चालू असलेल्या वेगवेगळया प्रस्तावांबाबत एकत्रित विचार करुन त्यांचेमध्ये सुसुत्रता आणणेकामी प्रत्येक प्रस्तावातील उद्दीष्टये व कामाचा वाव ठरविणे आवश्यक आहे, की जेणेकरुन यातील प्रत्येक प्रस्तावासाठी वेगवेगळी स्वतंत्र अशी कार्यकक्षा निश्चित होऊन उद्दीष्टये व कार्ये यांची पुनरुक्ती होणार नाही.

वरीलप्रमाणे महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांना रुपये ०१.०० कोटी मात्र इतका निधी आदा करावयाचा झाल्यास श्री साईबाबा सस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम,२००४ चे कलम २१ (२) (२) अन्वये राज्य शासनाची पूर्वमान्यता घेणे आवश्यक आहे.

उपरोक्त सर्व बाबींचा विचार करुन, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांचे माध्यमातून शिर्डी येथील वाहतुक व गर्दीचे नियोजन करणेसाठी सर्वंकष प्रकल्प अहवाल तयार करणेसाठी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाची नियुक्ती करणेबाबत व त्यांना या कामासाठी रक्कम रुपये ०१ कोटी मात्र इतका निधी उपलब्ध करुन देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, तो स्थगित ठेवण्यात यावा असे ठरले.

याचवेळी शिर्डी येथे रस्त्यावर मोठ्या प्रमाणावर गर्दी असल्याने वाहतूकीची कोंडी होते याकरीता संस्थानमार्फत ठिकठिकाणी ट्रॅफिक सिग्नल बसविण्यात यावे असे ठरले.

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख/ विद्युत विभाग प्रमुख)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.१२** **मौजे निमगाव कोऱ्हाळे ता.राहाता येथील गोदावरी उजवा तट कालवा चारी क्र.११ वरुन रस्ता विकसित करणेबाबत.**

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



**निर्णय क्र.७६९** **(अ)** मौजे निमगांव कोऱ्हाळे, तालुका राहाता येथील महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाची ४५ हेक्टर ६४ आर जमीन श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डीला भूसंपादनाने मिळालेली आहे. सदरील जमिनी या गोदावरी उजवा तट कालव्याच्या चारी क्रमांक ११ च्या दोन्ही बाजूस विखुरलेल्या आहेत. सदर जमिनींकडे जाणेसाठी प्रशस्त व सोयीचा रस्ता नाही. सध्या फक्त ३ ते ३.५ मीटर रुंदीचा रस्ता उपलब्ध आहे. सदर परिसरातील गट नंबर १७२ मध्ये शिर्डी साई ट्रस्ट, चेन्नई यांचे आर्थिक देणगीतून उभारण्यांत येणाऱ्या साई आश्रम प्रकल्प - भाग २ चे बांधकाम प्रगतीपथावर आहे. सदरहू साई आश्रम प्रकल्प - भाग २ मध्ये साधारणतः ४००० साईभक्तांची निवासव्यवस्था होणार आहे. गट नंबर १९८, १९९, २०० व २०१ मधील सुमारे २० एकर जमिनीत साई गार्डन प्रकल्प प्रस्तावीत आहे. गट नंबर १८३ मध्ये बहुउद्देशीय हॉल, गट नंबर १८६ मध्ये साईभक्तांचे देणगीतून निवासस्थान इमारती बांधणे असे प्रकल्प प्रस्तावित आहेत. तसेच गट नंबर १९५ मध्ये संस्थानने हेलिपोर्ट बांधलेले आहे. सध्या सदरहू हेलिपोर्टचा वापर श्री साई दर्शनासाठी येणारे महत्वाच्या / अतिमहत्वाच्या व्यक्तीचे हेलिकॉप्टर उतरविण्यासाठी तसेच या ठिकाणी इतर साईभक्तांकरीता हेलिकॉप्टर उतरविणेसाठी मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेने परवानगी देण्यांत येत आहे.

विषयांकित चारी क्रमांक ११ चे लगत लोकवस्ती (झोपडपट्टी) असल्यामुळे चारीमध्ये नेहमी घाण, प्लॅस्टिक, कचरा मोठया प्रमाणात जमा होतो, प्रातःर्विधीसाठी ही चारीचा वापर मोठया प्रमाणात केला जातो. त्यामुळे आरोग्याचे दृष्टीने हानीकारक परिस्थिती निर्माण झालेली आहे. चारीमधून ज्यावेळी पाटपाण्याचे आवर्तन सुटते त्यावेळी सदर समस्या अधिक गंभीर होते.

**(ब)** उपरोक्त विवेचनास अनुसरुन, मौजे निमगांव कोऱ्हाळे शिवारात उपरोक्त संस्थान जमिनीलगत असलेल्या चारी क्रमांक ११ वरुन अहमदनगर-मनमाड राज्यमार्ग ते कालवा हेडपर्यन्त सुमारे २ किमी लांबीमध्ये चारीसह १२ मीटरपेक्षा जास्त रुंदीचा रस्ता विकसित करता येईल, तसेच चारी क्रमांक ११ पाईप टाकून बंदिस्त करता येईल. सदरचा रस्ता संस्थानमार्फत विकसित करणेसाठी रस्त्याची जमीन सिंचन विभागाकडून भाडेपट्टयाने घ्यावी लागेल. उपरोक्त विषयाबाबत मा. ना. डॉ. सुनिल देशमुख, जलसंपदा राज्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी दिनांक १५ सप्टेंबर, २००८ रोजीचे शिर्डी भेटीत मा. अध्यक्षसाो. व मा. उपाध्यक्षसाो. यांचेशी चर्चा केली. यावेळेस मा.अध्यक्षसाो. यांनी मा. मंत्री महोदयांना असे सांगितले की, सदरहू रस्ता संस्थान मार्फत विकसित करुन देता येईल. रस्ता विकसित झालेनंतर रस्त्याचा वापर साईभक्तांबरोबरच स्थानिक रहिवाशी, या परिसरातील शेतकरी तसेच सिंचन विभागासही करता येणार आहे. सदरहू रस्ता संस्थान स्वःखर्चाने विकसित करुन देणार असल्याने, या जागेचा भाडेपट्टा संस्थानकडून आकारु नये, घेऊ नये. तथापि संस्थानच्या निधीतून विकसित करणेस मान्यता द्यावी, अशी विनंती केली.

यावर मा.मंत्री महोदयांनी, याबाबत सकारात्मक विचार करुन, संस्थानमार्फत रस्ता विकसित करणेस मान्यता देणेकामी आवश्यक ते सहकार्य जरुर करु, असे सांगितले.

(क) उपरोक्त परिच्छेदांत नमूद केल्यानुसार, मौजे निमगांव कोऱ्हाळे शिवारातील गोदावरी उजवा तट कालवा चारी क्रमांक ११ (अहमदनगर-मनमाड राज्यमार्ग ते कालवा हेडपर्यन्त अंदाजे २ किमी) पाईप टाकून बंदीस्त करणेस व त्यावरुन १२ मीटर रुंदीचा अथवा जास्तीत जास्त उपलब्ध रुंदीचा रस्ता संस्थान निधीतून विकसित करणेस व त्याकामी विहीत पध्दतीने कार्यवाही करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.१३** **स.नं.१४८ मधील द्वारावती भक्तनिवास इमारत बांधकाम ठेकेदार मे.गोलानी बिल्डर्स,मुंबई यांचे मुदतवाढ मिळणेचे पत्राबाबत.**

**निर्णय क्र.७७०** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे स.नं.१४८ मधील जागेत व्दारावती भक्तनिवास इमारतीचे बांधकाम प्रगतीपथावर असुन तळमजला (पार्कींग)अधिक तिन मजले व ४ था मजला बांधकाम करणे सह रस्ता कॉक्रीटीकरण करणे कामाचा थोडक्यात तपशील खालीलप्रमाणे :

| **कामाचे नांव** | तळमजला (पार्कींग)अधिक तिन मजले बांधकाम | ४ था मजला बांधकाम व रस्ता कॉक्रीटीकरण करणे. |
|---|---|---|
| आर्किटेक्ट | आर्किटेक्ट मे.काबरे- चौधरी, नाशिक. | आर्किटेक्ट मे.काबरे- चौधरी, नाशिक. |
| बांधकाम ठेकेदार | मे. गोलानी बिल्डर्स, मुंबई | मे. गोलानी बिल्डर्स, मुंबई |
| मंजूर निविदा रक्कम | रु.११,६२,३५,२२६.७३ | रू. ६,४५,७७,५३१.०० |
| कार्यादेश क्रमांक | जा.क्र.एसएसएस/वशी/बांध/२०२६/०६,<br>दि.१३ फेब्रु.,२००६. | जा.नं.SSST-WS-CONST-१८३५/२००८<br>दि.३०/०१/२००८ |
| कामाची मुदत | १८ महिने ( दिनांक २९ सप्टेंबर, २००७ अखेर). | ०७ महिने ( दिनांक १४ सप्टेंबर,२००८ अखेर). |
| मंजूर मुदतवाढ | २८/१२/२००७ (पूर्वीचे निविदेनुसार बांधकामासाठी) | -- |
| | २८/०४/२००८ (४थ्या मजल्याचे बांधकामा सह) | -- |

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



| | | |
|---|---|---|
| कामाची सद्यःस्थिती | वाढीव मुदतीत खोल्यांचे काम पूर्ण.<br>४था माळा बांधकामामुळे प्रलंबित असणा-या ३रा माळा रंगकाम-अंतिम कोट, टेरेस वॉटर प्रुफींग, पाणी पुरवठा-टेरेस पाईपलाईनचे काम प्रगतीपथावर. पॉलीकार्बोनेट डोम, इलेक्ट्रीकल केबल्स, पॅनेल्स, सोलर वॉटर हिटींग सिस्टीम, लिफ्टचे काम अद्याप सुरु केलेले नाही. रुम हॅंडओव्हरसाठी-१५० खोल्यांची तपासणी पूर्ण. | ०१. बांधकाम ९५ %पूर्ण.<br>जिप्सम प्लॅस्टर, टेरेस व टॉयलेट वॉटरप्रुफींग, एक्सटर्नल प्लॅस्टर इ. कामे प्रगतीपथावर.<br>०२. रस्ता- ड्रेनेज व सोलींग पूर्ण. |

ठेकेदार यांनी दि.१४.०९.२००८ चे पत्रान्वये तळमजला (पार्कींग)अधिक तिन मजले बांधकाम अंतिम टप्प्यात असतांना प्रस्तावीत ४ था मजला बांधकाम करणे व रस्ता कॉक्रीटीकरण करणेचे काम सुरु झाल्यामुळे खालील कामे वाढीव मुदतीत पूर्ण करताआली नाहीत. त्यामुळे व्दारावती भक्तनिवास इमारतीचे तळमजला (पार्कींग)अधिक तिन मजल्यांचे खोल्यांचे काम पूर्ण असूनही खालील कारणांमुळे बांधकाम वाढीव मुदतीत पूर्ण करणे शक्य होत नाही, त्यामुळे सदर काम पूर्ण करणेसाठी ६ महिने मुदतवाढ मिळावी अशी विनंती केली आहे.

अ) १. प्रस्तावीत ४ था मजला बांधकाम करणे व रस्ता कॉक्रीटीकरण करणे कामांमुळे खालील कामे सुरू करता आली नाहीत.

i) ३ रा माळा रंगकाम
ii) लिफ्ट बसविणे
iii) सोलर वॉटरहिटींग सिस्टीम बसविणे
iv) पाणी पुरवठा व ड्रेनेज कनेक्शन्स पूर्ण करून कार्यान्वित करणे
v) ओव्हरहेड पाण्याची टाकी-कनेक्शन्स पूर्ण करून कार्यान्वित करणे
vi) इतर अनुषंगिक कामे

२. लिफ्ट बसविणे -४थ्या मजल्यासाठी वाढीव लिफ्टव्यवस्था करावी लागणार असल्याने ४ थ्या मजल्याचे मंजूर आराखडे नगरपंचायतीकडून मिळणेकामी वेळ गेला.

ब) ४ था मजला बांधकाम करणे व रस्ता कॉक्रीटीकरण करणेकामाची मुदतही १४/०९/२००८ रोजी संपलेली असल्याने सदरचे कामही खालील कारणांमुळे मुदतीत पूर्ण होत नसले बाबत दि.१८/०९/२००८चे पत्रान्वये कळविले आहे.

०१) भाववाढीमुळे स्टील खरेदीकामातील विलंब -बाजारातील स्टीलचे दर सारखे वाढत असल्याने सप्लायर्स ऑर्डर्स लवकर स्वीकारत नाहीत व डिलीव्हरीचे वेळेस असलेल्या भावानुसार बील आकारतात.त्यामुळे स्टील खरेदीस विलंब लागतो.

०२) ३-या मजल्यावरील वाढीव कामे- कॉलमची नॉन डिस्ट्रक्टीव्ह टेस्ट, स्टील लॅपींगसाठी जूने कॉंक्रीट तोडणे इ.

०३) काही अडचणीमुळे कुशल व अकुशल मजूर मोठया प्रमाणावर उपलब्ध होत नाहीत.

०४) रस्ता कामातील अडचणी -रस्ता वर्दळीचा असल्याने कामाची गती राखता आली नाही.

०५) भारनियमनामुळे खडी व इ.बांधकाम साहित्याची टंचाई असल्याने सदर साहित्य मोठया प्रमाणावर उपलब्ध होत नाहीत.

०६) बांधकाम साहित्याची असामान्य भाववाढ झाल्याने अर्थिक टंचाईमुळे कामाची गती राखता आली नाही.

०७) अर्थिक टंचाई : अर्थिक टंचाईमुळे कामाची गती राखता आली नाही.

या कामांबाबत आर्कीटेक्ट काबरे चौधरी, नाशिक यांनी दि.२४.०९.२००८ चे पत्रान्वये खालीलप्रमाणे अभिप्राय दिलेले आहेत.

"४ था मजला बांधकामावर अवलंबून असणा-या काही बाबी प्रलंबित ठेवाव्या लागल्या, त्यामुळे तळमजला (पार्कींग)अधिक तिन मजल्यांचे कामास ४थ्या मजल्यांचे कामास लागणा-या मुदतीपर्यंत मुदतवाढ देण्यात यावी तसेंच बाजारातील परिस्थिती, कुशल व अकुशल मजूरांची कमतरता विचारात घेता ठेकेदार यांना त्यांचे मागणीप्रमाणे ६ महिने मुदतवाढ न देता ३ महिने मुदतवाढ देण्यात यावी अशी शिफारस केली आहे."

उपरोक्त प्रमाणे ठेकेदार यांचे विनंतीवरून व आर्कीटेक्ट यांचा अभिप्राय विचारात घेता ठेकेदार यांना तळमजला (पार्कींग)अधिक तिन मजले बांधकाम व ४ था मजला बांधकाम करणे व रस्ता कॉक्रीटीकरण करणे या दोन्ही कामांसाठी तिन महिने (१४/१२/२००८ अखेर) मुदतवाढ देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन,मे.गोलानी बिल्डर्स,मुंबई यांना माहे डिसेंबर,२००८ अखेर मुदतवाढ देणेत यावी. तसेच ठेकेदार यांना त्यांचे मागणीनुसार लिफ्ट बसविणेकामी ॲडव्हान्स पेमेंट देणेत यावे. याकरिता विद्युत विभाग प्रमुख यांनी योग्य ती कार्यवाही करावी.

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख/ विद्युत विभाग प्रमुख)

**आयत्या वेळेचा**

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



**विषय नं.१४** **शिर्डी साई ट्रस्ट,चेन्नई (तामीळनाडू) यांनी चेन्नई येथे संस्थानचे माहिती सुविधा केंद्र सुरु करणेसाठी देऊ केलैल्या जागेसाठी नाममात्र भाडे रु.१००/- भरणेबाबत.**

**निर्णय क्र.७७१** **(अ)** शिर्डी साई ट्रस्ट, चेन्नईचे कार्यकारी विश्वस्त श्री. के.व्ही. रमणी यांनी चेन्नई (तामिळनाडू) येथे संस्थानचे माहिती सुविधा केंद्र सुरु करणेसाठी देऊ केलेल्या अंदाजे ८५० चौरस फुट जागेबाबत मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक ०७ जुलै, २००८ रोजीचे सभेत निर्णय क्रमांक ५७७ मात्र खालीलप्रमाणे झालेला आहे :

". .. कार्यकारी विश्वस्त, शिर्डी साई ट्रस्ट, चेन्नई यांनी देऊ केलेली चेन्नई येथील अंदाजे ८५० स्क्वेअर फुट जागा संस्थानचे माहिती व सुविधा केंद्र सुरु करणेसाठी सुरुवातीस १० वर्षाचे कालावधीसाठी स्वीकारणेबाबत, याकामी करावयाच्या कायदेशीर बाबींच्या पुर्ततेसाठी येणाऱ्या योग्य त्या सर्वसमावेशक खर्चास मान्यता मिळणेसाठी आणि सदरहू जागा स्वीकारणेबाबत निर्णय झाल्यास याकामी करावयाचा करारनामा चेन्नई येथे करणे आवश्यक असल्याने त्यासाठी मा.कार्यकारी अधिकारी यांना प्राधिकृत करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा. कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. "

शिडी साई ट्रस्ट, चेन्नई यांनी त्यांचेकडील दिनांक ०९ जून, २००८ रोजीचे मूळ प्रस्तावात, समझ ोत्याचा करारनामा होईल त्या दिवसापासून १० वर्षाच्या कालावधीसाठी संस्थानला उपलब्ध करुन देण्यात येणाऱ्या जागेस कोणत्याही प्रकारे भाडे अथवा भाडयापोटी अनामत रक्कम द्यावी लागणार नाही, असे नमूद केलेले होते.

त्यास अनुसरुन व उपरोक्त मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार, सदरहू जागेचा करारनामा करणेसाठी प्रारुप मसुदा शिर्डी साई ट्रस्ट, चेन्नई यांना ०२ सप्टेंबर, २००८ रोजी पाठविणेत आलेला होता.

**(ब)** शिर्डी साई ट्रस्ट, चेन्नई यांनी त्यांना पाठविणेत आलेल्या करारनाम्याचा प्रारुप मसुदा तपासून व काही आवश्यक बदल करुन दिनांक १९ सप्टेंबर, २००८ रोजी संस्थानचे मान्यतेस्तव इकडील कार्यालयास ई-मेल व्दारे पाठविलेला आहे.

तसेच शिर्डी साई ट्रस्ट, चेन्नई चे कार्यकारी विश्वस्त श्री. के.व्ही. रमणी यांनी दिनांक १९ सप्टेंबर, २००८ रोजी ई-मेलव्दारे पाठविलेल्या पत्रात असे नमूद केले आहे की, सदरहू करारनामा नोंदणीकृत करणेसाठी, सदरहू करारनाम्यात नाममात्र किंमत समाविष्ट करणे आवश्यक आहे. त्याकरीता सदरहू जागेसाठी नाममात्र दरमहा रुपये १००/- मात्र (अक्षरी रुपये शंभर मात्र) आकारण्यांत येईल व तसा बदल करारनाम्याच्या प्रारुप मसुद्यात करण्यांत आलेला आहे. सदरहू बदल करणेस मान्यता असावी, अशी ही विनंती त्यांनी केलेली आहे.

तसेच शिर्डी साई ट्रस्ट, चेन्नई यांनी पाठविलेला करारनाम्याचा प्रारुप मसुदा संस्थान वकील ॲड. जे. के. गोंदकर यांनी दिनांक ०३ ऑक्टोबर, २००८ रोजी तपासून दिलेला असून, तो बरोबर असलेबाबत व सदरहू करारनाम्याची नोंदणी चेन्नई येथे करणे जरुरीचे आहे, असा अभिप्राय दिलेला आहे.

**(क)** उपरोक्त परिच्छेदात विवेचन केल्यानुसार, शिर्डी साई ट्रस्ट, चेन्नई हे संस्थानचे माहिती व सुविधा केंद्र चेन्नई येथे सुरु करणेसाठी उपलब्ध करुन देत असलेल्या अंदाजे ८५० चौरस फुट जागेस दरमहा नाममात्र भाडे रुपये १००/- (अक्षरी रुपये शंभर मात्र) भरणेस व त्यानुसार योग्य तो भाडेपट्टा करारनामा करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१५** **स.नं. १६४ मधील दक्षिणोत्तर रस्ता श्रीसाईबाबा संस्थानमार्फत विकसीत करणेबाबत.**

**निर्णय क्र.७७२** मौजे शिर्डी येथील सर्व्हे क्रमांक १६४ मधील दक्षिणोत्तर रस्ता हा शिर्डी नगरपंचायत हद्दीतील श्री. किशोर भाऊसाहेब गोंदकर यांचे क्षेत्रामध्ये असून तो नियोजित प्रसादालयाकडे जाणेसाठी विकसित करणेबाबत दिनांक ०६ सप्टेंबर, २००८ रोजीचे सभेत खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे :

". .. आजचे सभेत मा. विश्वस्त श्रीमती उर्मिला जाधव यांनी असे सांगितले की, नवीन श्री साई प्रसादालय इमारतीकडे जाणे-येणेकामी भक्तांना पर्यायी व जवळचा रस्ता उपलब्ध व्हावा म्हणून सर्व्हे नंबर १६४ पैकी मधील जमिनीतून दक्षिणोत्तर ०९ मीटरचा रस्ता देणेस जमीनमालक श्री. किशोर भाऊसाहेब गोंदकर तयार आहेत. याबाबत त्यांनी संबंधीत जमीनमालकाशी चर्चा केलेली आहे. यावर असे ठरले की, संबंधीत जमीनमालक विनामुल्य रस्ता देणेस तयार असतील तर त्यांचे जमिनीतून रस्ता विकसित करणेकामी कायदेशीर बाबी तपासून कार्यवाही करण्यात यावी. "

उपरोक्त निर्णयांस अनुसरुन, मा. व्यवस्थापन समितीच्या दिनांक १८ ऑक्टोबर, २००८ रोजीचे होणारे सभेत जमीनमालक श्री. किशोर भाऊसाहेब गोंदकर यांना बोलावून त्यांचेशी खालील बाबींवर चर्चा करणे आवश्यक राहिल :

०१. सदरचा प्रस्तावित रस्ता हा श्री. किशोर भाऊसाहेब गोंदकर व इतर १ यांनी शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांचेकडे सादर केलेल्या रेखांकनातील असून, तो ०९ मीटर x १२५ मीटर आहे. सदरहू रेखांकन

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांचेकडील पत्र क्रमांक बांध/कावि-५/११३९/२००५, दिनांक ०८ डिसेंबर, २००५ अन्वये मंजुरीस्तव सादर केलेले आहे. सदरहू रेखांकनात दर्शविल्यानुसार, जमीनमालक श्री. गोंदकर हे ०९ मीटर रुंदीच्या रस्त्याचे क्षेत्र संस्थानला विनामुल्य देणार किंवा कसे ?

०२. सदर रस्ता संस्थानने विकसित केल्यानंतर सार्वजनिक वापरासाठी वापरण्यांत येईल, यास जमीनमालकाची संमती राहिल किंवा कसे ?

०३. सदर नियोजित रस्त्याखालील जागा ही विनामुल्य व विनाअट संस्थानचे नांवावर करुन देणेसाठी आवश्यक ती सर्व कायदेशीर पूर्तता करुन देण्यांस, तसेच भविष्यात संस्थानला काही तोशिष लागणार नाही याची हमी देण्यांस जमीनमालक तयार आहेत काय ?

उपरोक्त बाबींवर चर्चा करणेकामी जमीनमालक श्री. किशोर भाऊसाहेब गोंदकर यांना आजचे सभेपुढे चर्चा करणेसाठी बोलविण्यांत आले होते. त्यांचे प्रतिनिधी श्री रमेश भाऊसाहेब गोंदकर हे उपस्थित होते. त्यांचेशी सभेने चर्चा केली.

शिर्डी येथे श्री साईबाबांचे दर्शनासाठी येणाऱ्या साईभक्तांची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढत आहे. नवीन प्रसादालयाकडे साईभक्तांना प्रसाद भोजन घेणेस जाण्यासाठी रस्त्याची अत्यंत आवश्यकता असल्याने सदर रस्ता विकसित करणे आवश्यक आहे. प्रसादालयात जाणेसाठी सध्या एकच रस्ता असल्याने सदरचा रस्ता जादा पर्यायी रस्ता तातडीने उपलब्ध व्हावा म्हणून पहिल्या टप्प्यात WBM करुन सीडी वर्कसह सदरहू रस्ता त्वरीत विकसीत करणेत यावा. याबाबत जमिनमालकांकडून योग्य तो करारनामा करुन घेण्यात यावा,असे ठरले. (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१६** **द्वारावती या निवासस्थान इमारतीकरिता खरेदी करण्यात येणाऱ्या सिंगल बेडसाठी रबराईज्ड कॉयर मॅट्रेसेस (गाद्या) खरेदी करणेबाबत.**

**निर्णय क्र.७७३** **(अ)** मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक १७ ऑगष्ट, २००८ रोजीचे उपसमितीने केलेल्या शिफारशीस अनुसरुन, दिनांक ०६ सप्टेंबर, २००८ रोजीचे सभेत व्दारावती इमारतीसाठी एम. एस. स्ट्रक्चरचे फर्निचर व इतर फर्निचर / साहित्य खरेदी करणेसाठी आर्किटेक्ट यांचेकडून फर्निचरचे सविस्तर स्पेसिफिकेशन तयार करुन गोदरेज व खिरा या नामांकित कंपन्यांकडून दरपत्रके मागवावित व उर्वरित काऊंटर व तत्सम इतर फर्निचरसाठी स्वतंत्र निविदा मागविण्यात याव्यात, असा निर्णय झालेला होता.

त्यानुसार गोदरेज व खिरा या उत्पादक कंपन्यांकडून व्दारावती इमारतीसाठी १२६४ नग सिंगल बेडस् खरेदी करणेकामी सिलबंद दरपत्रके मागविण्यांत आलेली आहेत. सदरहू सिलबंद दरपत्रके मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक १८ ऑक्टोबर, २००८ रोजीचे सभेपुढे उघडणेकामी आणि संबंधीत कंपन्यांच्या प्रतिनिधींशी चर्चा-तथा-वाटाघाटी करुन अंतिम निर्णय घेणेकामी सादर करण्यांत आलेल्या आहेत.

**(ब)** वर नमूद केल्याप्रमाणे, खरेदी करण्यांत येणाऱ्या सिंगल बेडस्साठी कापशांच्या गादीऐवजी टिकाऊ व उत्कृष्ठ प्रतिच्या रबराईज्ड क्वॉयर मॅट्रेसेस योग्य राहतील, असे मत आहे. सध्या बाजारात करलॉन, गोदरेज, स्पीलवेल, सेंच्युरी अशा नामांकित कंपन्यांच्या रबराईज्ड क्वॉयर मॅट्रेसेस उपलब्ध आहेत. या कंपन्यांपैकी गोदरेज ॲण्ड बॉयज् मॅन्यु. कंपनी लि., मुंबई / पुणे या कंपनीचे मॅट्रेसेस विभागाचे प्रतिनिधींनी दिनांक १४ ऑक्टोबर, २००८ रोजी शिर्डी येथे समक्ष भेट देऊन त्यांच्या कंपनीतर्फे उत्पादीत केलेल्या जाणाऱ्या विविध प्रकारच्या रबराईज्ड क्वॉयर मॅट्रेसेस बाबत माहिती दिली. त्यांनी ही संस्थानमध्ये गाद्यांचा दैनंदिन असलेला वापर, त्याचा टिकाऊपणा व भक्तांना विश्रांतीच्या दृष्टीने रबराईज्ड क्वॉयर मॅट्रेसेस योग्य राहतील, असे सांगितले. गोदरेज कंपनीच्या प्रतिनिधीने सुचविल्याप्रमाणे व्दारावती इमारतीसाठी चांगल्या प्रतीच्या १२६४ नग रबराईज्ड क्वॉयर मॅट्रेसेस खरेदीसाठी अंदाजित रक्कम रुपये ६५ लाख पर्यन्त खर्च येईल.

**(क)** उपरोक्त परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे, रबराईज्ड क्वॉयर मॅट्रेसेस खरेदी करणेकामी गोदरेज कंपनी बरोबरच बाजारात उपलब्ध असलेल्या करलॉन, स्लीपवेल, सेंच्युरी या नामांकित उत्पादक कंपन्यांची दरपत्रके मागविता येतील. याबाबत मा. व्यवस्थापन समितीची तत्वत: मान्यता मिळालेस विहीत पध्दतीने संबंधीत उत्पादक कंपन्यांकडून दरपत्रके मागवुन रबराईज्ड क्वॉयर मॅट्रसेस खरेदी करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, करलॉन, स्लीपवेल, सेंच्युरी,रिलॅक्सवेल इ.नामांकित उत्पादक कंपन्यांकडून दरपत्रके मागविणेस मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**<u>दिनांक १८.१०.२००८ रोजी झालेल्या व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णयाची कामापूरती नक्क्ल-</u>**

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१७** **श्रीपुण्यतिथी उत्सवाकरिता निलकमल कंपनीचे प्लॅस्टीक क्रेटस् व संस्थानचे कार्यक्रमासाठी शुटींग व फोटो कॅमेरा खरेदीबाबत.**

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



**निर्णय क्र.७७४** अ)कॅन्टीन विभागामार्फत श्री साईभक्तांना मोतीचूर प्रसादलाडू पाकिटांची विक्री करणेत येते. प्रसादालय विभागात तयार झालेले लाडू क्रेटस मध्ये ठेवणे, प्रसादलाडू पाकिटे विक्री काऊंटर पर्यंत वाहतूक करणे यासाठी क्रेटसचा वापर करणेत येतो. सध्या प्रसादालय नं.२ इमारतीचे उत्तर बाजूस आठ लाडू विक्री काऊंटर कार्यरत असून, त्याशिवाय गर्दीचे काळात नविन भक्तनिवासस्थान, धर्मशाळा, स्वागतकक्ष, साईउदयान, साईनाथछाया या ठिकाणीही लाडूची विक्री केली जाते. यापूर्वी खरेदी करणेत आलेले १८० क्रेटस वापरात असून, त्यातील बहुतेक क्रेटस नित्याच्या वापराने खराब झालेले आहेत. श्री साईभक्तांची संख्या दिवसेंदिवस वाढतच असून मोतीचूर प्रसादलाडूची मोठया प्रमाणावर मागणी होत असल्याने लाडू पाकिटे वाहतुकीसाठी व साठविणेसाठी क्रेटस अपूरे पडत आहेत. श्री पुण्यतिथी उत्सव दि.०८ ते १०.१०.२००८ असा साजरा होणार असल्याने भक्तांच्या गर्दीचा विचार करुन, कॅन्टीन विभागाने २१"x१४"x१५.५" या साईजचे निलकमल अथवा इतर नामंकित कंपन्याचे १०० नग क्रेटसची तातडीने मागणी केलेली होती.

त्यानुसार, मुंबई व नाशिक येथील निलकमल कंपनीच्या पुरवठाधारकाशी संपर्क साधून दरपत्रके पाठविणेस सांगणेत आलेले होते. प्राप्त दरपत्रकातील न्युनतम दराने मे.निलकमल लिमीटेड, मुंबई यांना जा.नं.१४६०१ दि.०४.१०.२००८ अन्वये रु.१०४७/- प्रती नग (सर्वसमावेशक) या दराने १०० क्रेटसाठी पुरवठा आदेश देणेत आलेला होता, त्यानुसार त्यांनी सर्व क्रेटसचा पुरवठा पुर्ण केलेला आहे.

ब) मा.व्यवस्थापन समिती सभा दि.२०.०१.२००८ मधील निर्णय क्र.१५५ नुसार श्री साईबाबांचे व श्रींचे दर्शनासाठी आलेल्या मान्यवरांचे तसेच उत्सवातील व वर्षभर होणारे कार्यक्रमाचे शुटींग व फोटो काढण्यासाठी आवश्यक असणारे ०१ नग शुटींग कॅमेरा व ०१ नग फोटो कॅमेरा खरेदीस व त्याकामी येणारे रक्कम रु.१,६०,०००/- पर्यंतचे खर्चास मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार मागविणेत आलेल्या दरपत्रकांतील न्युनतम दराने मे.प्रेरणा एंटरप्राईजेस, मुंबई यांना जा.नं.१४५८७ दि.०३.१०.२००८ अन्वये रक्कम रु.१,६५,५००/- चा पुरवठा आदेश देणेत आलेला आहे. त्यामुळे मुळ मंजूरीपेक्षा ५,५००/-जादा खर्च आलेला आहे.

तरी श्री पुण्यतिथी उत्सवासाठी खरेदी केलेल्या १०० नग क्रेटचे खरेदीस व त्यासाठी आलेल्या रक्कम रु.१,०४,७००/-चे खर्चास तसेच उत्सव व संस्थानचे इतर कार्यक्रमामध्ये शुटींग व फोटो काढण्यासाठी आवश्यक असलेले २ कॅमेरे खरेदीसाठी मूळ मंजूरीपेक्षा जादा झालेल्या रक्कम रु.५,५००/-चे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

सत्य प्रत

प्रशासकीय अधिकारी,
श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

(कार्यवाही-अधिक्षक,खरेदी विभाग)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१८** **देणगी पावती व उदी प्रसाद पाकिटासाठी आवश्यक असणारे सफेद विंडो पाकिटे व उदी प्रसाद पाकिटे छपाईबाबत.**

**निर्णय क्र.७७५** अ) प्रशासनशाखेमार्फत देणगीदार भक्तांच्या पावत्या व प्रसाद सफेद विंडो पाकिटामध्ये पाठविल्या जातात. यापूर्वी मध्यवर्ती भांडार विभागामध्ये ३ लाख पाकिटे शिल्लक असल्याने सन २००७-०८ मध्ये २ लाख पावत्या छपाई करुन घेणेत आलेल्या होत्या. मात्र दिवसेंदिवस साईभक्तांच्या देणगीचे प्रमाण वाढत आहे. त्यामुळे छपाई केलेल्या पाकिटे संपत आल्याने प्रशासनशाखेने तातडीने पाकिटाची मागणी केलेली होती. त्यानुसार विहीत पद्धतीने कोटेशन मागविणेत येऊन मे.प्रभात ऑफसेट, येवला यांना रु.३७१/-प्रती हजारी या न्युनतम दराने पुरवठा आदेश देणेत येऊन ६७,००० पाकिटे छपाई करुन घेणेत आलेले होते. मात्र श्री पुण्यतिथी उत्सव जवळ आल्याने, साईभक्तांना पावत्या पाठविणेस अडचण होऊ नये म्हणून मे.प्रभात ऑफसेट, येवला यांचेकडूनच रु.३७१/- प्रती हजारी या मंजूर दराने २ लाख पाकिटासाठी रक्कम रु.७४,२००/- चा पुरवठा आदेश देणेत आलेला आहे.

ब) संस्थानमार्फत साजरे करणेत येणाऱ्या उत्सवानंतर श्री साईभक्तांना प्रसादरुपाने उदीप्रसाद पाठविणेत येते. त्यासाठी संगणक कंटीन्युअस प्रि-प्रिंटेड पाकिटाचा वापर केला जातो. श्रींचा पुण्यतिथी उत्सव दि.०८ ते १०.१०.२००८ असा तिन दिवस साजरा होणार असल्याने श्री साईभक्तांना उदीप्रसाद पाठविणे आवश्यक होते. वार्षिक छपाईची कार्यवाही चालू असून निर्णय होऊन पुरवठा आदेश देणे, पुरवठा होणे यासाठी अंदाजे एक ते दिड महिन्याचा कालावधी लागणार असल्याने संगणक कंटीन्युअस स्टेशनरीच्या पुरवठाधारकांकडून दरपत्रके मागणी करणेत येऊन मे.प्रिमीअर डाटा फॉर्म्स प्रा.लि., मुंबई

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



यांना रु .२,७५०/-प्रती हजारी शीटस या न्युनतम दराने २५,००० शीटस पुरविणेकामी रक्कम रु.६८,७५०/- अधिक व्हॅट चा पुरवठा आदेश देणेत आलेला आहे. तसेच त्यांचेकडील पुरवठा पुर्ण झालेला असून उदीप्रसाद पाकिटे पाठविणेचे काम सुरु झालेले आहे.

तरी श्री साईभक्तांच्या देणगी पावत्यासाठी आवश्यक असणारे २ लाख विंडो पाकिटाचे छपाईस व त्याकामी आलेल्या रक्कम रु.७४,२००/- चे खर्चास तसेच उदीप्रसादासाठी आवश्यक असणारे संगणक कंटीन्युअस प्रि-प्रिंटेड पाकिटे १.५० लाख नग (२५,००० शीटस) चे छपाईकामी आलेल्या रक्कम रु.६८,७५०/- चे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-अधिक्षक,खरेदी विभाग)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.१९** **नविन प्रसादालय येथील प्लबिंग कामाकरिता मटेरियल खरेदी करणेबाबत.**
**निर्णय क्र.७७६** उपरोक्त विषयांन्वये नविन प्रसादालय येथे दिनांक १३-०९-२००८ रोजी मा.विश्वस्त श्रीमती जाधव मॅडम व आर्किटेक्ट श्रीमती पवार मॅडम यांचे झालेल्या राऊंडमध्ये नविन प्रसादालय इमारतीचे पहिल्या माळयावर असलेल्या व्ही.आय.पी प्रसाद भोजन कक्षात जेवणाचे ताटे साफ करण्यासाठी तीन ठिकाणी नळ कनेक्शन व त्याचे आऊटलेट कनेक्शन करून देणेस सांगितले आहे. तसेच प्रसाद भोजन कक्षात असलेल्या ड्रेनेज नाल्या साफ करणेसाठी प्रत्येक नालीवर पाण्याचे कनेक्शन करणेस सांगितले आहे. वरील प्रमाणे कामे करणेसाठी आवश्यक असणारे मटेरियल विभागाकडे शिल्लक नसल्याने ते खरेदी करून काम पुर्ण करावे लागणार आहे.

उपरोक्त कामांकरीता आवश्यक मटेरियलचा तपशिल खालीलप्रमाणे.

| अ.नं | तपशिल | साईज | कंपनी | मागणी | अंदाजे दर | एकुण किंमत |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१. | जी.आय.पाईप. | २" | झेनिथ/प्रकाश सुर्या | १२०० फुट | रु. ७५/- प्रती फुट. | ९०,०००.०० |
| ०२. | जी.आय.पाईप. | १.१/२" | झेनिथ/प्रकाश सुर्या | १२० फुट | रु. ६५/- प्रती फुट. | ७,८००.०० |
| ०३. | जी.आय.सॉकेट. | २" | ISI मार्क. | ५५ नग. | रु. ५५/- प्रती नग. | ३,०२५.०० |
| ०४. | जी.आय. टी | १.१/२"x२" | ISI मार्क. | ०४ नग. | रु. ६५/- प्रती नग. | २६०.०० |
| ०५. | जी.आय.टी. | २"x३/४" | ISI मार्क. | ०४ नग. | रु. ६०/- प्रती नग. | २४०.०० |
| ०६ | जी.आय.सॉकेट | १.१/२" | ISI मार्क. | ०६ नग. | रु. ४०/- प्रती नग. | २४०.०० |
| ०७ | जी.आय.एलबो. | १.१/२" | ISI मार्क. | २० नग. | रु. ४५/- प्रती नग. | ९००.०० |
| ०८. | जी.आय.एलबो. | २" | ISI मार्क. | १२ नग. | रु. ५०/- प्रती नग. | ६००.०० |
| ०९. | SWR पाईप | १०' x ४" | पारस/फिनोलेक्स | १७ नग. | रु. २४०/- प्रती नग. | ४,०८०.०० |
| १०. | SWR प्लग बेंड | ४" | पारस/फिनोलेक्स | ०८ नग. | रु. ५५/- प्रती नग. | ४४०.०० |
| ११. | SWR प्लेन बेंड | ४" | पारस/फिनोलेक्स | ०४ नग. | रु. ६५/- प्रती नग. | २६०.०० |
| | | | | | **एकुण रक्कम -** | **१,०७,८४५.००** |
| | | | | | **वॅट १२.५% -** | **१३४८१.००** |
| | | | | | **एकुण रक्कम -** | **१,२१,३२६.००** |

तरी वरील प्रमाणे मटेरियल खरेदी करणेकरीता अंदाजे रु. १,२१,३२६/- मात्र खर्च अपेक्षित असून सदरचे मटेरियल विहित पध्दतीने कोटेशन मागवून खरेदी करणेस व त्यासाठी येणारे अंदाजे एकूण रुपये १,२१,३२६/- मात्रचे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-पाणीपुरवठा विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.२०** **श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डीसाठी वाढीव पाण्याचे नियोजनाबाबत.**
**निर्णय क्र.७७७** सदरहू विषयाबाबत वर निर्णय क्र.७५४ मध्ये चर्चा झालेली आहे.

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.२१** **सुलभ शौचालयाकरिता पाईपलाईन टाकणेबाबत.**
**निर्णय क्र.७७८** उपरोक्त विषयानुसार साईप्रसाद परिसरात शुलभ शौचालय बांधण्यात आलेले आहे. सुलभ शौचालयाकरीता लागणा-या पाण्याचा पुरवठा हा साईप्रसाद पार्किंग मधील विहीरीवरुन करण्यात येतो. सदरच्या विहीरीचे पाणी कमी पडल्यास साईप्रसाद पंपरुम येथील पाईपलाईन मधून शुध्द पाणी पुरवावे लागते. दिवसेंदिवस पाण्याचा वापर वाढलेला असल्याने पिण्याकरीता पुरविण्यात येणारे पाणी कमी पडत आहे. साईप्रसाद पार्किंगमधील विहीरीच्या पाण्याची पातळी कमी झाली असल्यामुळे सुलभ शौचालयाकरीता पाणी कमी पडत आहे. तेथे पाणी भरपुर प्रमाणात न मिळाल्यास त्या परिसरामध्ये दुर्गंधी व अस्वच्छता पसरते.

यासाठी सुलभ शौचालयाकरीता पुरेसे पाणी पुरवायचे झाल्यास कनकुरी रोडवरील शिर्डी सर्व्हे नं. १६०, १६१ मध्ये असणा-या ओहर हेड टॅंक येथील विहीरीवरुन ५५०० फुट पाईपलाईन टाकून देता येईल. सध्या तेथील विहीरीच्या पाण्याचा वापर हा नविन प्रसादालय बगीचा तसेच शिर्डी नगरपंचायत क्षेत्रातील काही भागांसाठी करण्यात येतो. तरी सदरच्या विहीरीचे पाणी शिल्लक राहत आहे. याकरीता या विहीरीवरील शिल्लक पाण्याचा वापर सुलभ शौचालयाकरीता करता येईल.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



सदरची पाईपलाईन ही नाल्याच्या कडेने नगर-मनमाड रोड क्रॉस करुन रोडच्या पुर्व बाजूने पुढे साईप्रसाद पार्किंग मधून सुलभ शौचालय पर्यंत टाकता येईल. तेथे नगर-मनमाड रोड क्रॉसिंगसाठी जी.आय.पाईप २०० फुट व त्यासंबंधीचे जी.आय.मटेरियल वापरावे लागेल. उर्वरीत पाईपलाईन पी.व्ही.सी. वापरता येईल.

तरी वरील प्रमाणे काम करण्यासाठी बांधकाम विभाग- वरीष्ठ मुख्य अभियंता यांनी एम.जी.पी. चे दराप्रमाणे दिलेले इस्टीमेंट प्रमाणे येणारे एकूण रुपये ३,०८,९४५/- मात्र खर्च अपेक्षित असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-पाणीपुरवठा विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२२** **संस्थान प्रकाशने छपाईसाठी नवीन प्रेसधारकांची नांवे निवडक प्रेसधारकांच्या यादीत समाविष्ठ करुन घेणे बाबत.**

**निर्णय क्र.७७९** मदर्स ग्राफिक्स (इं) प्रा.लि., मुंबई यांचे दि.३०.०९.२००८ चे पत्र. व सकाळ पेपर्स लि., कोल्हापूर यांचे दि.१६.०९.२००८ रोजी दाखल झालेले पत्र. तसेच कॅलेंडर एक्झिबिशन (इं) प्रा.हावरा यांचे दि.१२.०९.२००८ चे पत्र.

यापमाणे ३ प्रेसधारकांनी त्यांचे नाव निवडक प्रेसधारकांचे यादीत समाविष्ट करुन घेणेबाबत पत्रान्वये कळविले आहे. त्यासाठी त्यांनी सदरचे पत्रासोबत त्यांचे प्रेसचे माहितीपत्रकात खालील तपशिलाप्रमाणे माहिती सादर केली आहे.

| अ.नं. | तपशिल | मदर्स ग्राफिक्स (इं) प्रा.लि., मुंबई १ | सकाळ पेपर्स लि., कोल्हापूर २ | कॅलेंडर एक्झिबिशन (इं) प्रा.हावरा ३ |
|---|---|---|---|---|
| ०१ | प्रेसचे संपूण नाव व पत्ता - | मदर्स ग्राफिक्स (इं) प्रा.लि., ९१/डी, गव्हर्नमेंट इंडस्ट्रिअल इस्टेट सह्याद्री नगरसमोर कांदिवली (प) मुंबई ४०० ०६७. फोन - ०२२ - २८६९१८६६/४६८२ | सकाळ पेपर्स लि.,डी - ४ एम.आय.डी.सी.शिरोली, कोल्हापूर ४१६ १२२ फोन-क्र.०२३०-२४६८३८३,८४ | कॅलेंडर एक्झिबिशन (इं) प्रा. लि, पी-५१/१, बेनारस रोड, बेलगाचिया , हावरा -७११ १०५ (वेस्ट बंगाल) इंडिया फोन ०३३ -२६५१७१६३/६४ |
| ०२ | मालाचे नाव::- | अलका बिजवे (संचालक) | श्री वाय व्ही चंद्रचुड (अध्यक्ष) | श्री कुंदन सीकारीया (डायरेक्टर) |
| ०३ | रजिस्ट्रेशन नं. - | २००२ मध्ये प्रा.लि. म्हणून अस्तित्त्वात आहे | ०८२७६८ (१ जाने.१९३२) | १९२९९०५५१२१५ दि.२४.१२.१९६६ |
| ०४ | किती वर्षापासून कार्यरत - | १९९४ पासून (१४ वर्षापासून) | ७६ वर्षापासून | ४२ वर्षापासून |
| ०५ | खाजगी मालकी किंवा कंपनी आहे. - | स्वः मालकीची संस्था | सहकारी संस्था | स्वः मालकीची संस्था |
| ०६ | मशिनरीचा तपशिल - | १) फोर कलर मशिन संख्या -८ नग<br>२) टु कलर मशिन संख्या -४ नग<br>३) ॲटोमटिक बायडींग मशिन -१नग<br>४) इमेज सेटर , प्लेट एक्सपोझिंग -२ नग<br>५) बेकिंग मशीन्स -२ नग<br>६) रिवायडींग मशीन्स -१ नग<br>७) कटिंग मशीन - ३ नग | १) सिंगल कलर मशिन २ नग<br>२) टु कलर मशिन २ नग<br>३) फोर कलर मशिन १३ नग<br>४) ॲटो फ्लोडींग मशिन २ नग<br>५) ॲटो सेव्हींग मशिन ४ नग<br>६) कटींग मशिन -५ नग<br>७) ॲटोमॅटीक केसमेकर १ नग<br>८) परफेक्ट बायडींग मशिन -२ नग | १) फोर कलर ऑफसेट मशिन<br>२) सिंगल कलर ऑफसेट मशिन<br>३) वॉर्निशिंग मशिन<br>४) गोल्ड ब्रॉझींग मशिन<br>५) ट्रॅडल मशिन<br>६) प्लेटमेकींग मशिन<br>७) टीन सीट कटींग मशिन<br>८) लॅमिनेशन मशीन<br>९) ॲटोमॅटिक पेस्टींग मशिन |
| ०७ | कर्मचारी संख्या | १) कुशल कर्मचारी - १६<br>२) अकुशल कर्मचारी -६४ | १) एकुण कर्मचारी - २९८ | १)कुशल ५५<br>२)अकुशल १०० |
| ०८ | स्वःची डी.टी.पी व्यवस्था आहे काय? कोणकोणत्या भाषेत | होय (९ ते १० कर्मचा-यांचा डी.टी.पी. विभाग कार्यरत आहे) | होय, मराठी, हिंदी, इंग्रजी, कन्नड, गुजराती, केरळी, तामिळ इ. | होय, हिंदी, बंगाली, इंग्रजी, तामिळ, तेलगू व मराठी |
| ०९ | संस्थानची कामे यापूर्वी केली आहे काय ? | नाही | नाही | नाही |
| १० | वार्षीक उलाढाल | ७ कोटी २२ लाख | १४ कोटी पेक्षा जास्त | १० कोटी पेक्षा जास्त |
| ११ | फोटो लॅमिनेशनची /बायडींगची व्यवस्था स्वतःची | होय | होय | होय |

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



| | | | | |
|---|---|---|---|---|
| | आहे काय ? | | | |
| १२ | इमारत मालकी /भाडोत्री क्षेत्रफळ | स्वः मालकीची १.५ एकरातील प्रिटींग प्रेस | १७१४० स्क्वे.फुट | १.२ एकर |

उपरोक्तप्रमाणे १) मदर्स ग्राफिक्स (इं) प्रा.लि., मुंबई २) सकाळ पेपर्स लि., कोल्हापूर ३) कॅलेंडर एक्झिबिशन (इं) प्रा.हावरा यांनी निवडक प्रेसधारक यादीत त्यांचे नाव समाविष्ट करुन घेणेकामी सादर केली आहे.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी प्रकाशीत पुस्तके/फोटो/दैनंदिनी व दिनदर्शिकेचे उत्कृष्ट छपाईसाठी तसेच प्रकाशनांचा दर्जा सुधारणेसाठी मा.व्यवस्थापन मंडळाचे दि. २९-३१.३.२००४ चे सभेतील विषय नं.२६ निर्णय क्र.१३८ नुसार १८ निवडक प्रेसधारक व मा. व्यवस्थापन समितीचे दि.०५.११.२००५ चे सभेतील विषय नं २९ निर्णय क्र.६७८ नुसार ११ प्रेसधारक तसेच मा. व्यवस्थापन समितीचे दि.१७.०२.२००७ चे सभेतील विषय नं.४२ निर्णय क्र.१५४ नुसार २ प्रेसधारक व दि.०६.०९.२००८ चे सभेतील निर्णयानुसार १ प्रेसधारक याप्रमाणे एकूण ३२ प्रेसधारकांची नावे खालील दर्शविल्याप्रमाणे निवडक प्रेसधारक यादीत समाविष्ट आहेत.

| अ.नं. | प्रेसधारकाचे नांव | अ.नं. | प्रेसधारकाचे नांव |
|---|---|---|---|
| ०१ | मे.युनायटेड मल्टीकलर प्रिंटर्स,पुणे | ०२ | मे.अमल ऑफसेट प्रॉ.प्रा. लि.,नासिक |
| ०३ | मे. रविक आर्टस् ॲण्ड प्रिंटर्स प्रा.लि.,मुंबई | ०४ | मे. ब्ल्यू बर्ड ( इंडिया ) प्रा.लि.,पुणे |
| ०५ | मे. निट प्रिंटर्स,अहमदनगर | ०६ | मे. कमर्शियल बुक बायडिंग वर्क्स,मुंबई |
| ०७ | मे. सुमंगल आरटेक, मुंबई | ०८ | मे.मॅग्ना ग्राफिक्स ( इंडिया) लि.,मुंबई |
| ०९ | मे.बळवंत प्रिंटर्स, पुणे | १० | मे. प्रिंटोग्राफी मुंबई |
| ११ | मे.प्रिंटमन्न, मुंबई | १२ | मे. विकास इले. (सकाळ पेपर्स) ॲण्ड सिरॅमिक प्रॉडक्टस् प्रा.लि.,नाशिक |
| १३ | मे. अजय ऑफसेट प्रा.लि,, पुणे | १४ | मे. प्रिंट पॅक बिजनेस फॉमर्स प्रा.लि.,लातुर |
| १५ | मे.माणिकचंद नंदादिप पेपर प्रॉ.प्रा.लि.,पुणे - | १६ | मे.मौज प्रिटींग ब्युरो, मुंबई |
| १७ | मे.चेरी ऑफसेट प्रिटींग ॲण्ड पॅकेजिंग इंडस्ट्रीज प्रा.लि सोलापूर | १८ | मे. चिराग प्रिंटर्स,मुंबई |
| १९ | मे.सेफ ऑफसेट प्रायव्हेट लि.,मुंबई | २० | मे.न्यू राधारमण प्रिटींग प्रेस,मुंबई |
| २१ | मे.कल्याणी कार्पोरेशन,पुणे | २२ | मे.नेक्टर प्रिंटर्स प्रायव्हेट लिमिटेड,मुंबई |
| २३ | मे.निर्मल ऑफसेट प्रा.लि.,नाशिक | २४ | मे.ओनस प्रिंट सोल्युशन (इंडिया) प्रा.लि.,मुंबई |
| २५ | मे.ऑस्कर ऑफसेट प्रायव्हेट लि.,नवी मुंबई. | २६ | मे.दि.प्रिमियर को-ऑपरेटिव्ह प्रिंटर्स लि. चे महाराष्ट्र सहकारी मुद्रणालय, पुणे |
| २७ | मे.एस.व्ही.प्रिंटर्स,मुंबई | २८ | मे.उचिता ग्राफिक प्रिंटर्स प्रा.लि.,मुंबई |
| २९ | Sai Security Printers Ltd,Bangalore | ३० | PREMIER PRESS, Secunderabad |
| ३१ | **मे.श्रीरंग प्रकाशन प्रा.लि.,नाशिक** | ३२ | मे.इंडो एन्टरप्रायझेस प्रा.लि., लातूर |

उपरोक्त प्रेसधारकांकडून आवश्यकतेनुसार वेळोवेळी प्रकाशने विभागाकडील पुस्तके/फोटो छपाई कामाचे कोटेशन्स पाठवून छपाईचे काम करुन घेण्यात येत आहे.

मा. व्यवस्थापन मंडळाचे दि.१-३/४/२००१ चे सभेतील विषय नं.३७ निर्णय क्र.१४५ तसेच मा. व्यवस्थापन मंडळाच्या दि.२९-३१/०३/२००४ चे सभेतील विषय नं. २६ निर्णय क्रमांक १३८ यात संस्थानची प्रकाशने छपाईकामी कोटेशन मागवितांना छपाई कर्त्यांची वार्षिक उलाढाल ही एक कोटी रुपये किंवा त्यापेक्षा जास्त असावी अशी अट घालण्यात आली असून, यानुसार वरील प्रेसधारकांचे माहितीपत्रकात परिपूर्णपणे पात्रता असल्याने त्यांचे नावे निवडक प्रेसधारकांच्या यादीत समाविष्ट करुन घेण्यात आली आहेत.

१) मदर्स ग्राफिक्स (इं) प्रा.लि., मुंबई २) सकाळ पेपर्स लि., कोल्हापूर ३) कॅलेंडर एक्झिबिशन (इं) प्रा.हावरा यांची प्रेससंबंधीची परिपूर्ण माहिती प्राप्त झाली असल्याने तसेच त्यांची वार्षिक उलाढाल ही ७ कोटीपेक्षा जास्त असल्याने सदर तीन्ही प्रेसधारकांचे नाव निवडक प्रेसधारक म्हणून निवड करणेविषयी निर्णय होऊन, त्यांचे नांव संस्थानचे निवडक प्रेसधारक यादीत समाविष्ट करून घेणेस व त्यांचेकडून आवश्यकतेनुसार वेळोवेळी प्रकाशने विभागाकडील पुस्तके/फोटो छपाई कामाचे कोटेशन पाठवून छपाईचे काम करून घेणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, मदर्स ग्राफिक्स (इं) प्रा.लि., मुंबई , सकाळ पेपर्स लि., कोल्हापूर, कॅलेंडर एक्झिबिशन (इं) प्रा.हावरा या प्रेसबरोबरच प्रगती ऑफसेट, हैद्राबाद यांचे नांव संस्थानचे निवडक प्रेसधारक यादीत समाविष्ट करून घेणेस व त्यांचेकडून आवश्यकतेनुसार वेळोवेळी प्रकाशने विभागाकडील पुस्तके/फोटो छपाई कामाचे कोटेशन पाठवून छपाईचे काम करून घेणेस मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-प्रकाशने विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



**विषय नं.२३ संस्थान प्रकाशित पुस्तकांचे पुनर्मुद्रण छपाईकामी देण्यात आलेल्या कार्यादेशास कार्योत्तर मंजुरी मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.७८०** मा व्यवस्थापन समितीचे दि.०७.०७.२००८ चे सभेतील निर्णयानुसार १२ पुस्तके छपाईकामी येणा-या एकूण रु.२७,२५,०००/- मात्रचे अपेक्षित खर्चास व मा. व्यवस्थापन समितीचे दि.०६.०९.२००८ चे सभेतील निर्णयानुसार १३ पुस्तके छपाईकामी येणा-या एकूण रु.६७,५०,०००/- मात्रचे अपेक्षित खर्चास मान्यता मिळलेनुसार ३० निवडक प्रेसधारकांना जा. नं. एसएसएस/वशी/प्रकाशने/१२४०१/२००८ दि.२१.८.०८ अन्वये अंतिम मुदत दि.५.९.२००८ अखेर व जा. नं. एसएसएस/वशी/प्रकाशने/ १२९०५/ २००८ दि.०१.९.०८ अन्वये अंतिम मुदत दि.२५.९.२००८ पर्यंत जमा करणेबाबत कळविण्यात आले होते. त्यानुसार.-

**अ) पुस्तके छपाई**

| अ.नं | पुस्तकाचे नांव | भाषा | नवीन छपाई संख्या | छपाई अंदाजे दर | एकूण रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | श्री सदगुरु साईनाथ सगुणो. आरती | मराठी | २,५०,००० | ३.०० | ७,५०,०००/- |
| ०२ | श्री साई तेलगू पुजाविधी आरती | तेलगू | ५०,००० | ७.०० | ३,५०,०००/- |
| ०३ | श्री साई स्तवन मंजरी | हिन्दी | २०,००० | ३.०० | ६०,०००/- |
| ०४ | श्री साई स्तवन मंजरी | गुजराथी | १०,००० | ३.०० | ३०,०००/- |
| ०५ | मुलांचे साईबाबा | इंग्रजी | १०,००० | ७.०० | ७०,०००/- |
| ०६ | मुलांचे साईबाबा | गुजराथी | ५,००० | ७.०० | ३५,०००/- |
| ०७ | मुलांचे साईबाबा | तेलगू | १०,००० | ७.०० | ७०,०००/- |
| ०८ | श्री साईबाबा चित्रावली | मराठी/इंग्रजी | १०,००० | ७.०० | ७०,०००/- |
| ०९ | गुरुपाठाचे अभंग | मराठी | ५,००० | ५.०० | २५,०००/- |
| १० | श्री साईंचे सत्य चरित्र | मराठी | १०,००० | ७५.०० | ७,५०,०००/- |
| ११ | श्री साई स्तवन मंजरी | कन्नड | ५,००० | ३.०० | १५,०००/- |
| १२ | श्री साईसत् चरित्र प्रथम आवृत्ती | पंजाबी | ५,००० | १००.०० | ५,००,०००/- |
| | | | | **एकूण रु.** | २७,२५,०००/- |

**ब) पुस्तके छपाई**

| अ.नं | पुस्तकाचे नांव | भाषा | नवीन छपाई संख्या | अंदाजे छपाई दर | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|
| १ | श्री साईलीलामृत | मराठी | २०,००० | १२.०० | २,४०,०००/- |
| २ | श्री साईलीलामृत | हिन्दी | २०००० | १५.०० | ३,००,०००/- |
| ३ | श्री साईबाबा अवतार व कार्य | मराठी | १०,००० | १०.०० | १,००,०००/- |
| ४ | श्री साई सगुणोपासना आरती | गुजराथी | २०००० | ३.०० | ६०,०००/- |
| ५ | श्री साई स्तवन मंजरी | इंग्रजी | ५००० | ५.०० | २५,०००/- |
| ६ | अर्वाचिन भक्त व संत लीलामृत यातील श्री साईबाबांचे चार अध्याय | मराठी | १०००० | ५.०० | ५०,०००/- |
| ७ | श्री साई रुद्राध्याय (११ वा अध्याय) | मराठी | २५००० | ३.०० | ७५,०००/- |
| ८ | श्री साईनाथ भजनमाला | हिन्दी | १०००० | ३०.०० | ३,००,०००/- |
| ९ | बच्चों के साईबाबा | हिन्दी | ५०,००० | ७.०० | ३,५०,०००/- |
| १० | श्री साई सत्चरित्र (ओवी टु ओवी) | तेलगू | १०००० | ७०.०० | ७,००,०००/- |
| ११ | श्री साई सच्चरित्र सार हिदी दोहावली | हिंदी | १५००० | ७०.०० | १०,५०,०००/- |
| १२ | श्री मातृ साई | तेलगू | ५०००० | २५.०० | १२,५०,०००/- |
| १३ | श्री साईंचे सत्य चरित्र | तेलगू | २५००० | ९०.०० | २२,५०,०००/- |
| | | | | एकूण रुपये | ६७,५०,०००/- |

वरील **"अ"** तक्यात दर्शविल्याप्रमाणे पुस्तके छपाईकामी ३० निवडक प्रेसधारकांपैकी मुदतीत ८ कोटेशन्स व ब तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे ९ दरपत्रके प्राप्त झाली, प्राप्त कोटेशन्स मा.विश्वस्तांचे समक्ष उघडण्यात आली आहे त्याचा निम्नतम दराचा तक्ता खालील ...

अ) पुस्तके निम्नतम दराचा तक्ता..

| **अ.नं.** | **प्रेसधारकाचे नांव** | **श्री साईंचे सत्य चरित्र मराठी** | **श्री साई सत्चरित्र पंजाबी** | **श्री सद्गुरु साईनाथ सगुणोपासना आरती मराठी** | **श्री साई तेलगू पुजाविधी आरती** | **श्री साई स्तवन मंजरी हिदी** | **श्री साई स्तवन मंजरी गुजराथी** | **श्री साई स्तवन मंजरी ,कन्नड** |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | **मागिल छपाई दर** | **६६.९०** | **प्रथम आवृत्ती** | **१.६८** | **५.००** | **१.९५** | **१.८०** | **१.८०** |
| | **नविन छपाई संख्या** | **१०,०००** | **५,०००** | **२,५०,०००** | **५०,०००** | **२०,०००** | **१०,०००** | **५,०००** |
| | | **रुपये पैसे** | **रुपये पैसे** | **रुपये पैसे** | **रुपये पैसे** | **रुपये पैसे** | **रुपये पैसे** | **रुपये पैसे** |
| **१** | प्रिमिअर प्रेस, सिंकदराबाद | १०८.०० | ८५.०० | २.७५ | १२.५० | ७.०० | ५.०० | ७.०० |
| **२** | महाराष्ट्र सहकारी मुद्रणालय, पुणे | ९४.४७ | ७०.४९ | २.४४ | ७.४८ | २.४८ | **२.१८** | **२.५५** |
| **३** | नीट प्रिंटर्स अ.नगर | ८४.१० | - | २.६५ | - | - | - | - |

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ४ | अजय ऑफसेट प्रा.लि.,पुणे | ८५.३३ | **७०.१७** | २.२७ | **६.६९** | २.५३ | २.२२ | २.५६ |
| ५ | ब्ल्यू बर्ड इंडिया लि., पुणे | **७६.०५** | ७६.७५ | २.२७ | ६.८५ | २.६५ | २.७० | ३.७५ |
| ६ | न्यु राधारमण प्रिंटींग प्रेस, मुंबई | ११५.०० | ११७.०० | ३.४७ | ६.७७ | ४.९५ | ५.२५ | ८.२२ |
| ७ | चेरी ऑफसेट प्रिंटींग प्रा.लि.सोलापूर | ८४.३७ | - | **२.२०** | ७.३६ | - | - | - |
| ८ | कमर्शियल बुक बायडींग वर्क्स, मुंबई | ९१.९५ | ८६.८० | २.२५ | ७.२० | **२.४५** | २.४५ | ३.३० |
| अ | पुस्तकावरील छपाई किंमत | **१०६.००** | **९८.००** | **३.००** | **१०.००** | **३.००** | **३.००** | **३.००** |
| ब | सवलतीचे दराने संस्थान विक्री किंमत | ८५.०० | ७८.०० | ३.०० | १०.०० | ३.०० | ३.०० | ३.०० |

| **अ.नं.** | **प्रेसधारकाचे नांव** | **चिल्ड्रेन्स श्री साईबाबा इंग्रजी** | **मुलांचे साईबाबा गुजराथी** | **मुलांचे साईबाबा, तेलगू** | **श्री साई साईबाबा चित्रावली मराठी/इंग्रजी** | **गुरुपाठाचे अभंग मराठी** | कोटेशन सोबत नमुने कागदाचे आहे/नाही | कोटेशन सोबत बया-ना रक्कम आहे/नाही | पात्र/अपात्र |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | **मागिल छपाई दर** | ४.०० | ४.०० | ३.९० | ५.६० | ३.१० | | | |
| | **नवीन छपाई संख्या** | **१०,०००** | **५,०००** | **१०,०००** | **१०,०००** | **५,०००** | | | |
| | | **रुपये पैसे** | **रुपये पैसे** | **रुपये पैसे** | **रुपये पैसे** | **रुपये पैसे** | | | |
| १ | प्रिमिअर प्रेस, सिंकदराबाद | १५.०० | १७.०० | १६.०० | - | - | आहे | आहे | पात्र |
| २ | महाराष्ट्र सहकारी मुद्रणालय, पुणे | ५.१८ | ४.९३ | ५.८६ | ६.७० | **२.५२** | आहे | आहे | पात्र |
| ३ | नीट प्रिंटर्स अ.नगर | - | - | - | **६.१५** | - | आहे | आहे | पात्र |
| ४ | अजय ऑफसेट प्रा.लि.,पुणे | **५.१३** | **४.८७** | **५.८०** | ६.५३ | २.५७ | आहे | आहे | पात्र |
| ५ | ब्ल्यू बर्ड इंडिया लि., पुणे | १३.०० | १३.३६ | १३.५४ | २०.३५ | ३.२७ | आहे | आहे | पात्र |
| ६ | न्यु राधारमण प्रिंटींग प्रेस, मुंबई | ८.३६ | ९.१० | ९.२१ | १०.०४ | २.६५ | आहे | आहे | पात्र |
| ७ | चेरी ऑफसेट प्रिंटींग प्रा.लि.सोलापूर | - | - | - | - | - | आहे | आहे | पात्र |
| ८ | कमर्शियल बुक बायडींग वर्क्स, मुंबई | ५.२५ | ५.५० | ५.९० | ६.२० | ६.१० | आहे | आहे | पात्र |
| अ | पुस्तकावरील छपाई किंमत | **७.००** | **६.००** | **८.००** | **८.००** | **३.००** | | | |
| ब | सवलतीचे दराने संस्थान विक्री किंमत | ७.०० | ६.०० | ८.०० | ८.०० | ३.०० | | | |

ब) पुस्तके निम्नतम दराचा तक्ता..

| **अ.नं.** | **प्रेसधारकाचे नांव** | **श्री साईंचे सत्य चरित्र ( गद्यात्मक ) तेलगू** | **श्री मातृसाई तेलगू** | **श्री साई सतचरित्र (ओवी टु ओवी) तेलगू** | **श्री साईलिलामृत मराठी** | **श्री साईलिलामृत हिंदी** | **बच्चो के साईबाबा हिंदी** | **श्री सदगुरु साईनाथ सगुणो. गुजराथी** |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | **मागिल छपाई दर** | **८४.५०** | **२३.७९** | **६१.६०** | **९.२०** | **११.७५** | **३.४७** | **१.९०** |
| | **नवीन छपाई संख्या** | **२५,०००** | **५०,०००** | **१०,०००** | **२०,०००** | **२०,०००** | **५०,०००** | **२०,०००** |
| | | **रुपये** | **रुपये** | **रुपये** | **रुपये** | **रुपये** | **रुपये** | **रुपये** |
| १ | **प्रिमिअर प्रेस, सिंकदराबाद** | १४०.०० | ४१.२५ | १०८.५० | २६.३५ | ३१.२५ | १०.०० | ५.०० |
| २ | **महाराष्ट्र सहकारी मुद्रणालय, पुणे** | १२३.३९ | ३२.१० | ८०.८८ | १६.२५ | - | ४.८० | ३.९१ |
| ३ | **नीट प्रिंटर्स अ.नगर** | **९९.५०** | २७.४० | ६५.२५ | - | - | - | - |
| ४ | **अजय ऑफसेट प्रा.लि.,पुणे** | ११७.६१ | ३०.१३ | ७३.५६ | **१२.१०** | **१३.६०** | **३.६०** | २.९४ |
| ५ | **ब्ल्यू बर्ड इंडिया लि., पुणे** | ९९.६५ | २७.९० | **२७.२०** | १२.३० | १३.७५ | ११.३६ | २.३६ |
| ६ | **न्यु राधारमण प्रिंटींग प्रेस, मुंबई** | १६१.२० | ५२.१८ | ११८.५६ | २२.८६ | २५.३३ | ५.७२ | ४.४० |
| ७ | **चेरी ऑफसेट प्रिंटींग प्रा.लि.सोलापूर** | १०४.०० | **२७.३२** | ६५.५१ | १३.१८ | १५.३८ | ४.४५ | - |
| ८ | **कमर्शियल बुक बायडींग वर्क्स, मुंबई** | ११९.५५ | ३४.५० | ७६.१५ | १४.५० | १६.६५ | ३.७० | **२.२५** |
| ०६. | श्री.दंडवते सुभाष निवृत्ती<br>शिक्षण सेवक (पूर्णवेळ) | रसायनशास्त्र | हिंदु कुणबी<br>इमाव | जा.नं.एसएसएस/वशी-०१/१३००३/२००८<br>दि. ०४/०९/२००८ |
| ०७. | श्री.अरुण लक्ष्मण शिंदे<br>शिक्षण सेवक (CHB) | रसायनशास्त्र | हिंदु माळी<br>इमाव | जा.नं.एसएसएस/वशी-०१/१३००४/२००८<br>दि. ०४/०९/२००८ |
| ०८. | श्री.संतोष मच्छिंद्र चौधरी<br>शिक्षण सेवक (पूर्णवेळ) | माहिती तंत्रज्ञान | हिंदु मराठा<br>खुला | जा.नं.एसएसएस/वशी-०१/१३००५/२००८<br>दि. ०४/०९/२००८ |
| ०९. | श्री.सुनिल दत्तात्रय वरघुडे<br>शिक्षण सेवक (CHB) | माहिती तंत्रज्ञान | हिंदु मराठा<br>खुला | जा.नं.एसएसएस/वशी-०१/१३००६/२००८<br>दि. ०४/०९/२००८ |
| १०. | श्री.मच्छिंद्र हरीभाऊ दरेकर<br>शिक्षण सेवक (पूर्णवेळ) | अर्थशास्त्र | हिंदु मराठा<br>खुला | जा.नं.एसएसएस/वशी-०१/१३००७/२००८<br>दि. ०४/०९/२००८ |
| ११. | श्री.दत्तु अशोक लांडे<br>शिक्षण सेवक (अर्धवेळ) | अर्थशास्त्र | हिंदु धनगर<br>भज | जा.नं.एसएसएस/वशी-०१/१३००८/२००८<br>दि. ०४/०९/२००८ |
| १२. | श्रीमती श्रध्दा बापुसाहेब शिंदे<br>शिक्षण सेवक (CHB) | भूगोल | हिंदु तिरमल<br>भज- ब. | जा.नं.एसएसएस/वशी-०१/१३००९/२००८<br>दि. ०४/०९/२००८ |
| १३. | श्री.येलवंडे सुभाष रामभाऊ<br>शिक्षण सेवक (पुर्णवेळ ) | वाणिज्य | हिंदु मराठा<br>खुला | फोनवरुन नेमणूक पत्र स्विकारण्यास नकार दिला. |

**ब) श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालय, शिर्डी**

**आरक्षण- अजा-०१, अज -०१ खुला-०२**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ०१. | श्री. विलास अशोकराव आंबेकर<br>प्रयोगशाळा सहाय्यक | भौतिकशास्त्र | हिंदु-मराठा<br>खुला | जा.नं.एसएसएस/वशी-०१/१३०१३/२००८<br>दि. ०४/०९/२००८ |
| ०२. | श्री. मिनीनाथ भाऊसाहेब कोते<br>प्रयोगशाळा सहाय्यक | रसायनशास्त्र | हिंदु-मराठा<br>खुला | जा.नं.एसएसएस/वशी-०१/१३०३६/२००८<br>दि. ०४/०९/२००८ |
| ०३. | सौ. वैशाली प्रशांत देवरे<br>प्रयोगशाळा सहाय्यक | जीवशास्त्र | हिंदु-धनगर<br>भज | जा.नं.एसएसएस/वशी-०१/१३०१५/२००८<br>दि. ०४/०९/२००८<br>(अज उमेदवार उपलब्ध नसल्याने शैक्षणिक वर्षासाठी नेमणूक) |
| ०४. | श्री. प्रशांत सबाजीराव बनसोडे<br>प्रयोगशाळा सहाय्यक | माहिती तंत्रज्ञान | हिंदु -तेली<br>इमाव | जा.नं.एसएसएस/वशी-०१/१३०१४/२००८<br>दि. ०४/०९/२००८<br>(अजा उमेदवार उपलब्ध नसल्याने शैक्षणिक वर्षासाठी नेमणूक) |

**क) श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर, शिर्डी**

**आरक्षण- अ.जा.-०१, अ.ज. -०१**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ०१. | श्रीमती स्वाती रामदास माने | गणित | हिंदु-चांभार | जा.नं.एसएसएस/वशी-०१/१३०१०/२००८<br>दि. ०४/०९/२००८ |

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



| | | | | |
|---|---|---|---|---|
| | शिक्षणसेवक ( माध्यमिक ) | | अजा | |
| ०२. | श्री.ताराचंद मुकिंदा चिधे<br>शिक्षणसेवक ( प्रथामिक ) | माहिती तंत्रज्ञान | हिंदु-धनगर<br>भ.ज. | जा.नं.एसएसएस/वशी-०१/१३०११/२००८<br>दि. ०४/०९/२००८<br>(अज उमेदवार उपलब्ध नसल्याने शैक्षणिक वर्षासाठी नेमणूक) |

**ड ) श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कूल, शिर्डी**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ०१. | श्री. कैलास निवृत्ती जेजूरकर<br>शिक्षण सेवक ( माध्यमिक ) | माहिती तंत्रज्ञान | हिंदु-माळी<br>इमाव | जा.नं.एसएसएस/वशी-०१/१३०१८/२००८<br>दि. ०४/०९/२००८ |
| ०२. | श्री.विजय बाजीराव पठारे<br>शिक्षणसेवक ( प्रथामिक ) | माहिती तंत्रज्ञान | हिन्दु-माळी<br>इमाव | जा.नं.एसएसएस/वशी-०१/१३०१२/२००८<br>दि. ०४/०९/२००८ |

**इ) श्री साईबाबा औद्योगिक प्रशिक्षण संस्था, शिर्डी** आरक्षण - अज -०१

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ०१. | श्री.सोनवणे प्रशांत प्रभाकर | निदेशक क्राफ्टस्मन<br>फुड प्रॉडक्शन<br>(व्हेज) | हिंदु-कुणबी<br>इमाव | जा.नं.एसएसएस/वशी-०१/१३५२८/२००८<br>दि.१५/०९/२००८<br>(अज उमेदवार उपलब्ध नसल्याने शैक्षणिक वर्षासाठी नेमणूक) |

**अ -** उपरोक्तप्रमाणे केलेल्या नेमणूकीस मान्यता देण्यात आली.

**ब-** उपरोक्त अ, ब, क, ड व इ मधील विविध पदासाठी पात्र उमेदवारांना नेमणूक आदेश देण्यात आलेले आहेत. नेमणूक आदेशात शर्ती / अटी आपणांस मान्य असल्यास तसे हमीपत्र आपण लिहून द्यावे व कामावर हजर व्हावे असे नमूद केलेले आहे. तथापी खालील १ ते ४ शिक्षण सेवक व अ.नं.५ प्रयोगशाळा सहाय्यक हे उमेदवार अद्याप कनिष्ठ महाविद्यालयाकडे कामावर हजर झालेले नाहीत.

| अ.नं. | उमेदवाराचे नाव | विषय | जात |
|---|---|---|---|
| ०१. | श्री.येलवंडे सुभाष रामभाऊ<br>शिक्षण सेवक (पुर्णवेळ ) | वाणिज्य | हिंदु मराठा<br>खुला |
| ०२. | श्रीमती शिंदे शितल सुभाषराव<br>शिक्षण सेवक (CHB) | भौतिकशास्त्र | हिंदु माळी<br>इमाव |
| ०३. | श्री.सुनिल दत्तात्रय वरघुडे<br>शिक्षण सेवक (CHB) | माहिती तंत्रज्ञान | हिंदु मराठा<br>खुला |
| ०४. | श्रीमती श्रध्दा बापुसाहेब शिंदे<br>शिक्षण सेवक (CHB) | भूगोल | हिंदु तिरमल<br>भज- ब |
| ०५. | श्री. प्रशांत सबाजीराव बनसोडे<br>प्रयोगशाळा सहाय्यक | माहिती तंत्रज्ञान | हिंदु -तेली<br>इमाव |

कनिष्ठ महाविद्यालयाकडील अ.नं.१ श्री.येलवंडे यांची वाणिज्य विषयासाठी निवड झालेली होती. परंतु ते सदरचे पदावर हजर न झाल्याने प्रतिक्षा यादीतील वरच्या क्रमांकावर असलेले उमेदवार श्री.संगमनेरे दिलीप विठ्ठलराव यांची जा.नं.एसएसएस/वशी-०१/३६७८/२००८ दि.१७/०९/२००८ अन्वये नेमणूक केलेली आहे त्यास मान्यता देण्यात आली.

श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयाकडील उपरोक्त पदांची कामाची निकड व आवश्यकता लक्षात घेता उपरोक्त हजर न झालेल्या शिक्षणसेवक व प्रयोगशाळा सहाय्यक उमेदवारांचे नेमणूक आदेश रद्द करुन, सदरहू पदासाठी घेण्यात आलेल्या मुलाखतीमधील पात्र उमेदवारांपैकी प्रतिक्षा यादीतील वरच्या क्रमांकावर असलेल्या उमेदवारांना नेमणूक द्यावी, असे ठरले. (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.४४** **श्रीसाईबाबा भक्तनिवासस्थान येथे आईस्क्रीम पार्लरसाठी श्री.प्रविण अशोक शिंदे यांना देण्यात आलेल्या गाळयास मुदतवाढ देणेबाबत.**

**निर्णय क्र.८०१** श्री प्रविण अशोक शिंदे , रा. शिर्डी यांना संस्थानचे भक्तनिवासस्थान इमारतीतील गाळा न. १ हा (टॉप ॲण्ड टाऊन आईस्क्रिम) विक्रीसाठी लिव्ह ॲण्ड लायसेन्स तत्वावर ११ महिणे (दि.१६.१०.२००७ ते दि.१५.०९.२००८) कालावधीसाठी दिलेला होता, त्याची मुदत संपलेली आहे. आता सदर गाळयाचे वापराची मुदत वाढवून मिळणेस श्री.प्रविण शिंदे यांनी अर्ज केलेला आहे.

यापूर्वी संस्थानने श्री साईबाबा भक्तनिवास परिसरातील गाळे शासकीय व सहकारी संस्थेस व इतर यांना खालीलप्रमाणे त्यांचेकडून मासिक परवाना फी / डिपॉझीट आकारुन तसेच मिटर रिडींगप्रमाणे विद्युत वेगळे आकारुन लिव्ह ॲण्ड लायसेन्सी तत्वावर देण्यात आलेले आहेत.

| अ.नं. | सुविधेचे नांव | मासिक भाडे रुपये | कालावधी | ठिकाण |
|---|---|---|---|---|

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



| | | | | |
|---|---|---|---|---|
| १) | श्री साई संस्थान नोकर पतपेढी प्रसाद नॉव्हेल्टी<br>अ) नॉव्हेल्टी स्टोअर नं.१<br>ब) नॉव्हेल्टी स्टोअर नं.२<br>क) प्रसाद स्टोअर नं.१ | १०७४/-<br>१०७४/-<br>१०७४/- | ०१/०६/२००८<br>ते<br>३१/०५/२००९ | भक्तनिवास डी ब्लॉक नं.३ - गाळा<br>भक्तनिवास डी ब्लॉक नं.२ - गाळा<br>भक्तनिवास डी ब्लॉक नं.४ - गाळा |
| २) | एस.टी.डी.बुथ श्री.जगधने<br>(डिपॉझीट रु, ३,१८,०००/-) | १७३१/- | ०१/११/२००७<br>ते<br>३०/०९/२००८ | भक्तनिवास अे विंग गाळा नं ०३<br>११ महिने |
| ३) | जनरल स्टोअर्स- श्री.नंदूकोळपकर, शिरडी<br>(डिपॉझीट रु, १,२५,०००/-) | ४२५९/- | १३/०६/२००८<br>ते<br>१२/०६/२००९ | भक्तनिवास अे विंग गाळा<br>नं. ०६<br>( एक वर्षाकरिता ) |
| ४) | प्रवरा फळे व भाजीपाला उत्पादक प्रकीया संस्था लि.<br>(डिपॉझीट १०,०००/- ) | २०००/-<br>(गाळा व स्टॉल) | ३०/११/२००७<br>ते<br>२९/११/२००८ | ५०० रुम परिसर- गाळा |
| ५) | श्री प्रविण अशोक शिंदे, शिर्डी, ता.राहाता, जि.अ.नगर<br>**Top N Town Ice Cream**<br>(डिपॉझीट रु. १,००,०००/-) | २,०००/- | दि. १६/१०/२००७<br>ते<br>दि १५/०९/२००८ | ५०० रुम परिसर- गाळा नं.०१ |

श्री प्रविण अशोक शिंदे यांनी गाळयाकरिता पुढील मुदतवाढ मिळावी, अशी विनंती केलेली आहे. त्यांचेकडे कोणत्याही प्रकारे संस्थानची बाकी नाही, असे त्यांनी कळविले आहे.

साईभक्तांना उपरोक्त गाळयाचा होणारा उपयोग लक्षात घेता श्री प्रविण अशोक शिंदे यांना दि.१६.०९.२००८ पासून दि.३१.०३.२००९ पर्यंत (०६ महिने १५ दिवस) कालावधीकरिता डिपॉझीट रु.१,००,०००/- (अक्षरी रु. एक लाख मात्र) मागील व फी रु.२०००/- मध्ये १०% वाढ करुन दरमहा रु.२,२००/- (अक्षरी रु.दोन हजार दोनशे मात्र) आकारुन व मिटर रिडींगप्रमाणे येणारे विद्युत बील वेगळे आकारुन पुर्वीचे अटी व शर्तीवर लिव्ह ॲण्ड लायसेन्सी तत्वावर गाळयास मुदतवाढ देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, तो अमान्य करण्यात आला.

(कार्यवाही-विधी अधिकारी)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.४५** **श्रीसाईबाबा पुण्यतिथी उत्सव-२००८ बाबत.**
**निर्णय क्र.८०२** सदरहू विषयाबाबत व्यवस्थापन समितीचे दिनांक ०६.०९.२००८ चे सभेत निर्णय झालेला असल्याने विषय मागे घेण्यात आला. (कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-०५)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.४६** **श्रीरामनवमी उत्सव-२००८ अंदाजपत्रकाबाबत.**
**निर्णय क्र.८०३** श्री रामनवमी उत्सव २००८ मध्ये खालीलप्रमाणे खर्चाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले होते व त्यास मा.व्यवस्थापन समितीत मान्यताही मिळालेली होती. प्रत्यक्षात मात्र अंदाजीत खर्चापेक्षाही जादा खर्च झालेला आहे. त्याचा अहवाल खालीलप्रमाणे -

| अ.नं. | तपशील | मा.व्य.समितीने मंजूर केलेली रक्कम | प्रत्यक्ष खर्च | शेरा (जादा खर्च) |
|---|---|---|---|---|
| **०१.** | मंडप, कमानी, गादीभाडे, स्टेज, उन्हाळी मंडपासह व पाणपोई इ. | १८,००,०००.०० | ५६,४५,८९२.०० | ३८,४५,८९२.०० |
| ०२. | कलाकार बिदागी, | १०,००,०००.०० | ०४,३८,४१६.०० | -- |
| ०३. | भक्तांना मिष्टान्न मजूरीसह | ०५,००,०००.०० | ०१,७०,९२५.०० | -- |
| ०४. | विद्युत रोषणाई | ०५,५०,०००.०० | ०४,९२,७५५.०० | -- |
| **०५.** | निमंत्रणपत्रिका, जाहिरात, पोष्टेज, उदीप्रसादासह. | १२,५०,०००.०० | १२,७८,५५४.०० | २८,५५४.०० |
| **०६.** | जादा कामगार | ०२,००,०००.०० | ०२,३८,७४२.०० | ३८,७४२.०० |
| ०७. | इतर खर्च - मंदिर रंगकाम, कुस्त्या, लस्सी, मंदिर प्रसाद, कावडी, जादा फर्निचर, गेस्ट हाऊस, व्ही.डी.ओ. शुटींग, पेंटर बिले, पोलीस स्टेशन इंधन बीलासह. | ०५,००,०००.०० | ००,८८,९१९.००<br>+<br>००,४६,७६४.०० | -- |
| ०८. | पालख्या, पिण्याचे पाणी इ. | ०२,००,०००.०० | ०१,३०,९७९.०० | -- |
| | **एकूण खर्च** | ६०,००,०००.०० | ८५,३१,९४६.०० | २५,३१,९४६.०० |

अ.नं.०१ मध्ये जादा झालेल्या खर्चाबाबत - श्री रामनवमी उत्सव २००८ मध्ये मंडप, कमानी व स्टेज, उन्हाळी मंडप इ.साठी रु. १८,००,०००.०० इतका खर्च मा.व्यवस्थापन समितीने मंजूर केला होता व श्री रामनवमी उत्सव २००८ मध्ये मंडप, कमानी व स्टेजवर रु. ५६,४५,८९२.०० इतका खर्च आलेला आहे. मंडप, कमानी, उन्हाळी मंडपासह इ.चे रु. ३८,४५,८९२.०० मात्रच्या जादा झालेल्या खर्चास

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



मा.व्यवस्थापन समिती सभा दि.१६/०३/२००८ निर्णय क्र. २८७(६) अन्वये व सभा दि.२४/०५/२००८ निर्णय क्र.४४१ अन्वये मंजूरी घेतलेली आहे.

अ.नं.०५ मध्ये जादा झालेल्या खर्चाबाबत - श्री रामनवमी उत्सव २००७ मध्ये निमंत्रण पत्रिका , जाहिरात, पोष्टेज उदीप्रसादसह इ.साठी रु. १२,५०,०००.०० इतका मंजूर झालेला होता व श्री रामनवमी उत्सव २००८ मध्ये प्रत्यक्ष निमंत्रण पत्रिका , जाहिरात, पोष्टेज उदीप्रसादसह इ.साठी हा खर्च रु. १२,७८,५५४.०० इतका झालेला आहे. यामध्ये आजीवन सभासदांच्या संख्येत वाढ झालेने रु. २८,५५४.०० इतका जादा खर्च झालेला आहे.

अ.नं.०६ मध्ये जादा झालेल्या खर्चाबाबत - श्री रामनवमी उत्सव २००७ मध्ये जादा कामगारांसाठी रु. ०२,००,०००.०० इतका मंजूर झालेला होता व श्री रामनवमी उत्सव २००८ मध्ये प्रत्यक्ष जादा कामगारांसाठी हा खर्च रु. ०२,३८,७४२.०० इतका झालेला आहे. यामध्ये कंत्राटी कामगार यांचे मानधनात वाढ झालेने रु. ३८,७४२.०० इतका जादा खर्च झालेला आहे.

तरी अ.नं. ०५ व ०६ प्रमाणे निमंत्रण पत्रिका पोष्टेज व जादा कामगार इ.साठी झालेल्या रु. ६७,२९६/-चे जादा खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-०५)

## दि.१८.१०.२००८ चे सभेतील निर्णयाची कामापुरती नक्कल-

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.४७** **१५ ऑगस्ट,२००८ रोजी झालेल्या स्वातंत्र्य दिनानिमित्त केलेल्या खाऊ वाटपाबाबत**

**निर्णय क्र.८०४** दरवर्षी २६ जानेवारी व १५ ऑगष्ट रोजी शिर्डी परिसरातील शालेय विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करण्यात येते. खाऊ म्हणून ५० ग्रॅमची एक अश्या दोन नारळाच्या बर्फीचे एक पाकीट प्रत्येकी वाटप करण्यात येते.

सन २००८ सालात झालेल्या १५ ऑगष्ट २००८ रोजीचे स्वातंत्र्य दिनानिमित्त सालाबादप्रमाणे शिर्डी परिसरातील १५ शाळेतील १०,२५० विद्यार्थ्यांना प्रत्येकी एक प्रमाणे २ वड्याचे बर्फीचे पाकीट वाटप करण्यात आलेले असून त्यासाठी साधारणपणे खालीलप्रमाणे खर्च आलेला आहे.

| अ.नं. | एकूण बर्फी पाकीटे | प्रत्येकी दर | एकूण रक्कम |
|---|---|---|---|
| ०१. | १०,२५० | रु. २.५८ | रु. २६,४४५.०० |

यापुर्वी अशाप्रकारचा खर्च साधारणपणे रु. २५,०००/- चे आत होत असल्याने रु. २५,०००/- चे आतील खर्चास मा.कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने मंजूरी मिळत असे. तथापि यावेळेस सदरचा खर्च हा रु. २६,४४५/- (अक्षरी रु. सव्हीस हजार चारशे पंचेचाळीस मात्र) झालेला असून मा.व्यवस्थापन समितीचे सभेत मान्यता घेणे आवश्यक आहे.

तरी दि.१५/०८/२००८ स्वातंत्र्य दिनानिमित्त वाटलेल्या १५ शाळेतील १०,२५० विद्यार्थ्यांच्या रु.२६,४४५.०० (अक्षरी रु. सव्हीस हजार चारशे पंचेचाळीस मात्र) चे झालेल्या खर्चास मा.व्यवस्थापन समितीचे सभेत कार्योत्तर मान्यता मिळावी ही विनंती..

तसेच दिवसेंदिवस शिर्डी परिसरातील शाळेची संख्या व विद्यार्थ्यांची संख्या वाढत रहाणार आहे. त्यामुळे खर्चही वाढत जाणार आहे. तरी दरवर्षी १५ ऑगष्ट व २६ जानेवारीस खाऊवाटपास व याकामी येणारे योग्य त्या खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-प्रशासनशाखा आवक विभाग)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.४८** **बहुजन समाज पार्टीचे जन चेतना आंदोलनाची सभा आयोजित करण्यासाठी साईनगर मैदान देणेबाबत.**

**निर्णय क्र.८०५** अध्यक्ष, ब.स.पा. राहाता, यांनी दि. ०५/११/२००८ रोजी सकाळी ११.०० वा. बहुजन समाज पार्टीचे मार्फत जन चेतना आंदोलनची सभा आयोजित करणार असून त्यासाठी साईनगर मैदान सभेसाठी मिळावे, तसेच मैदान साफसफाई करुन व औषध मारुन मिळावे, तसेच गेटजवळ बोर्ड लावणेस परवानगी मिळावी, अशी विनंती केलेली आहे. तसेच संबंधीत हे एक दिवसाचे भाडे भरणेस तयार आहेत.

यापुर्वी कोणत्याही राजकीय पक्षाची सभा साईनगर मैदानात आयोजित करण्यात आलेली नव्हती. याठिकाणी फक्त संस्थानचे कार्यक्रम, धार्मिक कार्यक्रम इ. आयोजित केले जातात. साईनगर मैदानात राजकीय पक्षाची सभा यापुर्वी कधीही झालेली नाही. अशाप्रकारे राजकीय पक्षाची सभा साईनगर मैदानात आयोजित करणेस परवानगी दिलेस इतरही पक्ष सभा आयोजित करणेस परवानगी मागतील. तसेच साईनगर परिसरातील राहणा-या कर्मचा-यांना, शाळा व हॉस्पीटल यांना ध्वनीप्रदुषण होणेची शक्यता नाकारता येत नाही.

दि.२४/०५/२००८ रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेत विषय नं.६६ व निर्णय क्र.४७९ अन्वये यावर सविस्तर चर्चा होऊन शिर्डी गांवातील सार्वजनिक कार्यक्रमासाठी साईनगर परिसरात आकार

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



घेऊन मोकळे मैदान द्यावे व विजपूरवठा करणेत यावा असे ठरलेले आहे. तथापि साईनगर मैदानाचा आकार किती घ्यावा विजपुरवठा दिलेस विद्युत आकार घ्यावा किंवा कसे याबाबत निर्णय झालेला नाही.

उपरोक्त निर्णयानुसार दि. ०५/११/२००८ रोजी सकाळी ११.०० वा. बहुजन समाज पार्टीचे मार्फत जन चेतना आंदोलनची सभा आयोजित करणेस, त्यासाठी साईनगर मैदान आकार घेऊन देणेस तसेच साईनगर गेटजवळ बोर्ड लावणेस परवानगी देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता तो अमान्य करण्यात आला.

याचवेळी येथून पूढे साईनगर मैदान कोणत्याही खाजगी व राजकीय प्रकारच्या कार्यक्रमास भाडोत्री देण्यात येऊ नये असे ठरले. (कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-०५)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.४९** **क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले ग्रामिण रुग्णालय,शिखर शिंगणापूर यांना रुग्णालयाचे बांधकाम व वैद्यकीय उपकरणे खरेदीस आर्थिक मदत देणेबाबत.**

**निर्णय क्र.८०६** सदरहू विषय छाननी समितीचे सभेपूढे निर्णयार्थ सादर करावा असे ठरले.(कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-०३)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.५०** **अपंगांसाठी व्हील चेअर ॲम्ब्यूलन्स खरेदीसाठी स्फुर्ती वेलफेअर ट्रस्ट मुंबई आर्थिक मदत मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.८०७** सदरहू विषय छाननी समितीचे सभेपूढे निर्णयार्थ सादर करावा असे ठरले.(कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-०३)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.५१** **अहमदनगर जिल्ह्यात कुपोषण निर्मुलन अभियानाकरिता बाल विकास केंद्रांना सहकार्य करणेबाबत.**

**निर्णय क्र.८०८** सदरहू विषय छाननी समितीचे सभेपूढे निर्णयार्थ सादर करावा असे ठरले.

(कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-०३)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.५२** **श्री साईबाबा संस्थानच्या स्थापित व्यवस्थापन निधीमध्ये सन २००७-२००८ या आर्थिक वर्षात प्रत्यक्ष झालेल्या खर्चाच्या मर्यादेपर्यन्त वाढ करणेसाठी शासनाकडे प्रस्ताव सादर करणेबाबत**

**निर्णय क्र.८०९** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुदीप्रमाणे दिनांक २३ ऑगस्ट, २००४ च्या अधिसुचनेनुसार श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेचे व्यवस्थापन शासन नियुक्त मा.व्यवस्थापन समितीकडून सुरु आहे.

अ) या अधिनियमातील **व्यवस्थापन निधी व त्याचा विनियोग** संबंधीत कलम २२ मधील तरतूद पुढील प्रमाणे आहे.

०१. व्यवस्थापन निधी नावाचा एक स्वतंत्र निधी घटीत करण्यात येईल व तो समितीकडे निहीत असेल व समितीच्या नियंत्रणाखाली असेल.

व्यवस्थापन निधीत शिल्लक रक्कम उपलब्ध असल्यास ती विचारात घेऊन, विश्वस्तव्यवस्थेच्या लगतपुर्व वर्षातील अंदाजे स्थूल वार्षीक उत्पन्नाच्या दहा टक्क्यांपेक्षा अधिक नसेल इतकी समितीकडून निश्चित करण्यात येईल एवढी रक्कम, राज्य शासनाच्या मान्यतेने, दरवर्षी या निधीमध्ये जमा करण्यात येईल. राज्य शासनास, आवश्यक वाटले तर, कोणत्याही वर्षात विश्वस्तव्यवस्था निधीतून कोणत्याही अतिरिक्त रकमा या निधीत जमा करण्याबद्दल कोणत्याही वेळी, निर्देश देता येईल.

व्यवस्थापन निधीचा, राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून, पुढील प्रयोजनांसाठी उपयोग करण्यात येईल:-

क) समितीचा अध्यक्ष, उपाध्यक्ष, व इतर सदस्य यांना मानधन, फी व भत्ते देणे

ख) समितीचे इतर अधिकारी व कर्मचारी यांचे वेतन व भत्ते देणे.

ग) या अधिनियमाखालील आपल्या अधिकारांचा वापर करतांना आणि आपली कर्तव्ये व कामे पार पाडतांना, समितीने किंवा कोणत्याही सदस्याने किंवा अधिकाऱ्यांने किंवा कर्मचाऱ्याने कायदेशिररीत्या केलेल्या कोणत्याही खर्चाची रक्कम देणे.

उपरोक्त अधिनियमातील कलम २२(२) मध्ये निर्देशित केल्याप्रमाणे लगतपुर्व वर्षातील अंदाजे स्थुल वार्षिक उत्पन्नाच्या १० टक्क्यांपेक्षा अधिक नसेल इतकी रक्कम व्यवस्थापन निधीत वर्ग करण्याबाबत तरतुद करण्यात आलेली आहे. तथापि, सदरची तरतुद ही प्रायोजीत बाबींवरील खर्चासाठी अपुरी आहे. त्यासाठी व्यवस्थापन निधीत वर्ग करावयाच्या रकमेचे प्रमाण लगतच्या वर्षाच्या स्थुल उत्पन्नाच्या १० टक्क्यांऐवजी २५% करणेबाबत व त्यादृष्टीने अधिनियमातील कलम २२(२) या तरतुदीत सुधारणा करणेसाठी मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक २७ डिसेंबर, २००४ चे सभेतील निर्णय क्र. १३४ अन्वये व्यवस्थापन निधीत वर्ग करावयाच्या रकमेची मर्यादा वाढवून घेणेकामी जा.नं.एसएसएस-वशी-लेखा-२३२८-०५ दिनांक ०३ मार्च,२००५ अन्वये राज्य शासनाकडे प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे. तसेच त्या अनुषंगाने जा.नं.एसएसएस-वशी-लेखा-१२४४१-०५ दिनांक २८ ऑक्टोबर २००५ अन्वये

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



अधिनियमातील तरतुदीत सुधारणा करण्याबाबत राज्य शासनाकडे पुनःश्च एकदा प्रस्तावित करण्यात आलेले आहे. उपरोक्त दोनही प्रस्ताव शासन स्तरावर विचाराधीन आहेत.

**ब)** सन २००७-०८ या आर्थिक वर्षाचा लेखापरिक्षण अहवाल दिनांक २९ सप्टेंबर, २००८ रोजी प्राप्त झालेला असून सदर अहवाल मा.व्यवस्थापन समितीच्या आजच्या सभेसमोर नोंद घेणेकामी सादर करण्यात आलेला आहे.

सदर अहवालातील खर्चाच्या बाबीवरील मुद्दा क्र. ०२ मध्ये वैधानिक लेखापरिक्षक यांनी खालीलप्रमाणे भाष्य केलेले आहे.

**02.** Details of Expenses towards Management Fund shown in Sch. चKछ for the year 2007-08 were as under:

| Particulars | Amount |
|---|---|
| Board Meeting Expenses | 1,38,583.00 |
| Staff Salary | 10,14,56,774.00 |
| Prov. Fund (Sansthan Contribution) | 1,10,64,120.00 |
| Gratuity | 36,26,529.91 |
| Travelling Exp. | 5,61,310.50 |
| **Total** | **11,68,47,317.41** |

As against above expenditure, contribution to Management Fund was calculated & brought in to account as Rs. 11,61,90,309.00 as per provisions of 22(2) of Act(Amendment), 2004, leaving excess of expenditure over contribution of Rs.6,57,008,.41 which was debited to Income & Expenditure Account for the year 2007-08. Sansthan is advised to obtain permission of the State Government for the deficit referred above.

उपरोक्त मुद्यात नमुद केल्याप्रमाणे व अधिनियमातील तरतुदीनुसार लगतपुर्व वर्षातील म्हणजे सन २००६-०७ या आर्थिक वर्षातील स्थुल उत्पन्नाच्या १० टक्के येणारी रक्कम ही रु. ११,६१,९०,३०९.०० एवढी असून प्रायोजीत बाबींवर व्यवस्थापन निधीमधून झालेला प्रत्यक्ष खर्च रु. ११,६८,४७,३१७.४१ एवढा दर्शविण्यात आलेला आहे. म्हणजेच रु. ६,५७,००८.४१ एवढा खर्च अधिनियमातील तरतूदीपेक्षा अधिक झालेला आहे. संस्थानचे वैधानिक लेखापरीक्षक यांनी त्यांच्या अहवालात, या अधिक झालेल्या खर्चास अधिनियमातील कलम २२(२)मधील तरतुदीनुसार शासनाची मान्यता घेणेबाबत सुचीत केलेले आहे.

त्या अनुषंगाने उपरोक्त **परिच्छेद ब** मध्ये नमुद केल्याप्रमाणे अधिनियमातील कलम २२(२) मधील तरतूदीनुसार सन २००७-०८ या आर्थिक वर्षात प्रायोजीत बाबींवर झालेल्या प्रत्यक्ष खर्चाएवढी रक्कम रु. ११,६८,४७,३१७.४१ मात्र, म्हणजेच रु. ६,५७,००८.४१ एवढी तरतुदीपेक्षा अधिक रक्कम व्यवस्थापन निधी मध्ये वर्ग करणेस शासन मान्यता आवश्यक आहे. त्यासाठी शासनाकडे प्रस्ताव सादर करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन,उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे अधिनियमातील कलम २२(२) मधील तरतूदीनुसार सन २००७-०८ या आर्थिक वर्षात प्रायोजित बाबींवर झालेल्या प्रत्यक्ष खर्चाएवढी रक्कम रुपये ११,६८,४७,३१७.४१ मात्र म्हणजेच रुपये ६,५७,००८.४१ एवढी तरतूदीपेक्षा अधिक रक्कम व्यवस्थापन निधीमध्ये वर्ग करणेकामी प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यास,मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-मुख्य लेखाधिकारी )

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.५३** **श्री साईबाबा संस्थानच्या स्थापित व्यवस्थापन निधीमध्ये सन २००८-२००९ या आर्थिक वर्षासाठी वाढ करणे बाबत**

**निर्णय क्र.८१०** श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुदीप्रमाणे दिनांक २३ ऑगस्ट, २००४ च्या अधिसुचनेनुसार श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेचे व्यवस्थापन शासन नियुक्त मा.व्यवस्थापन समितीकडून सुरु आहे.

अ) या अधिनियमातील **व्यवस्थापन निधी व त्याचा विनियोग** या संबंधीत कलम २२ मधील तरतूद पुढील प्रमाणे आहे.

०१. व्यवस्थापन निधी नावाचा एक स्वतंत्र निधी घटीत करण्यात येईल व तो समितीकडे निहीत असेल व समितीच्या नियंत्रणाखाली असेल.

२.व्यवस्थापन निधीत शिल्लक रक्कम उपलब्ध असल्यास ती विचारात घेऊन, विश्वस्तव्यवस्थेच्या लगतपुर्व वर्षातील अंदाजे स्थूल वार्षीक उत्पन्नाच्या दहा टक्क्यांपेक्षा अधिक नसेल इतकी समितीकडून निश्चित करण्यात येईल एवढी रक्कम, राज्य शासनाच्या मान्यतेने, दरवर्षी या निधीमध्ये जमा करण्यात येईल. राज्य शासनास, आवश्यक वाटले तर, कोणत्याही वर्षात विश्वस्तव्यवस्था निधीतून कोणत्याही अतिरिक्त रकमा या निधीत जमा करण्याबद्दल कोणत्याही वेळी, निर्देश देता येईल.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



०३.व्यवस्थापन निधीचा, राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून, पुढील प्रयोजनांसाठी उपयोग करण्यात येईल:-

क) समितीचा अध्यक्ष, उपाध्यक्ष, व इतर सदस्य यांना मानधन, फी व भत्ते देणे

ख) समितीचे इतर अधिकारी व कर्मचारी यांचे वेतन व भत्ते देणे.

ग) या अधिनियमाखालील आपल्या अधिकारांचा वापर करतांना आणि आपली कर्तव्ये व कामे पार पाडतांना, समितीने किंवा कोणत्याही सदस्याने किंवा अधिकाऱ्यांने किंवा कर्मचाऱ्याने कायदेशिररीत्या केलेल्या कोणत्याही खर्चाची रक्कम देणे.

उपरोक्त अधिनियमातील कलम २२(२) मध्ये निर्देशित केल्याप्रमाणे लगतपुर्व वर्षातील अंदाजे स्थुल वार्षिक उत्पन्नाच्या १० टक्क्यांपेक्षा अधिक नसेल इतकी रक्कम व्यवस्थापन निधीत वर्ग करण्याबाबत तरतुद करण्यात आलेली आहे. तथापि, सदरची तरतुद ही प्रायोजीत बाबींवरील खर्चासाठी अपुरी आहे. त्यासाठी व्यवस्थापन निधीत वर्ग करावयाच्या रकमेचे प्रमाण लगतच्या वर्षाच्या स्थुल उत्पन्नाच्या १० टक्क्यांऐवजी २५% करणेबाबत व त्यादृष्टीने अधिनियमातील कलम २२(२) या तरतुदीत सुधारणा करणेसाठी मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक २७ डिसेंबर, २००४ चे सभेतील निर्णय क्र. १३४ अन्वये व्यवस्थापन निधीत वर्ग करावयाच्या रकमेची मर्यादा वाढवून घेणेकामी जा.नं.एसएसएस-वशी-लेखा-२३२८-२००५ दिनांक ३ मार्च,२००५ अन्वये राज्य शासनाकडे प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे. तसेच त्या अनुषंगाने जा.नं.एसएसएस-वशी-लेखा-१२४४१-२००५ दिनांक २८ ऑक्टोबर,२००५ अन्वये अधिनियमातील तरतुदीत सुधारणा करण्याबाबत राज्य शासनाकडे पुनःश्च एकदा प्रस्तावित करण्यात आलेले आहे. उपरोक्त दोनही प्रस्ताव शासन स्तरावर विचाराधिन आहेत.

ब) सन २००७-०८ या आर्थिक वर्षाचा लेखापरिक्षण अहवाल प्राप्त झाला असून सन २००८-०९ हे आर्थिक वर्ष सध्या सुरु आहे. चालू आर्थिक वर्षात नविन प्रसादालय, नविन भक्तनिवास (द्वारावती इमारत) नव्याने सुरु करण्यात येत असल्यामुळे याठिकाणी आवश्यक असणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या नव्याने नेमणूका होणार आहेत. तसेच कर्मचाऱ्यांचा महागाई भत्त्यातही वाढ होणार आहे. २००८-०९ या आर्थिक वर्षात ६ व्या वेतन आयोग अंमलात येण्याचीही शक्यता आहे. त्या अनुशंगाने भविष्य निर्वाह निधी, उपदान या खर्चातही वाढ होणार असल्याने सन २००८-०९ या आर्थिक वर्षात व्यवस्थापन निधीतून करावयाच्या विविध बाबींवरील संभाव्य खर्च अंदाजे रक्कम रु. १८.५० कोटी होईल असे वाटते.

अधिनियमातील तरतुदीनुसार, लगतपुर्व वर्षातील म्हणजे सन २००७-०८ या आर्थिक वर्षातील स्थूल वार्षीक उत्पन्न रु. १५९.३१ कोटी एवढे असून या रकमेच्या १०% म्हणजे रु. १५.९३ कोटी एवढी रक्कम व्यवस्थापन निधीत वर्ग करणेबाबत तरतूद आहे. तथापि, प्रायोजीत बाबींवर होणारा खर्च अंदाजे रु. १८.५० कोटी पर्यंत असल्यामुळे सदरची तरतूद कमी पडणार असून त्यापेक्षा होणारा खर्च रु. ०२.५७ कोटी अधिक होणार आहे.

तरी, उपरोक्त परिच्छेदमध्ये नमुद केल्याप्रमाणे अधिनियमातील कलम २२ (२) मधील तरतूदीनुसार सन २००८-०९ या आर्थिक वर्षासाठी प्रायोजित बाबींवर होणारा खर्च अंदाजे रु. १८.५० कोटी विश्वस्तव्यवस्था निधीतून व्यवस्थापन निधीमध्ये वर्ग करणेस शासनाची मान्यता आवश्यक आहे. त्यासाठी शासनाकडे प्रस्ताव सादर करणेकामी मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे अधिनियमातील कलम २२(२) मधील तरदूतीनुसार सन २००८-०९ या आर्थिक वर्षासाठी प्रायोजित बाबींवर होणारा खर्च अंदाजे रुपये १८.५० कोटी विश्वस्तव्यवस्था निधीतून व्यवस्थापन निधिमध्ये वर्ग करणेस मान्यता मिळणेकामी शासनाकडे प्रस्ताव सादर करण्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-मुख्य लेखाधिकारी )

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.५४** **आयकर कायदा १९६१ च्या तरतूदीनुसार सन २००१-२००२ या आर्थिक वर्षापासूनच्या अखर्चीत उत्पन्नाच्या खर्चाबाबत.**

**निर्णय क्र.८११** **अ)** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांस सर्व माध्यमांद्वारे मिळणारे उत्पन्न हे आयकर कायदा, १९६१ चे कलम १०(२३)(सी)(v) अन्वये संपूर्ण करमुक्त आहे. या कलमांतर्गत तरतुदींमध्ये सन २००२ मध्ये सुधारणा झालेल्या असून, सुधारित तरतूद पूढीलप्रमाणे आहे.

Provided also that the fund or trust or institution [ or any university or other educational institution or any hospital or other medical institution ] referred to in sub-clause (iv) or sub clause (v) [or sub clause (vi) or sub clause(VIA)]

(a) applied its income, or accumulates it for application, wholly and exclusively to the objects for which it is established and in a case where more than fifteen percent of its income is accumulated on or after the १st day of April, २००२, the period of the accumulation of the amount exceeding fifteen percent of its income shall in no case exceed five years.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



उपरोक्त सुधारीत तरतुदीनुसार एका आर्थिक वर्षात मिळालेल्या एकूण उत्पन्नापैकी ८५% उत्पन्न हे त्याच आर्थिक वर्षात खर्च करणे बंधनकारक आहे तसे शक्य न झाल्यास या ८५% उत्पन्नापैकी अखर्चीत रक्कम त्या पूढील पाच आर्थिक वर्षामध्ये खर्च करता येईल व दरम्यान या रकमेची आयकर कलम ११ अन्वये विहीत पद्धतीने गुंतवणूक करावी लागेल. पुढील पाच आर्थिक वर्षात सदरची अखर्चीत रक्कम संस्थानच्या कोणकोणत्या उद्दीष्टांवर खर्च करण्यात येईल या विषयी मा. व्यवस्थापन समितीने नियोजनाबाबत निर्णय घेऊन तो संस्थानच्या आयकर विवरण पत्रासोबत आयकर विभागकडे सादर करणे बंधनकारक आहे.

**ब)** उपरोक्त तरतुदीनुसार सन २००१-०२ ते २००६-०७ या आर्थिक वर्षातील संस्थानचे आयकर विवरणपत्र आयकर कार्यालयाकडे दाखल करतांना दर्शविण्यात आलेले एकूण अखर्चीत उत्पन्न, दि. ३१ मार्च, २००७ अखेर त्यातून केलेला खर्च व दि. ३१ मार्च, २००७ रोजी शिल्लक अखर्चीत उत्पन्न याबाबतचा तपशील खालील प्रमाणे :

| **आर्थिक वर्ष** | **एकूण अखर्चीत उत्पन्न रु.** | **दि. ३१.०३.२००७ अखेर दर्शविण्यात आलेला खर्च** | **दि. ३१.०३.२००७ अखेर शिल्लक अखर्चीत उत्पन्न** |
|---|---|---|---|
| २००१-०२ | २२,९५,९३,६०६.०० | २२,९५,९३,६०६.०० | -- |
| २००२-०३ | २८,०८,३६,२१२.०० | २८,०८,३६,२१२.०० | -- |
| २००३-०४ | ३२,५७,९९,१९५.०० | २३,२२,८८,०६५.०० | ९,३५,११,१३०.०० |
| २००४-०५ | ३७,१०,९०,७७६.०० | ५,७६,४३,५७२.०० | ३१,३४,४७,२०४.०० |
| २००५-०६ | ४३,४६,६२,१२१.०० | -- | ४३,४६,६२,१२१.०० |
| २००६-०७ | २७,२८,२३,२८७.०० | -- | २७,२८,२३,२८७.०० |

उपरोक्त सन २००१-०२ ते सन २००४-०५ या आर्थिक वर्षातील अखर्चीत उत्पन्नातून दर्शविण्यात आलेला खर्च हा तत्कालीन मा. व्यवस्थापन मंडळ व विद्यमान व्यवस्थापन समितीच्या सभेतील निर्णयानुसार करण्यात आलेला असून सन २००४-०५ ते सन २००६-०७ या आर्थिक वर्षातील अखर्चीत उत्पन्न दि. ३१ मार्च, २००७ रोजी वरील तक्त्यात नमुद केल्याप्रमाणे खर्च करणे बाकी आहे. सदर दर्शविण्यात आलेला खर्च हा त्या-त्या आर्थिक वर्षातील वैधानिक लेखापरिक्षक व संस्थानचे आयकर सल्लागार मे. एस.एस. गणपूले अँड कं., मुंबई यांचा सल्ला घेऊन करण्यात आलेला आहे.

**क)** सन २००७-०८ या आर्थिक वर्षाचे लेखापरिक्षण मे. शरद एस. गायकवाड अँड कं., चार्टर्ड अकौंटंट्स, मुंबई यांनी पुर्ण केले असून संस्थानचे सन २००७-०८ आर्थिक वर्षाचे आयकर विवरण पत्र मा. व्यवस्थापन समितीच्या दि. ०६ सप्टेंबर, २००८ च्या सभेतील निर्णयानुसार आयकर कार्यालयाकडे दि.३० सप्टेंबर, २००८ रोजी दाखल करण्यात आलेले आहे. सदरचे आयकर विवरणपत्र दाखल करतांना सन २००३-०४, २००४-०५ व सन २००६-०७ या आर्थिक वर्षातील शिल्लक राहिलेल्या अखर्चीत उत्पन्नापैकी अनुक्रमे रु. ९,३५,११,१३०.००, रु. ३१,३४,४७,२०४.०० व रु. १५,००,००,०००.०० एवढी रक्कम संस्थानच्या विविध ध्येय व उद्दीष्टांवर मा. व्यवस्थापन समितीच्या सभेतील निर्णयानुसार सन २००७-०८ या आर्थिक वर्षात खर्च केल्याचे दर्शविण्यात आले आहे. याबाबत संस्थानचे वैधानिक लेखापरिक्षक मे. शरद एस. गायकवाड ॲड कं., चार्टर्ड अकौंटंट्स, मुंबई व संस्थानचे आयकर सल्लागार मे. एस.एस. गणपूले अँड कं., मुंबई, संस्थानचे पुर्व लेखापरिक्षक शास्त्री पुरोहीत ॲण्ड असोसिएट्स तसेच संस्थानचे अंतर्गत लेखापरिक्षक ए.जी. लोंगाणी आणि व्ही.व्ही. कोठारी, चार्टर्ड अकौंटंट्स यांचे मार्गदर्शन/सल्ला घेण्यात आलेला असुन, त्यांच्या सल्ल्यानुसारच सदर खर्च दर्शविण्यात आलेला आहे.

अशा प्रकारे मागील आर्थिक वर्षातील शिल्लक असलेल्या अखर्चीत उत्पन्नाचा काही भाग सन २००७-०८ या आर्थिक वर्षात खर्च करण्यात आल्याचे दर्शविल्यानंतर, सन २००७-०८ या आर्थिक वर्षाचे एकूण अखर्चीत उत्पन्न रु. ६५,७१,७५,२२०.०० एवढे शिल्लक दिसत आहे. सदरचे अखर्चीत उत्पन्न मा. व्यवस्थापन समितीच्या निर्णयानुसार पूढील पाच आर्थिक वर्षात संस्थानच्या विविध ध्येय व उद्दिष्टांवर खर्च करणे संस्थान व्यवस्थापनावर बंधनकारक आहे.

**ड)** वरील परिच्छेद **ब** व **क** मध्ये नमुद केल्यानुसार दि. ३१ मार्च, २००८ अखेर शिल्लक राहिलेले अखर्चीत उत्पन्न व ते खर्च करण्यासाठी उपलब्ध असलेली कालमर्यादा पुढीलप्रमाणे आहे:

| आर्थिक वर्ष | दि. ३१.०३.०८ रोजी शिल्लक असलेले अखर्चीत उत्पन्न रु. | खर्च करण्यासाठी उपलब्ध कालमर्यादा |
|---|---|---|
| २००१-०२ | निरंक | -- |
| २००२-०३ | निरंक | -- |
| २००३-०४ | निरंक | -- |
| २००४-०५ | निरंक | -- |
| २००५-०६ | ४३,४६,६२,१२१.०० | सन २०१०-११ अखेर |
| २००६-०७ | १२,२८,२३,२८७.०० | सन २०११-१२ अखेर |
| २००७-०८ | ६५,७१,७५,२२०.०० | सन २०१२-१३ अखेर |

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



| | | |
|---|---|---|
| एकूण - | १२१,४६,६०,६२८.०० | |

उपरोक्तपणे नमुद करण्यात आलेले अखर्चीत उत्पन्न त्या समोर दर्शविण्यात आलेल्या आर्थिक वर्षाअखेर खर्च करणे, आयकर कायदा, १९६१ मधील तरतुदींन्वये संस्थानवर बंधनकारक आहे. सदरची अखर्चीत रक्कम वर दर्शविलेल्या कालावधीमध्ये पुर्णतः खर्च न झाल्यास शिल्लक राहिलेली अखर्चीत रक्कम त्यापुढील आर्थिक वर्षात करपात्र म्हणून हिशोबात धरली जाईल व त्या रकमेवर आयकर कायद्यातील कलम ४ अन्वये करपात्र म्हणून धरलेल्या आर्थिक वर्षासाठी लागू असलेल्या महत्तम आकारणी दराने (Maximum Rate) आयकराची आकारणी केली जाईल. त्यासाठी आयकर तरतुदीनुसार उपलब्ध कालमर्यादेतच, तसेच मा.व्यवस्थापन समितीने याबाबत त्या त्या वेळी घेतलेल्या निर्णयानुसारच सदरचे अखर्चीत उत्पन्न खर्च करण्याच्या दृष्टीने नियोजन होणे अत्यावश्यक आहे. अन्यथा अखर्चित उत्पन्नावर मोठयाप्रमाणात आयकर भरावा लागेल.

**इ. १.** उपरोक्त परिच्छेद **ब** मध्ये नमुद केल्याप्रमाणे सन २००३-०४ ची अखर्चीत रक्कम रु. ९,३५,११,१३०.००, सन २००४-०५ ची अखर्चीत रक्कम रु. ३१,३४,४७,२०४.०० व सन २००६-०७ ची अखर्चित रक्कम रु. २७,२८,२३,२८७.०० पैकी रु. १५,००,००,०००.०० मात्र सन २००७-०८ या आर्थिक वर्षात खर्च झाल्याचे दर्शविणे.

उपरोक्त परिच्छेद **क** मध्ये नमुद केल्याप्रमाणे सन २००७-०८ या वर्षातील अखर्चीत रक्कम रु. ६५,७१,७५,२२०.०० एवढी दर्शविणे.

तरी परिच्छेद **इ** अ.नं. १ मध्ये नमुद केलेला खर्च दर्शविणेस व अ.नं.२ मध्ये नमूद केल्याप्रमाणे अखर्चित रक्कम दर्शविणेकामी मान्यता मिळणेस व परिच्छेद **ड** मध्ये नमुद केलेली एकूण अखर्चीत रक्कम रु. १२१,४६,६०,६२८.०० खर्च करणेकामी नियोजन होणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-मुख्य लेखाधिकारी)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.५५ पुस्तके/फोटो, सी.डी/व्हीसीडी संस्थान प्रकाशने छपाई करणे विक्री किमती ठरविणे वगैरे रुटीनच्या कामाची कार्यालयीन पद्धती निश्चीत करणेबाबत.**

**निर्णय क्र.८१२** सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.१४ च्या कलम नं.१७ ठ मध्ये खालील प्रमाणे तरतूद आहे.

**समितीची कर्तव्ये व अधिकार**

"श्रीसाईबाबांचे जीवन त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहीतीचा प्रचार- प्रसार करील आणि साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील"

उपरोक्त तरतूदीनूसार साईभक्तांसाठी संस्थानमार्फत वेगवेगळया भाषेत साईचरित्र, आरत्या वगैरे पुस्तकांची फोटोची छपाई करुन विक्री केली जाते तसेच सी.डी. , व्हीसीडीची निर्मीती करुन विक्री केली जाते. दिवसेंदिवस साईभक्तांची वाढणारी लक्ष्मणीय संख्या विचारात घेता संस्थान प्रकाशनास मोठ्या प्रमाणात मागणी असते. साईभक्तांची गैरसोय होऊ नये म्हणून वेळोवेळी पुस्तक, फोटो, छपाई सीडी ,व्हीसीडी निर्मीती करावी लागते, सध्या उपरोक्त कामाची कार्यालयीन पद्धती खालील प्रमाणे आहे.

१) या कामी मा. व्यवस्थापन समितीच्या मान्यतेने वार्षीक बजेट तरतूद करण्यात येते.

२) गरजेनुसार छपाईकामी मा. व्यवस्थापन समितीची तत्वतः मान्यता घेण्यात येते.

३) मा. व्यवस्थापन समितीने ठरविलेल्या शार्ट लिस्ट मधील छपाई धारकांकडून छपाईकामी दरपत्रके मागविली जातात.

४) आलेली दरपत्रके मा. उपसमितीसमोर उघडण्यात येतात. विक्री किंमती निश्चित करतांना छपाईची किंमत आधिक कर्मचा-यांचा पगार, स्टेशनरी, विद्युत आकार वगैरे खर्च विचारात घेता साधारणपणे छपाई किंमतीच्या २०% आधीक भक्तांना देण्यात येणारा डिस्कांउट २०% याप्रमाणे विक्री किंमत मा. व्यवस्थापन समितीचे मान्यतेने ठरविण्यात येते.

५) मा. व्यवस्थापन समितीचे मान्यतेनंतर निम्नतम दर असणा-या प्रेसला छपाई कामाचे कार्यादेश देण्यात येतात. पुस्तकांची छपाई होणेस विलंब होऊ नये साईभक्तांची गैरसोय होऊ नये म्हणून मा. उपसमितीच्या मान्यतेने निम्नतम दर असल्यास कार्योदश देण्यात येऊन मा. व्यवस्थापन समितीची कार्योत्तर मान्यता घेतली जाते.

उपरोक्त कामकाज हे रुटींन स्वरुपाचे आहे, तथापी उपरोक्त कार्यालयीन कार्य प्रणालीनुसार छपाई कामात विलंब होतो. पर्यायाने वेळीच प्रकाशने उपलब्ध न झाल्याने भक्तांची गैरसोय होते.

भक्तांची गैरसोय होऊ नये वेळोवळी साठा उपलब्ध व्हावा या करीता खालील सुधारीत पद्धत अवलंबणे बाबत विचार होणेस विनंती.

१) मा. व्यवस्थापन समितीने मंजूर केलेल्या बजेटच्या आधीन राहून, मा. व्यवस्थापन समितीने मंजूर केलेल्या शार्ट लिस्ट मधील प्रेसकडून मा. कार्यकारी अधिकारी यांनी प्रथमतः दरपत्रके मागवावीत.

२) आलेली दरपत्रके मा.व्यवस्थापन समितीच्या सदस्यांसमोर उघडावीत .

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



३) निम्नतम दर + निम्नतम दराच्या २०% कर्मचारी पगार, विद्युत आकार वगैरे खर्चास+भक्तांना दिला जाणारा २०% डिस्काउंट याप्रमाणे विक्री किंमत निश्चीत करावी. मा. उपसमितीच्या मान्यतेने निम्नतम दर असणा-या प्रेसला मा. कार्यकारी अधिकारी यांनी कार्यादेश द्यावेत.
४) उपरोक्त कामकाजाचा कार्योत्तर अहवाल मा. व्यवस्थापन समितीच्या सभेत मान्यतेसाठी सादर करावा.

उपरोक्तप्रमाणे कार्यालयीन कार्यवाहीची पद्धत निश्चित करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-प्रकाशने विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.५६** **दिवाळी (लक्ष्मीपुजन)निमित्त फुलांची सजावट करुन घेणे बाबत.**
**निर्णय क्र.८१३** साईभक्त श्री रविंद्र तलवार, दिल्ली यांनी मंगळवार दिनांक २८.१०.२००८ रोजी दिवाळी (लक्ष्मीपूजन) निमित्त फुलांची सजावट (डेकोरेशन) करण्यास परवानगी मिळावी अशी विनंती केलेली आहे.

मंदिर व मंदिर परिसरात फुलांच्या सजावटीचे काम प्रत्येक उत्सवात देणगी किंवा संस्थानमार्फत करुन घेण्यात येते. श्री रामनवमी उत्सवात शिर्डी ग्रामस्थांनी व श्री गुरुपौर्णिमा उत्सवात श्री के.सी.सुब्रामनी राजू, बंगलोर यांनी फुलांचे सजावटीचे काम केलेले आहे.

तरी दिनांक २८.१०.२००८ रोजी दिवाळी (लक्ष्मीपूजन) निमित्त फुलांचे सजावटीचे काम श्री रविंद्र तलवार, दिल्ली यांचेकडून करुन घेण्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही- मंदिर विभाग)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.५७** **नवीन श्रीसाईप्रसादालय येथील व्ही.आय.पी डायनिंग हॉलमध्ये स्वतंत्र किचन व सर्व्हिस काऊंटर तयार करणेबाबत.**
**निर्णय क्र.८१४** संस्थानचे जुने प्रसादालयामध्ये व्ही.आय.पी. साठी स्वतंत्र प्रसाद भोजन देतांना ते गरम करणे, जादा भाज्या तयार करणे, पापड भाजणे किंवा नाष्टा तयार करणे या सारख्या सुविधांसाठी व्ही.आय.पी. साठी स्वतंत्र किचन व सर्व्हिस टेबल तयार करण्यात आलेला आहे. नविन प्रसादालय येथील व्ही.आय.पी. साठी स्वतंत्र किचन व्यवस्था नाही. सदरचे काम तातडीचे असल्यामुळे याकामी नवीन प्रसादायल येथील अंतर्गत सजावट व फर्निचरचे कामासाठी आर्किटेक्ट म्हणून नेमणूक करण्यात आलेल्या आर्किटेक्ट अमृता पवार, नाशिक यांचेकडून दि. २५/०९/२००८ रोजी प्लॅन व अंदाजपत्रक तयार करुन घेण्यात आले आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | कामाचा तपशिल | परिमाण | एकक | दर | रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | Kitchen Trolley S.S. Basket CRC Pipe frame with Powder Coating M.S. Carrier Hinjes | ३८. | RFT | ३६००.०० | १,३६,८००.०० |
| ०२ | Corocel | ०१ | No | १०,०००.०० | १०,०००.०० |
| ०३ | M.D.F. Shutter १८ mm | १५०/- | SFT | ५८०.०० | ८७,०००.०० |
| ०४ | Corean Kitchen Platform | ७६/- | SFT | १०००.०० | ७६,०००.०० |
| | | | | एकूण रुपये | ३,०९,८००.०० |

सदरहू काम नविन प्रसादालय अंतर्गत सजावटीसाठी मा. व्यवस्थापन समितीचे निर्णय क्र. ५२४ दि. २८/०७/२००८ अन्वये मंजूर रकमेपैकी शिल्लक असलेल्या रकमेतून करता येईल. विषयांकित काम हे Specialised स्वरुपाचे असल्याने अशी Modulor Kitchen ची कामे करणाऱ्या उत्पादक अथवा ठेकेदार यांचेकडून कोटेशन्स मागविण्यात आली आहे. प्राप्त झालेल्या कोटेशन्सचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | कोटेशन धारकाचे नांव |
|---|---|
| ०१ | मे. सुदर्शन फ्लेक्झिबल पॅकेजिंग प्रा.लि., नाशिक |
| ०२ | मे. एम.एस. शेल्टर, नाशिक |
| ०३ | मे. आदित्य एन्टरप्रायजेस, नाशिक |
| ०४ | मे. माय. किचन सिस्टिम , नाशिक |

तरी उपरोक्त प्राप्त झालेले कोटेशन्स आजचे सभेत समक्ष उघडण्यात आलेला कोटेशन्सधारकांनी खालीलप्रमाणे दर देऊ केलेले आहेत.

| अ.नं. | कोटेशन धारकाचे नांव | कोटेशनमधील दर रुपये |
|---|---|---|
| ०१ | मे. सुदर्शन फ्लेक्झिबल पॅकेजिंग प्रा.लि., नाशिक | ४,५५,१००.०० |
| ०२ | मे. एम.एस. शेल्टर, नाशिक | ५,८२,६४०.०० |

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



| | | |
|---|---|---|
| ०३ | मे. आदित्य एन्टरप्रायजेस, नाशिक | ३,३४,७५०.०० |
| ०४ | मे. माय. किचन सिस्टिम , नाशिक | २,७७,४९१.०० |

यावर सविस्तर चर्चा होऊन, मे. माय. किचन सिस्टिम, नाशिक यांचे निम्नतम दर स्विकारणेत येऊन,त्यांना कार्यादेश देण्यात यावा,असें ठरले. (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**विषय नं. ५८** **विविध विकास व बांधकाम प्रकल्पांबरोबरच इतर अनुदानित विकास प्रकल्पांसाठी आर्थिक तरतूद करणेबाबत.**

**निर्णय क्र.८१५** बांधकाम विभागामार्फत विविध विकास बांधकाम प्रकल्पांबरोबरच इतर अनुदानित विकास प्रकल्पांसाठी येत्या ०३ वर्षात ढोबळ मानाने करावयाच्या अंदाजपत्रकीय तरतुदीबाबतचा गोषवारा खालीलप्रमाणे :

*** रक्कम रुपये लाखात**

| अ.नं. | तपशील | रक्कम |
|---|---|---|
| ०१ | सध्याचे मंदिर व प्रसादालय परिसरात सुधारणा करणे (प्रस्तावित) | २५००.०० |
| ०२ | शिर्डी शहर एकात्मिक रस्ते विकास प्रकल्प (मरारविम / नगरपंचायत) (शासन निर्णयानुसार रुपये २८ कोटी मात्रस मंजुरी तथापि सुधारीत प्रस्तावानुसार येणारा अंदाजित खर्च ) | ८०००.०० |
| ०३ | नवीन रुग्णालय इमारत बांधकाम करणे (प्रस्तावित) | ७६००.०० |
| ०४ | शैक्षणिक संकुल (प्रस्तावित) | २०००.०० |
| ०५ | नियोजित साईआश्रम प्रकल्प बाह्य सुविधा (निविदा स्तरावर) | २२००.०० |
| ०६ | आध्यात्मिक व मनोरंजानत्मक उद्यान उभारणी (प्रस्तावित) | ४६००.०० |
| ०७ | शिर्डी शहर अंतर्गत भुयारी गटर योजना लोकवर्गणी निधी (शासन निर्णय प्राप्त) | ०२१८.०० |
| ०८ | अति महत्वाच्या व्यक्तींसाठी अतिथीगृह बांधकाम निधी (बांधकाम प्रगतीपथावर) | ०१७०.०० |
| ०९ | शिर्डी येथे अद्यायवत बसस्थानक उभारणी करणे (प्रस्तावित) | ०७६६.०० |
| १० | शिर्डी - शनि शिंगणापूर रस्ता प्रस्तावित निधी मंजूरी ( प्रस्तावित) | ०४५७.०० |
| ११ | बहुउद्देशीय हॉल उभारणी (प्रस्तावित) | २०००.०० |
| १२ | नियोजित ज्ञानसंकुल (Proposed Knowledge Centre) (प्रस्तावित) | ५०००.०० |
| १३ | शिर्डी व शिर्डी परिसर विकास प्राधिकरण अंतर्गत विविध अनुषंगिक कामासाठी (प्रस्तावित) | १००००.०० |
| | **एकूण** → | **४५५११.००** |

उपरोक्त तपशीलवार विवेचनानुसार, पुढील तीन आर्थिक वर्षात, म्हणजेच सन २००८-२००९ ते सन २०१०-२०११ अखेर बांधकाम विभागामार्फत सुरु असणारे विविध बांधकाम प्रकल्पांसाठी, नियोजित प्रकल्पांसाठी तसेच शासन निर्णयानुसार वर्ग करण्यात यावयाच्या रक्कमेचा तपशील पाहतां, अंदाजित रक्कम रुपये ४५५.११ कोटी मात्र इतकी आर्थिक तरतूद ढोबळ मानाने करावी लागणार आहे.

बांधकाम विभागाने आजचे सभेपुढे सादर केलेल्या विविध विकास प्रकल्पांची माहिती व त्यासोबत कराव्या लागणाऱ्या इतर अनुषंगिक बाबींची माहितीबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. उपरोक्त काही विकास प्रकल्पांसाठी त्या-त्या वेळेचे परिस्थितीनुसार कमी-जास्त खर्च येण्याची शक्यता आहे. त्यामुळे उपरोक्त तरतूद ही निश्चित स्वरुपाची आहे असे म्हणता येणार नाही. त्यामुळे उपरोक्त तक्त्यात नमुद केलेल्या विविध विकास प्रकल्पांसाठी येत्या तीन आर्थिक वर्षामध्ये संस्थानच्या आर्थिक अंदाजपत्रकात ढोबळमानाने तरतूद करणेत यावी, असे ठरले. (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.५९** **श्री साईबाबा थ्रीडी फोटो पॉकेट साईज संस्थानमार्फत विक्री करणेबाबत.**

**निर्णय क्र.८१६** परफेक्ट प्रिंट प्रॉडक्टस् प्रा.लि., मुंबई यांचेकडील दि.१६.१०.२००८ चे फॅक्स द्वारे आलेले पत्राने ३.१/२ "x २.१/२" आकाराचे थ्रीडी साईबाबांचे फोटो प्रती नग दर रु.६.६० प्रमाणे देऊ केले आहेत. संस्थानने ५०,००,००० प्रतींची आर्डर दिल्यास प्रती नग रु.५/- प्रमाणे ते पुरविण्यास तयार आहेत.

यापूर्वी त्यांनी दि.०३.०७.२००८ रोजी संस्थानला ११,००० प्रती देणगी म्हणून दिल्या होत्या त्या प्रतींची प्रती नग रू.७/- प्रमाणे दि.०६.०८.२००८ ते दि.३०.०९.२००८ अखेर दोन महिन्यात विक्री झाली होती.

यावर चर्चा होऊन,परफेक्ट प्रिंट प्रॉडक्टस् प्रा.लि.,मुंबई यांचेकडून देणगी दाखल प्राप्त थ्रीडी साईबाबांचे फोटोचा विक्री/खप लक्षात घेता त्यांचे रुपये ६.६० प्रतीनग दराऐवजी रुपये ६.५० प्रती नगाप्रमाणे देण्यास तयार असल्यास सध्या १ लाख नग छपाई करुन घ्यावे असे ठरलें. (कार्यवाही-प्रकाशने विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.६०** **मा.विश्वस्तांचे सुचनेबाबत.**

**निर्णय क्र.८१७** मा.विश्वस्तांनी सभेत खालीलप्रमाणे सुचना मांडल्या त्या मान्य करण्यात आल्या-

(०१) संस्थानचे कार्यालयीन कामासाठी एक स्कार्पिओ अथवा इनोव्हा गाडी खरेदी करण्यात यावी. (कार्यवाही-वाहन विभाग प्रमुख)

(०२) श्रीसाईबाबांनी हाताळलेले/वापरातील साहित्य अथवा वस्तू ज्या साईभक्तांकडे आहेत त्यांना अशा वस्तू संस्थानकडे जमा करणेबाबत अवाहन करण्यात यावे. (कार्यवाही-जनसंपर्क अधिकारी)

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



(०३) संस्थान निवासस्थानांचा सेवा आकार दिनांक १ जानेवारी, २००९ पासून वाढविण्यात यावा. ज्या निवासस्थानाचा सेवा आकार रुपये १००/- आहे त्याचा सेवाआकार रुपये २००/- व ज्या निवासस्थानाचा सेवा आकार २००/- आहे त्याचा रुपये ३००/- करण्यात यावा.

(कार्यवाही-सर्वअधिक्षक-चौकशी निवासस्थान,भक्तनिवासस्थान,धर्मशाळा)

(०४) नविन प्रसादालयात विविध ठिकाणी दक्षिणा पेट्या ठेवण्यात याव्यात.

(कार्यवाही-अधिक्षक, प्रसादालय)

(०५) श्रीसाईलिला मासिकाचे संपादक पदावर पात्र उमेदवाराची नेमणूक करण्यात यावी. तसेच श्रीसाईलिला मासिकात श्री.मोहन जगन्नाथ यादव, जनसंपर्क अधिकारी यांना ५० टक्के लिखाण करणेस सांगण्यात यावे. (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना/जनसंपर्क अधिकारी)

(०६) संस्थान मार्फत तयार करण्यात येत असलेल्या सोन्याचे नाण्यात १० टक्के वाढ करुन ते स्थानिक सराफांना विक्री करण्यात यावे. (कार्यवाही-मुख्य लेखाधिकारी)

वरील निर्णय क्र ७४८ ते ८१७ सर्वानुमते घेण्यात आले आहेत.
यानंतर सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.

स्वाक्षरित/-
(किशोर रा.मोरे)
कार्यकारी अधिकारी
श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

स्वाक्षरित/-
(जयंत मुरलीधर ससाणे )
अध्यक्ष
श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com   For evaluation only.